ई/३४६

# इस्लाम आणि संस्कृति

सय्यद अमीन

## मराठी जाणणाऱ्या विद्वान् मुस्लिमांच्या चष्म्यांतून

" मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद आमदार सय्यद अमीन यांनीं लिहिलेला ' इस्लाम आणि संस्कृति ' हा महत्त्वाचा ग्रन्थ मोठ्या आवडीनें वाचला. धर्म, समाजकारण, राजकारण व तत्त्वज्ञान या इस्लामच्या विविध पैलूंचा वाचनीय इतिहास यामध्यें आहे; इतकेंच नव्हे तर त्याचा जगभर प्रसार कसा व कोणत्या परिस्थितींत झाला आणि आंतरराष्ट्रीय दळणवळण व सुसंस्कृतता वाढविण्यास त्याची कशी मदत झाली याचें विवेचन आढळून येतें. या ग्रन्थांत ग्रन्थकर्त्याचें गाढ ज्ञान व विद्वत्ता प्रकर्षानें दिसून येते आणि म्हणूनच या ग्रंथाची गणना महान् साहित्यामध्यें होईल असा मला विश्वास वाटतो."

—सय्यद अबदुल्ला, एम्.ए., एल्एल्.बी.
(चॅन्सलर्स गोल्ड मेडॅलिस्ट, मुंबई युनिव्हर्सिटी)

" सय्यद अमीन, एम्. एल्. ए., यांनीं संशोधन करून इतका विद्वत्ताप्रचुर ग्रन्थ लिहिल्याबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. विषयाची आकर्षक मांडणी, विद्वत्तापूर्ण विवेचन, उदात्त विचारसरणी, गोड व ओघवती भाषा व डौलदार लेखनशैली हीं या ग्रन्थाची वैशिष्ट्यें आहेत. इतका महत्त्वाचा ग्रन्थ लिहून त्यांनीं मराठी साहित्याचीच नव्हे तर आपल्या राष्ट्राची फार मोठी सेवा केली आहे. सांस्कृतिक ऐक्य ही आपल्या राष्ट्राची फार मोठी शक्ति आहे व ती निर्माण करणें हें आजचें सर्वांत मोठें व महत्त्वाचें कार्य आहे. तें कार्य केल्याबद्दल सय्यद अमीन यांना धन्यवाद."

—खान अब्दुल मजीद, एम्.ए.

" आमदार सय्यद अमीन यांनीं " इस्लाम आणि संस्कृति " हा ग्रन्थ मराठी भाषेंत लिहिल्याबद्दल मला आनंद वाटतो. इस्लामचे विविध पैलू त्यांनीं उत्कृष्टपणें दाखविले आहेत व आपला दृष्टिकोन मांडतांना मुस्लिम व मुस्लिमेतर विद्वानांचे जागोजाग भरपूर हवाले दिले आहेत. हल्लींच्या ढांसळलेल्या आध्यात्मिक व ऐहिक परिस्थितीमधून मानवतेची सुटका करण्याकरितां सर्व जग एका नव्या मार्गाच्या शोधांत आहे. अशा प्रसंगीं या ग्रन्थाचा मोठा उपयोग होण्यासारखा आहे. असा ग्रन्थ मराठी वाचकांपुढें ठेवण्याचें श्रेय आमदार सय्यद अमीन यांनीं मिळविलें आहे. आपल्या देशांत वास्तव्य करणाऱ्या अनेक धर्मियांत समझोता व स्नेहभाव उत्पन्न करण्याचा हा एक स्तुत्य मार्ग होय.

—डॉ. अब्दुल हमीद काझी, एम्.ए., पीएच्.डी.

" ज्यांना धार्मिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती-विषयीं आस्था वाटते त्यांना " इस्लाम आणि संस्कृति " हा ग्रन्थ आवडीनें वाचावा असें वाटेल. श्री. सय्यद अमीन यांना आपल्या विषयाचें पूर्ण ज्ञान असून, तो विषय त्यांनीं सुंदर भाषेंत हाताळला आहे. हा महत्त्वाचा ग्रन्थ इतक्या चातुर्यानें व सुस्पष्ट रीतीनें लिहिल्याबद्दल महाराष्ट्राच्या या नामवंत मुस्लिम ग्रन्थकाराची प्रशंसाच केली पाहिजे."

—शेख अब्दुल अजीझ, एम्.एस्सी. (लंडन)

महाराष्ट्र मुस्लिम साहित्य

( ५ )

# इस्लाम आणि संस्कृति

लेखक

सय्यद अमीन

हजरत मुहम्मद पैगंबर चरित्र, इस्लाम आणि नीतिशास्त्र,
अतातुर्क कमालपाशा, ऐतिहासिक हिंदी मुसलमान
वगैरे मराठी ग्रन्थांचे कर्ते

आवृत्ति पहिली

किंमत ४ रुपये

लेखक व प्रकाशक :--
सय्यद् अहंमद् अमीन,
एम्. एल्. ए.
सांगली

भारतमंत्रि
नामदार न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ
यांचे अध्यक्षतेखालीं
तारीख १७ मे १९५० इसवी रोजीं
प्रकाशित

मुद्रक :—
स. रा. सरदेसाई, बी. ए., एलूएल्. बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा ‘ समर्थ भारत ’ छापखाना,
४१ बुधवार पेठ, पुणें २.



हिज हायनेस श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन
राजासाहेब, सांगली

पितृतुल्य

हिज हायनेस

# श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन

राजासाहेब, सांगली

यांचे सेवेशीं

सप्रेम अर्पण

# विज्ञप्ति

माझें हें नवें प्रकाशन वाचकांच्या हातीं देण्याचा योग येत आहे या-बद्दल प्रथम त्या दयाघन परमेश्वराचे मन:पूर्वक आभार मानतों.

'इस्लाम आणि संस्कृति' हें पुस्तक लिहून झाल्यानंतर त्याला प्रकाशांत आणण्याकरितां माझ्या जिवलग स्नेह्यांनीं जी आस्था दाखविली त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे. पुस्तक प्रकाशित करण्याकरितां ज्या हिंदु-मुस्लिम बांधवांनीं अत्यंत दिलदारपणानें प्रोत्साहन दिलें, त्यांचा मी अत्यंत आभारी आहें.

'मुस्लिम मराठी साहित्य' या नांवाखालीं मीं आतांपर्यंत पुस्तकें प्रकाशित केलीं. मुस्लिम मराठी साहित्यापेक्षां 'महाराष्ट्र मुस्लिम साहित्य' हें नांव अधिक सुटसुटीत व सार्थ आहे असें वाचकांनीं सुचाविल्यामुळें यापुढें 'महाराष्ट्र मुस्लिम साहित्य' या नांवाखालीं पुस्तकें प्रकाशित केलीं जातील.

माझ्या महाराष्ट्रीय बंधु-भगिनींनीं माझ्यावर कृपादृष्टि ठेवून, माझ्या हातून होत असलेली मराठी साहित्याची ओबडधोबड सेवा गोड करून घ्यावी हीच विज्ञप्ति.

सर्वांचा नम्र
सय्यद अमीन

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ | इस्लामपूर्व जग | ... | ... | १ |
| २ | इस्लामचा प्रसार | ... | ... | ८ |
| ३ | इस्लाम आणि धर्मशास्त्र | ... | ... | २१ |
| ४ | इस्लाम आणि समाजशास्त्र | ... | ... | ७८ |
| ५ | इस्लाम आणि राज्यशास्त्र | ... | ... | १२० |
| ६ | इस्लाम आणि तत्त्वज्ञान | ... | ... | १५७ |
| ७ | इस्लाम आणि विज्ञान | ... | ... | १७३ |
| ८ | संस्कृतीचें सारसर्वस्व | ... | ... | २०९ |

# इस्लाम आणि संस्कृति

—o—

## प्रकरण १ लें

## इस्लामपूर्व जग

"सर्व बहुजन समाज अगतिक व अवश झाला होता. त्या स्थितींतून त्याला वर काढण्यासाठीं क्रांति घडवून आणण्याचें यशस्वी कार्य इस्लाम धर्मानें केलें आहे; आणि त्यामुळेंच इस्लामी धर्माचा प्रभाव व यश आश्चर्यावह ठरलें आहे."

—मानवेंद्र रॉय.

पांचवें आणि सहावें शतक म्हणजे जगाच्या राशीला लागलेल्या साडेसातीचा काळ ! या दुर्धर काळांत अखिल जगामध्यें अन्याय, अनाचार आणि बेबंदशाहीला नुसता ऊत आला होता. जिकडे पहावें तिकडे स्वातंत्र्याची मुस्कटदाबी, सदाचाराची अवहेलना आणि सद्विचाराची होळी चालली होती. बलिष्ठांनीं अनाथांवर अत्याचार करावेत, श्रीमंतांनीं गरिबांना भरडून काढावें, राज्य-कर्त्यांनीं आपल्या प्रजाजनांवर दडपशाहीचा वरवंटा फिरवावा, धनिकांनीं गुलामांना पशूंप्रमाणें वागवावें, पुरुषांनीं स्त्रियांची विटंबना करावी, पुरोहित वर्गानें धर्माच्या नांवावर अनन्वित व अमानुष कृत्यें करावींत असे हृदयविदारक प्रकार जगामध्यें राजरोस चालले होते.

निरनिराळ्या धर्मप्रवर्तकांनीं प्रज्वलित केलेलें धर्मदीप विझूं लागले, त्यांची तेजस्वी शिकवण निष्प्रभ होऊं लागली, त्यांच्या अवतारकार्याची विस्मृती पडूं लागली. जगाच्या उद्धाराकरितां, त्या महात्म्यांनीं केलेली अविश्रांत मेहनत वायां चालली; मानवांच्या कल्याणाकरितां त्यांनीं प्रस्थापित केलेली संस्कृती मातीच्या मोलानें विकूं लागली; समाजाच्या स्वास्थ्याकरितां त्यांनीं घालून दिलेल्या नीतिनियमांची दिवसाढवळ्या पायमल्ली होऊं लागली. त्या वेळची एकंदर परिस्थिति पाहिली म्हणजे सारें जग अधःपाताच्या धारेस लागलें होतें असा आपणांस निर्वाळा द्यावा लागेल.

अपवाद म्हणून नांव घेतां येईल असें एकही राष्ट्र नव्हतें किंवा एकही देश नव्हता कीं ज्या राष्ट्रांत किंवा देशांत आबादीआबाद किंवा सुव्यवस्था होती. त्या काळीं अगदीं सुधारलेलें राष्ट्र म्हणून ज्याचा उदोउदो चालला होता, त्या रोमन राष्ट्रांत तर जनतेच्या स्वातंत्र्याची बिनदिक्कत गळचेपी सुरू होती, गुलामांचा व्यापार राजरोस सुरू होता, गोरगरीब अक्षरशः नागविलें जात होतें.

पर्शियामध्यें समाजव्यवस्था अत्यंत विस्कळित झाली होती. समाजाला योग्य वळण लावणारा कोणीही नेता उरला नव्हता. राजानें वाटेल ते अनन्वित अत्याचार केले किंवा अनिष्ट प्रथा पाडली तर त्याविरुद्ध ब्र काढण्याची सोय नव्हती. मेझदकनें अनेक लाजिरवाणे रिवाज सुरू केले पण त्याचा निषेध करावयाचें धाडस कोणासही होत नसे. स्त्रीपुरुषांच्या एकत्र मैफिली बोलवावयाच्या, पुरुषांना दारू पिऊन धुंद करावयाचे आणि त्यांच्याकडून स्त्रियांची विटंबना चालू झाली म्हणजे तें दृश्य पाहण्यांत आनंद मानावयाचा निंद्य प्रघात त्यानें पाडला होता. नवपरिणत वधूला गुरूच्या सेवे-

साठीं एक आठवडाभर ठेवावयाची रूढीं अत्यंत चीड आणण्यासारखी होती. सख्या भाऊबहिणींमध्यें तर सर्रास लग्नें होत.

ग्रीस एवढा तत्त्वज्ञांचा देश! पण त्याची अत्यंत अवनती झाली होती. तेथील जनता तत्त्वज्ञानाच्या गोष्टी पार विसरून गेली होती. चैन आणि ऐषआराम यांकडे सर्वांचें लक्ष केंद्रीभूत झालें होतें. लग्नाशिवाय स्त्रियांशीं संबंध ठेवणें भूषणास्पद मानलें जाई. बेताल आचरणामुळें ग्रीक लोकांत भयंकर लैंगिक रोगांचा फैलाव झाला होता; निष्पाप स्त्रियांना त्याची झळ लागणें साहजिक होतें. ग्रीक स्त्रिया जात्याच सौंदर्यवान होत्या; पण त्या सौंदर्याचा लिलांव पुकारला जाई.

स्पेन देश म्हणजे श्रीमंत सुखासक्तांचें आगर, धनिकांचें मनसोक्त चैन करण्याचें एकमेव ठिकाण, अशी त्या देशाची ख्याति होती. अन्नपाण्यावांचून तडफडत असलेल्या जनतेचा आर्तस्वर भव्य प्रासादांमध्यें सुंदर स्त्रियांच्या घोळक्यांत रममाण होणाऱ्या श्रीमंतांना कधींच ऐकूं जात नसे. गरीब लोकांच्या दु:खावर डागण्या देण्याकरितांच कीं काय त्यांच्या सुंदर स्त्रियांना जबरदस्तीनें अंत:पुरांत खेचून नेण्यांत येई. तेथील धर्मगुरूंनीं तर ताळतंत्रच सोडला होता. व्यभिचार करणें हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असें ते म्हणत. प्रसिद्ध इतिहासकार गिबन म्हणतो, "हे धर्मगुरु आपण घेतलेली ब्रह्मचर्याची शपथ विसरून अनेक स्त्रियांशीं संबध ठेवीत." गुलामगिरी तर व्यवस्थित चालू होती. भर बाजारांत स्त्रीपुरुषांना उभे करून त्यांना विकण्यांत येई.

बायझंटाईन साम्राज्यांत तर राजा म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर आणि त्याचा शब्द म्हणजे बायबलचा शब्द असें समजण्यांत येई. प्रजेचें

जीवित आणि मालमत्ता यांचा एकमेव धनी म्हणजे राजा असा सांप्रदाय चालू असे. त्याच्याइतकाच पुरोहित किंवा धर्मपंडित यांचा बडेजाव होता. त्यांच्याविरुद्ध ब्र काढणें म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूला आव्हान करण्यासारखें होतें. एका मान्यवर स्त्रीनें तत्त्वज्ञानावर प्रवचन करीत असतां पुरोहितवर्गावर टीका करण्याचें धाडस केलें म्हणून आलेक्झाँड्रीयाच्या भर रस्त्यावर गाडींतून ओढून काढून तिला नग्न करण्यांत आलें व तशा अवस्थेंत तिच्या उघड्या अंगावर फटक्यांचा मार देण्यांत आला. शेवटीं तिला चर्चमध्यें तशीच फरफटत नेऊन मुख्य पुरोहिताच्या धर्मदंडानें ठार मारण्यांत आलें. त्यानंतर तिच्या प्रेताची विटंबना करण्यांत येऊन तिचा एकएक अवयव तोडून काढण्यांत आला. विख्यात तत्त्वज्ञ डॉ. ड्रेपरनें या प्रसंगाचें अत्यंत हृदयविदारक वर्णन केलें आहे.†

कॉन्स्टँटिनोपलमध्यें हीच अवस्था होती. एक मान्यवर ग्रंथकार लिहितो, " अनन्वित अत्याचार, समाजद्रोह आणि अधःपाताचीं कृत्यें यामध्यें पुरोहित वर्गाचा सदैव हात असणें हाच जणूं कांहीं त्या काळचा दंडक होता. अशा प्रसंगीं प्रत्येक कायदा—मग तो मानवी असो वा दैवी असो—पायदळीं तुडविला जात असे; ख्रिश्चन देवळें व तेथील व्यासपीठें रक्तानें न्हाऊन निघत; अनाचारापासून एकही स्थळ अलिप्त नव्हतें; सामाजिक बंधनें पार तुटून गेलीं होतीं, आणि दिवसाढवळ्या अंगावर रोमांच उभे करणारे अनेक अत्याचार घडत."* यापुढें जाऊन गिबन म्हणतो कीं 'एखाद्यास शांतपणें मृत्यु आला तर तें भाग्याचें लक्षण समजलें जात असे;

† History of the Conflict between Religion & Science, Page 55.

* Spirit of Islam, Page 35.

पण असा मृत्यु क्वचितच येत असे.' वरील उद्गारांवरून मानवी जीवित किती अशाश्वत व धोक्याचें होतें याची आपणांस कल्पना येईल.

अरबस्तानमध्यें तर अध:पाताचा कळसच झाला होता. बेबंदशाही, खून, लांचलुचपत, मदिरासक्ति, जुगार, व्यभिचार इत्यादि प्रकार विनासंकोच सर्व देशभर चालू होते. जीविताची शाश्वती तर कोणालाच वाटत नसे. कोणाच्या तलवारीला केव्हां बळी पडावें लागेल याचा कांहीं नेम नव्हता. 'बळी तो कान पिळी' या तत्त्वाचा अवलंब सर्वत्र केला जात असे. अरब जन्मत:च शूर व बेडर पण या शूरपणाचा व बेडरवृत्तीचा दुरुपयोग झालेला दिसून येई. त्या ठिकाणीं कोणतीही राज्यसत्ता नसल्यामुळें तेथील जनता बेलगामी वृत्तीनें वागे. धर्म म्हणजे काय चीज आहे हें तेथील जनतेस माहित नव्हतें. वाडवडिलांनीं जी रूढी घालून दिली, तिचें अवलंबन करणें ती आपलें कर्तव्य समजे. त्या काळीं मूर्तिपूजेचें विलक्षण बंड होतें. मूर्तीपुढें दर रोज हजारों जीवांची हत्त्या होत असे; इतकेंच नव्हे तर कित्येक ठिकाणीं मानवांचे बळी दिले जात. मक्केमधील प्रसिद्ध अशा काबा मंदिरांत ३६० मूर्ती बसविल्या होत्या. प्रत्येक दिवशीं एकेका मूर्तीची पूजा केली जाई. पूजा चालू असतां, नग्न स्त्रियांचा नाच चालूं असे. प्रसाद म्हणून मदिरेची मुक्त हस्तानें खैरात होई. मदिरापान हें अरबांचें सर्वांत मोठें व्यसन. प्रत्येक व्यक्तीनें दररोज मदिरेचा आस्वाद घेतलाच पाहिजे असा रिवाज रूढ होता. रस्त्याच्या कोंपऱ्या-कोंपऱ्यावर दारूचे हंडे भरून ठेविलेले असत. अरबांचें दुसरें मोठें व्यसन म्हणजे जुगार. गल्लोगल्लीं जुगाराचे अड्डे चालत. सर्व पैसे संपले म्हणजे अरब स्वत:ला पणाला लावीत.

स्त्रियांच्या दुर्दैवाचे दशावतार त्या काळीं कोठें दिसून येत असतील तर ते अरबस्तानांतच. स्त्रिया या सैतानांच्या सूत्रधार आहेत; स्त्री म्हणजे पुरुषजातीवरील महान संकट; कार्यांत बिघाड व्हावा अशी इच्छा असेल त्यानें प्रथम स्त्रीचें तोंड पहावें; अशा कित्येक म्हणी त्या ठिकाणीं प्रसृत होत्या. स्त्री म्हणजे उपभोग्य वस्तु या पलिकडे तिला कांहीं महत्व नव्हतें. स्त्रियांना दर्जा किंवा इज्जत असूंच शकत नाहीं असा अरबांचा दावा होता. एकादी स्त्री सौंदर्यवती असेल तर तिची विटंबना विचारावयास नको. भर रस्त्यांत अशा स्त्रीचा पदर ओढणें, तिला धक्के देणें, तिच्याबद्दल अचकट विचकट उद्गार काढणें हे प्रकार व्हावयाचेच. प्रतिभा हा अरबांचा अभिजात गुण पण त्या प्रतिभेचा उपयोग स्त्रियांबद्दल अश्लिल काव्य करण्यांत होई. एकाद्याला मुलगी झालीं कीं 'शांतं पापं' समजून तिला जिवंत मूठमाती देण्यांत येई. आपल्या सावत्र आईशीं लग्न लावण्यांत त्यांना काडीमात्र शरम वाटत नसे.

इतर देशांप्रमाणें अरबस्तानांतही गुलामगिरी रूढ होती. गुरांढोरांप्रमाणें दावणींत बांधून गुलामांना विकण्याकरितां मोठमोठ्या शहरीं नेण्यांत येत असे. गुलाम स्त्रियांना विकत घेऊन त्यांच्या शरीर-विक्रयावर अरब लोक पैसे मिळवीत. तेथील कुंटणखान्यांत प्रामुख्यानें अशाच स्त्रियांचा विशेष भरणा असे.

वरील विवेचनावरून त्या काळीं सर्व जगाचा कसा अधःपात झाला होता याची आपणांस सर्व साधारण कल्पना येईल. डेनिसन नांवाचा विख्यात तत्त्वज्ञ आपल्या Emotion as the Basis of Civilization या आपल्या ग्रंथांत म्हणतो, "पांचव्या व सहाव्या शतकांत सर्व जग अधःपाताच्या कक्षेंत गेलें होतें. प्रेम, आदर

यांची शिकवण देणारे, प्राचीन विचार व भावना यांचा लोप झाला होता. संपूर्ण रानटी व तमोयुगाकडे सर्व जग झपाट्यानें परतूं लागलें होतें. सर्व शक्तींचा वापर करून जगास विनाशापासून वांचविणारा आणि संस्कृतीचें रक्षण करणारा कोणी त्राता त्या काळीं होता काय?" स्वतःच विचारलेल्या या प्रश्नाचें उत्तर त्यां ग्रंथकारानें दिलें आहे. तो म्हणतो, "याच अरब लोकांत, पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पसरलेल्या जगांत ऐक्य निर्माण करून, विनाशापासून जगाचें संरक्षण करणारा महान पुरुष—मुहम्मद पैगंबर—निर्माण झाला."

## प्रकरण २ रें

# इस्लामचा प्रसार

"मुहम्मद पैगंबरांच्या मृत्यूनंतर पहिल्या शतकांतील मुस्लिम विजयाची कथा म्हणजे जगाच्या इतिहासांत आश्चर्यानें थक्क करून सोडणारी घटना होय."†

—प्रो. सी. आर नॉर्थ.

हजरत मुहम्मद पैगंबरांच्या मृत्यूनंतर, त्यांच्या एकनिष्ठ अनुयायांनीं जो अभूतपूर्व विजय मिळविला, त्याला जगाच्या इतिहासांत क्वचित्‌च तोड मिळेल. अरबस्तानसारख्या मागासलेल्या राष्ट्रांतील मुस्लिमांनीं प्रचंड अशा रोमन साम्राज्याशीं टक्कर मारून तें खिळखिळें करून टाकलें, पर्शिया व बायझंटाईनसारख्या बलाढ्य राष्ट्रांना धूळ चारली व पैगंबराच्या मृत्यूनंतर अवघ्या तीस वर्षांत ॲटलांटिक महासागरापर्यंत आपला विजयध्वज फडकावून अर्ध्या युरोपखंडावर स्वामित्व मिळविलें ही गोष्ट सर्वांना विस्मित करून टाकणारी आहे.

पराक्रम हा अरबांचा अभिजात गुण; तलवार आणि घोडा म्हणजे अरबांचे पंचप्राण ही समजूत सर्वत्र प्रचलित होती. लढाऊ शिक्षणाचें बाळकडू प्रत्येक अरबास मिळत असे. बेडरपणा हा अरबाच्या हाडीमांसीं खिळल्यामुळें समरभूमी म्हणजे क्रीडांगण असें त्यांना वाटे. या धाडसी व पराक्रमी मनोवृत्तीस ऐक्य व समानध्येय यांची जोड मिळाल्यामुळें अरबांनीं जगाला थक्क करून सोडणारे विजय मिळविले.

† An Outline of Islam, Page 39.

हजरत महम्मद पैगंबरांनंतर हजरत अबुबकर यांची खलिफा (राज्य-प्रमुख) म्हणून निवड झाली. इस्लामधर्म व राष्ट्र यांचें नेतृत्व स्वीकारण्याची जी प्रचंड जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली होती ती त्यांनीं यशस्वी रीतीनें पार पडली. त्यांची कारकीर्द फक्त २ वर्षें ३ महिनेच झाली; पण इतक्या अल्पावधींत इराक, सिरियाचा दक्षिणभाग, पर्शिया व बायझंटाईन साम्राज्यामधील कांहीं प्रदेश हस्तगत करण्यांत आला. खालीदसारखा पराक्रमी सेनापति मुस्लिम सैन्याला मिळाल्यामुळें इतक्या लवकर वरील प्रदेश काबीज करणें शक्य झालें. त्यानंतर हजरत उमर खलिफा बनले. त्यांनीं दहा वर्षें सत्ता गाजविली. हजरत उमर यांची कारकीर्द म्हणजे इस्लामी इतिहासामधील दैदिप्यमान काळ असें समजलें जातें. त्यांचा निःपक्षपाती कारभार आणि त्यांनीं केलेल्या अनेक सुधारणा आज चिरंजीव होऊन राहिल्या आहेत. राज्यप्रमुख म्हणजे प्रजेचा सेवक ही म्हण त्यांनीं यथार्थतेनें अमलांत आणली होती. रात्रीं शहरांतून गस्त घालीत असतां एका अनाथ स्त्रीचें कण्हणें ऐकून, त्यांनीं समक्ष चौकशी केली. त्या बाईस प्रसूति-वेदना होत असून तिच्याजवळ कोणीही नाहीं असें दिसून आल्यानंतर त्यांनीं स्वतःच्या पत्नीस बोलावून आणलें व तिच्या हातून त्या बाईचें बाळंतपण सुखरूपपणें करविलें. न्यायाच्या बाबतींत हजरत उमर यांनीं इस्लामची शिकवण तंतोतंत अमलांत आणली होती. आपला स्वतःचा मुलगा दोषी आहे असें सिद्ध झाल्यानंतर त्याला फटके मारावयास कोणीच धजेना. हजरत उमर यांनीं स्वतः आपल्या हातांत आसूड घेतला आणि आपल्या मुलाच्या उघड्या अंगावर फटके लगावले.

हजरत उमर यांच्या कारकीर्दींत मुस्लिमांनीं बॅबिलोन पादाक्रांत

केला. इराणमध्यें सैन्य घुसवून तेहरान, हमदान व इस्पहान इत्यादि मोठीं शहरें हस्तगत केलीं. रोमन साम्राज्याला टक्कर देऊन, इजिप्त सर केला. उत्तर आफ्रिकेवर मोहीम करून बरका व ट्रिपोली ताब्यांत घेतलीं. तिकडे सिरियामधून आर्मेनिया व जॉर्जियावर कबजा केला. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सायप्रस बेटावर समुद्रामधून हल्ला चढवून त्यावर आपलें निशाण फडकावलें. राज्याचा हा वाढता पसारा पाहून हजरत उमर यांनीं ठिकठिकाणीं लष्करी केंद्रें प्रस्थापित केलीं आणि आपल्या सैन्याची नव्या धर्तीवर रचना केली.

विजयामुळें एक प्रकारची मस्त निशा सैन्यामध्यें फैलावते, तिला आळा घालण्याची खबरदारी हजरत उमर व त्यांच्या नंतरच्या खलिफांनीं घेतली होती. इस्लाम धर्मांतील सहिष्णुता व मानवता या दोन महान तत्त्वांचा विसर मुस्लिम सैन्याला पडतां कामा नये असा त्यांचा कटाक्ष होता. मुलुखगिरी करावयास निघालेल्या आपल्या सैन्यास " जनतेशीं अदबीनें वागा; वृद्ध, स्त्रिया, आणि मुलें यांच्यावर हत्यार उगारूं नका; नागरिकांचीं घरेंदारें व पिकें उध्वस्त करूं नका." असा संदेश देत. देश पादाक्रांत केल्यानंतर, तेथील नागरिकांना अत्यंत सहिष्णुतेनें वागविण्यांत येई. ते परधर्मीय म्हणून त्यांचा कधींही छळ करण्यांत येत नसे; उलट शाही फर्मान काढून त्यांचे सर्व हक्क अबाधित राखले जात. त्यांच्या धर्मांत ढवळाढवळ करण्याचें किंवा जबरदस्तीनें आपला धर्म लादण्याचें पाप कधींही होत नसे. सुप्रसिद्ध इतिहासकार गिबन यानें ' रोमन साम्राज्याचा उदयास्त ' या आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं काढलेले उद्गार मनन करण्यासारखे आहेत. तो म्हणतो, " जेरूसलेम ज्या वेळीं उमर खलिफाच्या स्वाधीन करण्यांत आलें, त्या वेळीं

तेथील नागरिकांना यत्किंचितही त्रास देण्यांत आला नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यांची मालमत्ता त्यांच्या स्वाधीन ठेवण्यांत आली. त्यांच्या उपासनेंत कसलाही व्यत्यय आला नाहीं. ख्रिस्ती लोक, त्यांचे धर्मगुरु व त्यांचे कुलपती यांसाठीं त्या शहरांत स्वतंत्र विभाग राखून ठेवण्यांत आला.... धर्मयुद्धाच्या शेवटीं ज्या वेळीं जेरूसलेम परत देण्यांत आलें, त्या वेळीं तेथील पौर्वात्य ख्रिस्ती लोकांना मुस्लिम खलिफांच्या सहिष्णु राज्याची अत्यंत आठवण होत असे."

खलिफांच्या या दिलदार वृत्तीमुळेंच इस्लाम प्रसाराचा मार्ग पुष्कळसा सुगम झाला. जित देशांतील नागरिकांना मुस्लिमांच्या या औदार्यपूर्ण मनोवृत्तीबद्दल अत्यंत आदर वाटे; कारण जेत्यांकडून अशा तऱ्हेची उदार वागणूक त्यांना कधींही मिळाली नव्हती. त्यांच्या देशावर रोमन, इराणी लोकांच्या स्वाऱ्या होत, त्या वेळीं त्यांची संपत्ति लुटली जात असे, अनन्वित अत्याचार घडत, सबंध देश रक्तानें न्हाऊन निघत असे. मुस्लिम व ख्रिश्चन जेत्यांच्या या परस्पर विरोधी वृत्तींचें पृथःकरण करतांना पॉवेल नांवाचा विख्यात लेखक म्हणतो, "या विजयाच्या लढयामध्यें मुस्लिमांनीं जी उदारवृत्ती दाखविली, ती पाहून कित्येक ख्रिश्चन राष्ट्रांनीं लाजेनें खालीं माना घातल्या."† या उदार वृत्तीची फेड ख्रिश्चन जेत्यांनीं कशी केली याचें विवरण शेवटच्या प्रकरणांत विस्तारानें केलें आहे, तिकडे वाचकांनीं अवश्य लक्ष द्यावें.

मुस्लिमांना ठिकठिकाणीं जे स्पृहणीय विजय मिळाले, त्याची कारणपरंपरा भाई मानवेंद्र रॉय यांनीं उत्कृष्ट रीतीनें दाखविली आहे. ते म्हणतात, "धर्मवेडया लोकांची लुटालूट म्हणजेच इस्लामचा इतिहास

† The Struggle for Power in Asia, Page 48.

असें ज्यांना वाटतें, त्यांना काय म्हणावें तेंच कळत नाहीं. कारण 'अल्लाहो अकबर'च्या गर्जनेनें कुराण किंवा तलवार यांपैकीं एकाची निवड करावयास इस्लामनें–मुहम्मदानें सांगितलें असें जे मानतात त्यांना हें माहित तरी नसावें किंवा ते तिकडे दुर्लक्ष तरी करीत असावेत कीं, मुहम्मदाच्या पाठोपाठ त्यांच्या गादीवर आलेल्यांनीं ऐहिक विजयावरच भर दिला. ते सर्व औदार्य, पावित्र्य आणि भूतदया इत्यादि गुणांमध्यें मानवी समाजावर तुटून पडणाऱ्या ॲलरिक, चैंगीजखान, वगैरे रानटी लोकांपेक्षां कितीतरी श्रेष्ठ होते. त्यांच्या भक्तींभोंवतीं रूढीचें अवलय असेल परंतु ते दांभिक नव्हते. व्यवहारज्ञान व औदार्य यांनीं त्यांच्या धर्मवेडाला हळुवारपणा आणला होता. ते महत्त्वाकांक्षी होते पण पूर्णपणें निःस्वार्थी होते. देवभक्तीच्या नांवाखालीं ते आपली धनभक्ति झांकीत नव्हते. धर्मरक्षक अबुबकर यांच्याइतकी भक्तिवान्, उदात्त, कार्यनिष्ठ व नम्र व्यक्ति इतिहासांत शोधूं जातां सांपडणार नाहीं. त्यानें सेनेला दिलेला संस्मरणीय संदेश पहा : ' न्यायी बना, अन्यायानें वागणारे कधींच उन्नत होत नसतात. धैर्यशाली बना, मरण पत्करा, पण शरण जाऊं नका. दया दाखवा; वृद्ध, स्त्रिया आणि मुलें यांना मारूं नका; फळझाडें, धान्य आणि पशू यांचा नाश करूं नका. शत्रूला देखील दिलेलें वचन पाळा.' या आज्ञा मनापासून सोडल्या व पाळल्या जात म्हणून तर अप्रतिहतपणें विजय मिळत असत. अरबस्वारांचें सर्वत्र ' स्वातंत्र्यदाते ' म्हणून स्वागत होत असे. मुहम्मदाची क्रांतिकारक शिकवण निष्ठेनें तंतोतंत पाळणारे आणि सुज्ञ खलिपांच्या आदेशाप्रमाणें आचरण करणारे, लोकांच्या सहानुभूतीस कां बरे पात्र होणार नाहींत ? ''†

† Historical Roll of Islam, Page 15.

हजरत उमर यांच्यानंतर हजरत उस्मान हे खलिफा बनले. त्यांची एकंदर कारकीर्द १२ वर्षांची झाली. या अवधींत मुस्लिमांनीं अनेक विजय मिळविले व आपल्या राज्याची हद्द ऑक्सस व पूर्वेंकडे अफगाणिस्तानपर्यंत भिडविली. हजरत अली हे नंतरचे खलिफा होत. त्यांच्या पांच वर्षांच्या कारकीर्दींत अंतर्गत झगडे निर्माण झाल्यामुळें राज्याची व्हावी तशी वाढ होऊं शकली नाहीं. त्यांच्यानंतर खलिफा मुआविया यांच्या कारकीर्दींत पूर्वेस हिंदुस्तानांतील सिंधुनदीपर्यंत व पश्चिमेस टुनिसियापर्यंत मुस्लिमांनीं धडक मारली. खलिफा अबुलमालिक व अलवलिद्‌ची अमदानी म्हणजे मुस्लिमाच्या विजयाचा उच्चांक. दमास्कस, अलेक्झांड्रीया, कार्थेज आणि जेरूसलेम हीं राजधानी असलेलीं ख्रिश्चन शहरें मुस्लिमांनीं हस्तगत केलीं. खलिफा अलवलीदचा शूर सेनापति मुसा याच्या नेतृत्वाखालीं मुस्लिमसैन्यानें जिब्राल्टर सर करून स्पेनवर हल्ला चढविला. स्पेनच्या बादशाहानें मुस्लिम सैन्याला थोपवून धरण्याची शिकस्त केली पण तिचा काडीमात्र उपयोग न होतां स्पेन देशावर मुस्लिमांचा झेंडा फडकला. स्पेनमध्यें मुस्लिमांचें आगमन म्हणजे संस्कृतीची प्राणप्रतिष्ठा असा इतिहासकारांनीं निर्वाळा दिला आहे; इतकेंच नव्हे तर "स्पेनदेशांत मुस्लिम सत्ता राहिली म्हणूनच युरोपमध्यें ज्ञानदीप प्रज्वलित झाला" असा त्यांनीं कबूलीजबाब दिला आहे. साहित्य व शास्त्र यांच्या उत्कर्षाकरितां स्पेनच्या अरबांनीं जे भगीरथ प्रयत्न केले त्यांचा विचार केला म्हणजे आजच्या युरोपखंडाला, अरबांनीं निरनिराळे उपयुक्त शोध लावून, कायमचें ऋणी करून ठेविलें आहे असें म्हणावयास आपल्याजवळ भरपूर पुरावा आहे.† मुस्लिमांनीं प्रथमच प्रस्थापित केलेल्या क्रोडावा विश्वविद्यालयांत

† The History of Mahomedan Empire in Spain, P. 322.

युरोपमधून अनेक विद्यार्थी विद्याभ्यासाकरितां येत; त्यांनीं सुरू केलेल्या संशोधन कार्यांत अनेक युरोपियन मुमुक्षू भाग घेत. कला, साहित्य, शास्त्र अशा अनेकविध क्षेत्रांत मुस्लिमांनीं केलेली कामगिरी कित्येक शतकांपर्यंत युरोपनें आपल्यापुढें आदर्श म्हणून ठेविली होती. स्टॅनले लेनपूल म्हणतो, "कला, शास्त्र आणि संस्कृती या बाबतींत स्पेनची राजधानी कोर्डावा ही 'सर्व जगाचे डोळे दिपवून टाकणारें वैभव' अशा यथार्थ संज्ञेनें ओळखली जात होती."§ स्पेन-मधील मुस्लिमांनीं युरोपासच नव्हे तर सर्व जगास कसें ऋणी करून ठेविलें आहे याचें विवेचन आपल्या ग्रंथांत विस्तारानें केलें आहे. मुस्लिमांची स्पेनमधील ७८० वर्षांची कारकीर्द म्हणजे मानवी संस्कृतीमध्यें पडलेली मोलाची भर असें सर्वत्र म्हटलें जातें.

स्पेन हस्तगत केल्यानंतर मुस्लिमांनीं फ्रान्सवर चढाई करून तो देश अर्धाअधिक काबीज केला. यानंतर मात्र चार्लस मार्टेलनें त्यांना पुढें सरकूं दिलें नाहीं. ही गोष्ट इ. स. ७३२ सालीं घडली. इकडे पूर्वेस चिनी तुर्कस्तान घेतल्यानंतर सिंधूनद ओलांडून मुलतान शहर सर करण्यांत आलें. त्यानंतर मुस्लिमांनीं भूमध्य समुद्रांतून इटलीवर हल्ला चढविला आणि क्रीट व सिसली हीं बेटें घेतलीं. शेवटीं त्यांनीं इटलीच्या काळजाला–रोमला–हात घातला. रोममध्यें मुस्लिमांच्या नौबती झडूं लागल्या. रोमसारखें अत्यंत महत्त्वाचें शहर पडल्यामुळें सबंध इटलीमध्यें नैराश्य पसरलें व त्याचाच परिणाम म्हणजे सबंध इटली त्यांच्या हस्तगत झाला. आपल्या अतुल पराक्रमानें मुस्लिमांनीं अवघ्या शंभर वर्षांत एक महान इस्लामी साम्राज्य प्रस्थापित केलें. डॉ. ड्रेपर म्हणतो, "जगानें

§ Moors in Spain, Page 151.

आतांपर्यंत पाहिलें नाहीं असें अत्यंत सामर्थ्यवान इस्लामी साम्राज्य एकदम अस्तित्वांत आलें. ॲटलांटिक महासागरापासून चीनपर्यंत, कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यापासून हिंदी महासागरापर्यंत हें साम्राज्य पसरलें."†

या अभूतपूर्व विजयपरंपरेबद्दल एक ग्रंथकार म्हणतो, "इस्लाम धर्माचा ध्वज पुढें पुढें चालला याचें कारण त्यांतील स्वातंत्र्य व समता हीं तत्त्वें हेंच होय. अरबांनीं जे ख्रिश्चन प्रदेश जिंकले तेथें गमतीची गोष्ट ही कीं, अरबांची प्रगती झाली आहे या भावनेनेंच सामान्य बहुजन मुस्लिम धर्माकडे आदरानें पहात असत. ख्रिश्चन सरकारांना हें लांछनास्पद आहे कीं त्यांची बहुतेक ठिकाणची राज्यव्यवस्था जुलमी होती. सिरियाच्या रहिवाश्यांनीं मुस्लिमांचें स्वागतच केलें. इजिप्तच्या लोकांनीं आपला देश अरबांच्या हातीं जावा असे प्रयत्न केले; आफ्रिकेंतील स्वारींत बर्बरांनीं मदत केली. कॉन्स्टँटिनोपलच्या विद्वेषामुळें या सर्व राष्ट्रांना आपले देश अरबी सत्तेच्या स्वाधीन व्हावेत असें वाटलें."*

वरील उद्गारावरून, मुस्लिमांच्या पराक्रमाबरोबर त्यांची उदारवृत्ती, सहिष्णुता त्यांच्या विजयपरंपरेस कारणीभूत झाली आहेत असें आपणांस दिसून येईल. देश पादाक्रांत केल्यावर तेथील जनतेची मुस्कटदाबी करून, त्यांना सर्वस्वी गुलाम करून ठेवण्याचें कृत्य त्यांनीं केलें नाहीं; तलवारीच्या जोरावर त्यांच्या धर्मावर आघात करण्याचा आततायीपणा त्यांनीं केला नाहीं किंवा त्यांना अज्ञानांत ठेवून आपला वरचष्मा त्यांच्यावर सदैव राहील असा प्रयत्नही पण केला नाहीं.

---

† History of the Conflict between Religion & Science, Page 98.

* Historical Roll of Islam, Page 54.

ते ज्या ठिकाणीं जेते म्हणून गेले, त्या ठिकाणीं त्यांनीं तेथील जनतेला संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य व धर्मस्वातंत्र्य दिलें इतकेंच नव्हे तिला सुसंस्कृत करण्याची थोर वृत्ति त्यांनीं दाखविली आहे. इस्लाममध्यें समता कसोशीनें पाळण्यांत येत असल्यामुळें दलितांना तर अरब जेते आपले उद्धारकर्ते वाटत. रेनौडॉट लिहितो, "इजिप्तमधील मुस्लिम मॅजिस्ट्रेट हे धर्मगुरु, कुलपति इत्यादि सर्व लोकांचे हक्क, दर्जा व अंतर्गत कारभाराचें स्वातंत्र्य पूर्णपणें रक्षीत असत. कित्येकांना शहर अगर प्रांताधिकारी बनवून त्यांचा गुणगौरव केला जात असे. एका खलिफानें इराणचें राज्ययंत्र चालविण्यास ख्रिश्चन लोक विश्वासार्ह आहेत असें घोषित केलें होतें."†

परधर्मीय प्रजाजनांना विश्वासांत घेऊन, त्यांच्याशीं समरस होण्याची कला मुस्लिम जेत्यांनीं साध्य केली होती. आपल्याशीं ते इमानानें वागतील का, आपल्या विरुद्ध कांहीं कारस्थान तर ते करणार नाहींत, अशा शंका मनांत बाळगून त्यांची निष्ठा कसाला लावण्याचा हास्यास्पद उद्योग न करितां, त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचा दिलदारपणा ते प्रदर्शित करीत. या आत्मीयतेमुळें प्रजाजनांना त्यांच्याशीं बेइमान व्हावें असें कधींच वाटलें नाहीं. मनुष्य विश्वासाची किंवा उदारवृत्तीची फेड सहसा कृतघ्नतेनें करीत नाहीं हें मुस्लिमांनीं पूर्णपणें ओळखलें होतें. परधर्मीय प्रजाजनांवर मुस्लिमांनीं संपूर्ण विश्वास टाकल्याचीं अनेक उदाहरणें इतिहासांत जागोजाग आढळून येतील. हिंदुस्थानावर पहिली स्वारी करणारा मुहम्मद इब्न कासीम हा हिंदुस्थानी वातावरणास सर्वस्वीं अपरिचित होता. त्याच्याविषयीं इलियट आपल्या "हिंदुस्थानचा इतिहास" ग्रंथांत

---

† Historical Roll of Islam Page, 46.

म्हणतो, "त्यानें ब्राह्मण सत्ताधारी वर्गाला विश्वासांत घेऊन, देशांत शांतता प्रस्थापित करण्याचें कार्य त्यांच्यावर सोंपविलें. त्यांचीं देवळें सुस्थितींत ठेवण्याची परवानगी दिली, त्यांना आपल्या धर्माप्रमाणें वागण्यास कधींही हरकत केली नाहीं, वसूल त्यांचेच हातीं ठेवला, इतकेंच नव्हे तर पूर्वीची राज्यव्यवस्था चालू ठेवण्यासाठीं त्यांचीच योजना केली." मोंगल रियासतींत तर मोठमोठया जबाबदारीच्या हुद्यांवर हिंदूंची नेमणूक करण्यांत येई. हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं विखुरलेल्या निरनिराळ्या मुस्लिम राजवटींत मुख्य प्रधान-पदावर मुस्लिमेतरांना नेमण्यांत आल्याचे दाखले आहेत. विशेषत: ज्या औरंगजेब बादशाहाविषयीं प्रखर टीका केली जाते त्या बादशाहांनीं आपल्या साम्राज्याचे मुख्य प्रधान म्हणून पंडित रघुनाथ खत्री व मुख्य सेनापति म्हणून जयसिंग यांची नेमणूक केली होती ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आपण सोईस्करपणें विसरतां कामा नये.

परधर्मीय नागरिकांना सुसंस्कृत करण्याकरितां, मुस्लिम जेत्यांनीं जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचें ऋण कधींहीं विसरलें जाणें शक्य नाहीं. ठिकठिकाणीं त्यांनीं महाविद्यालयें व शिक्षणकेंद्रें प्रस्थापित केलीं; विद्वानांचा गौरव केला; समृद्ध साहित्य व तत्त्वज्ञान निर्माण केलें. डॉ. ड्रेपर लिहितो, "मुस्लिमांनीं जितक्या वेगानें रोमन साम्राज्य हस्तगत केलें तितक्याच वेगानें तत्त्वज्ञान व साहित्य यांवर प्रभुत्व मिळविलें."*

लूटमार, कत्तल व अनाचार यांचा अवलंब न करतां, मुस्लिमांच्या लष्करी विजयांनीं संस्कृतीचा रम्य प्रांत निर्माण केला आहे.

* History of the Conflict between Religion & Science; Page 106.

भाई मानवेंद्र रॉय लिहितात, " हे लष्करी विजय पुढील सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील कार्याचा प्रारंभच होत. त्यांच्यामुळें आर्थिक उन्नति व आध्यात्मिक प्रगति घडवून आणणारें राजकीय वातावरण निर्मिलें गेलें. रोमन व इराणी साम्राज्याचे अवशेष नाहींसे करणें अवश्य होते तरच नवीन कल्पना व ध्येयें यांनीं निबद्ध अशी नवी साम्राज्यघटना तयार होणें शक्य होतें. दुष्ट रूढींनीं व जादूटोण्याच्या गूढवादानें सर्व वातावरण गढळून टाकलें होतें व त्यामुळें पर्शियन आणि बायझंटाईन साम्राज्यांतील प्रजेचा आध्यात्मिक, बौद्धिक व नैतिक विकास अगदींच खुंटून गेला होता. मुहम्मदाच्या एकेश्वरीवादाच्या तलवारीनें अरबी टोळ्यांमधील दांभिक मूर्तिपूजेचा नायनाट केला, झोरॉअस्टरच्या चिरंतन अशा दुष्ट तत्त्वज्ञानापासून मानवाला मुक्त केलें, ख्रिश्चन धर्माच्या चमत्कारपूर्ण रूढीच्या चिखलांतून त्यांचा उद्धार केला आणि हिंदुस्थानला संन्यासवादाचा लागलेला रोग पूर्णपणें बरा करण्याचे कामीं वरील हत्यार अत्यंत उपयुक्त ठरलें. अरबांच्या सर्व विजयांच्या योगानें नवा इतिहासच घडविला गेला आहे. मानवी समाजाला प्रगत केलें आहे."†

मुस्लिमांच्या विजयाची परंपरा १६ व्या शतकापर्यंत अखंड चालू होती. हिंदुस्थान, चीन, रशिया, तुर्कस्थान, जावा, सुमात्रा इतक्या ठिकाणीं मुस्लिमांनीं आपलें निशाण फडकावलें. हिंदुस्थानवर सातव्या शतकापासून मुस्लिमांच्या स्वाऱ्या चालू होत्या. बाराव्या शतकाच्या सुमारास त्यांनीं हिंदुस्थानांत स्थाईक होण्याचा पायंडा घातला. " इसवी सन १२०५ पासून दिल्लीच्या तक्तावर मुस्लिमांचा

† Historical Roll of Islam, Page 10–11.

अंमल सुरू झाला तेव्हांपासून अठराव्या शतकाच्या अखेरी-पर्यंत ( म्हणजे सहाशें वर्षे ) त्यांचा अम्मल चालू होता."†

तेराव्या शतकाच्या सुमारास चीन, सैबिरीया व दक्षिण रशिया-मध्यें मुस्लिमांनीं आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें. चीनमध्यें तर मुस्लिम राज्यकर्त्यांची कारकीर्द उल्लेखनीय अशीच झाली. चीन-मधील अठरा प्रांतांत मुस्लिम लोकसंख्या अंदाजे दहा कोट होईल इतकी आहे. विशेषतः पश्चिम प्रांतांत ते बहुसंख्याक आहेत. त्याच शतकांत तुर्कांनीं बाल्कन टापू व्यापून टाकला. तुर्कांच्या पहिल्या सुलतानाचें नांव ' उस्मान ' असल्यामुळें तुर्की साम्राज्यास उस्मानी किंवा इंग्रजीमध्यें ओटोमन साम्राज्य या नांवानें ओळखण्यांत येतें. तुर्कांनीं इ. स. १४५३ मध्यें कॉन्स्टँटिनोपल सर केलें; इ. स. १५२१ सालीं बेलग्रेड घेतलें आणि ऑस्ट्रियाच्या राजधानीस—व्हियेनास—वेढा घातला. पोलंडच्या राजानें तीव्र प्रतिकार केल्या-मुळें व्हियेना त्यांच्या तावडींतून वांचलें.

पंधराव्या शतकांत जावा, बोर्नियोमध्यें मुस्लिमांनीं प्रवेश केला. आज इंडोनिशियामध्यें मुस्लिमांची लोकसंख्या पांच कोटी आहे. जावापासून फिलिपाईन्स बेटापर्यंत मुस्लिम बहुसंख्याक आहेत. सोळाव्या शतकांत उत्तर सुमात्रामध्यें मुस्लिम राज्यकर्ते होते. इब्न बतूता या सुप्रसिद्ध मुस्लिम प्रवाशानें चीन व मलायामधील वसाहतींचें साग्र व मनोरंजक वर्णन केलें आहे.

आफ्रिका खंड व्यापण्यास मुस्लिमांनीं सातव्या शतकांतच

† प्रो. ओतूरकरकृत " हिंदुस्थानांतील मुसलमानांचें साम्राज्य " पृ. २३.

सुरुवात केली. या महान् खंडामध्यें इस्लामचा प्रसार एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाला आहे कीं आज या खंडाची अर्धी लोकसंख्या इस्लामधर्मीय आहे. इस्लामच्या या विलक्षण प्रसाराबद्दल डॉ. ड्रेपर लिहितो, " इस्लाम धर्मासारखा इतक्या झपाट्यानें व एवढ्या मोठ्या प्रमाणावर कोणत्याही धर्माचा प्रसार जगाच्या इतिहासांत अद्याप-पर्यंत झाला नाहीं."†

† History of the Conflict between Religion & Science, Page 96.

## प्रकरण ३ रें

# इस्लाम आणि धर्मशास्त्र

"इस्लाम हा दया, औदार्य आणि बंधुतेच्या भावनांनीं ओतप्रोत भरलेला असून तो साधा व सर्वांना सहज समजणारा धर्म आहे."†

—एच्. जी. वेल्स.

जगांतील अनेक धर्मांना, त्या त्या धर्मसंस्थापकांचें किंवा ज्या जमातींत तो धर्म प्रसरत झाला त्या जमातीचें नांव देण्यांत आलें आहे. ख्रिस्ती धर्म हें नांव त्या धर्माचा संस्थापक ख्रिस्त याच्यापासून मिळालेलें आहे. बुद्धानें प्रस्थापित केलेल्या धर्मास 'बुद्धधर्म' अशी संज्ञा आहे. ज्यू लोकांच्या धर्मास 'ज्यूडाइझम' हें नांव आहे. त्या धर्माचा संस्थापक जूडा नामक जमातीमधील होता म्हणून त्या धर्मास वरील नांव देण्यांत आलें. इस्लाम या नांवाशीं कोणत्याही व्यक्तीच्या किंवा जमातीच्या नांवाचा संबंध येत नाहीं. इस्लाम हा कोणत्याही एका विवक्षित राष्ट्राचा किंवा जमातीचा धर्म नाहीं. परमेश्वरावर संपूर्ण विश्वास ठेवून सदाचारानें वागणाऱ्या व मानवतेची सेवा करणाऱ्या अशा सर्वांचा हा धर्म आहे. इस्लाम हा शब्द अर्थपूर्ण आहे. शब्दश: त्याचा अर्थ स्नेहत्व असा होतो. त्याचा दुसरा अर्थ स्नेह-संपादन करण्याचा मार्ग असा आहे. त्याचा रूढार्थ परमेश्वरास

† Outline of History, Page 607.

सर्वस्वीं शरण जाणें असा समजला जातो. परमेश्वराचे जे गुणधर्म मानले जातात त्या गुणधर्मांशीं समरस होण्याचा मानवांना आदेश देणारा धर्म म्हणजे इस्लाम अशी त्याची व्याख्या केली जाते. इस्लाम धर्मीय लोकांना 'मुस्लिम' अशीं संज्ञा आहे. सदाचार हें मुस्लिमांचें वैशिष्ट्य असलें पाहिजे. इस्लाम धर्माचे प्रणेते हजरत मुहम्मद पैगंबर यांनीं मुस्लिम कोणाला म्हणतां येईल याचा स्पष्ट खुलासा केला आहे. ते म्हणतात, "जे विश्वासानें वागतात, आपला शब्द पाळतात व वचनास जागतात ते मुस्लिम होत. व्यभिचार करणारे, चोरी करणारे, दारू पिणारे, लूटमार करणारे व दुसऱ्यांचा माल किंवा पैसा गिळंकृत करणारे, मुस्लिम नव्हेत. जो आपण स्वतः पोटभर जेवतो व शेजाऱ्यास उपाशीं ठेवतो तो मुस्लिम होऊं शकत नाहीं."

परमेश्वरावर अढळ विश्वास हें इस्लामचें आद्य तत्त्व होय. सर्वशक्तिमान परमेश्वराखेरीज इतर देवदेवतांवर इस्लाम विश्वास ठेवीत नाहीं. इस्लाम धर्मांतील परमेश्वर हा कोणत्याहीं एका धर्माचा किंवा राष्ट्राचा परमेश्वर नसून तो साऱ्या विश्वाचा अधिपती आहे. पवित्र कुराणमध्यें परमेश्वरास "रब्बुल आलमीन्" (जगाचा परमेश्वर) असें संबोधण्यांत आलें आहे. इस्लाम धर्मांतील परमेश्वराचें स्वरूप भयानक व अक्राळविक्राळ नसून तें अत्यंत प्रेमळ आहे. पवित्र कुराणच्या प्रत्येक अध्यायाच्या सुरुवातीस अर्-रहमान् (उपकारकर्ता) व अर्-रहीम(दयेचा सागर) अशा सुंदर नांवानें परमेश्वरास आळविलें आहे. इस्लामची परमेश्वराबद्दलची कल्पना काय आहे याचें वर्णन पवित्र कुराणमध्यें केलें आहे. "ईश्वर एकच आहे, त्याच्याशिवाय दुसरा देव नाहीं. जें आपल्याला दिसत नाहीं व जें दिसतें तें जाणणारा

असा तोच एक आहे. उदारांतला उदार; दयासागर तोच एक. त्याच्याखेरीज दुसरा देव नाहीं. तो बादशहा आहे, तो पवित्र आहे. शांतीचा तो अधिपती आहे. अभय देणारा, रक्षण करणारा, सर्वांचा पोशिंदा, सर्वशक्तिमान्, नुकसान भरून देणारा आणि सर्व अत्युच्च सद्गुणांचा कळस असा तो एकच आहे. तोच एक श्रेष्ठ, सृष्टि-निर्माण-कर्ता, सर्वांचा कर्ता असा तो आहे. अत्यंत आल्हादकारक, अशीं त्याचीं नांवें आहेत. स्वर्गांत्, पृथ्वीवर असणारे यच्चयावत त्याची कीर्ति गात असतात. बलवानांतला बलवान, ज्ञान्यांचा ज्ञानी असा तो एकच आहे. त्याला सर्व ऐकूं येतें, त्याला सर्व दिसतें. तो कोणत्याही दुःखांतून मुक्त करणारा आहे. तो अत्यंत उदार व क्षमाशील असून जे सत्कृत्य करतात व पापापासून अलिप्त राहतात अशा सज्जनांच्या अगदीं हातानजीक आहे."

इस्लाममधील परमेश्वर किती प्रेमळ आहे याचा सुंदर दृष्टांत हजरत मुहम्मद पैगंबरांनीं दिला आहे. एकदां एका गृहस्थानें पक्षाचीं पिलें धरून आणलीं होतीं. हजरत पैगंबरांनीं त्या पिल्लांना त्यांच्या आईजवळ सोडतांच, तिनें त्यांना प्रेमानें आपल्या पंखांखालीं घेतलें. त्या प्रसंगीं हजरत पैगंबर म्हणाले, "आपल्या पिल्लांवर आईचें जितकें प्रेम आहे त्यापेक्षां जास्त प्रेम परमेश्वराचें आपल्या भक्तांवर आहे."

इस्लाम धर्मांतील एकेश्वरवादानें नुसत्या अरबस्तानांतच नव्हे तर साऱ्या जगामध्यें क्रांती करून टाकली आहे. अनेक देवांच्या कल्पनेमुळें तुझा देव श्रेष्ठ, माझा देव श्रेष्ठ अशी चाललेली लठ्ठालठ्ठी बंद झाली, देवांना प्रसन्न करण्याकरितां धार्मिक विधींचें अवडंबर माजवून, स्वतः मदोन्मत्त झालेल्या पुरोहित वर्गाचा नक्षा उतरला

आणि आपल्या भोंवतीं शिष्यगणांची प्रभावळ निर्माण करून जनतेला अक्षरशः नागविणाऱ्या ढोंगी धर्ममार्तंडांना कायमची मूठमाती मिळाली. एकेश्वरवादानें संत्रस्त जनतेचा केवढा मोठा फायदा झाला याचें भाई मानवेंद्र रॉय यांनीं सुंदर वर्णन केलें आहे. ते म्हणतात, "अंतःकलहानें विस्कळित झालेल्या जनतेची अंतरीची भूक महंमदाच्या कडव्या अद्वैतानें तर भागविलीच, परंतु शेजारच्या राष्ट्रांतूनही—जेथें सनातनीयांचा छळ असह्य झाला होता—या ऐक्याच्या हांकेस 'ओ' मिळाली. मॅगीचा गूढवाद, ज्यूंचा पुराणाभिमान आणि ख्रिश्चनांचा दुरभिमान यांमुळें इराण, मेसॉपोटेमिया, सिरिया, ईजिप्त व पॅलेस्टाईन येथील लोकांचें धार्मिक जीवन अगदीं गुंतागुंतीचें होऊन बसलें होतें. कडक धार्मिक विधी आणि आचार यांनीं धर्माचें स्थान बळकाविलें होतें. ढोंगी समारंभांनीं भक्तीची हकालपट्टी केली होती, शब्दप्रामाण्यानें निष्ठेचा छळ चालविला होता. देवदूत, संत आणि शिष्यगण यांच्या मेळाव्यांत ईश्वर अदृश्य बनला होता; म्हणूनच अद्वैताची घोषणा करणाऱ्या नवीन सहिष्णु धर्माचें दलित व त्रस्त अशा बहुसंख्याक जनतेनें स्वागत केलें. बौद्धिक दिवाळखोरी, आध्यात्मिक गोंधळ, सामाजिक अव्यवस्था आणि धकाधकी यांच्या काळांत सामान्य जनतेला हव्या असलेल्या ऋजु निष्ठेचा आधार मिळाला आणि म्हणूनच या खवळलेल्या समुद्रांत जनतेचें तारूं सुखानें आपला मार्ग काढूं लागलें. एकच एक परमेश्वर आहे या विचारसरणींच्या प्रसारानें अधिराज्याचा पाया घातला आणि त्या अधिराज्याच्या सर्व क्रियांचें एकीकरण करण्यांत आलें. या एकीकरणामुळें नवीन सामाजिक घडी निर्माण झाली. या संस्कृतीचें मंदीर जुन्या संस्कृतीच्या अवशेषांवर

भव्य व उत्तुंग असें उभें राहिलें. धार्मिक छळानें त्रस्त झालेल्या अनेकांना हा आश्रय आकर्षक वाटल्यास नवल तें काय ? इस्लामी धर्माच्या संरक्षणाखालीं जे जे आले त्या सर्वांना सदसद्‌विवेकबुद्धीचें संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें, किंबहुना त्रस्त व दलित यांच्या आश्रया-साठींच या नवधर्माचा अवतार झाला आहे असें सर्वांना वाटलें."†

एकेश्वरवादानें व्यक्तिशः प्रत्येक मनुष्याचा दृष्टिकोन विशाल होतो, त्याची नैतिक व सांस्कृतिक उंची वाढते. परमेश्वर हा सर्व जगाचा मालीक असल्यामुळें जगांतील यच्चयावत् मनुष्यमात्रावर प्रेम करणें हें आपलें कर्तव्य आहे असें तो समजतो. आपल्याच जाती-पुरतें किंवा राष्ट्रापुरतें पाहण्याची त्याची कोती दृष्टि निघून जाते. त्याचप्रमाणें मनुष्यामध्यें स्वाभिमान व निर्भयवृत्ति अधिक जोरानें पालवते. परमेश्वर सर्वशक्तिमान असल्यामुळें त्याच्याखेरीज आपलें या जगांत कोणी वांकडें करूं शकत नाहीं किंवा आपल्याला धक्का पोहोंचवूं शकत नाहीं या विश्वासानें परमेश्वराखेरीज तो कोणत्याही पाशवी शक्तीपुढें आपलें शीर झुकवीत नाहीं. वाटेल तेवढीं संकटें कोसळलीं किंवा वाटेल त्या दुर्धर परिस्थितीला तोंड द्यावें लागलें तरी न डगमगतां परमेश्वरावर संपूर्ण विश्वास ठेवून, प्रशंसनीय सहनशीलता व धैर्य तो दाखवूं शकतो. इच्छित वस्तु प्राप्त करून देणें हें परमेश्वराच्या हातीं असल्यामुळें तो कोणाजवळही तोंड वेंगाडत नाहीं, दुसऱ्यापुढें हात फैलावत नाहीं किंवा वाममार्गाचा अवलंब करीत नाहीं. विनम्रता ही त्या मनुष्यामध्यें आपोआप येते. संपत्ति किंवा सत्ता यांची धुंदी त्याच्यावर चढत नाहीं; कारण त्याला मिळालेली संपत्ति

† Historical Roll of Islam, Page 35.

किंवा सत्ता परमेश्वराच्या कृपेनें मिळाली असून, त्याला वाटेल तर तो ती काढून घेऊं शकतो या गोष्टीवर त्याचा विश्वास असतो. त्याचप्रमाणें आपलें कार्य करितांना तो द्वेष, हेवादावा किंवा अभिलाष यांच्या आहारीं जात नाहीं. त्याला वाटतें यश देणें न देणें हें परमेश्वराच्या हातीं आहे. यश द्यावें असें त्याच्या मनांत आलें तर जगांतील कोणतीही व्यक्ति किंवा शक्ति त्याला प्रतिबंध करूं शकत नाहीं; मग आपल्या इप्सित कार्याकरितां दुसऱ्याचा द्वेष किंवा हेवादावा करून त्याचा उपयोग काय? परमेश्वरावर संपूर्ण विश्वास ठेवून आपलें कार्य अविरतपणें करीत राहणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें तो समजतो.

परमेश्वरावर ज्याचा संपूर्ण विश्वास आहे तो निषिद्ध गोष्टीपासून व कुकर्मापासून सदैव अलिप्त राहतो. परमेश्वराला ज्ञात व अज्ञात गोष्टी कळूं शकतात. तो दिव्यचक्षू असल्यामुळें आपण केलेली गोष्ट जगाला दिसली नाहीं तरी त्याला दिसते. अंधारांत जरी आपण दुष्कृत्य केलें तरी तो पाहूं शकतो; इतकेंच नव्हे तर आपल्या अंतःकरणांतील वाईट विचाराचे पडसाद तो ओळखूं शकतो. या विचारसरणीमुळें मनुष्य दुष्कृत्यापासून, अनाचारापासून सदैव दूर राहतो. मानवी शील तयार करण्यांत परमेश्वरावरील अढळ विश्वासाचा केवढा मोठा उपयोग होत असतो हें स्पष्टपणें दिसून येणार आहे.

परमेश्वराला मानवांची केलेली सेवा आवडते. सत्कृत्य करणारांवर तो प्रसन्न होतो. सदाचारी माणसावर त्याची बहाल मर्जी असते. मानवांच्या सुखदुःखाकडे दुर्लक्ष करून, फक्त परमेश्वराच्या नांवाचा कोरडा गजर करणाऱ्या दांभिकांकडे तो ढुंकून देखील पहात नाहीं. मानवांना सदैव लाथाडणाऱ्या मस्तवाल लोकांनीं, परमेश्वराच्या

नांवावर हजारों लोकांच्या पंक्ति उठविल्या तरी तो त्याकडे लक्ष देत नाहीं किंवा बलिदानाचें ढोंग करणाऱ्या लङ्‌भारतीची तो कधींच पर्वा करीत नाहीं.

"तुम्हीं केलेल्या बलिदानाचें रक्त किंवा मांस परमेश्वरास पोहोंचत नाहीं. तो एकच गोष्ट स्वीकारतो आणि ती म्हणजे तुमची त्याच्यावरील भक्ति."

—पवित्र कुराण २२:३७.

परमेश्वरावरील भक्ति म्हणजे त्यानें आदेशित केलेल्या तत्त्वांचें परिपालन, सदाचार व सद्विचारांचें अवलंबन. मानवांची उन्नति व्हावी, त्यांना सौख्य लाभावें, त्यांचा उद्धार व्हावा याकरितां होणारे अहर्निश प्रयत्न म्हणजेच परमेश्वरावरील भक्ति, परमेश्वराची सेवा. असे अहर्निश प्रयत्न करणाऱ्या महाभागांवर परमेश्वर सदैव प्रसन्न असतो, त्यांच्यावर प्रेम करतो, असें पवित्र कुराणामध्यें स्पष्ट दिग्दर्शित केलें आहे.

"परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रांचें कल्याण करा; कारण जे कल्याण करतात त्यांच्यावर परमेश्वर प्रेम करतो."

—पवित्र कुराण २:१९५.

एकेश्वरवादानें विश्वबंधुत्वाचा व मानवतेचा मार्ग सुकर करून टाकला आहे. ज्याचा परमेश्वरावर विश्वास आहे त्याच्याजवळ आपपर भाव राहूंच शकत नाहीं. कुटुंब, जमात किंवा राष्ट्र यांपुरतेच विचार न करतां तो सर्व विश्वाकडे आत्मीयतेनें पाहूं लागतो. आपल्या कुटुंबाभोंवतीं किंवा जमातीभोंवतीं घुटमळणारी त्याची सदिच्छा मानव जातीकडे झेप घेऊं लागते. अखिल मानव जातीचा तो निर्माता

असल्यामुळें मानव जातीचें कल्याण म्हणजेच परमेश्वराची सेवा असें तो मानूं लागतो.

मानव जातीच्या सौख्याप्रीत्यर्थ चंदनासारखे झिजणारास मुक्ति किंवा सद्‌गति मिळते असा इस्लामचा दावा आहे. कोणत्याही माणसास अशी सद्गति मिळूं शकते असा आदेश देऊन इस्लामनें धार्मिक जगांत बुद्धिवादाचें नवें दालन उघडलें आहे. त्या काळीं मुक्ति किंवा सद्गति मिळवावयाची असेल तर आमच्या धर्मांत या असा आक्रोश चालूं होता. स्वर्गाच्या किल्ल्या फक्त आपल्या धर्माच्या हातीं आहेत असा डांगोरा पिटला जात होता. इस्लामनें पवित्र कुराणमधून ( २:१११ ) अशा धर्मांना उघड आव्हान देऊन विचारलें कीं याला आधार काय ? त्या त्या धर्माच्या अगोदर जगाचें अस्तित्व हजारों वर्षें आहे. त्या धर्माखेरीज सद्गति मिळणें शक्य नाहीं असा हटवाद मांडला तर त्या धर्माच्या अगोदर होऊन गेलेल्या असंख्य सच्छिल माणसांची किंवा इतर धर्मांत असणाऱ्या सदाचारी व वंदनीय पुरुषांची वाट काय ? त्यांना सद्गति किंवा मुक्ति मिळणें शक्य नाहीं असें धर्ममार्तंडांनीं टाहो फोडून सांगितलें तर तें बुद्धीला कधींतरी पटेल काय ? या बाबतींत इस्लामनें अंधश्रद्धेपेक्षां बुद्धिवादाला आवाहन केलें आहे. परमेश्वराला शरण जाणारा आणि मानवांच्या सौख्याकरितां अहर्निश धडपडणारा कोणताही मनुष्य असो त्याला सद्गति ही मिळालीच पाहिजे असा निर्णय इस्लामनें दिला आहे.

"जो परमेश्वरास शरण जातो आणि ( दुसऱ्यांचें ) कल्याण करतो त्याला परमेश्वराकडून बक्षीस ( मुक्ति ) मिळते. त्याला भीति बाळगावयाचें किंवा भ्यावयाचें कांहीं कारण नाहीं."

—पवित्र कुराण २:११२.

वरील श्लोकावर भाष्य करतांना, मौ. महंमद अली लिहितात, " ख्रिश्चन किंवा ज्यू लोकांनाच मुक्ति मिळेल अशी जी त्यांची कल्पना, तिला कोणताही आधार नाहीं असें ख्रिश्चन व ज्यू लोकांस बजावणेंत आलें आहे. परमेश्वरास संपूर्णपणें शरण जाणें आणि त्यानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रांचें कल्याण करणें हाच मुक्तीचा किंवा सद्गतीचा खरा मार्ग आहे आणि इस्लाम हेंच शिकवितो हें पवित्र कुराणवरून सिद्ध होतें."†

इस्लामचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सर्वसाधारण माणसाच्या पचनीं पटतील अशीं तत्त्वें त्या धर्मांत आहेत. धर्म हा कांहीं विशिष्ट व्यक्तीपुरता नसून तो जनतेकरितां असतो. सर्वांना मार्गदर्शन करावयाचें श्रेष्ठ कार्य धर्माला करावयाचें असतें. त्या धर्माचें आकलन व आचरण सर्वसाधारण व्यक्तीच्या शक्तीबाहेर असेल तर त्याला धर्म ही संज्ञा देणें धाष्टर्याचें ठरेल. धर्म किंवा धर्मांतील तत्त्वें जनतेला सहज कळलीं पाहिजेत व तीं बिनासायास आचरतां आलीं पाहिजेत हा दृष्टिकोन इस्लामनें आपल्या समोर ठेविला आहे. गहन तत्त्वें, गूढ विचार व माणसाच्या सहनशीलतेचा अंत पाहणारीं व्रतवैकल्यें आपणांस इस्लाम धर्मांत कधींच दिसून येणार नाहींत; त्याच्या शक्तीबाहेर असणारें एकही तत्त्व किंवा विधी आपणांस सांपडणार नाहीं.

" आपल्या शक्तीबाहेर असणाऱ्या गोष्टींचा प्रयत्न करा अशी सक्ति परमेश्वर कोणावरही करीत नाहीं."

—पवित्र कुराण २:२८६.

† The Holy Quran, Pages 56.

कांहीं धर्मांत संन्यास धर्म किंवा विरक्तवृत्ति याची महती गाण्यांत आली आहे; पण इस्लाम धर्मानें संन्यास घेण्यास सक्त मनाई केली आहे. संन्यस्त किंवा वैराग्यवृत्ति ही सर्वसाधारण माणसांना झेंपण्यासारखी नाहीं. सर्वसंग परित्याग करून संन्यास धर्म स्वीकारणें ही कठीण गोष्ट आहे. त्याचप्रमाणें ब्रह्मचर्य, खडतर तपश्चर्या यांमुळें परमार्थ मिळवितां येतो अशी समजूत आहे. ही समजूत इस्लाम धर्मास पटत नाहीं; इतकेंच नव्हे या गोष्टी अनैसर्गिक आहेत असें तो समजतो. एकाद्या सुंदर स्त्रीकडे पापी नजरेनें पहात नाहीं म्हणून मी सज्जन आहे असें एकाद्या आंधळ्यानें सांगितलें तर त्याचा आपल्या मनावर परिणाम होणें शक्य आहे का! याच्या उलट डोळे असून त्या स्त्रीकडे एकाद्यानें पापी नजरेनें पाहिलें नाहीं तर त्याच्या सज्जनपणाबद्दल आपणांस कधींच शंका येणार नाहीं. या जगांत राहून मोह किंवा विकार यांच्या आहारीं न जातां सत्कार्य करीत राहणें हीच खरी पुण्याई व हाच खरा परमार्थ असें इस्लाम मानतो.

मनुष्यास आचरण्यास कठीण असे धार्मिक विधी किंवा त्याला कर्जबगारी करून टाकणारीं व्रतवैकल्यें यांना इस्लाममध्यें स्थान नाहीं. धार्मिक विधी व व्रतवैकल्यांच्या फापट पसाऱ्यांत, मनुष्य परमेश्वराला विसरून जातो. त्याला वाटतें कीं आपण नुसते विधी, याग किंवा वैकल्यें केलीं म्हणजे आपली इतिकर्तव्यता संपली. या वृत्तीमुळें परमेश्वरानें आपणांस ज्या गोष्टींचा आदेश दिला आहे त्या गोष्टींकडे सहजच कानाडोळा होतो; शिवाय दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या वृत्तीमुळें परान्नपुष्ट असा निराळाच वर्ग समाजांत निर्माण होतो. हा वर्ग 'पुरोहित वर्ग' या नांवानें साऱ्या जगास ज्ञात आहे.

लोकांच्या धार्मिक भावनांचा या वर्गानें भरपूर फायदा घेतला आहे, इतकेंच नव्हे तर सार्वजनिक जीवनांत स्वतःचें प्रस्थ वाढवून, जनतेला सतावून सोडलें आहे. जनतेच्या पैशावर जगावयाचें, चैन करावयाची आणि जनतेलाच त्राही भगवान करून सोडावयाचें हा कृतघ्नपणा या वर्गानें केला आहे. आपण सांगूं त्याप्रमाणें जनतेनें वागलेंच पाहिजे अशी हुकूमशाही त्याच्या रोमरोमांत भरून राहिली आहे. जातिबहिष्काराचें अमानुष शस्त्र त्याच्या हातीं असल्यामुळें अनेक विवेकशील माणसांचा त्या वर्गानें छळ मांडला आहे. याशिवाय प्रगति आणि विकास यांचा संकोच करण्याचें महापाप या वर्गानें केलें आहे. इस्लामनें पुरोहित वर्गाचें अस्तित्वच नष्ट करून टाकल्यामुळें मानवांचें स्वास्थ्य व प्रगती यांचा मार्ग सुकर झाला ही गोष्ट इतिहाससिद्ध आहे.

शब्दप्रामाण्य किंवा हटवाद ( Dogamatism ) इस्लाम धर्मांत नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आपलें प्रतिपादित तत्त्व सर्वांनीं डोळे झांकून मानलेंच पाहिजे असा आग्रह न धरतां, मनुष्याच्या सदसद्विवेक बुद्धीस आवाहन करण्याचें कार्य इस्लामनें केलें आहे. हटवाद व भौतिक शास्त्रें यांमध्यें सदैव उभा दावा असलेला आपण पाहतों; पण इस्लाममध्यें असें विरोधी दृश्य आढळत नाहीं. भौतिक शास्त्रांच्या नव्या कल्पना, शोध व विचार यांना इस्लामकडून कसें प्रोत्साहन मिळालें आहे हें पुढील एका प्रकरणावरून वाचकांच्या लक्षांत येईल.

हटवाद किंवा नव्या युगांतील कल्पना यांमध्यें कधींच सख्य असत नाही. हटवाद अंधश्रद्धेचा पुरस्कार करतो तर बुद्धिवाद नव्या कल्पनांना उचलून धरतो. हटवादी धर्मांचा नवविचाराशीं

संघर्ष होतोच; पण इस्लाममध्यें अशा तऱ्हेचें खडाष्टक कधींच दिसून येणार नाहीं. नवयुगाच्या कल्पनांशीं विरोध न करतां, त्या आत्मसात करण्याचें उदार धोरण त्यानें आपल्यासमोर ठेविलें आहे. काळ व परिस्थितीनुसार इतर धर्मग्रंथांतून बदल करण्यांत आला आहे, पण पवित्र कुराणामध्यें तसा काडीमात्र बदल झाला नाहीं, ही एकच गोष्ट इस्लामचा उदारमतवाद स्पष्टपणें सिद्ध करीत आहे.

इस्लाम आणखी एका बाबतींत पुरोगामी आहे. त्याची मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टि कांहीं धर्मांपेक्षां निराळी आहे. मनुष्य जन्मतःच पापी असतो आणि त्या पापापासून मुक्त करण्याकरितांच धर्माचा अवतार आहे, या कल्पनेशीं इस्लामचा सक्त विरोध आहे. मानवीं स्वभाव निसर्गतः पापापासून अलिप्त असतो. पाप हा वारसा ( Heritage ) नसून, नंतरची माणसानें लावून घेतलेली उपाधी आहे. या उपाधीपासून मनुष्यास अलिप्त ठेवणें व सुप्तावस्थेंत असलेल्या त्याच्या चांगल्या भावनांचा विकास करणें हें धर्माचें प्रधान कार्य आहे असें इस्लाम समजतो. धर्म म्हणजे अधःपातापासून मुक्ति नव्हे तर मनुष्यामध्यें अप्रकटपणें वास करीत असलेल्या शक्तीचा बिकास होय. निसर्गांतील प्रत्येक गोष्टीप्रमाणें, मनुष्याच्या भावना किंवा प्रवृत्ति सुप्तावस्थेंत असतात. त्या जागृत करून त्यांची वाढ व विकास करणें यालाच इस्लाम ‘ धर्म ’ अशी संज्ञा देतो. त्याचप्रमाणें मनुष्याच्या मनोविकारांना नेस्तनाबूद करणें किंवा दडपून टाकणें अनैसर्गिक ठरतें. मनोविकार हे सदैव उत्क्रांति अवस्थेंत असतात. नैतिक व आध्यात्मिक उन्नतीचीं बीजें त्यांच्यापोटीं आढळतात. मनोविकारांना दडपून न टाकतां किंवा मोकाट न सोडतां, त्यांना योग्य मुरड घालून त्यांचें सद्गुणांत परिवर्तन करणें

हें महत्त्वाचें कार्य आहे असें इस्लाम समजतो. उदाहरणार्थ राग, हा एक मनोविकार आहे. त्याला दडपून टाकण्यांत तो केव्हांही नुकसानीच करतो. त्याला मोकाट सोडला तर त्याचें पर्यवसान जुल्म, जबरदस्ती, छळ, अपशब्द किंवा निंदा यांमध्यें होतें. याच मनोविकाराचें परिवर्तन केलें तर शौर्य, धैर्य, सहनशीलता, दीर्घोद्योग, सहिष्णुता व क्षमा या उदात्त नैतिक मूल्यांत त्याचें रूपांतर होतें. मानसिक उत्क्रांतिवादाचा हा एक प्रकार इस्लाम धर्माच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा समजला जातो.

## पवित्र कुराण

मुस्लिमांचा सर्वश्रेष्ठ व एकमेव धर्मग्रंथ म्हणज़े पवित्र कुराण होय. जगांतील कोणत्याही देशांतील कोणत्याही मताचा मुस्लिम असला तरी पवित्र कुराणबद्दल त्याला अत्यंत आदर वाटतो. इतर धार्मिक गोष्टींबद्दल त्याचा मतभेद असेल किंवा एकाद्या तत्त्वाबद्दल तो सहमत होणार नाहीं पण पवित्र कुराणबद्दल मात्र कोणताही मुस्लिम सहमतच होईल. जगांतील अनेक धर्मग्रंथांत काळ व प्रसंगानुसार बरेच फेरफार झालेले दिसून येतात; पण आज तेराशें वर्षांत कुराणमधील वाक्यांत किंवा शब्दांत काडीमात्र फरक झाला नाहीं. पवित्र कुराण इतकें पवित्र मानलें जातें कीं वजू (शुचिर्भूत) केल्याशिवाय त्याला सहसा कोणी स्पर्श करीत नाहीं. पवित्र कुराण परमेश्वराकडून प्रकट झालें आहे; तें ईश्वरनिर्मित आहे असें समजलें जातें. ज्या ज्या वेळीं हजरत मुहम्मद पैगंबर ध्यानमग्न होत, त्या वेळीं बाह्य जगाशीं त्यांचा संबंध तुटत असे. आंपल्या भोंवतीं काय चाललें आहे हें त्या वेळीं विसरून जांत. अशा ध्यानमग्न अवस्थेंत असतांना त्यांच्या तोंडून ज्या ऋचा बाहेर पडत, त्या जवळचे लोक

टिपून ठेवीत. या ऋच्यांचें संकलन म्हणजेच पवित्र कुराण होय. सुरुवातीस पैगंबरांच्या शत्रूंनीं त्या ऋच्या ईश्वरप्रणित नसून त्यांनींच बनविल्या आहेत असा आक्षेप घेतला. पण पवित्र कुराणमधील ऋच्या भाषेच्या व व्याकरणाच्या दृष्टीनें इतक्या श्रेष्ठ दर्जाच्या आहेत कीं हजरत मुहम्मद पैगंबरासारख्या एक अक्षरही लिहितां वाचतां न येणाऱ्यांना त्या तोडीच्या ऋचा स्वतः बनविणें शक्य नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यामधील भव्यता व उदात्तता चित्रित करणें कोणाही मानवास शक्य नाहीं असें तेथील विद्वानांनीं पटविल्यानंतर त्या 'अपौरुषेय' आहेत असा त्यांच्या शत्रूंना शेवटीं निर्वाळा द्यावा लागला. इस्लाम धर्माच्या पुष्ट्यर्थ एकादा चमत्कार करून दाखवा असें हजरत पैगंबरांच्या विरोधकांनीं त्यांना सांगितल्यानंतर पवित्र कुराणकडे बोट दाखवून त्यासारखी एकादी ऋचा तयार करून दाखवा असें आव्हानपूर्वक म्हणत. सर्व मुस्लिम जगत् पवित्र कुराण म्हणजे 'शाश्वत चमत्कार' असें मानतें.

सबंध पवित्र कुराणचें प्रगटीकरण होण्यास तेवीस वर्षें लागलीं. परिस्थिती व प्रसंगानुसार निरनिराळ्या वेळीं पवित्र कुराणचें प्रगटीकरण होत असे. पवित्र कुराणचे एकंदर ३० भाग (जूज) असून ते ११४ प्रकरणांत (सूरा) विभागले आहेत. प्रत्येक भागाचे चार उपभाग करण्यांत आले आहेत. या भागांची जुळणीं हजरत पैगंबरांच्या मार्गदर्शनाखालीं करण्यांत आली आहे. पवित्र कुराणमधील निरनिराळ्या भागांचें संकलन करण्याचें कार्य हजरत अबुबकर यांच्या आज्ञेनें करण्यांत येऊन तें हजरत उस्मान यांच्या कारकीर्दींत पुरें करण्यांत आलें. हें महत्त्वाचें कार्य झैद, अबदुल्ला आणि अब्दुर रहीम या तज्ज्ञांच्या नेतृत्वाखालीं करण्यांत येऊन पवित्र कुराणची

अधिकृत प्रत तयार करण्यांत आली. त्या प्रतीवरून अनेक प्रती काढण्यांत येऊन त्या सर्वत्र पाठविण्यांत आल्या. पवित्र कुराण मुखोद्गत करण्यास त्या काळीं प्रोत्साहन दिलें जात असे आणि आज अद्यापही दिलें जातें. पवित्र कुराण मुखोद्गत म्हणणारास 'हाफीज' अशी संज्ञा आहे.

पवित्र कुराण हें अनेक नांवांनीं संबोधिलें जातें. अल्-किताब (२:२), अल्-फुरकान् (२५:१), अज्-झिक्र (१५:९) अल्-हदीस (१८:६), अल्-हुक्म (१३:३७), अल्-हुदा (२:२), अर्-राहमत् (१७:८२), अल्-खैर (३:१०३), अल्-बयान् (३:१३७), अन्-नूर (७-१५७), अल्-हक्क् (१७:८१), अल्-मुबारक (२१:५०) वगैरे नांवांचा उल्लेख पवित्र कुराणमध्यें त्या नांवांपुढें केलेल्या भाग व ऋचांमध्यें आपणांस आढळून येईल.

पवित्र कुराणची भाषा अत्यंत सुंदर, ओघवती व परिणामकारक आहे. त्यामधील प्रत्येक शब्द वेंचक व मांडणी डौलदार आहे. कित्येक वेळां तें वाचण्यापेक्षां ऐकण्यांतच जास्त आल्हाद होतो. विशेषतः परमेश्वराच्या भव्य व उदात्त स्वरूपाचें त्यामधील वर्णन तर अत्यंत हृद्य आहे. पवित्र कुराणचें ज्यांनीं इंग्रजी भाषांतर केलें आहे ते मि. सील पवित्र कुराणच्या वाङ्मयीन श्रेष्ठतेबद्दल लिहितात, "श्रोतृवृंदांच्या मनावर तें इतकें पकड घेत असे कीं पैगंबरांचे कट्टे विरोधक देखील मंत्रमुग्ध होत." हजरत उमर हे सुरुवातीस हजरत पैगंबरांचे वैरी होते. ते स्वतः हजरत पैगंबरांना ठार मारण्यास निघाले असतां, त्यांच्या बहिणीच्या तोंडून बाहेर पडत असलेलीं पवित्र कुराणमधील कांहीं वाक्यें त्यांनीं ऐकलीं. त्याबरोबर ते थांबले व त्यांनीं तीं वाक्यें अनेक वेळां वाचलीं. त्या वाक्यांनीं त्यांच्या

मनावर इतका परिणाम झाला कीं त्यांनीं हजरत पैगंबरांचा खून करण्याचा बेत रहित केला आणि ताबडतोब स्वत: इस्लाम धर्माची दीक्षा घेतली.

पवित्र कुराणमधील भाषा जितकी परिणामकारक तितके त्यामधील विचार उदात्त आहेत. सत्य व सदाचाराकडे आवाहन करतांना, मानवतेचा पुरस्कार करतांना तर त्या उदात्तपणाची सीमा झालेली दिसून येते. पवित्र कुराण व त्यामधील विचारसरणी यांसंबंधीं तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, "कुराणचे संदेश म्हणजे ईश्वराचे औदार्यपूर्ण निश्वास आहेत. त्यांत दिव्यता ऐवजीं मानव्य आहे."

पवित्र कुराणमध्यें नुसत्या धार्मिक गोष्टींचाच अंतर्भाव केला नाहीं तर त्यांत ऐहिक गोष्टींचाही परामर्ष घेण्यांत आला आहे. पवित्र कुराण म्हणजे धार्मिक, सामाजिक, नैतिक व राजकीय संहिताच होय. मनुष्याला मार्गदर्शक होतील अशा अनेक गोष्टींचा ऊहापोह त्यांमध्यें आहे. अल्-बक्र, अन्-निसा, अल्-इमरान, अल्-मयदा, अन्-नूर, बनी ईस्राईल या भागांमध्यें मुस्लिम कायद्याची रूपरेषा आपणांस दिसून येईल.

पवित्र कुराणचे खालोखाल हदीसचें महत्त्व आहे. हदीस म्हणजे हजरत मुहम्मद पैगंबरांचीं संकलित केलेलीं बोधवचनें. जनतेला मार्गदर्शन करण्याकरितां हजरत पैगंबरांनीं जो सदुपदेश केला किंवा जीं बोधवचनें सांगितलीं त्यांचें संकलन हदीसमध्यें केलें आहे. हें संकलनकार्य पहिल्या चार खलिफांच्या कारकीर्दींमध्यें अत्यंत परिश्रमपूर्वक करण्यांत आलें आहे. हजरत पैगंबरांच्या निकट

सहवासांत असणाऱ्या खास व अधिकारी व्यक्तींकडून हीं बोधवचनें गोळा करण्यांत आलीं आहेत. त्या व्यक्तींकडून आपण जें सांगतों तें सत्य आहे अशी शपथ घेऊन नंतर त्या व्यक्तीनें कथन केलेलीं हजरत पैगंबरांचीं वचनें विचारांत घेण्यांत येत. त्यानंतर तीं वचनें हजरत पैगंबरांचींच आहेत याविषयीं कसून चौकशी केल्यानंतरच त्यांचें संकलन करण्यांत येई. अल् बुखारी, इमाम मुस्लिम, अबू इसा तिरमिझीं, अबू दाऊद, अबू अबदुर रहिमान आणि अबू अब्दुल्ला इब्न माजा या सहा विद्वान् व सदाचरणी मुस्लिम महाभागांनीं एकत्रित केलेलीं वचनें अधिकृत मानलीं जातात. याखेरीज इमाम शाफी, इब्ने हंबल, इमाम मालिक यांचेंही संकलन तितक्याच योग्यतेचें मानलें जातें.

पवित्र कुराण व हदीस नंतर आणखी दोन तत्त्वांवर इस्लाम आधारला आहे. तीं तत्त्वें म्हणजे ‘ इज्मा ’ व ‘ कयास ’ हीं होत. इज्मा याचा अर्थ मतैक्य असा होतो. “ माझ्या अनुयायांचें चुकीच्या मार्गावर कधींही एकमत होणार नाहीं.” या हजरत पैगंबरांच्या वचनामुळेंच ‘ इज्मा ’ नांवाची निष्पत्ति झाली आहे. आपल्या अनुयायांचें ज्या गोष्टीवर एकमत होईल तीच गोष्ट योग्य समजावी हाच अर्थ हजरत पैगंबरांच्या वरील वाक्यावरून निघत असल्यामुळें मतैक्यास किंवा ‘ इज्मा ’च्या विशाल तत्त्वास इस्लाम धर्मांत फार मोठें स्थान आहे. या तत्त्वामुळें निरनिराळ्या काळास पोषक होणारी मतप्रणाली व कायदे यांना इस्लाम धर्मांत स्थान मिळालें आहे. नव्या परिस्थितीस सुसंगत व अनुरूप असें नवें जीवन कंठण्यास मुस्लिमांना या तत्त्वानें मार्ग खुला करून दिला आहे. बदलती परिस्थिति व इस्लाम यांचा संघर्ष कोठेंही होत नाहीं याचें कारण तरी हेंच होय.

एक विद्वान् धर्मशास्त्रज्ञ म्हणतात, "इज्मा हें मुस्लिम कायद्याच्या (शरीयतचे) चार उगमस्थानांपैकीं एक उगमस्थान असून त्या कायद्याच्या उत्क्रांतिवादाची ती किल्ली आहे हें आपण विसरतां कामा नये. इस्लामी कायद्याचें स्थितिस्थापकत्व टिकवून त्याच्या विकासास वाव देणारें व त्यास सदैव ताजातवाना ठेवणारें तत्त्व म्हणजे इज्मा होय."†

'कयास' याचा अर्थ अनुमानसिद्धांत. एकाद्या गोष्टीचा प्रत्यक्ष उल्लेख कुराणांत किंवा हदीसमध्यें आढळला नाहीं तर त्याच नमुन्यांचें, पवित्र कुराण किंवा हदीसमध्यें आढळणाऱ्या गोष्टींपासून अनुमान काढणें याला 'कयास' म्हणतां येईल. उदाहरणार्थ, शराब ही निशा आणणारी चीज असल्यामुळें ती निषिद्ध आहे असा पवित्र कुराणमध्यें आदेश आढळतो. त्यावरून निशा आणणाऱ्या जितक्या चीजा आहेत (मग त्यांचा उल्लेख पवित्र कुराण किंवा हदीसमध्यें नसला तरी) त्या सर्व निषिद्ध आहेत असें अनुमान आपणांस 'कयास' या तत्त्वानें काढतां येतें. हदीसमध्यें या तत्त्वाला मोठा आधार सांपडतो. एकदां हजरत पैगंबरांनीं एका विवक्षित कार्याकरितां एका मनुष्यास पाठवून देण्याचें ठरवून त्याला विचारलें, "हें कार्य करतांना कोणच्या आधारें तूं वागशील?" तो गृहस्थ म्हणाला, "पवित्र कुराणच्या आधारें." त्यावर हजरत पैगंबर म्हणाले, "पण सदर प्रसंगीं कसें वागावें याचा उल्लेख तुला पवित्र कुराणमध्यें आढळला नाहीं, तर काय करशील?" त्या गृहस्थानें उत्तर दिलें, "मी हदीसच्या आधारें वागेन." यावर हजरत पैगंबर उद्गारले, "हदीसमध्यें तसा उल्लेख नसेल तर?" शेवटीं तो गृहस्थ म्हणाला,

---

† Islam in the World, Page 51.

"तर तर्क किंवा अनुमानसिद्धांत यांचा अवलंब करून तें कार्य करीन." हजरत पैगंबरांनीं या उत्तराबद्दल समाधान व्यक्त केलें. इस्लाममध्यें अनुमानसिद्धांताला केवढा वाव ठेवला आहे हें 'कयास' तत्त्वावरून दिसून येईल.

शरीयत ( इस्लामी कायदेशास्त्र ) ही पवित्र कुराण, हदीस, इज्मा व कयास यांवर आधारली आहे. इस्लामी कायदेशास्त्र म्हणजे नुसत्या नियमांची जंत्री नसून प्रगति व विकासाच्या भरभक्कम व शाश्वत पायावर आधारलेली शास्त्रशुद्ध तत्त्वप्रणाली आहे. पाश्चात्य ग्रंथ-कारांच्या टीकेला उत्तर देतांना एक मुस्लिम ग्रंथकार म्हणतो, "निरनिराळ्या काळाशीं व लोकांशीं जुळतें घेण्याची विलक्षण शक्ति मुस्लिम कायद्यामध्यें आहे; त्यामुळें तो मानव प्रगतीबरोबर पाऊलें टाकीत जाऊं शकतो."† सुप्रसिद्ध मुस्लिम कायदेपंडित न्यायमूर्ती सय्यद अमीर अली हे तर स्वच्छ म्हणतात कीं, "मुस्लिम कायद्यामध्येंच विकासाचें तत्त्व अंतर्भूत झालें आहे." रद्दल मुहतार-मध्यें त्यांनीं केलेल्या विधानास संपूर्ण पुष्टि मिळते. कायरो युनिव्हर्सिटीमधील फॅकल्टी ऑफ लॉचे डीन व ईजिप्तमध्यें नांवाजलेले इस्लामी कायद्याचे तज्ज्ञ डॉ. अब्दुर रझाक सनावरी यांनीं तर जगाच्या बदलत्या परिस्थितीशीं ब काळाशीं इस्लामी कायदा समरस होऊं शकतो असें आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें आहे.†

## पांच आधारस्तंभ

(१) धर्मावर श्रद्धा (२) नमाज (३) उपवास (४) दानधर्म व

† Islam in the World, Page 45. Quoted in Al-Fith ( Islamic Weekly Cairo ) Vol. XI, No. 535.

(५) मक्केची यात्रा, हे पांच इस्लाम धर्माचे आधारस्तंभ समजले जातात. वरील पांच महान् तत्त्वांचा प्रत्येक मुस्लिमानें अवलंब केलाच पाहिजे.

## धर्मावर श्रद्धा

इस्लाम धर्मावरील श्रद्धा ही एकाच वाक्यांत प्रदर्शित केली जाते. या वाक्यास 'कलिमा' (कल्मा) अशी संज्ञा आहे. मुस्लिमेतर, या वाक्याचा उच्चार केल्याखेरीज किंवा कलिमा पढल्याखेरीज मुस्लिम होऊं शकत नाहीं. तो कलिमा म्हणजे "ला इलाहा इल्लाह मोहम्मदुर रसुलुल्लाह" (एका परमेश्वराखेरीज दुसरा देव नाहीं; हजरत मुहम्मद हे त्यानेंच पृथ्वीवर पाठविलेले पैगंबर होत). या एकाच वाक्यांत इस्लामचें ध्येय समाविष्ट केलें आहे. परमेश्वरावर अढळ विश्वास ठेवणें हें प्रत्येक मुस्लिमाचें आद्य व पवित्र कर्तव्य आहे. परमेश्वरावर विश्वास यांचा अर्थ परमेश्वराचे जे उदात्त गुण वर्णिले आहेत, त्या गुणांचा शक्य तितका अंगीकार करणें होय. परमेश्वर म्हणजे मूर्तिमंत सत्य व न्याय; परमेश्वर म्हणजे दयेचा सागर व औदार्याचा कळस; परमेश्वर म्हणजे शांततेचें व मानवतेचें प्रतीक. प्रत्येक मुस्लिमानें पवित्र कुराणमध्यें वर्णिलेले परमेश्वराचें उदात्त स्वरूप आत्मसात करण्याचा प्रयत्न करणें म्हणजेच धर्मावरील श्रद्धा प्रकट करणें होय. आपणही सत्याचा, न्यायाचा पुरस्कार केला पाहिजे; आपल्या अंत:करणामध्यें ऋजुता निर्माण केली पाहिजे; आपण उदारचरित झालें पाहिजे; मानवता हें सर्वश्रेष्ठ कर्तव्य समजून त्याप्रीत्यर्थ आपलें सर्वस्व वाहण्याची तयारी दर्शविली पाहिजे; परमेश्वर मानवांवर प्रेम करण्यानें संतुष्ट होतो, त्यांचीं दु:खें व यातना दूर

करण्यानें प्रसन्न होतो; मानवांची सेवा व त्यांचें कल्याण हींच मनुष्याची इतिकर्तव्यता आहे असें प्रत्येक मुस्लिमानें समजलें पाहिजे. हाच अर्थ 'ला इलाहा इल्ललाह्' मध्यें ध्वनित केला आहे. त्याचप्रमाणें हजरत मुहम्मद हे परमेश्वरानें पृथ्वीवर पाठविलेले पैगंबर असल्यामुळें त्यांनीं मानवांच्या उद्धाराची जी शिकवण दिली आहे ती पूर्णपणें अंमलांत आणणें हें आपलें परम कर्तव्य आहे असें मुस्लिम म्हणविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें मानलें पाहिजे. या गोष्टी आपण केल्या तरच इस्लाम धर्मावर आपली खरी श्रद्धा आहे हें सिद्ध होईल. नुसता कलिमा तोंडानें म्हणून त्याचा उपयोग नाहीं. त्यामध्यें वर प्रदर्शित केलेला जो अर्थ आहे तो प्रत्यक्ष अंमलांत आणण्याचा प्रयत्न करूं तरच 'कलिमा' पढल्याचें खरें श्रेय मिळणार आहे. या दृष्टीनें इस्लाम धर्माचा पहिला आधारस्तंभ कलिमा पठण किंवा धर्मावरील श्रद्धेचें निवेदन किती महत्त्वाचें आहे याची आपणांस कल्पना येईल.

## नमाज

सर्व शक्तिमान परमेश्वराची सतत आठवण राहावी या हेतूनें दिवसांतून पांच वेळां प्रत्येकानें नमाज (प्रार्थना) आदा केली पाहिजे, अशी इस्लाम धर्माची आज्ञा आहे. 'परमेश्वराचे जे उदात्त गुण आहेत त्यांमध्यें तद्रूप व्हा.' या इस्लामच्या आदेशाचें विस्मरण होऊं नये म्हणून प्रार्थनेची आवश्यकता प्रतिपादली आहे. सूर्योदयापूर्वी, दोन प्रहरीं, तिसऱ्या प्रहरीं, संध्याकाळीं व रात्रीं अशा पांच वेळां प्रार्थनेकरितां नियुक्त करण्यांत आल्या आहेत. मध्यरात्रीं जी प्रार्थना करण्यांत येते, तिला 'तहाज्जुद' असें नांव आहे. ही प्रार्थना करावीच असा आग्रह नाहीं. ज्यांना शक्य होईल त्यांनीं

‘ तहाज्जुद ’ नमाज आदा करावी असा आदेश आहे. प्रार्थना करण्यापूर्वी एका गोष्टीची अत्यंत आवश्यकता आहे आणि ती म्हणजे ‘ शूचिर्भूतपणा ’ ही होय. वजू केल्याखेरीज किंवा शूचिर्भूत झाल्याखेरीज प्रार्थना करतां येत नाहीं. प्रथम हात धुतल्यानंतर तोंड व नाक पाण्यानें स्वच्छ करावें लागतें. नंतर तोंडाचा भाग धुवावा लागतो. नंतर कोपऱ्यापर्यंत हात धुऊन डोक्यावरून पाण्याचा हात फिरवावा लागतो. शेवटीं घोट्यापर्यंत पाय धुतल्यानंतर शुचिर्भूतपणाचा हा विधि परिपूर्ण होतो. या विधीस ‘ वजू ’ असें नांव आहे. प्रत्येक प्रार्थनेच्या अगोदर म्हणजे दिवसांतून पांच वेळां शुचिर्भूत व्हावें लागतें. एकादा मनुष्य प्रवासांत असेल किंवा पाणी मिळण्याची सोय नसेल तर स्वच्छ जमिनीवर दोन्ही हात ठेवावे व नंतर तोंडावरून आणि हाताच्या मागच्या भागावरून हात फिरवावा या विधीला ‘ तयम्मूम ’ असें म्हणतात. यानंतर त्या व्यक्तीला प्रार्थना करावयास हरकत नाहीं. धोक्याच्या काळांत किंवा प्रवासांत उभ्यानेंच प्रार्थना करण्याचा आणि अशी प्रार्थना थोडक्यांत व आटोपती घेण्याचा आदेश पवित्र कुराणमध्यें देण्यांत आला आहे.

प्रार्थना मशिदींत, घरीं, उघडया मैदानावर किंवा कोणत्याही स्वच्छ ठिकाणीं करतां येते. प्रार्थना करतांना आपलें अंतःकरण निर्मळ ठेवावें लागतें. प्रार्थना चालू ठेवावयाची आणि मनांत भलतेच विचार यावयाचे हा प्रकार केव्हांही योग्य ठरत नाहीं. अशी प्रार्थना व्यर्थ समजली जाते. प्रार्थना करतांना पवित्र कुराणमधील ज्या ऋच्या म्हटल्या जातात, त्यामध्यें केवढेतरी उदात्त व मंगल विचार भरलेले असतात.

उदाहरण म्हणून एक दोन ऋच्या पुढें उद्धृत केल्या आहेत.

"परमेश्वरा, ज्यांच्यावर तुझा कृपाप्रसाद झाला आहे अशांचा सन्मार्ग आम्हांला दाखीव. वाममार्गानें जाणाऱ्यांचा किंवा ज्यांच्यावर तुझा कोप झाला आहे अशांचा मार्ग आम्हांला दाखवूं नकोस."

"हे परमेश्वरा! आम्हांला इहलोकीं व परलोकीं भलेपणा व कृपा दे आणि आम्हांला नर्काग्नीच्या दुःखापासून मुक्त करून आमचें संरक्षण कर. हे अत्यंत दयाळू परमेश्वरा, तुझ्या दयेनें व कृपेनें मला व माझ्या आईबापांना क्षमा कर आणि त्यांच्यावर दया कर. त्यांनीं बालपणापासून वाढविलें आहे म्हणून त्यांच्या चांगुलपणाबद्दल त्यांना बक्षीस देऊन त्यांच्या चुकांची क्षमा कर."

## उपवास

प्रत्येक मुस्लिमानें वर्षांतून एक महिना (रमजान) उपवास केलाच पाहिजे अशी धर्माज्ञा आहे. मनुष्याच्या अंतःकरणाची शुद्धि व्हावी आणि वाईट मनोवृत्तीपासून परावृत्त होण्याकरितां त्यांच्यामध्यें शक्ति निर्माण व्हावी हा या उपवासाचा मुख्य हेतु आहे. उपवास म्हणजे संयम व सहनशीलता निर्माण करण्याचें एक महान साधन. उपवास करतांना संबंध दिवसभर अन्नपाणी वर्ज करावयाचें असतें. फक्त पहांटे व सूर्यास्तानंतर मनुष्यानें हलका आहार घ्यावयाचा असतो. उपासकालीं प्रत्येकानें 'मनोवाक्कायकर्मभिः' पावित्र्य पाळलें पाहिजे. त्या काळांत तोंडांतून अपशब्द काढणें, निंदा करणें, दुसऱ्यास टाकून बोलणें, रागावणें किंवा विलास करणें त्याज्य ठरविण्यांत आलें आहे. या गोष्टी आपण केल्या तर त्या उपवासाचा काडीमात्र उपयोग नाहीं. 'परमेश्वराच्या दृष्टीनें असा उपवास व्यर्थ आहे.' असें हजरत पैगंबरांनीं निवेदिलें आहे.

मुस्लिम धर्मांतील उपवास म्हणजे नुसतें अन्नपाण्यावांचून उपाशी राहणें नसून दुष्ट व पापी वृत्तीपासून अलिप्त राहणें होय. त्या काळांत सदाचार व सद्विचार यांचा अवलंब करून आपला वेळ ईशचिंतनांत घालवावा लागतो. सूर्यास्तानंतर उपवास सोडल्यास थोडा वेळ विश्रांति घेऊन पुन्हां रात्रीं ९ वाजतां मशिदींत जाऊन प्रार्थना करावी लागते. या प्रार्थनेस 'तरावीह' म्हणतात. त्या वेळीं पवित्र कुराणचें पठण होत असतें. एक महिनाभर उपवास केल्यानंतर शेवटीं 'ईदुल फित्र' (रमजान ईद) साजरी करण्यांत येऊन दानधर्म मोठ्या प्रमाणांत केला जातो. ईदचा दिवस अत्यंत आनंदांत घालविण्यांत येतो. ईदनंतर आणखी सहा दिवस उपवास करावयाचा असतो; पण हा उपवास केलाच पाहिजे असें बंधन नाहीं. आजारी, प्रवासी व गर्भवती स्त्रिया यांनीं रमजानचे उपवास केले पाहिजेत अशी सक्ति नाहीं; पण उपवासाऐवजीं त्यांनीं गोरगरिबांना अन्नदान करावें अशी आज्ञा आहे.

उपवासाचा रमजान महिना अत्यंत पवित्र मानला जातो. जगांतील सर्व भागांमध्यें, मुस्लिमांकडून हा महिना मोठ्या निष्ठेनें व भक्तिभावानें पाळला जातो. उपवासाची ईश्वरी आज्ञा मुस्लिम केवढ्या निष्ठेनें पाळतात याचें वर्णन सर थॉमस अर्नोल्ड यांनीं आपल्या ग्रंथांत केलें आहे. ते म्हणतात, "इ. स. १९२८ सालीं उत्तर ध्रुवाकडे जाणाऱ्या एका ब्रिटिश बोटींत मुस्लिम सैनिक होते. त्या प्रदेशांत सूर्यास्त होत नाहीं हें श्रुत आहेच. त्या वेळीं रमजानचा महिना सुरू होता; अर्थात् सूर्यास्त झाल्यावर उपवास सोडूं, या कल्पनेनें ते मुस्लिम सूर्यास्ताची वाट पाहूं लागले. उपवास सोडून त्यांनीं अन्नग्रहण करावें असें त्यांना परोपरीनें सांगण्यांत आलें पण

त्याचा कांहीं एक उपयोग न होतां, त्यांच्यापैकीं कांहींनीं उपवास न सोडतां मरण पत्करलें. तेथून ताबडतोब ती बोट इंग्लंडला परत फिरविल्यामुळेंच बाकीच्या सैनिकांचे प्राण वांचले.''*

## दानधर्म

प्रत्येक मुस्लिमानें दानधर्म (जकात) केलाच पाहिजे असें बंधन आहे. आपल्या उत्पन्नाचा ४० वा भाग त्यानें गोरगरीब, गरजू, अपंग व अनाथ यांना दान म्हणून दिला पाहिजे. त्याच्याजवळ १०० रुपये असतील तर वरील हिशेबानें अडीच रुपये त्यानें दानधर्माकरितां बाजूला काढून ठेवलेच पाहिजेत. दानधर्म न करतां संपत्तीचा संचय करणारा गृहस्थ हीन मानला जातो. आपली संपत्ति ही केवळ आपल्या चैनीकरितांच आहे असें न समजतां, आपल्या संपत्तीमध्यें गोरगरिबांचा हक्काचा हिस्सा आहे असें प्रत्येक मुस्लिमानें समजावें म्हणूनच दानधर्माचें तत्त्व इस्लाम धर्मांत समाविष्ट केलें आहे. नमाजइतकेंच पुण्य दानधर्मांत आहे हें प्रत्येक मुस्लिमानें ओळखलें पाहिजे. गोरगरिबांखेरीज जे कर्जबाजारी असतील, पैशाच्या अडचणींत असतील त्यांना मदत करणें किंवा जे गुलाम असतील त्यांचें स्वातंत्र्य खरेदी करण्याकरितां पैसे खर्चणें या गोष्टींचा इस्लाम धर्मानें दानधर्मांत अंतर्भाव केला आहे.

दानधर्म करतांना कांहीं गोष्टी कटाक्षानें पाळल्या पाहिजेत. दानधर्म करणारानें आपण दुसऱ्यावर उपकार करीत आहोंत असें समजतां कामा नये; त्यानें गरजूला तुच्छतेनें न वागवितां प्रेमानें वागविलें पाहिजे; त्यानें उपकृत माणसापासून कृतज्ञतेची अपेक्षा

* Islamic Faith, Page 36.

करतां कामा नये. आपण दानशूर आहोंत अशी आपली जाहिरात व्हावी या हेतूनें कांहीं लोक दानधर्म करतात; पण हा मार्ग इस्लाम धर्मांत 'अपवित्र' समजण्यांत येतो. कोणालाही न समजतां केलेलें गुप्त दान अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें समजलें जातें.

ज्यांच्याजवळ संपत्ति नाहीं, त्यांनाही पण दानधर्म करतां येतो. एकाद्या गरीब माणसानें सत्कार्य केलें तर त्या सत्कार्याची गणना दानधर्मांत केली जाते. दलितांची सेवा करणें, लोकांना सन्मार्गावर आणण्याकारितां उपदेश करणें, चुकलेल्या वाटसरूंस वाट दाखविणें, तहानेलेल्यास पाणी देणें, अशक्त किंवा वृद्ध लोकांचा बोजा उचलणें, मूक प्राण्यांना दयाळूपणानें वागविणें, शोकग्रस्तांचें सांत्वन करणें, लहान मुलें व पत्नी यांजबरोबर ममतेनें वागणें, शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं प्रेमानें बोलणें या सर्व गोष्टी सत्कृत्यांत जमा होतात. हीं सत्कृत्यें म्हणजे दानधर्मच होय असें इस्लामधर्म समजतो.

## मक्केची यात्रा

'मक्केची यात्रा' हें पांचवें तत्त्व होय. ज्यांना शक्य आहे त्यांनीं मक्केची यात्रा केलीच पाहिजे असा दंडक आहे. ही महान यात्रा करणाऱ्यास पुढील गोष्टी आचराव्या लागतात. (१) आपलें सर्व कर्ज फेडून, आपल्या मुलाबाळांची व कुटुंबियांची तरतूद करून ठेविली पाहिजे. (२) प्रवासास आवश्यक असणाऱ्या वाहनाची व अन्नपाण्याची व्यवस्था करण्याचें सामर्थ्य त्यांच्यामध्यें असलें पाहिजे. (३) त्यानें आपल्या प्रवासाच्या शक्याशक्यतेचा विचार केला पाहिजे. (४) त्यानें आपल्या शत्रूंना मोकळ्या अंतःकरणानें क्षमा केली पाहिजे. (५) त्यानें एकाद्याचा गुन्हा केला असेल तर तो

कबूल करून, त्याच्याशीं मैत्री केली पाहिजे. या सर्व अटी पाळील त्यालाच मक्केची यात्रा करणेचा अधिकार पोहोंचतो.

यात्रेकरू मक्केजवळ जाऊन पोहोंचल्यानंतर यात्रेच्या विधीस सुरुवात होते. आंघोळ करून प्रार्थना केल्यानंतर यात्रेकरू आपले कपडे उतरतो व फक्त कापडाचे दोन तुकडे पेहेरतो. एक तुकडा कमरेखालीं घोटयापर्यंत व दुसरा कमरेच्यावर खांद्यापर्यंत. डोकें उघडें ठेवावें लागतें. हा नियम सर्व यात्रेकरूंनीं पाळावयाचा असतो. राजा असो वा रंक असो, त्यानें हा यात्रेच्या सुरुवातीचा विधी केलाच पाहिजे. या विधीस ' एहराम ' अशी संज्ञा आहे. एहराम बांधल्यानंतर हजामत करणें किंवा नखें काढणें धर्मबाह्य ठरविलें आहे. त्याचप्रमाणें त्यानें कोणतीही हत्या करतां कामा नये; इतकेंच नव्हे तर अंगावरील बारीक जंतूंची हत्या होईल म्हणून आंग खाजवावयास देखील मनाई करण्यांत आली आहे. यात्रा संपेपर्यंत या अहिंसा वृत्तीचें तंतोतंत पालन करावयाचें असतें. निरनिराळे विधी केल्यानंतर गाळा यात्रा परिपूर्ण होते. मक्केचीं यात्रा करणारास ' हाजी ' असें संबोधिण्यांत येतें.

मक्केची यात्रा करण्याकरितां जगांतील सर्व भागांतून लाखों मुस्लिम एकत्र जमा होतात; त्यामुळें मक्केला जगांतील मुस्लिम केंद्राचें स्वरूप येतें. त्या ठिकाणीं एकत्रित झाल्यामुळें आपण सर्व एकाच कुटुंबांतील आहोंत ही भावना निर्माण होणें साहजिक आहे. यात्रेहून परत आल्यानंतर यात्रेकरू ही विश्वबंधुत्वाची विशाल कल्पना बरोबर घेऊन येतो व त्यामुळें त्याचा दृष्टीकोन व्यापक होण्यास बरीच मदत होते.

## नीतितत्त्वें

" इस्लामच्या नीतिशास्त्राचा त्या धर्माशीं निकट संबंध आहे आणि त्या नीतिशास्त्राचीं तत्त्वें परमेश्वरी आज्ञा समजल्या जातात."

—सर थॉमस अर्नोल्ड, डी. लिट., पीएच्. डी.

इस्लाम धर्मांत नीतितत्त्वांना फार उच्च स्थान आहे. नीतितत्त्वांना महत्त्व न देतां, नुसत्या धर्मतत्त्वांचा अवलंब केला तर इस्लाम धर्माचें पालन परिपूर्ण होऊं शकत नाहीं. नीतिशास्त्र हें इस्लाम धर्माचें अधिष्ठान मानलें जातें. तें अधिष्ठानच गेलें तर धर्माचें अस्तित्व तरी कसें राहील! परमेश्वरी स्वरूपाशीं तादात्म्य होणें हें इस्लाम धर्माचें मुख्य कार्य असल्यामुळें, ती तादात्म्यता संपादण्याचा मार्ग म्हणजे नीतितत्त्वें आत्मसात करणें होय. अशा कांहीं महत्त्वाच्या नीतितत्त्वांचा आपणांस संक्षेपानें विचार करावयाचा आहे.

" आईबापांशीं दयाळूपणानें वागा अशी परमेश्वराची तुम्हांला आज्ञा आहे."

—पवित्र कुराण १७:२३

आपल्या आईबापांशीं प्रेमळपणानें वागणें हें प्रत्येक मुस्लिमाचें कर्तव्य आहे. त्यांनीं आपणांस जन्म दिला, आपल्याकरितां अनेक खस्ता खाऊन आपणांस लहानाचे मोठें केलें, हे त्यांचे महदुपकार आपण कधींही विसरतां कामा नये. या जगामध्यें आपल्यावर जर कोणाचें सर्वांत मोठें ऋण असेल तर तें आईबापांचें आहे. या ऋणांतून अंशतः का होईना मुक्त होण्याकरितां आपण त्यांच्याशीं दयाशील वृत्तीनें वागलें पाहिजे.

" आईबापांच्या वृद्धापकाळीं त्यांच्या मनाला लागेल असा एकही धिःकारयुक्त शब्द वापरूं नका किंवा धमकीवजा बोलूं नका. त्यांच्याशीं नेहमीं गोड बोला."

--पवित्र कुराण १७:२३

वृद्धापकाळीं तर आईबापांना अतिशय जपलें पाहिजे. मनुष्य वृद्ध झाला कीं त्याची विचारशक्ति कमकुवत होते किंवा त्यांच्यामध्यें सर्वसाधारणपणें चिडखोरवृत्ति येते; त्याच्या तोंडून एकादा उणा शब्द बाहेर पडणें साहजिक असतें. या गोष्टीचें नीट स्मरण ठेवून आपल्या वृद्ध आईबापांशीं वागतांना आपण फार खबरदारी घेतली पाहिजे. वृद्धापकाळांत त्यांना टाकून बोलण्यास किंवा दुरुत्तरें देण्यास इस्लामनें सक्त मनाई केली आहे. त्यांच्या हातून एकादी चूक झाली तरी त्या चुकीची त्यांना जाणीव करून न देतां त्यांच्याशीं नेहमीं प्रेमळपणानें वागलें पाहिजे.

" स्वर्गांत प्रवेश मिळवूं इच्छिणारांनीं प्रथम आपल्या आईबापांस संतुष्ट केलें पाहिजे."

—हजरत मुहम्मद पैगंबर

स्वर्गप्राप्ती ही आईबापांच्या संतुष्टतेवर अवलंबून आहे असें इस्लाम मानतो. आपण वाटेल तेवढीं पुण्यकृत्यें केलीं आणि आईबापांचा छळ चालूं ठेवला तर आपणांस स्वर्ग कधींच मिळणार नाहीं. आईबापांचा शाप लवकर भोंवतो हें लक्षांत ठेवून त्यांना प्रसन्न ठेवण्याची आपण पराकाष्टा केली पाहिजे.

" मातेच्या पायांखालीं स्वर्ग आहे."

—हजरत मुहम्मद पैगंबर

इस्लाम धर्मास आईविषयीं केवढा आदर वाटतो हें हजरत पैगंबरांच्या वरील वाक्यावरून सिद्ध होण्यासारखें आहे. माता-पित्यांच्या भक्तीस या धर्मांत इतकें महत्त्व आहे कीं दररोज पांच वेळां प्रार्थना करीत असतां, प्रार्थनेमध्यें त्यांचा उल्लेख करण्यांत येऊन, त्यांना सद्गति देण्याकरितां परमेश्वरास आळविण्यांत येतें.

प्रत्येक मुस्लिम कुटुंबवत्सल असला पाहिजे. आपली पत्नी, मुलें आणि नातेवाईक यांच्याशीं त्यानें अत्यंत प्रेमळपणानें वागलें पाहिजे. इस्लाम धर्मांत पत्नीला घरची 'राज्ञी' समजण्यांत येतें. तिला कोणत्याही प्रकारें दुखवूं नका असा धर्माचा आदेश आहे.

"तुमच्या पत्नीला संतुष्ट राखा."

—पवित्र कुराण ६६:१

ती दुःखीकष्टी होईल अशा तऱ्हेचें वर्तन कोणीही करूं नये. तिला शिव्याशाप किंवा मारहाण करणाऱ्या पतीचा धिक्कार करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें आपलीं मुलेंबाळें व नातेवाईक यांच्याशीं सहृदयतेनें वागलें पाहिजे. आपले नातेवाईक हे दूरचे लोक नसून ते आपल्या कुटुंबियांपैकींच आहेत असें समजलें पाहिजे.

तसेंच प्रेमाचें वर्तन आपल्या शेजाऱ्याशींही ठेविलें पाहिजे. शेजारधर्म हा एक श्रेष्ठ धर्म समजून शेजाऱ्यांच्या सुखदुःखांशीं आपण समरस झालें पाहिजे. त्यांना त्रास होईल किंवा त्यांच्या भावना दुखावल्या जातील असें कृत्य आपल्या हातून चुकून देखील होणार नाहीं याबद्दल आपण तत्पर असलें पाहिजे.

"जो स्वतः पोटभर जेवतो व शेजाऱ्यांना उपाशीं ठेवतो तो सच्चा मुसलमान नव्हे."

—हजरत मुहम्मद पैगंबर.

शेजाऱ्यांबद्दल नुसती शाब्दिक सहानुभूति न दाखवितां ती कृतींत आणून दाखविली पाहिजे. शेजाऱ्याच्या घरीं जर उपासमार होत असेल तर आपण स्वतः अर्धपोटीं राहून आपली अर्धी भाकर त्यांना दिली पाहिजे. आपण आकंठ जेवावयाचें आणि शेजारघरीं उपवास घडावयाचा हें दृश्य जगाला कधींही दिसतां कामा नये.

" जो गृहस्थ थोडा वेळ प्रार्थना करतो आणि थोडा दानधर्म करतो पण शेजाऱ्यांच्या कल्याणाकरितां अहर्निश झटतो तो श्रेष्ठ मानवांपैकीं होय."

—हजरत मुहम्मद पैगंबर.

मानव्य हें आपलें ध्येय असल्यामुळें त्याचा उगम प्रथम घरांत होणें क्रमप्राप्त आहे. आपल्या कुटुंबांतील मंडळीशीं, नातेवाईकांशीं आपण आत्मीयतेनें व प्रेमानें वागलें पाहिजे. त्यानंतर शेजाऱ्यांशींही तसेंच वर्तन ठेविलें पाहिजे. हा प्रेमाचा व सहानुभूतीचा परिघ असाच वाढत जाऊन त्यामध्यें सबंध मानवतेचा समावेश झाला पाहिजे.

" दया हें धर्माचें चिन्ह आहे. ज्याच्याजवळ दया नाहीं त्याच्याजवळ धर्म नाहीं."

—हजरत मुहम्मद पैगंबर.

धर्माचें महात्म्य, त्या धर्मांतील दयेच्या शिकवणीवर अवलंबून असतें. ज्या धर्मांत दयेचा पुरस्कार करण्यांत येत नाहीं तो धर्म या संज्ञेस पात्र होऊं शकत नाहीं. धर्मशील माणसाची ' सहृदय माणूस ' अशी इस्लामची व्याख्या आहे. पांच वेळां नमाज पडणाऱ्या सद्गृहस्थाच्या अंतःकरणांत दयेचा मागमूसही नसेल तर

त्याला धर्मशील असें कधींच म्हणतां येत नाहीं. अशा गृहस्थाच्या प्रार्थनेची परमेश्वर पर्वाही पण करीत नाहीं. पैशाच्या किंवा सत्तेच्या धुंदींत अनाथांना दुरुत्तरें द्यावयाचीं, गोरगरिबांना पिळून काढावयाचें, लोकांना छळावयाचें आणि इकडे पांच वेळां प्रार्थना करून आपण धर्मशील आहोंत असा देखावा करावयाचा ही गोष्ट परमेश्वरास कधींच आवडत नाहीं.

दया हें धर्माचें जीवन आहे; तिला जातगोत माहित नसतें; स्वकीय व परकीय असा भेदाभेद ती करीत नाहीं; स्वधर्मी व परधर्मी असा पंक्तिप्रपंच तिला वावडा असतो; इतकेंच नव्हे तर सज्जन व दुर्जन असा भेदही ती ओळखीत नाहीं.

> " जगांतील प्रत्येक व्यक्तीवर, मग ती वाईट असो वा चांगली असो, दया करा. वाईट माणसांवर दया करणें म्हणजे वाईटपणापासून त्या माणसास परावृत्त करणें होय."
>
> —हजरत मुहम्मद पैगंबर.

' वाईटाचा बदला चांगल्या गोष्टीनें द्या ' या तत्त्वाचीं बीजें वरील हजरत पैगंबरांच्या आज्ञेंत आपणांस दिसून येतील. वाईट माणसांशीं जशास तसें या न्यायानें वागणें म्हणजे स्वतः त्या माणसाच्या पंक्तीमध्यें जाऊन बसणें होय. अशा वागण्यानें आपण आपलें स्वतःचें नुकसान करून घेतोंच पण त्या वागण्याचा वाईट माणसावर कांहींच परिणाम होत नाहीं. उलट तो माणूस चिडून अधःपाताच्या गर्तेत अधिक खोल जाऊं लागतो.

> " वाईट गोष्ट चांगल्या गोष्टीनें परतवा."
>
> —पवित्र कुराण १३:२२.

वाईट मनुष्याशीं आपण चांगल्या रीतीनें वागलों, त्याच्यावर दया केली तर मात्र त्याला स्वत:लाच आपण केलेल्या वाईट कृत्याबद्दल लाज वाटेल आणि तो चांगल्या मार्गाचा अवलंब करील. "वाईटाचा बदला चांगल्या गोष्टीनें द्या" हा महान प्रयोग, वाईट किंवा दुष्ट माणसांच्या अंत:करणाचें परिवर्तन करून त्याला सज्जन बनवूं शकतो. हाच विश्वास पवित्र कुराणच्या वरील वाक्यांत प्रकट झाला आहे.

प्रत्येक मुस्लिमानें प्रसन्नचित्त राहिलें पाहिजे आणि त्याच्या सहवासांत येणारी व्यक्ति प्रसन्नचित्त होईल अशी खबरदारी घेतली पाहिजे. त्याचे आचारविचार, रीति-रिवाज, शिष्टाचार पाहून दुसऱ्यांना समाधान व आनंद वाटला पाहिजे. लोक आपल्यापासून फटकून वागतील अशा तऱ्हेनें तुसडें वर्तन इस्लामनें गर्ह्य मानलें आहे. उद्दामपणाचा तर धिक्कार करण्यांत आला आहे. आपण कितीही श्रीमान् असलों, सत्ताधारी असलों, विद्वान असलों तरी आपण सदैव विनम्र असलें पाहिजे; दुसऱ्यांशीं वागतांना सहृदयता दाखविली पाहिजे.

"लोकांना पाहून तिरस्कारानें तोंड फिरवूं नका."

—पवित्र कुराण ३१:१८.

कोणाबद्दलही घृणा किंवा तिटकारा बाळगतां कामा नये. एकाद्या व्यक्तीबद्दल तिटकारा व्यक्त करतांना तिरस्कारानें तोंड फिरविलें जातें. ही वृत्ति इस्लामनें निषेधार्ह ठरविली आहे. अशा आचरणानें तो मनुष्य निष्कारण दुखावला जातो ही गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे. आपल्या नजरेपुढें नको असलेली व्यक्ति

जर समोर आली तर तिला न टाळतां आपण मोकळेपणानें तिची विचारपूस केली पाहिजे. तीच गोष्ट अतिथीची – अतिथीसत्कार हा एक महान् शिष्टाचार आहे. आपल्याकडे येणाऱ्या पाहुण्याची योग्य बडदास्त ठेवणें हें प्रत्येकाचें कर्तव्य-कर्म आहे. आपली गैरसोय झाली तरी तिचा विचार न करतां अतिथीचा सत्कार केला पाहिजे; इतकेंच नव्हे तर आपणांस नको असणारा पाहुणा आलाच तर त्याला देखील प्रेमळपणाची वागणूक दिली पाहिजे. 'यजमान घरीं नाहींत' असें परभारें उत्तर देण्याची व्यवस्था करून पाहुण्याची ब्याद न घालवितां आपण त्यांचें अंत:करणपूर्वक आतिथ्य केलें पाहिजे. केवळ नाइलाज म्हणून पाहुण्याचें स्वागत करावयाचें व तो निघून गेला म्हणजे त्याच्या नांवानें बोटें मोडावयाचीं, त्याची टवाळकी करावयाची निंद्य संवय इस्लामच्या दृष्टीनें त्याज्य होय.

"निंदा करणाऱ्या किंवा बदनाम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा धिक्कार असो."

—पवित्र कुराण १०४:१.

मनुष्याचा सर्वांत मोठा व अक्षम्य दुर्गुण म्हणजे त्याची निंदक वृत्ति. या अश्लाघ्य वृत्तीचा पवित्र कुराणांत अत्यंत कडक शब्दांत धिक्कार करण्यांत आला आहे. अट्टल गुन्हेगारापेक्षांही निंदक निषेधार्ह समजला जातो. त्याला सद्विचार माहित नसतात, अंत:करणाच्या दिलदारपणास तो पारखी झालेला असतो, सभ्यतेच्या मर्यादा तो जाणीत नाहीं, खेळाडूवृत्ति त्याच्या ध्यानींमनींही नसते. लोकांची सतत निंदा करून त्याचें अंत:करण काळवंडून गेलेलें असतें, त्याची नजर दोषी बनलेली असते. एकाद्या स्त्रीचें निष्पाप वर्तन त्याला गर्ह्य वाटतें, तिच्या निष्कपट वागण्यांत त्याला किल्मिष

दिसूं लागतें, तिच्या निर्मल चारित्र्यावर तो गिधाडासारखा तुटून पडतो. सालस स्त्रियांची निंदा करणारास 'सार्वजनिक शत्रू' समजून त्याचा धिक्कार केला पाहिजे, इतकेंच नव्हे, अशा नीच गृहस्थास समाजांत देखील वावरूं देऊं नये.

"एकाद्याची गुप्तपणें चवकशी करूं नका किंवा त्याच्या पाठी-मागें निंदा करूं नका."

—पवित्र कुराण ४९:१२.

लोकांचीं बिंगें शोधण्याची कांहीं लोकांना खोडच असते; त्यांच्या स्नेह्यासोबत्यांजवळ जाऊन बारीकसारीक चवकशी करण्याचा निंद्य प्रयत्न ते सदैव करीत असतात. वास्तविक अशा प्रयत्नांपासून त्यांचा किंवा समाजाचा कांहींच फायदा नाहीं याची त्यांना जाणीव असत नाहीं. जो अमूल्य वेळ एखाद्या सत्कार्यांत खर्च करावयाचा तो वेळ हे सद्गृहस्थ दुसऱ्यांची कुचाळकी करण्यांत खर्च करीत असतात. असे रिकामटेकडे व हीन उद्योग करण्यास इस्लामनें मनाई केली आहे.

"लोकांचे दोष काढीत बसूं नका किंवा टोंपण नांवानें हिणवूं नका."

—पवित्र कुराण ४९:११.

चारचौघांसमोर एकाद्याचे दोष दाखवीत राहणें ही एक प्रकारची निंदाच आहे. कारण दुसऱ्याचे दोष दाखविण्यांत त्याची कधींच सदिच्छा असत नाहीं. दोष दाखवून तो गृहस्थ किती नालायक आहे हें सिद्ध करण्याचा तो खटाटोप असतो. तसेंच एकाद्याला टोंपण नांवानें हिणवणें ही देखील प्रच्छन्न निंदाच आहे. शारीरिक

व्यंगावरून, किंवा त्याच्या हातून चुकून घडलेल्या प्रसंगावरून त्याला टोपण नांवानें हिणवणें हें निंद्य मानलें पाहिजे. गालीप्रदान, निंदा, कुचाळकी या गोष्टी सदभिरुचीस व सभ्यतेस सोडून असल्या-मुळें त्यांपासून आपण सदैव दूर राहिलें पाहिजे.

इस्लामधर्मांत सभ्यतेस मोठें महत्त्व आहे. सभ्यता म्हणजे मनुष्याचा बहुमोल अलंकार असें समजलें जातें. मनुष्याला परमेश्वराच्या स्वरूपाशीं तद्रूप करणारे जे सद्गुण आहेत, त्यांमध्यें सभ्यतेचा इस्लामधर्मानें अंतःर्भाव केला आहे. आपल्या बोलण्याचालण्यांत व कृतींत जें औदार्य आणि शिष्टता दिसून येते तिलाच आपण सभ्यता समजतों. मनुष्याच्या सुसंस्कृत स्वभावाची पारख त्याच्या सभ्यतेवरून सहज करतां येते.

"मणभर धान्याचा दानधर्म करण्यापेक्षां आपल्या मुलास सभ्यता शिकविणें अधिक चांगलें आहे."

—हजरत मुहम्मद पैगंबर.

इस्लाम धर्मांत दानधर्माचें महत्त्व मोठें आहे हे आपण मागें पाहिलें आहे; पण या ठिकाणीं त्याहून सभ्यतेचें जास्त महत्त्व मानण्यांत आलें आहे. आपल्या वागणुकीनें दुसऱ्यांना प्रसन्न करणें हा सभ्यतेचा उद्देश असतो. आपल्या सहवासांत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या वागणुकीनें आल्हाद देणें किंवा प्रसन्न करणें हा एक प्रकारचा परोपकारच आहे. दानधर्मानें आपण गरजूंना संतुष्ट करूं पण सभ्यतेचा धर्म पाळून आपल्या सहवासांत येणाऱ्या अनेक गरीबश्रीमंत, लहानथोर इत्यादि लोकांना प्रसन्न करूं शकूं. सभ्यतेचें धडे देणें हे दानधर्मापेक्षांही मोलाचें आहे असा आदेश

देऊन इस्लामनें मानवी संस्कृति समृद्ध करण्यास केवढी तरी मदत केली आहे.

प्रत्येक व्यक्तीनें वाणीचें व कृतीचें पावित्र्य पाळलें पाहिजे. अवाच्य बोलणें, शिवीगाळ करणें, अभद्र शब्द उच्चारणें यांपासून आपण परावृत्त झालें पाहिजे. उन्मत्तपणानें बढाया मारणें हा देखील वाणीचा दुरुपयोग आहे. संपत्तीच्या किंवा अधिकाराच्या धुंदींत वाटेल त्या बढाया मारणें हा आपला हक्क आहे असें कित्येकांना वाटतें. अशा उन्मत्तपणाचा निषेध करण्यांत आला आहे.

"गर्विष्ठ व बढाईखोर माणसावर परमेश्वर प्रेम करीत नाहीं."

—पवित्र कुराण ४:३६.

नम्रतापूर्वक बोलणें हा वाणीचा सदुपयोग समजला जातो. कठोरपणानें कोणालाही टाकून बोलणें हें सभ्यतेस सोडून आहे. लोक आपल्याशीं फटकून वागतील अशा तऱ्हेची कटु भाषा आपण कधींही वापरतां कामा नये.

"लोक आपल्याशीं फटकून वागतील अशा तऱ्हेची भाषा वापरणारा मनुष्य परमेश्वराच्या दृष्टीनें अधम मानला जातो."

—हजरत मुहम्मद पैगंबर.

परमेश्वरानें आपल्याला वाणी दिली हेंच त्याचें आपल्यावर किती तरी उपकार आहेत. या वाणीचा दुरुपयोग करणें म्हणजे परमेश्वराशीं कृतघ्न बनणें होय. अशा कृतघ्न माणसास अधम समजण्यांत आलें तर तें योग्यच ठरेल. आपल्या वाणीचा सदुपयोग करणें हें आपलें कर्तव्य आहे असें सभ्य गृहस्थ समजतो. आपल्या तोंडून चुकून देखील अपशब्द पडणार नाहीं अशी खबरदारी तो सदैव घेत असतो.

लोक प्रसन्न होतील असें वक्तव्य करणें, चांगले विचार बोलून दाखविणें, परमेश्वराचें नामसंकीर्तन करणें, अनाथ व असहाय्य लोकांस धीराचें बोल ऐकविणें अशा कितीतरी मार्गांनीं, सभ्य गृहस्थ आपल्या वाणीचें पावित्र्य राखीत असतो.

" एकदां तुम्ही वचनबद्ध झालांत म्हणजे आपलें वचन मोडूं नका."

—पवित्र कुराण १६:९१.

आपण दिलेलें वचन परिपूर्ण करणें म्हणजे वाणीचें पावित्र्य सांभाळणें होय. आपण एकाद्याला वचन दिलें तर तें कोणत्याही परिस्थितींत पुरें करून दाखविलें पाहिजे. आपण दिलेलें वचन म्हणजे परमेश्वराजवळ घेतलेली शपथ आहे असें आपण समजलें पाहिजे. आपलें कार्य तडीस जावें म्हणून लोकांना वचनें द्यावयाचीं आणि नंतर तीं सोईस्करपणें विसरून जावयाचें ही अधमवृत्ति केव्हांही निंद्यच होय.

" परमेश्वर दगलबाज माणसावर प्रेम करीत नाहीं."

—पवित्र कुराण ६:६०.

आपण दिलेलें वचन मोडणारा गृहस्थ दगलबाज समजला जातो. अघळपघळ आश्वासनें देऊन तीं न पाळणें, भरपूर काम करून घेऊन मजुराला त्याच्या श्रमाचे पैसे देण्यास टाळाटाळ करणें, लोकांचा विश्वासघात करणें, अनाथ स्त्रिया व मुलें यांची मिळकत गिळंकृत करणें, खोटेंनाटें सांगून लोकांना फसविणें हे सारे प्रकार दगलबाजींत अंतर्भूत होतात. समाजाची घडी विस्कटण्यास कारणीभूत होणाऱ्या अशा अश्लाघ्य प्रकारास प्रत्येकानें आळा घातला पाहिजे.

वाणीप्रमाणें कृतीचेंही पावित्र्य आपण सांभाळलें पाहिजे. आपल्या हातून अशी कोणतीही कृति घडतां कामा नये कीं ज्यामुळें आपल्या सभ्यतेस काळिमा लागेल. आपण आपली शक्ति, संपत्ति आणि बुद्धिमत्ता लोकांच्या कल्याणाकरितां खर्चली पाहिजे. द्वेषाच्या किंवा मग्रुरीच्या आहारीं जाऊन आपल्या शक्तिसंपदेचा कधींही दुरुपयोग करतां कामा नये.

"असभ्यता, दुष्टपणा आणि शिरजोर वृत्तीचा परमेश्वर धिक्कार करतो."

—पवित्र कुराण १६:९०.

आपल्या असभ्य वर्तनानें लोकांचीं मनें दुखविणें, आपल्या दुष्टपणानें त्यांना संकटांत लोटणें, आपल्या शिरजोर वृत्तीनें त्यांची कुचंबणा करणें या साऱ्या गोष्टी माणूसकीला सोडून आहेत. मानव्याचें स्वास्थ्य बिघडवून टाकणाऱ्या अशा अनाचारांपासून शक्य तितकें दूर राहण्याचा प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे.

"परमेश्वरा, अनाचार करणाऱ्या लोकांपासून मला वांचव."

—पवित्र कुराण २८:२१.

अनाचारामुळें समाजाच्या स्वास्थ्याला धक्का पोहोंचतो, त्याची घडी विसकटते, तो कमकुवत बनतो, त्यामध्यें बेबंदशाही माजते; याकरितां अनाचारांना पायबंद घालणें हें प्रत्येक मुस्लिमाचें कर्तव्यकर्म आहे. अनाचार करणारा कोणीही असो; त्याला अभय मिळतां कामा नये. आपल्या समाजांतील किंवा पक्षांतील लोकांनीं अनाचार केले तरी त्यावर पांघरूण न घालतां, त्यांना न्यायासनासमोर खेंचलें पाहिजे. अनाचार हा भस्मासुरासारखा असतो. आज प्रतिपक्षाला

तो त्राहि भगवान् करील पण उद्यां तोच आपल्या डोक्यावर हात ठेवावयास कमी करणार नाहीं; हें नीट लक्षांत ठेवून तो निर्माण होणार नाहीं अशी खबरदारी आपण घेतली पाहिजे.

"आपल्या वाचेनें व कृतीनें जो मानव जातीस दुखवीत नाहीं तो मुस्लिम होय."

—हजरत मुहम्मद पैगंबर.

मुस्लिम म्हणविणारावर वाचा आणि कृती यांचें पावित्र्य सांभाळ्याची फार मोठी जबाबदारी आहे हें वरील वाक्यावरून सिद्ध होतें. मानवता हा आपला श्रेष्ठ धर्म आहे असें त्यानें समजलें पाहिजे; आपल्या वाचेनें आणि कृतीनें त्याचें संवधर्न केलें पाहिजे. इस्लाम धर्माचा वरील आदेश लक्षांत ठेवून आपले आचारविचार शुद्ध, पवित्र व संशयातीत ठेवणें हें प्रत्येक मुस्लिमाचें पवित्र कर्त्तव्य आहे.

## सहिष्णुता

"सहिष्णु असण्याचें धोरण मुहम्मद व त्यांचे एक दोन वंशज यांनीं पाळले असें नसून अरबांचें वर्चस्व होतें तोंपर्यंत अखंड पाळलें जात होतें."†

—मानवेंद्र रॉय.

इस्लाम धर्माची अपुरी माहिती व अज्ञान यांमुळें जे गैरसमज पसरले आहेत व पसरविले जात आहेत, त्यांपैकीं 'इस्लाम धर्म हा असहिष्णु आहे' हा एक होय. इस्लामधर्माचीं तत्त्वें, हजरत पैगंबरांनीं काढलेलीं फर्मानें, परधर्मीयांना मिळालेले संपूर्ण आचार-

† Historical Roll of Islam Page, 44.

विचार व धर्मस्वातंत्र्य, पराभूत लोकांना मुस्लिमांनीं दिलेली उदार वागणूक यांचा विचार केला म्हणजे इस्लामधर्म केवढा सहिष्णु आहे याची आपणांस कल्पना येईल. यापुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं, इस्लाम धर्मानें जी सहिष्णुता दाखविली ती नुसती प्रशंसनीयच नव्हे तर आजकालच्या परिस्थितींत सर्वांनाच आचरणीय अशी आहे.

परधर्म व परधर्म-संस्थापक यांच्याविषयीं अनादर ही अव्वल दर्जाची असहिष्णुता समजली जाते. परधर्म व त्यांचे संस्थापक यांची निंदा करणें, त्यांना शिव्याशाप देणें, त्यांचा धिक्कार करणें म्हणजेच धर्म अशी कल्पना एके काळीं प्रसृत होती. त्या काळीं ख्रिश्चन व ज्यू धर्मियांमध्यें तर एकमेकांना गालीप्रदान करण्यांत अहमहमिका लागली होती. या धुळवडीचा इस्लामधर्म-संस्थापकांना फायदा घेतां आला असता; पण हें अहिष्णु व गर्ह्य कार्य त्यांनीं केलें नाहीं. परधर्म व त्यांचे संस्थापक यांच्याविषयीं नितांत आदर प्रदर्शित करून त्यांनीं आपली असामान्य सहिष्णुवृत्ति जगाच्या निदर्शनास आणून दिली आहे. इस्लामधर्म दुसऱ्या धर्माची किंवा त्या धर्माच्या प्रवर्तकाची कधींच निंदा करीत नाहीं; उलट त्यांच्याविषयीं आदराची भावना बाळगतो. प्रत्येक धर्माचा संस्थापक किंवा प्रवर्तक हा निष्कलंक आहे, त्याचें कार्य थोर आहे, त्याला सर्वांनीं मान दिला पाहिजे अशी इस्लामची शिकवण आहे. बायबलमध्यें अब्राहम व जोसेफ आदि धर्मसंस्थापकांविषयीं जो अविश्वास व अनादर दाखविला आहे तो आपणांस पवित्र कुराणमध्यें कधींच दिसून येणार नाहीं. त्याचप्रमाणें ज्यू लोकांनीं येशू ख्रिस्तावर त्याच्या जन्माबद्दल जे घाणेरडे आरोप केले आहेत त्याचा पवित्र कुराणमध्यें

इन्कार करण्यांत आला आहे; इतकेंच नव्हे तर येशू ख्रिस्त व इतर धर्मसंस्थापक यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

इस्लामचा दृष्टिकोण विशाल आहे. निरनिराळ्या धर्म व धर्मसंस्थापकांनीं त्या त्या देशांत, तेथील जनतेला अधःपातापासून वांचविण्याचें श्रेष्ठ कार्य केलें आहे असें तो मानतो. मानव जातीवर झालेलें प्रत्येक धर्माचें ऋण कबूल करण्याइतकी उदारता इस्लाम धर्मामध्यें आहे. कालपरिस्थितीनुसार प्रत्येक देशांत परमेश्वरानें पैगंबर पाठविला आहे असें इस्लाम समजतो.

"प्रत्येक राष्ट्रामध्यें पैगंबर पाठविला आहे."

—पवित्र कुराण १६:३६.

ज्या ज्या वेळीं धर्मग्लानि होते, सत्य व न्याय पायदळीं तुडविलीं जातात, सर्वत्र अनाचार माजतो त्या त्या वेळीं जनतेला अधःपातापासून वांचविण्याकरितां त्या त्या देशामध्यें परमेश्वर पैगंबर पाठवून देतो. जनतेला परमेश्वराची व तिच्या थोर कार्याची आठवण करून देऊन तिला सन्मार्गी लावण्याचें श्रेष्ठ कार्य पैगंबर करीत असतात. प्रत्येक राष्ट्रांत एकच धर्म असूं शकत नाहीं. निरनिराळ्या राष्ट्रांत निरनिराळे धर्म संभवतात. प्रत्येक राष्ट्रांत परमेश्वरानें पैगंबर पाठविला आहे म्हणजे प्रत्येक धर्मांत पैगंबरांचा अवतार संभवतो. ईश्वराचा संदेश आणणाऱ्या प्रत्येक पैगंबराबद्दल मुस्लिमानें आदराची भावना बाळगली पाहिजे. पवित्र कुराणमध्यें तिसऱ्या अध्यायांत त्याच्यावर विश्वासही ठेवला पाहिजे असा स्पष्ट आदेश देण्यांत आला आहे.

"जे परमेश्वर आणि त्याचे पैगंबर यांच्यावर विश्वास ठेवितात

आणि त्यांच्यामध्यें भेदाभेद करीत नाहीं त्यांना परमेश्वर पारितोषिक देईल."

—पवित्र कुराण ४:१५२.

परमेश्वर आणि त्यानें भूतलावर पाठविलेल्या पैगंबरांच्या अवतार-कार्यावर प्रत्येक मुस्लिमानें भरंवसा ठेवला पाहिजे. पैगंबरांचें कार्य थोर व संशयातीत असल्यामुळें त्यांच्यामध्यें श्रेष्ठतर, श्रेष्ठतम असा भेदाभेद न करितां सर्वांबद्दल सारखा आदर व विश्वास प्रकट केला पाहिजे. कांहीं पैगंबरांबद्दल विश्वास व कांहीं पैगंबरांबद्दल अविश्वास बाळगणें किंवा धर्माच्या अतिरेकी कल्पनेमुळें फक्त आपल्या धर्माच्या पैगंबरांचें अस्तित्व मान्य करणें या गोष्टी इस्लाम धर्मानें धर्मबाह्य मानल्या आहेत. पवित्र कुराणच्या 'अन्-निसा' या अध्यायांत (१५० वी ऋचा) परमेश्वर व त्यांचे पैगंबर यांबद्दल अविश्वास बाळगणारा किंवा त्यांच्यामध्यें भेदभाव करणारा 'नास्तिक' आहे असा स्पष्ट उल्लेख केला आहे. नास्तिक कधींही मुस्लिम होऊं शकत नाहीं, असा इस्लामचा दावा आहे.

"अल्लाखेरीज लोकांनीं इतर देव मानले तर त्या देवांना शिवीगाळ करूं नका."

—पवित्र कुराण ६:१०९.

आपल्या धर्माच्या अभिनिवेशांत परधर्मीयांच्या देवादिकांविषयीं अभद्र बोलणें किंवा शिवीगाळ करणें हें अयोग्य आहे. आज आपण देवादिकांविषयीं अश्लिल भाषा वापरूं तर उद्यां आपल्या सर्वशक्तिमान परमेश्वराचीही तशीच संभावना होईल; याकरितां अशा असहिष्णुतेपासून दूर राहण्याचा इस्लामचा आदेश आहे.

" धर्माच्या बाबतींत अतिरेकी वर्तन करूं नका."

पवित्र कुराण ५:८०.

अर्थात धर्मांध बनूं नका असा इस्लामनें इशारा दिला आहे. धर्मांध मनुष्य म्हटला कीं तो अव्वल दर्जाचा असहिष्णु असतोच. इतर धर्म व त्यांचे प्रणेते यांची नालस्ती करणें, त्यांना हिणवणें, किंवा आपल्या धर्मसंस्थापकास देवाचा पुत्र बनवून इतरांना तुच्छ लेखणें इत्यादि गोष्टींचा समावेश धर्मांधतेंत किंवा धर्माबद्दलच्या अतिरेकी वर्तनांत होऊं शकतो. अशा तऱ्हेचें असहिष्णु व अविवेकी वर्तन इस्लामला मुळींच संमत नाहीं. धर्माच्या नांवावर चरितार्थ चालविणारा किंवा प्रतिष्ठा मिळविणारा गृहस्थच 'अतिरेकी' वर्तनास प्रोत्साहन देत असतो. या नीच वृत्तीवर, महान् मुस्लिम पंडित अल्लामा यूसफ अली यांनीं विदारक प्रकाश पाडला आहे. वरील ऋचेवर भाष्य करतांना ते लिहितात, " अतिरेक हा केव्हांही नेमस्तपणा व बुद्धिवाद यांच्या विरुद्ध असून, धर्माच्या नांवावर व्यापार करणाऱ्या ढोंगी व स्वार्थी माणसाला पडताळून पाहण्याची सर्वांत सोपी पारख किंवा कसोटी आहे....सत्य कांहीं वेळां दडविणें किंवा पायदळीं तुडविणें म्हणजेच अतिरेक करणें होय."†

परधर्मीयांचें धर्मस्वातंत्र्य हिरावून घेणें, अधिकाराच्या जोरावर त्यांची मुस्कटदाबी करणें किंवा त्यांना जबरदस्तीनें आपला धर्म स्वीकारावयास लावणें हे व यांसारखे दुसरे असहिष्णु प्रकार त्याज्य आहेत हें इस्लामनें सिद्ध केलें आहे. मदिनेचे सर्वाधिकारी झाल्यानंतर हजरत मुहम्मद पैगंबरांनीं, परधर्मीयांचे हक्क संरक्षण्याकरितां जे अनेक जाहीरनामे काढले ते पाहिले म्हणजे इस्लाममध्यें केवढी

---

† The Holy Quran, Page 267.

श्रेष्ठ दर्जाची सहिष्णुता आहे याची आपणांस कल्पना येईल. ख्रिश्चन व ज्यू हे इस्लामचे कट्टे वैरी होते हें आपण मागें पाहिलेंच; पण त्यांच्या दुर्बलतेचा, असहाय्यतेचा फायदा घेऊन भरपूर उट्टें काढण्याचा दुष्टपणा इस्लामधर्म-प्रणेत्यांनीं केव्हांही दाखविला नाहीं. आपल्या राज्यांत वास्तव्य करणाऱ्या ख्रिश्चन, ज्यू व पारशी जनतेस संपूर्ण धर्मस्वातंत्र्य देण्याची असामान्य दिलदार वृत्ती हजरत पैगंबरांनीं प्रगट केली आहे. त्यांनीं इस्लामी राष्ट्राचे सर्वाधिकारी या नात्यानें ख्रिश्चन लोकांबद्दल जे फर्मान काढले ते असें:–

"ख्रिश्चन लोकांचें जीवित, संपत्ति आणि धर्म यांचे आम्हीं रक्षण करूं. त्यांच्या रीतिरिवाजांत आम्ही ढवळाढवळ करणार नाहीं किंवा त्यांच्या धार्मिक समजुती दुखविणार नाहीं. त्यांच्या धर्माध्यक्षांस पदच्युत केलें जाणार नाहीं. त्यांच्या धर्म-चिन्हांचा किंवा क्रॉसचा नाश केला जाणार नाहीं."

ज्यू लोकांविषयीं जे फर्मान काढण्यांत आले त्याचा आशय असा :–

"ज्यू लोकांचें सर्व दृष्टींनीं संरक्षण केलें जाईल. त्यांच्यावर जुलूम केला जाणार नाहीं किंवा त्यांच्या विरुद्ध त्यांच्या शत्रूला कोणतीही मदत केली जाणार नाहीं. ज्यू लोकांना आपल्या धर्मा-प्रमाणें वागण्याची पूर्ण मुभा आहे."†

त्याचप्रमाणें पारशी व मुस्लिमेतरांना सनद देण्यांत येऊन त्यांचे सर्व प्रकारचे हक्क अबाधित ठेवण्याची खबरदारी घेतली आहे. ती सनद अशी :—

---

† The life of Mohamet by Sir William Muir, P. 192.

"मी ( हजरत पैगंबर ) मुसलमानेतरांना जी ही सनद देत आहे तिचा मान ठेवावा असें प्रत्येक काळामधील मुस्लिमांना आग्रहपूर्वक सांगतों. परमेश्वराच्या नांवानें मी अशी ग्वाही देतों कीं या सनदेमध्यें जें वचन दिलें आहे त्याप्रमाणें मुस्लिमांनीं वागावें आणि ज्यामुळें माझ्या वचनाचा भंग होईल अशा वाईट रीतीनें त्यांना वागवूं नये. जर लोकांनीं इस्लाम धर्म स्वीकारला नाहीं तर त्यांना आपआपल्या धर्माप्रमाणें वागण्याची मोकळीक द्या; पण त्यांचा छळ किंवा जुलूम करूं नका; कारण त्यामुळें सृष्टि-निर्माता परमेश्वर नाराज होईल. या कराराचा भंग करणारास न्यायनिवाड्याच्या दिवसापर्यंत अपराधी म्हणून समजलें जाईल. जो कोणी या लोकांचा छळ करील तो मलाच छळत आहे असें मी समजेन आणि त्यानंतर मला संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं. अशा मनुष्यास नरकवास प्राप्त होईल."*

हजरत मुहम्मद पैगंबरांच्या या असामान्य सहिष्णुवृत्तींचा विचार करीत असतां, त्या काळच्या रोमन साम्राज्यामधील एक प्रसंग ठळकपणें आपल्या नजरेसमोर उभा राहतो. त्या काळीं रोमन साम्राज्य पुढारलेलें व आघाडीवरचें समजलें जात होतें. ज्या वेळीं ऑगस्टस सिंहासनावर अधिष्ठित झाला, त्या वेळीं रोमन इंपीरियल चर्चच्या आर्च बिशपनीं त्यांच्याकडून जी शपथ घेवविली तिचें भाषांतर "History of European Morality and Civilisation" या ग्रंथांत खालीलप्रमाणें दिलें आहे :—

"आपल्या देशांतील रीतिरिवाजाप्रमाणें देवादिकांची पूजा कर

* Fear Allah & take your own Part, P. 46.

आणि तुझा देव व देवता यांची पूजा करण्यास दुसऱ्यास भाग पाड. जे तुझ्या धर्माचा स्वीकार करणार नाहींत आणि दुसऱ्या धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न करतील, त्यांना कठोरपणानें शिक्षा कर. तुझ्या धर्माचा खरेपणा जे स्वीकारणार नाहींत त्यांच्यावर काडीमात्र दया करूं नकोस."

पुढारलेल्या राष्ट्रांत देखील थैमान घालणारें धर्मवेड पाहिल्यानंतर हजरत पैगंबर हे सहिष्णुवादाचे केवढे श्रेष्ठ पुरस्कर्ते असले पाहिजेत याची आपणांस स्पष्ट कल्पना येते. आणखी एका उदाहरणाचा जातां जातां उल्लेख करावासा वाटतो. अरबस्तानांत इस्लामी राज्य प्रस्थापित झाल्यानंतर ख्रिश्चन लोकांचें शिष्टमंडळ हजरत पैगंबरांस भेटण्याकरितां मदीनेस आलें. रविवारीं त्यांना प्रार्थना करावयास जागा मिळेना. शेवटीं हजरत पैगंबरानीं आपल्या मशिदींत त्यांना प्रार्थना करावयास परवानगी दिली. हजरत पैगंबरांच्या या औदार्याबद्दल त्यांना धन्यवाद देत तें शिष्टमंडळ आपल्या स्वस्थानीं निघून गेलें.

हजरत पैगंबरांच्या आदेशानुसार परधर्मीयांना आचारविचार आणि धर्मस्वातंत्र्य देण्याची उदार परंपरा त्यांच्यानंतर झालेल्या खलिफांनीं व राज्यकर्त्यांनीं चालविल्याचीं अनेक उदाहरणें इस्लामच्या इतिहासांत सांपडतील. इस्लाम धर्माच्या या उदार सहिष्णु धोरणामुळें अरबस्तान हें परदेशांतील त्रस्त परधर्मीयांचें आश्रयस्थान बनलें होतें. ईजिप्त, पर्शिया वगैरे देशांतील लोक रोमन राज्यकर्त्यांच्या जुलुमास कंटाळून अरबस्तानच्या आश्रयास येत. इराणनें असीरियाचें राष्ट्र जिंकलें त्या वेळीं तेथील ज्यू नागरिक अरबस्तानमध्यें येऊन राहिले. मॅगीनें बॅबिलोनियाचा धर्म

नष्ट केला त्या वेळीं सॅबियन भिक्षूंनीं आश्रयाकरितां अरबस्तानकडे धांव घेतली. जॉन बॅप्टिस्टसारखा हिब्रू अवतारी पुरुष आपल्या अनुयायांसह आश्रयार्थ अरबस्तानांतच येऊन राहिला होता. ॲलेक्झांडरच्या स्वारीमुळें हैराण झालेल्या पारशी लोकांना अरबस्तानांतच अभय मिळालें. या सर्व धर्मीयांना अरबस्तानमध्यें संपूर्ण धर्मस्वातंत्र्य होतें इतकेंच नव्हे तर त्यांच्या तत्त्वज्ञानाला तेथें निःशंकपणें भरपूर वाव व खतपाणी मिळालें. "पौर्वात्य गूढवादी पंथांतून निर्माण झालेले ज्ञानवाद, एकरूपवाद, ग्रीक व ख्रिश्चन तत्त्वज्ञान या सर्वांचा सारखा विकास अरबस्तानच्या स्वतंत्र वातावरणांत होत होता. नेस्टोरियन, जॅकोबाईट आणि युरिशियन पंथांप्रमाणें कॅथोलिक सनातनीही अरबांचें आतिथ्य चाखण्यास, त्यांचेच 'पांतीकर' बनले."† "जुने व. नवे, मुस्लिम युरोपियन अशा अधिकारी इतिहासकारांच्या पुराव्यांची छाननी करून, गिबननें असें सिद्ध केलें आहे कीं महंमदानें आपल्या विधर्मी प्रजाजनांना व्यक्तिस्वातंत्र्याबरोबरच व्यापार व मालमत्ता यांचेंही स्वातंत्र्य दिलें होतें. उपासनेचें तर स्वातंत्र्य होतेंच होतें. सहिष्णु असण्याचें धोरण महंमद व त्याचे एक दोन वंशज यांनीं पाळलें असें नसून अरबांचें वर्चस्व होतें तोंपर्यंत अखंड पाळलें जात होतें."*

## तलवारीच्या जोरावर (?)

"तलवारीच्या जोरावर इस्लाम धर्म फैलावला नाहीं, याबद्दल

† Historical Roll of Islam, Page 36.

* Historical Roll of Islam, Page 44.

माझ्या मनाची पक्की खात्री झाली. पैगंबरांची अत्यंत साधी वृत्ति, विलक्षण स्वार्थत्याग, वचनबद्धता, आपल्या अनुयायांवरील निस्सीम प्रेम, अचाट धैर्य, निधडा स्वभाव, आपल्या कार्यावर व परमेश्वरावर अढळ विश्वास या बहुमोल गुणांमुळें-तलवारी-मुळें नव्हे-प्रत्येक संकट निवारण होऊन हजरत पैगंबरांचें कार्य यशस्वी झालें."

—महात्मा गांधी

इस्लाम धर्म हा तलवारीच्या जोरावर फैलावला हा दुसरा गैर-समज फैलावण्यांत आला आहे. याचें जनकत्व ख्रिश्चन धर्मांतील धर्मवेडे पाद्री व कांहीं ग्रंथकार यांचेकडे जातें. मध्ययुगीन काळांत झंझा-वाताच्या वेगानें होणारा इस्लामचा प्रसार पाहून त्या धर्माला बदनाम करण्याकरितां त्यांनीं शिकस्तीचे प्रयत्न केले आहेत. स्वतःची अगतिकता व नैराश्य यांमुळें इस्लामशीं मुकाबला करण्याचें सामर्थ्य अंगीं नसल्यामुळें त्यांना इस्लामवर शिंतोडे उडविण्याचा वाम मार्ग पत्करावा लागला. थॉमस कार्लाईलसारख्या जगद्विख्यात तत्त्वज्ञानें "पैगंबर व इस्लाम यांसंबंधानें ज्या खोटयानाटया कंडया आम्हीं पिकविल्या त्याबद्दल आम्हीं लाजेनें खालीं माना घातल्या पाहिजेत" अशा स्पष्ट शब्दांत कबूलीजबाब दिला आहे. वरील आक्षेप कितपत खरा आहे, इस्लाम धर्मांत त्याबद्दल कांहीं आदेश देण्यांत आला आहे किंवा कसें याचा आपणांस थोडक्यांत विचार करावयाचा आहे.

"ला इकरादा फिदीन."

—पवित्र कुराण २:२५७.

म्हणजे ‘ धर्माच्या बाबतींत जबरदस्ती करूं नका ’ अशी स्पष्ट आज्ञा पवित्र कुराणमध्यें देण्यांत आली आहे. जबरदस्तीनें कोणताही धर्म किंवा तत्त्व फैलावत नसतें किंवा त्यास स्थैर्य मिळत नसतें. जबरदस्तीनें फार तर तात्पुरता कार्यभाग झाल्यासारखें वाटेल, पण त्यामुळें मनुष्याच्या सदसद्विवेक बुद्धीवर काडीमात्र उपयोग होत नाहीं. तिला जोंपर्यंत कोणतीही गोष्ट पटत नाहीं तोंपर्यंत आपण वाटेल तेवढी जुलूमजबरदस्ती केली तरी तिचा कांहीं उपयोग होत नाहीं. जबरदस्ती करण्यापेक्षां किंवा तलवारीचा धाक दाखविण्यापेक्षां मनुष्याच्या बुद्धीला आवाहन करणें हीच महत्त्वाची गोष्ट आहे असें इस्लाम धर्म समजतो.

“ शहाणपणानें आणि अत्यंत विचारपूर्वक रीतीनें त्यांना तुमच्या परमेश्वराच्या मार्गाकडे बोलवा आणि प्रेमळपणानें त्यांच्याशीं वादविवाद करा.”

—पवित्र कुराण १६:१२५.

आपल्या धर्माचें महत्त्व पटवितांना आपण शहाणपणानें व संयमानें वागलें पाहिजे. आपला प्रतिपाद्य विषय मांडतांना रागाच्या आहारीं न जातां अत्यंत शांतपणानें वादविवाद केला पाहिजे. वादविवादांत आपल्या मनाचा तोल जाऊं नये अशी मुस्लिमानें खबरदारी घेतली पाहिजे. आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ, दुसऱ्याचें मन दुखावेल अशा तऱ्हेची भाषा वापरण्यास इस्लामनें मनाई केली आहे.

“ लोकांनीं तुमचें म्हणणें मानलें नाहीं तर तुमचें काम फक्त उपदेश करीत राहण्याचें आहे.”

—पवित्र कुराण १६:८२.

लोकांनीं आपल्या उपदेशाचा अव्हेर केला म्हणून संतापून न जातां आपण शांतपणें वागलें पाहिजे. लोक आपल्याशीं सहमत होत नाहींत म्हणून त्यांच्यावर जबरदस्ती करणें किंवा तलवारीचा धाक दाखविणें पवित्र कुराणच्या आदेशाविरुद्ध आहे. उपदेश करण्यापलीकडे कोणतीही मर्यादा ओलांडावयाची नाहीं हा आदेश लक्षांत घेतां 'जबरदस्तीच्या जोरावर धर्माचा प्रसार करा' अशी इस्लामची आज्ञा नाहीं हें स्पष्ट झालें आहे.

मुस्लिमांना व खुद्द हजरत पैगंबरांना कित्येक वेळां तलवार हातांत घ्यावी लागली ही गोष्ट सत्य आहे, पण ती कां घ्यावी लागली याचें उत्तर पवित्र कुराणमध्यें सांपडतें.

> "ज्यांच्याशीं युद्ध पुकारलें गेलें आहे व ज्यांच्यावर जुलूम होत आहे अशांनाच लढण्याची परवानगी दिली आहे."
>
> —पवित्र कुराण २२:३९.

आपल्या विरुद्ध कोणी प्रथम युद्ध पुकारील तर त्याच्याशीं लढण्याची आज्ञा इस्लाम धर्मानें दिली आहे. त्याचप्रमाणें आपल्यावर जुलूम करून आपला निःपात करण्याचा चंग बांधणाऱ्या विरुद्ध शस्त्र घेण्यास संमति देण्यांत आली आहे; याचाच अर्थ स्वतःच्या स्वसंरक्षणाकरितां (Defence) किंवा प्रतिकाराकरितां आपण लढलें पाहिजे. ज्यांच्याकडून निरपराधी मुलें, स्त्रिया आणि पुरुष यांचा छळ मांडण्यांत आला आहे त्यांच्या विरुद्धही लढण्याची आज्ञा दिली आहे. कांहीं कारण नसतां आपण होऊन दुसऱ्याशीं युद्ध करण्याकरितां हातीं शस्त्र घेण्यास इस्लाम धर्माची मनाई आहे.

"जुलूम थांबेपर्यंत लढत रहा."

—पवित्र कुराण २:१९३.

आपल्यावर होणारा जुलूम थांबला कीं आपण शस्त्र खालीं ठेविलें पाहिजे; इतकेंच नव्हे तर जे जुलूम करणारे असतील त्यांच्याविषयीं वैरभाव देखील ठेवतां कामा नये अशी त्याच श्लोकांत आज्ञा आहे. जुलूम करणारांवर डूक धरून त्यांच्याशीं वैरत्वाचें नातें ठेवणें म्हणजे पुन्हां नव्या लढ्यास उत्तेजन देण्यासारखें असल्यामुळें आपलें मन द्वेषरहित ठेवण्याचा प्रयत्न करा असें पवित्र कुराणमध्यें सांगितलें आहे.

"शांततेचा तह करण्याची त्यांची मनीषा असेल तर, तुम्हीही तह करण्याची तयारी दाखवा."

—पवित्र कुराण ७:६३.

आक्रमकांनीं तह करण्याची तयारी दर्शविली तर आपणही ताबडतोब तह केला पाहिजे. आक्रमक तहाची भाषा बोलतात म्हणून त्यांचा तो कमकुवतपणा समजून त्यांची पूर्ण रग जिरविण्याकरितां युद्ध तसेंच चालू ठेवणें किंवा सूडाच्या भावनेनें त्यांचा निःपात करण्याचा चंग बांधणें हें केव्हांही अन्यायाचें आहे असें इस्लामी युद्धनीति सांगते.

संरक्षण व जुलमजबरदस्तीचा प्रतिकार याकरितांच तलवार हातीं घेण्याचा इस्लामनें आदेश दिला आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट झालें आहे. तलवार हातीं घेण्याची परवानगी देण्यांत आली पण तिचे भीषण परिणाम घडूं नयेत याविषयीं इस्लामनें दक्षता घेतली आहे.

शत्रूंशीं लढतांना त्यांचीं बायकामुलें व वृद्ध मंडळी यांच्या केसाला देखील धक्का लागतां कामा नये असा इस्लामचा कटाक्ष आहे. शत्रूवरील राग त्यांच्या आप्तस्वकीय व बायकामुलें यांच्यावर काढणें हा धडधडीत अत्याचार आहे असें इस्लाम समजतो. हजरत पैगंबर युद्धाचे वेळीं 'स्त्रिया, मुलें व वृद्ध नागरिक यांच्यावर हल्ला करूं नका' असा आपल्या सैनिकांस आदेश देत. त्यांच्यानंतरच्या खलिफांनीं हा आदेश किती तंतोतंत पाळला आहे याचा उल्लेख मागें कोठेंतरी केला आहेच.

निव्वळ सूड घेण्याकरितां शस्त्र हातांत धरणें इस्लामनें त्याज्य ठरविलें आहे. मुस्लिमांचा असह्य छळ करणाऱ्या कुरेशांविरुद्ध लढण्याची आज्ञा द्या अशी मुस्लिम सेनापति अब्दुररहिमान यांनीं हजरत पैगंबरांना विनंती केली. त्यावेळीं हजरत पैगंबर म्हणाले, "दया व क्षमा करण्याकरितां परमेश्वराची मला आज्ञा आहे; एवढ्याकरितां हातांत तलवार घेऊन शत्रूंशीं लढाई करण्यास मी परवानगी देऊं शकत नाहीं." परधर्मीयांना ठार मारणें म्हणजे महापुण्य असा घोष करणाऱ्या जमान्यांत हजरत पैगंबरांनीं "दया व क्षमा" यांचा पुरस्कार करावा ही कितीतरी महत्त्वाची गोष्ट आहे. इब्न खल्दून, गिबन या विख्यात इतिहासकारांनीं लिहिलेल्या ग्रंथांमध्यें धर्माच्या नांवावर लाखों लोकांची हत्या झाल्याचा उल्लेख आपणांस आढळून येतो. त्या काळांत इस्लाम धर्माचे प्रणेते हजरत पैगंबर यांनीं दिलेला संदेश केवढा तरी उदात्त आहे. ते म्हणतात, "जनतेशीं विनम्रतेनें वागा; कठोर बनूं नका. त्यांना न धिक्कारतां धीर, भरंवसा द्या. तुम्हांला पुष्कळ लोक विचारतील कीं स्वर्गाचीं गुरु-

किल्ली कोणती ? तेव्हां तुम्हीं त्यांना "परमेश्वरी सत्य ओळखणें व सत्कृत्य करणें" असें उत्तर द्या.

इस्लामी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यानंतर वरील आरोप केवढा फोल आहे याचें विवेचन करीत असतां, अलीकडील एक नामांकित धर्मोपदेशक रेव्हरंड ओहेरी म्हणतात, "जग पादाक्रांत करीत असतां, धर्मवेड्या मुस्लिमांनीं पराभूत राष्ट्रांतील जनतेला तलवारीच्या टोंकावर धरून इस्लाम धर्म स्वीकारावयास लावला वगैरे हकीकती म्हणजे पुन्हा: पुन्हा कथन करण्यांत आलेल्या अत्यंत हास्यास्पद व विकृत कथा होत असें इतिहासानें सिद्ध केलें आहे.*

इस्लामचा विद्युत्वेगानें प्रसार झाला त्याचीं कारणें काय आहेत हें आपण शोधून पाहिल्यानंतर वरील आरोपाची पूर्ण शहानिशा होईल व त्याबद्दल वाटणारा उरलासुरला संदेह नष्ट होईल. त्या वेळच्या परिस्थितीचा आपण विचार केला म्हणजे ज्या ज्या ठिकाणीं इस्लाम प्रसरत झाला त्या त्या ठिकाणीं इस्लाम धर्मास अनुकूल अशी भूमिका तयार झाली होती. धर्माची अवनती व त्यामुळें उत्पन्न झालेली अगतिकता व निराशा, पुरोहित वर्गाचा असह्य जाच, दलित वर्गाची कारुण्यमय अवस्था, वर्गयुक्त समाजरचनेचें प्राबल्य, सामाजिक गोंधळ, आध्यात्मिक औदासिन्य या व अशा अनेक कारणांमुळें तेथें इस्लामचें स्वागत होऊं शकलें. भाई मानवेंद्र रॉय यांनीं हा विषय अधिक विस्तृत रीतीनें हाताळला आहे. ते म्हणतात, " कितीही दडपशाही व छळ झाला तरी सर्व राष्ट्रच्या राष्ट्र आपल्या सनातन धर्माचा त्याग इतका अल्प विरोध दाखवून

* Islam at the Cross Roads, Page 8.

करणारच नाहीं. परंतु जुना धर्म अवनत झाला होता, सुसंस्कृत जनतेची आध्यात्मिक भूक भागविण्यास तो असमर्थ होता. दुष्ट तत्त्वाच्या जाचांतून सोडवणूक व्हावी व होईल म्हणूनच महंमदाचें अद्वैताचें साधें तत्त्व त्यांनीं स्वीकारलें....आफिकेच्या उत्तर प्रदेशांत या सर्वभक्षक क्रांतीचें खरें कारण नवधर्मानें (इस्लामनें) केलेली सक्ती नसून जुन्या धर्मांची अवनती व त्यामुळें उत्पन्न झालेली अगतिकता व निराशा हेंच होय. सिप्रिअन, अथेन्सिअस् व अगष्टाईन यांच्या शक्तियुक्तीनें स्थापिलेला जीजसचा धर्म एरिअन डोनॅटिस्टांच्या दुष्ट चालींनीं व कॅथोलिक पंथीयांनीं विपरीत केला म्हणूनच दरिद्री जनतेनें त्याचेविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें."†

हिंदुस्थानच्या परिस्थितीचें विश्लेषण करतांना रॉय लिहितात, "बुद्धाच्या पराभवानंतर, देशाची स्थिति अधिकच वाईट झाली. आर्थिक दुरवस्था, राजकीय जुलूम, बौद्धिक बेबंदशाही (Intellectual Anarchy) व आध्यात्मिक गोंधळ यांनीं सारा देश बुजबुजाटून गेला होता. सर्व समाज विनाश व विघटना यांच्या चक्रांत सांपडला होता आणि म्हणूनच दलित जनता, सामाजिक समता व राजकीय स्वातंत्र्य यांचें आश्वासन देणाऱ्या इस्लामी धर्माच्या झेंड्याखालीं गोळा झाली."* हिंदु संस्कृतीचा निष्ठावंत भक्त हॅवेल यानें आपल्या 'हिंदुस्थानांतील आर्यांचें राज्य' या ग्रंथांत या विषयावर आणखी थोडा उजेड पाडला आहे. तो म्हणतो, "हर्षवर्धन राजा सातव्या शतकाच्या मध्यास निवर्तला. इस्लामचा विकास व हिंदी राजकीय अवनती हीं एकसमयावच्छेदेनें

† Historical Roll of Islam, Page 47-48.
* Historical Roll of Islam, P. 97.

चालली होतीं. कोठल्याही मोठ्या राजाच्या मृत्यूनेंच कांही इतिहासांत घडामोडी होत नाहींत. अवनति किती तरी शतकें आधीं चालू असते. बुद्धक्रांतीमुळें ती थोपवून धरली गेली होती. मात्र बुद्ध-क्रांति अशयस्वी झाल्यावर दुप्पट दौडीनें अधोगति होऊं लागली. अप्रबुद्ध संन्याशांच्या अधःपातानें हिंदु साम्राज्याच्या अधःपातास मदत झाली व त्यामुळेंच मुस्लिमांचा विजय सुलभ झाला."

हिंदुस्थानाप्रमाणें इतरत्रही संन्यासवादाचा जोरांत प्रादुर्भाव झाला होता. भाई रॉय म्हणतात, " त्या तमोमय काळांत अरबस्तानांतील अवतारी पुरुषाचा आशादायक व तेजस्वी संदेश प्रदीप्तपणें चमकला व आशेची दिव्य ज्योतिच जणूं त्या संदेशानें प्रदीप्त केली. नवीन धर्मानें मिळणाऱ्या भौतिक व पारलौकिक सुखाशेनें हजारों लोकांचीं मनें आकृष्ट झालीं. भौतिक जीवनांत पराभूत झाल्यामुळें निराश होऊन ज्यांनीं अतिमानुषाच्या अस्तित्वावर विश्वासून आपणांस रूढीच्या खड्डयांत बुडवून घेतलें होतें त्यांना इस्लामी धर्माच्या जय-शाली तुतारीनें जागें केलें. नैसर्गिक जीवनाचा मनमुराद उपभोग घेण्याची संधि मिळाल्यामुळें अवनत ख्रिस्ती धर्मानें प्रसृत केलेल्या संन्यासवादाच्या विकृत कल्पना पार नाहींशा झाल्या. आशेचें नवें क्षितिजच सामान्य जनतेला दिसलें."*

युरोपमध्येंही तशीच अनवस्था असल्यामुळें इस्लाम धर्माचा विजय सहज सुलभ झाला. भाई रॉय म्हणतात, " त्या वेळची परिस्थिति इस्लामच्या अभिवृद्धीस अत्यंत अनुकूल होती. जुन्या संस्कृतींतील सत्ताधीश वर्गाच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक ऱ्हासाच्या वेळींच

* Historical Roll of Islam, P. 48.

इस्लामचा उदय झाला. सामाजिक अनवस्थेबद्दल असमाधान, कुजट मनोवृत्ति व जुलूम यांमुळें बहुजन समाजांत नवी चांगली समाजघटना निर्माण व्हावी अशी तीव्र आकांक्षा व धडपड निर्माण झाली होती. ख्रिश्चन धर्माचे जुन्या संस्कृतीचा आश्रय केल्यामुळें 'आहे तें टिकवून धरावें' या वृत्तीची कैफियत त्याला मांडावी लागे.... नव्या युगाला योग्य अशा समाजरचनेचा पाया घालण्याचें कर्तव्य ख्रिश्चन धर्म करूं शकला नाहीं. विश्वविजयाच्या स्वारीचें नेतृत्व तो स्वीकारूं शकला नाहीं. दलितांना त्यानें मदतही केली नाहीं. उलट भावी काळांत सर्व सुखसमृद्धि येणार आहे अशी जनतेची फसवणूक केली....ख्रिश्चन धर्माचे बांध फुटल्यामुळें नवीन प्रभावी धर्माची आवश्यकता इतिहासाच्या क्षेत्रांत भासूं लागली होती. इस्लामी धर्मानें नुसत्या पारलौकिक स्वर्गप्राप्तीची लालूच दाखविली नाहीं तर भौतिक विश्वावर विजय मिळविण्याची स्फूर्ति देखील दिली. महंमदानें आपल्या लोकांनाच राष्ट्रीय ऐक्याचें व्यासपीठ निर्माण करून दिलें असें नाहीं तर आपल्या अरब बांधवांच्या हातीं अभिनव क्रांतीचा दीप दिला व त्याच्या दिव्य प्रकाशांत शेजारच्या सर्व देशांतील दलित व अकिंचन जनता एकत्र गोळा झाली. इस्लाम धर्माच्या विजयाचीं कारणें सामाजिक, आध्यात्मिक व राजकीय हीं आहेत."*

* Historical Roll of Islam, P. 52–53.

# प्रकरण ४ थें

# इस्लाम आणि समाजशास्त्र

" इस्लाम म्हणजे इतिहासाचें फल व मानव प्रगतीचें एक साधन होय. नव्या सामाजिक संबंधांचे ध्येयरूपानें त्याचा उदय झाला आणि त्याच्या योगानें मानवी मनोविकासांत क्रांति करून टाकली...सामाजिक क्रांतीचीं नवीं साधनें निर्माण करण्याला त्यानें मदत केली."†

—भाई मानवेंद्र रॉय

मानवी जीवन परिपूर्ण करण्यासाठीं समाजसंस्थेची अत्यंत आवश्यकता आहे असें इस्लाम मानतो. मनुष्याच्या व्यक्तित्वाची वाढ व संगोपन समाज करूं शकतो. समाजाशीं फटकून वागणाऱ्या मनुष्याच्या व्यक्तित्वाचा विकास होणें शक्य नाहीं. आपण सुखी व्हावें, आपला उत्कर्ष व्हावा, आपण संस्कृतिसंपन्न व्हावें असें त्याला वाटत असेल तर त्यानें समाजांत येऊन मिसळलें पाहिजे, समाजाशीं समरस झालें पाहिजे. मनुष्यामध्यें उच्च व्यक्तित्व उत्पन्न करणें, त्याला उन्नत करणें, त्याला उदारचरित बनविणें या साऱ्या गोष्टी समाजसंस्था करूं शकते. त्या संस्थेमध्यें चारी पुरुषार्थांना अवसर आहे. ज्या मूल्यांवर, इस्लामची समाजसंस्था आधारली आहे त्याचीं बीजें हजरत मुहम्मद पैगंबर यांनीं आपल्या शेवटच्या मक्केच्या यात्रेवेळीं जो सदुपदेश मुस्लिमांना केला, त्यामध्यें आपणांस

† Historical Roll of Islam Page, 44.

दिसून येतील. त्यावेळीं हजरत पैगंबर म्हणाले, "........जगांत शांती प्रस्थापित करणाऱ्या इस्लाम धर्माचे तुम्हीं अनुयायी आहांत हें लक्षांत ठेवून सर्व लोकांशीं प्रेमानें वागा. दुसऱ्याच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न होईल अशा तऱ्हेचें वर्तन ठेवा. रक्तपात किंवा अनाचार करून तुमचा केव्हांही उद्धार होणार नाहीं. तुमचा कट्टा शत्रू असला तरी त्याच्याशीं प्रेमानें वागा. प्रेम हें आपल्या धर्मांतील महान तत्त्व आहे. अंतःकरणांत द्वेषबुद्धीला थारा देऊं नका. द्वेषानें तुमच्या इतर चांगल्या भावना देखील गढूळ होऊन जातील. अन्यायाची कोणतीही गोष्ट करूं नका. एकमेकांचें जीवित आणि संपत्ति एकमेकांनीं पवित्र मानली पाहिजे. अतिक्रमण करू नका. दुसऱ्याच्या विश्वासास पात्र व्हा. व्याज व रक्ताचा बदला घेण्यास मनाई आहे. ....स्त्रियांचा मान राखा. स्त्रियांची तुमच्यावर व तुमची स्त्रियांवर सत्ता आहे हें विसरू नका. आपल्या स्त्रियांवर प्रेम करा आणि त्यांना दयाळूपणानें वागवा. स्त्रियांची इज्जत राखा व तुमच्या प्रत्येक कार्यांत त्यांना सहभागी करा. तुमच्या नोकरचाकरांशीं प्रेमानें वागा. तुम्ही खाल तें अन्न आणि वापराल तें वस्त्रप्रावरण त्यांना द्या. त्यांच्या शक्तिबाहेरचें काम करण्यास त्यांना सांगू नका. तुमच्या सर्व कृत्यांचा जबाब शेवटच्या दिवशीं परमेश्वर तुम्हांला विचारील हें लक्षांत ठेवून कोणताही अनाचार करू नका."

या संदेशांतील बंधुता, समता, सदाचार आणि प्रेम या चतुः-सूत्रीवर इस्लामनें समाज संस्थेची उभारणी केली आहे. त्या काळीं अरबस्तानमध्यें सामुदायिक जीवन अस्तित्वांत नव्हतेंच. तेथील लोक टोळ्या टोळ्यांनीं रहात. एकमेकांशीं सहकार्य करणें किंवा उपयोगी पडणें त्यांना माहित नव्हतें. एका टोळीनें दुसऱ्या टोळीवर हल्ला

करावयाचा, लूटमार करावयाची, खून पाडावयाचे वगैरे प्रकार तेथें सर्रास चालत हें आपण मागें पाहिलें आहे. हजरत पैगंबरांनीं सर्वत्र विखुरलेल्या लोकांना एकत्रित आणून त्यांच्यामध्यें सामुदायिक जीवन प्रस्थापित केलें. भ्रातृभाव किंवा बंधुता ही समाज टिकवणारी फार मोठी शक्ति आहे; ती शक्ति त्यांनीं निर्माण केली. आपण सर्व एकाच परमेश्वराचीं लेकरें आहोंत, एकाच कुटुंबांत राहणारे आहोंत, आपणामध्यें बंधुभाव असणें नैसर्गिक व आवश्यक आहे या इस्लामच्या प्रचारामुळें विखुरलेली जनता एकत्र आली, तिच्यामध्यें जिव्हाळा निर्माण झाला, बंधुता प्रत्यक्षांत दिसूं लागली.

समाजामध्यें उच्चनीच, काळागोरा, स्पृश्य-अस्पृश्य हे भेदाभेद असणें केव्हांही श्रेयस्कर नाहीं. अशा कृत्रिम भेदभावांमुळें समाजांत असंतोष फैलावतो; समाजामधील निरनिराळ्या शक्तींचा संचय होण्याऐवजीं त्यामध्यें झगडा सुरू होतो; द्वेषाचें बीज पेरलें जातें. हें संकट टाळण्याकरितां इस्लामनें समतेचा जोरांत पुरस्कार केला आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वाभिमान आहे. केवळ तो गरीब म्हणून त्याची कां अवहेलना करण्यांत यावी ! केवळ तो अशिक्षित म्हणून त्याला कां धिक्कारण्यांत यावें ! केवळ तो दलित म्हणून त्याला कां ठोकरण्यांत यावें ! तोही मनुष्य आहे; त्यालाही भावना आहेत. समाजांतील विषमतेचे चटके त्याला जाणवतात. त्याला दिलेली तुच्छतेची वागणूक त्याच्या जिव्हारीं लागते. त्याच्या बाबतींत दाखविलेला भेदाभेद त्याचें अंतःकरण भेदून जातो. समाजपुरुषाचे हात बळकट कर असें कोणी त्याला सांगितलें तर तो विकट हास्य करून म्हणेल कीं असा समाज राहण्यापेक्षां तो नष्ट झालेला बरा. इस्लामनें हा धोका ओळखून समतेस धर्माज्ञेचें स्वरूप दिलें आहे.

समता ही धर्माज्ञा समजून तिचा अवलंब केला पाहिजे असा पवित्र कुराणचा आदेश आहे.

" मी आपल्यासारखाच एक माणूस आहें."

—पवित्र कुराण १८:११०.

वरील वाक्य हजरत मुहम्मद पैगंबरांना अनुलक्षून आहे. हजरत पैगंबर हे इस्लाम धर्माचे प्रणेते आहेत, त्यामुळें त्यांनींच समतेची भूमिका पत्करणें हें इस्लामला जास्त श्रेयस्कर वाटतें. धर्मसंस्थापक किंवा प्रणेता म्हणजे परमेश्वराचा अवतार मानला जातो. सर्वांत श्रेष्ठ असें त्याला संबोधिलें जातें. त्याची पूजाअर्चा करण्यांत येते. सर्वसाधारण मनुष्यापेक्षां सर्व दृष्टीनें त्याच्यामध्यें विभूतीमत्व आहे असा पुकारा केला जातो. अशा अतिरंजित कल्पनांशीं इस्लाम मुळींच सहमत नाहीं. या कल्पना समतेचा संक्षेप करणाऱ्या आहेत असें त्याला वाटतें. मानव कितीही योग्यतेचा असला तरी त्याच्यामध्यें व इतर मानवांमध्यें भेदभाव करणें इस्लामला इष्ट वाटत नाहीं. समतेचें तत्त्व गढूळ होईल अशी कोणतीही कल्पना इस्लाम पत्करत नाहीं. हजरत पैगंबरांची योग्यता केवढी श्रेष्ठ, त्यांचें कार्य केवढें उज्ज्वल, त्यांचें ध्येय केवढें उदात्त पण पवित्र कुराणमधील वरील वाक्यांवरून इस्लाममध्यें समतेचा पुरस्कार किती प्रकर्षानें करण्यांत आला आहे याची वाचकांस कल्पना येईल.

" लोकांना दूर लोटूं नका."

—पवित्र कुराण ६:५२

आपण श्रीमंत आहोंत, खानदानी आहोंत, विद्वान आहोंत या भ्रमांत गरिबांना दूर लोटणें हा अन्याय आहे. या जगामध्यें कोणीही

उच्चनीच नाहीं. परमेश्वराजवळ श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव नाहीं. एकाद्या गरीब किंवा अशिक्षित गृहस्थास दूर लोटणें, त्याच्याकडे तुच्छतेनें पाहणें हा अधर्म आहे. हजरत पैगंबरांच्या भोंवतीं सदैव मजूर, गरीब यांचा घोळका असे. मक्केमधील धनवान आणि कुलश्रेष्ठ समजले जाणारे कुरेश हजरत पैगंबरांना म्हणाले, “आपण या गरीब व दलितांची सोबत सोडीत असाल तर आम्ही इस्लाम धर्म स्वीकारतों.” हजरत पैगंबरांनीं या मागणीस साफ नकार दिला. समता हें इस्लाममधील महत्त्वाचें तत्त्व आहे. या तत्त्वास हरताळ फांसला तर इस्लाम धर्म राहिलाच कोठें? तुमच्यासारख्या लोकांचें इस्लाम धर्मास पाठबळ मिळत आहे ही महत्त्वाची गोष्ट आहे; पण त्याकरितां समतेचें तत्त्व लाथाडून या गरीब व दलित लोकांना मी कधींही दूर लोटणार नाहीं असा हजरत पैगंबरांनीं कुरेशांना खडखडीत जबाब दिला.

“मुस्लिम स्त्रीपुरुष परस्परांचे स्नेही आहेत.”

—हजरत मुहम्मद पैगंबर

स्त्रीपुरुष यांमध्यें समता असणें क्रमप्राप्त आहे. आपण स्त्रियांपेक्षां श्रेष्ठ आहोंत, आपणांस त्यांच्यापेक्षां जादा अधिकार आहेत, स्त्रियांवर सत्ता गाजविण्याचा अधिकार निसर्गानें आम्हांला दिला आहे अशा कल्पना पुरुष जातीनें कधींही करूं नयेत. इस्लाम स्त्री-पुरुष यांमध्यें भेद मानीत नाहीं. स्त्री ही गुलाम नसून ती माणसाची कर्तृत्वशक्ति आहे असें तो समजतो. स्त्री बटीक नसून ती घरची राज्ञी आहे. स्त्रियांना समान दर्जा मिळावा म्हणून त्यांना पुरुषांच्या दासी किंवा बटीक म्हणून न लेखतां इस्लामनें त्यांना स्नेही म्हणून पुकारलें आहे.

स्नेह हा शब्दच समतावाचक आहे. स्नेह्यांमध्यें भेदभाव, उच्चकनिष्ठ यांना कधींही अवसर असत नाहीं. स्त्रीपुरुष परस्परांचे स्नेही आहेत याचा अर्थ त्यांच्यामध्यें समता आहे असें इस्लाम मानतो.

हजरत पैगंबरांनीं आपल्या आचारविचारांनीं मुस्लिमांस समतेचा फार मोठा धडा घालून दिला आहे. ' समतेचा मूर्तिमंत आदर्श ' अशा शब्दांत परधर्मीयांनीं हजरत पैगंबरांना गौरविलें आहे. सर्व-साधारण नागरिक असतां त्यांच्या समतेच्या ज्या कल्पना होत्या, त्यांमध्यें ते मदिनेचे सर्वाधिकारी झाल्यानंतर काडीमात्र बदल झाला नाहीं. राजसत्ता हातीं आल्यानंतरही ते पूर्वींप्रमाणेंच गोरगरीब, मजूर व शेतकरी यांच्याशीं समतेनें वागत. रस्त्यावरून जाणाऱ्या वृद्ध अगर अशक्त नागरिकांच्या डोक्यावरील बोजा आपल्या डोक्यावर घेऊन जाणें हा त्यांचा नित्याचाच क्रम होता. मशिदीचें बांधकाम चाललें असतां, थकून गेलेल्या मजूराच्या डोक्यावरील दगड त्यांनीं स्वतः वाहून त्या मजूराला विसावा दिला. मोलमजूरी करणाऱ्या मजूरांबद्दल त्यांना विलक्षण जिव्हाळा वाटे. ते आजारी पडल्यास ते स्वतः त्यांच्या घरीं जाऊन शुश्रूषा करीत. " मजूर म्हणजे क्षुल्लक मनुष्य नसून तो परमेश्वराचा स्नेही आहे" असें हजरत पैगंबर म्हणत. ' मजुरांशीं स्नेह राखणें म्हणजे परमेश्वराशीं स्नेह जोडणें ' अशी त्यांची भावना होती. ' मजुराचा घाम वाळण्यापूर्वीं त्याची मजूरी देऊन टाका ' अशी घोषणा करून हजरत पैगंबरांनीं मजूर व श्रमीक यांच्याबद्दलची कळकळ व्यक्त केली आहे. त्यांच्याजवळ गरीब श्रीमंत हा भेद नव्हता हें आपण पाहिलें आहे. गरीबांशीं बातचीत करीत असतां, एकादा श्रीमान गृहस्थ आला तर त्या गरीबाकडे दुर्लक्ष्य करून त्या श्रीमानाची ते कधींच वास्तपूस्त करीत नसत. त्यांचा

दरवाजा सर्वांना सताड उघडा असे. मोठ्या माणसांना प्रथम आणि नंतर सवड असल्यास गरिबांना प्रवेश असें कधींच घडत नसे. धर्मप्रणेते म्हणून ते अग्रभागीं कधींच बसत नसत किंवा सर्वाधिकारी म्हणून मखमलीचें आसन स्वीकारीत नसत. मशिदींत प्रार्थनेच्या वेळीं देखील तसेंच आचरण असे. अरबस्तानच्या प्रखर उन्हांत ते अनवाणी चालत. आपण एका राज्याचे धनी म्हणून पालखींतून जावें किंवा आल्यावर छत्रचामरें ढाळावीं असें त्यांना कधींच वाटलें नाहीं. हजरत पैगंबरांची ही उज्ज्वल शिकवण मुस्लिमांनीं आजतागायत अंमलांत आणली आहे. मशिदींत प्रार्थना करीत असतां अमीराच्या शेजारीं गरीब उभा असलेला दिसेल किंवा भोजन करीत असतां श्रीमंत व मजूर, मालक व नोकर एकाच ताटांत जेवतांना दिसतील किंवा एकाद्या समारंभाच्या ठिकाणीं मोठा अधिकारी व चपराशी शेजारीं बसलेले आढळतील.

हजरत पैगंबरांची समतेची शिकवण त्यांच्यानंतर होऊन गेलेल्या खलिफांनीं व राज्यकर्त्यांनीं कशी तंतोतंत पाळली याचीं असंख्य उदाहरणें आपणांस इस्लामच्या इतिहासांत आढळतील. त्यांपैकीं खालील कांहीं उदाहरणें मनन करण्यासारखीं आहेत. खलिफा हजरत उमर हे मदिनेहून जेरूसलेमला तहाच्या वाटाघाटी करण्याकरितां निघाले असतां त्यांनीं आपल्या बरोबर फक्त एक नोकर घेतला होता. उंटावरून मजल दरमजल करीत ते जेरूसलेमच्या वेशीजवळ पोहोंचले. त्या वेळीं त्यांचें स्वागत करण्याकरितां, वेशीजवळ त्यांचा सरसेनापती हजर होता. हजरत उमर उंटाची दोरी धरून पायीं चालत असून त्यांचा नोकर उंटावर बसलेला पाहून तो सरसेनापति चकित झाला. एकच उंट असल्यामुळें हजरत उमर

च त्यांचा नोकर आळीपाळीनें उंटावर बसत. ते जेरूसलेमजवळ आले त्या वेळीं उंटावर बसण्याची नोकराची पाळी होती. सर-सेनापतींनें नोकराला खालीं उतरवून आपण उंटावर आरूढ व्हावें व नंतर शहरांत प्रवेश करावा असें हजरत उमरनां परोपरीनें विनविलें. हजरत उमरनीं त्याच्या विनंतीस साफ नकार दिला. ते म्हणाले, "इस्लाममध्यें अमीर व गरीब असा भेद नाहीं हें तुला माहित नाहीं का ? तूं मुस्लिम असून अशी मला विनंति करावीस याचें मला आश्चर्य वाटतें." हजरत उमरनीं आणखी चार शब्द ऐकविले व तडक शहरांत प्रवेश केला.

आणखी एका प्रसंगीं कुरेशांचा प्रमुख सरदार अबू सुफीयान हजरत उमर यांना भेटावयास आला होता. पूर्वी गुलाम असलेले तिघे गृहस्थ अगोदरच हजरत उमर यांची मुलाखत घेण्याकरितां येऊन बसले होते. भेटीची वेळ होतांच हजरत उमरनीं प्रथम त्या गुलामांची भेट घेतांच सरदार अबू सुफीयान संतप्त झाला. जवळच्या लोकांनीं त्याला समजावलें कीं इस्लाममध्यें बडा छोटा असा भेदभाव नाहीं. तुमच्या अगोदर ते तिघेजण आल्यामुळें त्यांची प्रथम भेट घेणें हें हजरत उमर यांचें कर्तव्यच होतें. तें त्यांनीं केलें म्हणून तुम्हीं त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

अबू उबेदा या पराक्रमी सेनापतीनें कादीसियाची लढाई जिंकल्यानंतर पर्शियन नागरिकांनीं त्याला भेट म्हणून पंचपक्वान्नांनीं भरलेलीं ताटें पाठवून दिलीं. त्यांनीं विचारलें कीं हें माझ्याकरितां आहे कीं सर्व सैन्याकरितां ? त्यांनीं उत्तर दिलें, "आम्हांला भरपूर वेळ न मिळाल्यामुळें फक्त आपल्याकरितांच हीं पक्वान्नें तयार

करण्यांत आलीं आहेत ! " अबु उबैदा म्हणाला, "मी आणि माझे सैनिक यांच्यामध्यें भेदभाव मी कधींच मानीत नाहीं. माझ्या सैनिकांना सोडून आपल्या पंचपक्वान्नांचा आस्वाद मी घेऊं शकत नाहीं. आम्हीं सर्व समान आहोंत अशी अल्लाची आज्ञा आहे."

डॉ. इक्बाल यांनीं आपल्या 'असरारे खुदी' या काव्यग्रंथांत इस्लामची समता केवढ्या श्रेष्ठ दर्जाची आहे याचें अत्यंत हृदयंगम वर्णन केलें आहे. त्यामध्यें एका राजाची कथा देण्यांत आली आहे. त्या राजाकरितां एका कारागिरानें अत्यंत सुंदर व अवर्णनीय असा प्रासाद तयार केला. अशी नयनमनोहर कृति पुन्हां त्या कारागिरानें दुसऱ्या एकाद्या राजाकरितां तयार केल्यास आपल्या प्रासादाचें वैशिष्ट्य जाईल म्हणून त्यानें त्या कारागिराचे हात तोडण्याचा हुकूम दिला. हुकुमाची अंमलबजावणी झाल्यानंतर, आपला रक्ताळलेला हात घेऊन तो कारागिर थेट न्यायाधिशाकडे गेला व त्यानें आपल्यावर झालेला अन्याय निवेदन करून राजाविरुद्ध आपली फिर्याद दाखल केली. न्यायाधिशानें ती फिर्याद स्वीकारली व आपल्यापुढें हजर होण्यास त्या राजास फर्माविलें. त्याप्रमाणें राजा न्यायालयांत हजर झाला व त्यानें आपला गुन्हा कबूल केला. आपला हात उघडा करून त्या राजानें तीच शिक्षा आपणांस करावी अशी न्यायाधिशास विनंति केली. आपल्यास न्याय मिळाला असें फिर्यादीनें सांगितल्यावर तो प्रश्न निकालांत निघाला. डॉ. इक्बाल यांनीं वरील घटनेचा खालील शब्दांत समारोप केला आहे.

"पेशी कुरआन बंदा वो मौला याकस्त बोर्या वो मसनदी दीबा याकस्त." ( कुराणचे दृष्टीनें धनी व गुलाम सारखेच आहेत; गोधडी व मखमलीचें सिंहासन यांमध्यें कांहींच फरक नाहीं. )

## गुलामगिरी

धर्म, जात, रंग, कुलशील किंवा देश याचा विचार न करतां सर्वांना समतेच्या पातळीवर आणण्याचें महान कार्य इस्लामनें कसें केलें आहे याची सर्वसाधारण कल्पना वाचकांस आली असेल. त्याचप्रमाणें समतेस पोषक होणारें आणखी एक महान कार्य इस्लामनें केलें आहे आणि तें म्हणजे मानवतेस काळीमा आणणाऱ्या गुलामगिरीचें उच्चाटण होय. ज्या वेळीं इस्लामची मुहूर्तमेढ रोवली गेली, त्या वेळीं सर्वत्र गुलामगिरीचे थैमान चालूं होतें. त्या काळीं नाणावलेल्या राष्ट्रांत तर गुलामगिरी म्हणजे त्या राष्ट्राचें वैभव असें समजण्यांत येई. त्या काळचे किंवा त्या पूर्वीचे लोकधुरीण, राज्यकर्ते यांनीं गुलामगिरीचा पुरस्कार केला आहे. एपिक्युरीयन, स्टूईक्स इत्यादि तत्त्वज्ञानांतून तोच सूर निघाला आहे. कोणत्याही शासन किंवा धर्म संस्थेनें गुलामगिरीस पायबंद घालण्याचा प्रयत्न केला नाहीं. त्या काळच्या गुलामगिरीचीं वर्णनें वाचलीं म्हणजे अद्याप आपल्या अंगावर शहारे उभे राहतात. एक प्रथितयश विद्वान, गुलामगिरीचें विदारक वर्णन करीत असतां लिहितो, " मानेभोंवतीं लोखंडी पट्टी ही गुलामांची खूण होती. गुलामांना गटांगटांनीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणास जनावरांसारखे हांकून नेत असत. जनावर देखील खाणार नाहीं असें अन्न त्यांना देण्यांत येई. हातापायांत बेड्या घालून व गळ्यांतील लोखंडी पट्ट्यांमधून सांखळी अडकवून सर्वांना एकत्र बांधीत व अत्यंत घाणेरड्या आणि बंदिस्त जागेंत त्यांना कोंडून ठेवीत. त्यांना विकण्याकरितां हांकून नेत असतां गुलामांचा व्यापार करणारा त्यांचा मालक घोड्यावर बसून हातांत जाड चाबूक घेई आणि

थकल्यामुळें एक पाऊलही पुढें टाकण्यास असमर्थ बनलेल्या गुलामांच्या अंगावर कोरडे ओढून पुढें चलण्यास उत्तेजन (?) देई. भोंवळ येऊन एकादा दुर्दैवी खालीं पडलाच तर त्याची चामडी निघेपर्यंत व तो मृतप्राय होईपर्यंत कोरडे उडविले जात."*

अशा हृदयविदारक व अमानुष प्रथेला पायबंद घालण्याचें पुण्य कार्य इस्लामनें केलें आहे. गुलामगिरीचें हें विष जनतेच्या हाडींमांसीं आणि रोमरोमांत इतकें भिनलें होतें कीं, नुसत्या कायद्यानें त्याचें उच्चाटण करणें केव्हांही शक्य नव्हतें. कायद्यामुळें फार तर वरवर गुलामगिरी नष्ट झाल्यासारखें दिसेल; पण जनतेच्या अंतर्यामीं ती मळमळ कायम राहणारच. जोंपर्यंत मालक व गुलाम यांच्या मनोवृत्तींत कांहींच फरक झाला नाहीं तोंपर्यंत मालक गुलामांना सदैव दलितच समजणार आणि गुलामांमध्येंही न्यूनगंड कायम राहणार. आज आपण अमेरिकेमध्यें काय पाहतों ? तेथें कायदा आहे पण लोकांच्या मनोवृत्तींत कांहीं बदल झाला आहे का ! अद्याप नीग्रोनां बहिष्कृत समजण्यांत येतें, त्यांना छळण्यांत येतें; कित्येक वेळां त्यांना उभें जाळण्यांत येतें. आपण आणि नीग्रो यांच्यामधील उच्च-नीच भाव नैसर्गिक आहे अशी त्यांच्या मनाची ठेवण आहे. ही ठेवण बदलल्याखेरीज गुलामगिरी नष्ट झाली असें आपणांस म्हणतां येईल काय ?

गुलामगिरीस खतपाणी घालणारी मनोवृत्तीच नष्ट करणें हा एकच उपाय शक्य आहे आणि तो इस्लामनें यशस्वी रीतीनें हाताळला आहे. गुलाम आपल्यासारखींच माणसें आहेत, त्यांनाही

---

* Spirit of Islam, Page 405.

आपल्यासारख्याच सुखदु:खाच्या संवेदना आहेत, त्यांच्याशीं प्रेमानें वागलें पाहिजे, त्यांना आपल्या कुटुंबियांशीं समरस करून घेतलें पाहिजे, त्यांना आपल्यासारखें स्वातंत्र्य मिळवून देणें हें पुण्य कार्य आहे अशी विचारप्रणाली क्रमाक्रमानें मांडून, इस्लामनें गुलामगिरीस प्रोत्साहन देणाऱ्या किंवा ती आवश्यक आहे अशी मानणाऱ्या मनोवृत्तीचा नि:पात केला आहे असें हदीस व पवित्र कुराणवरून आपणांस आढळून येईल.

"तुम्हीं खातां तें अन्न आणि वापरतां तीं वस्त्रप्रावरणें त्यांना द्या."

—हजरत मुहम्मद पैगंबर.

गुलामांबद्दल वाटणारी तुच्छतां आपण काढून टाकिली पाहिजे. त्याला परका किंवा हीन न समजतां तो आपल्या कुटुंबियांपैकींच आहे असें आपण समजलें पाहिजे. कुटुंबियांमध्यें खाणेंपिणें किंवा कपडेलत्ते यांच्या बाबतींत कधींच भेदभाव दिसून येत नाहीं. सर्वांना सारखेंच अन्न व कपडेलत्ते दिले जातात. अशीच आत्मीयता आपण गुलामांना दाखविली पाहिजे. त्यांच्या तोंडावर चार शिळे तुकडे टाकून न देतां, आपण जें अन्न खातों तें अन्न आणि त्यांच्या अंगावर फाटकीं लतकरें असतील तर त्याऐवजीं आपण पेहेरतों तसे कपडे त्यांना पुरविले पाहिजेत.

"(तुम्हीं ज्या वाहनावर बसाल) त्या वाहनावर त्यांना बसवा; कारण तो तुमचा भाऊ आहे आणि तुमच्यासारखा त्यांनाही आत्मा आहे."

—हजरत मुहम्मद पैगंबर

त्या काळीं मालकानें उंटावरून अथवा घोड्यावरून बसून जावयाचें व गुलामानें बरोबर अनवाणी पळत राहावयाचें असा रिवाजच होता. इस्लामनें हा रिवाज त्याज्य ठरविला आहे. गुलामाला आपला कुटुंबीय मानल्यानंतर त्याच्याशीं अमानुष वर्तन केव्हांही निषिद्धच ठरतें. प्रवास करीत असतां त्याला आपला भाऊ समजून उंटावर आपल्या बरोबर बसवून घेतलें पाहिजे. हजरत पैगंबरांच्या आज्ञेचा एवढा विलक्षण परिणाम झाला कीं एकाच उंटावर बसून मालक व गुलाम प्रवास करूं लागले; इतकेंच नव्हे तर मोठी मंझल करावयाची असेल तर कांहीं वेळ गुलाम उंटावर बसून मालक पायीं चाले व कांहीं वेळ मालक उंटावर बसून गुलाम पायीं प्रवास करी. खलिफा हजरत उमर यांचें उदाहरण आपण मागें पाहिलेंच आहे.

"त्याला माझा गुलाम किंवा दासी न म्हणतां माझा मुलगा किंवा कन्या म्हणून संबोधा."

—हजरत मुहम्मद पैगंबर

गुलामाला दास्यत्व किंवा गुलामगिरीची आठवण चुकून देखील होणार नाहीं अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे. अमूक एक आपला नोकर आहे असें आपण चारचौघांसमक्ष बिनदिक्कत सांगतों पण इस्लामनें अशा गोष्टीस सक्त मनाई केली आहे. आपण आपल्या नोकरांना किंवा गुलामांना त्यांच्या दास्यत्वाची जाणीव करून देऊं लागलों तर त्यांच्या भावना दुखावल्या जाण्याचा संभव असतो किंवा त्यांच्यामध्यें न्यूनगंडाची कल्पना कायमची ठाण मांडून बसते. मालक आणि नोकर किंवा गुलाम यांमधील भेदभाव नष्ट होण्याऐवजीं तो वाढीसच लागतो. या सर्व गोष्टी टाळण्याकरितां नोकरांना व गुलामांना आपण स्वतःच्या मुलांप्रमाणें वागविलें पाहिजे. आपण

आपल्या मुलांना जितकें प्रेमानें वागवितों तितक्याच प्रेमानें गुलामांनाही वागविलें पाहिजे. हजरत पैगंबरांना गुलामाबद्दल इतकी सहानुभूति व जिव्हाळा होता कीं, ते मृत्युशय्येवर पडले असतां अली इब्न अबू तालीब यांना म्हणाले, " प्रार्थना करीत रहा आणि गुलामांची काळजी घेऊन त्यांना दयाळूपणानें वागवा हेंच माझें शेवटचें सांगणें आहे."

एक दिवस हजरत पैगंबरांना एक सद्‌गृहस्थ म्हणाला कीं, गुलामांनीं चूक केली नाहीं तर त्यांना दयाळूपणानें वागवावयास हरकत नाहीं; पण त्यांनीं प्रमाद केले तर मात्र त्यांना शिक्षा करावयाचा अधिकार असला पाहिजे. हजरत पैगंबरांनीं त्या सद्‌गृहस्थास सांगितलें, " गुलामानें एकादीच चूक काय पण प्रतिदिनीं सत्तर चुका केल्या तरी आपण त्या क्षम्य मानल्या पाहिजेत." मनुष्य स्खलनशील आहे. त्याच्या हातून चुका होणें साहजिक आहे. त्या चुका लक्षांत न घेतां त्याला क्षमा करणें म्हणजे पुन्हां त्या चुका न होतील अशी खबरदारी घेणें होय. क्षमा ही कधींही फुकट जात नाहीं. ज्या गोष्टीची आपण अपेक्षा करतों ती गोष्ट सत्यसृष्टींत उतरविण्याचें श्रेष्ठ कार्य ती करूं शकते.

> " गुलामांना वाईट रीतीनें वागविणारास स्वर्गाचें द्वार बंद असतें."
>
> —हजरत मुहम्मद पैगंबर

हा दंडक घालून हजरत पैगंबरांनीं गुलामांवर होणाऱ्या अत्याचारांना कायमची मूठमाती दिली. हजरत पैगंबरांची आज्ञा ही धर्माज्ञा समजून गुलामांना अत्यंत दयाळूपणानें वागविण्यांत येऊं

लागलें. त्यांचा सामाजिक दर्जा वाढविण्याचें आणखी एक श्रेष्ठ कार्य हजरत पैगंबरांनीं केलें आहे व तें म्हणजे त्यांच्याशीं बेटी-व्यवहार होय. या श्रेष्ठ कार्याची सुरुवात प्रथम आपल्या घरींच करून हजरत पैगंबरांनीं साऱ्या जगास थक्क करून सोडलें. त्यांनीं आपल्या आतेबहिणीचें लग्न झैद नांवाच्या गुलामाशीं करून आपलें विलक्षण नीतिधैर्य प्रकट केलें. हजरत पैगंबरांच्या आतेबहिणीशीं लग्नसंबंध व्हावा म्हणून अरबस्तानांतील अत्यंत सुंदर, श्रीमान् व थोर घराण्यांतील युवकांमध्यें स्पर्धा लागली होती. हजरत पैगंबरांनीं केवळ तत्त्वाकरितां त्या सर्वांस नकार दिला. हजरत पैगंबरांचें घराणें केवढें थोर, त्यांचा दर्जा केवढा मोठा, त्यांची योग्यता केवढी श्रेष्ठ; पण सदैव लाथाडल्या जाणाऱ्या एका बहिष्कृत गुलामास आपली बहीण देऊन, इस्लाम धर्मांत केवढी श्रेष्ठ दर्जाची समता असूं शकते हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. हजरत पैगंबरांच्या या औदार्यामुळेंच माणुसकीला पारखा झालेला गुलाम पुन्हां समाजांत माणूस म्हणून वावरूं लागला; कुटुंबांत त्याला बरोबरीचें स्थान मिळालें. ब्रिटानिका ज्ञानकोशाच्या ४५ व्या भागांत “ गुलामांना कुटुंबांतील मंडळीप्रमाणें वागविण्यांत येऊं लागलें ” असे उद्गार काढण्यांत आले आहेत.

त्या काळीं लढाईंत कैदी केलेल्या लोकांना गुलाम करण्यांत येई. हजरत पैगंबरांनीं ही निर्घृण पद्धत बंद करून टाकली. लढाईंत कैदी झालेल्या कित्येक लोकांना गुलामगिरीच्या खाईंत न लोटतां, त्यांनीं स्वातंत्र्य देऊन टाकलें आहे. बनी मुस्तालिकंचे जे कैदी होते त्यांची मुक्तता करण्यांत आली. हवाझीनचे सहा हजार कैदी होते त्यांनाही पण स्वातंत्र्य देण्यांत आलें. लढाईंतील कैदी, गुलाम

झाल्यानंतर तो कायमचा परतंत्र समजला जाई. त्याला स्वतंत्र करावयाचें झाल्यास त्याची किंमत द्यावी लागे. प्रत्येक मुस्लिमानें अशी किंमत देऊन कैदी झालेल्या कट्टर शत्रूंचेंही स्वातंत्र्य अबाधित ठेवावें अशी उदार घोषणा इस्लामनें केली आहे. पवित्र कुराणच्या दुसऱ्या अध्यायांत ( ऋचा १७७ ) "लढाईंत कैदी झाल्यामुळें गुलाम बनलेल्या शत्रूंना मुक्त करण्यासाठीं, केवळ परमेश्वराच्या प्रेमाकरितां, पैसा खर्च करणें ही श्रेष्ठ दर्जाची धर्मशीलता आहे" असा स्पष्ट आदेश देण्यांत आला आहे. गुलामांना स्वातंत्र्य प्राप्त करून देणें, हा आपण केलेल्या दुष्कृत्याचें किंवा पापाचें परिमार्जन करण्याचा मार्ग आहे असें इस्लाम धर्म समजतो. एकदां एक गृहस्थ हजरत पैगंबरांकडे आला आणि त्यानें विचारलें कीं, नरकापासून मुक्त होऊन स्वर्गप्राप्ति होण्याचा मार्ग कोणता? हजरत पैगंबरांनीं उत्तर दिलें, "गुलामांना मुक्त करणें किंवा त्यांना स्वातंत्र्य प्राप्त करून देणें हाच मार्ग होय."

इतर धर्मांप्रमाणें इस्लाम धर्मानेंही पुण्याचे मार्ग सांगितले आहेत. पवित्र कुराणमध्यें पुण्याईचा राजमार्ग कोणता याविषयीं जें सुंदर विवेचन करण्यांत आलें आहे, त्यामध्यें गुलामांच्या मुक्ततेस अग्रस्थान देण्यांत आलेलें आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

> "पुण्याईचा राजमार्ग कोणता? तर गुलामांना मुक्त करणें, अनाथ मुलांना किंवा धुळींत पडलेल्या गरिबांना दुष्काळाच्या दिवसांत अन्न देणें होय."
>
> —पवित्र कुराण ९०:१३.

इस्लाम धर्माच्या या उदात्त शिकवणीमुळें गुलामगिरीचे लंगर

गळून पडले. आज कित्येक वर्षें दृढमूल झालेली ही अमानुष पद्धत नष्ट झाली. समाजसंस्थेला पोखरून टाकणारी ही कीड निघून गेली. समाजाच्या पायदळीं तुडविला जाणारा हा वर्ग समाजाच्या बरोबरीनें वागूं लागला, त्याला मानाचें स्थान मिळूं लागलें; कुटुंबांतील मंडळींशीं समरस होऊं लागला. इस्लामनें मानवतेवरील गुलामगिरीचा कलंक धुऊन टाकला. गुलामांचें हृदयद्रावक वर्णन करणारा ग्रंथकार, त्याच गुलामांचें इस्लाममध्यें स्थान काय आहे याचें विवेचन करतांना लिहितो, " इस्लाममध्यें आजचा गुलाम उद्यां मुख्य प्रधान झालेला दिसून येईल. तो आपल्या धन्याच्या मुलीशीं लग्न करूं शकतो आणि त्या कुटुंबाचा प्रमुख म्हणून वावरूं शकतो. गुलाम म्हणविणाऱ्यांनीं राज्यें प्रस्थापित केलीं आहेत आणि राजवंश चालू केला आहे. महंमद गझनीचा बाप गुलाम होता हें सर्वश्रुत आहे. ख्रिश्चन धर्मांत अशीं उदाहरणें दाखवून देतां येतील काय ? किंवा गुलामाबद्दल दाखविलेली अशी माणुसकी इतिहासामध्यें आपणांस कोठेंतरी आढळून येईल काय ? "

इस्लामचा प्रसार ज्या ज्या प्रदेशांत झाला, त्या त्या ठिकाणीं गुलामगिरी नष्ट झालेली आपणांस दिसून येईल. जोसेफ थॉमसन नांवाच्या प्रसिद्ध प्रवाश्यानें ' लंडन टाईम्स ' मध्यें आपला प्रवासवृत्तांत लिहितांना काढलेले उद्गार किती तरी अर्थपूर्ण आहेत. तो लिहितो, " माझ्या आतांपर्यंतच्या अनुभवावरून मी असें ठासून सांगतों कीं ज्या भागांत इस्लामचा प्रसार झाला नाहीं, त्या ठिकाणींच गुलामांचा व्यापार अद्यापही चालू असलेला दिसून येतो."

आतांपर्यंत झालेल्या विवेचनावरून इस्लाममधील बंधुता व समता किती विश्वव्यापी आहे याची सर्वसाधारण कल्पना येईल. अखिल हिंदुस्थानास भूषणभूत होऊन राहणारे विख्यात तत्त्वज्ञ सर राधाकृष्णन् यांनीं आपल्या East and West in Religion या ग्रंथांत पुढील शब्दांमध्यें धन्यवाद दिले आहेत. "दुसऱ्या कोणत्याही धर्मांत दिसून न येणारी इस्लाम धर्मांतील बंधुता ही जात व राष्ट्र यांच्या सर्व मर्यादा ओलांडणारी आहे हें आपण नाकबूल करूं शकत नाहीं."

## स्त्रीदाक्षिण्य

इस्लाममधील समाजशास्त्रानें त्या काळीं सर्वत्र रूढ असलेल्या स्त्रींविषयक कल्पना पार बदलून टाकून जगामध्यें एक फार मोठी क्रांती करून टाकली आहे. अपमानित व पददलित झालेल्या स्त्री-वर्गाला समाजामध्यें मानाचें व वैभवाचें स्थान प्राप्त करून देण्यांत इस्लामनें अग्रपूजेचा मान मिळविला आहे असें विधान केलें तर तें मुळींच अतिशयोक्तीचें होणार नाहीं. त्या काळीं अरबस्तानाबरोबरच सर्व जगांत स्त्रीजातीचा केवढा अपमान होत असे हें आपण पहिल्या प्रकरणांत पाहिलें आहे. स्त्रियांच्या या अक्षम्य अवहेलनेमुळें समाज कमकुवत बनत आहे, तो अधोगतीला जात आहे हें इस्लामनें बरोबर ओळखलें. स्त्री ही समाजाची अर्धी शक्ति आहे; ती शक्ति वायां जाऊं लागली तर समाज बलवान बनणें किंवा त्यामध्यें स्थैर्य येणें कदापिही शक्य नाहीं. स्त्रियांना दास्यांत ठेवणें याचा अर्थ समाजास विकलांग करणें होय. समाजसंस्था मजबूत व उन्नत करावयाची असेल तर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें व तितक्याच इज्जतीनें

वागविण्यांत आलें पाहिजे. स्त्री ही बटीक किंवा उपभोग्य वस्तु नव्हे. सर्वांच्या आदरास पात्र होणारी ती सहृदय व त्यागी व्यक्ति आहे. स्त्री म्हणजे मांगल्याचें मूर्तिमंत प्रतीक, मार्गदर्शन करणारी तेजस्वी शलाका, मानवी जीवनांत आनंद निर्माण करणारी शक्ति, धोक्याचा इशारा देणारा दीपस्तंभ या व अशा ओथंबलेल्या भावनांनीं स्त्रीजातीकडे पाहण्यास इस्लामनें प्रवृत्त केलें; आई, स्त्री आणि कन्यका या तिन्ही स्वरूपांत मानवजातीस उपकृत करणाऱ्या स्त्री-जातीशीं प्रेमळपणानें वागणें हें आपलें कर्तव्य आहे अशी जाणीव करून दिली. पवित्र कुराणांत 'अन्-निसा' नांवाचा संपूर्ण अध्याय खर्ची पडला आहे, यावरून स्त्रीजातीचें इस्लामला केवढें महत्त्व वाटतें हें सिद्ध होण्यासारखें आहे. पुरुषसत्तेची जबरदस्ती किंवा स्त्रियांची अवहेलना यांना पवित्र कुराणांत स्थान नाहीं. स्त्रियांशीं प्रेमळपणानें व दयार्द्रतेनें वागण्याचा वारंवार आदेश देण्यांत आला आहे. त्यांच्या अभिजात हक्कांविषयीं सदैव जागरूक राहण्याच्या आज्ञा दिलेल्या आहेत. स्त्रीपुरुषांमधील संबंध प्रेम, सहानुभूति आणि समतेच्या पायावर उभारलेले असले पाहिजेत असें आग्रहानें प्रतिपादन करण्यांत आलें आहे.

> "स्त्रियांशीं प्रेमळपणानें वागा; तुम्ही त्यांचा द्वेष कराल तर परमेश्वरानें ज्यामध्यें मांगल्य निर्माण केलें आहे अशा व्यक्तीचा तिरस्कार केल्यासारखें होईल."
>
> —पवित्र कुराण ४:१९.

स्त्रियांशीं तुसडतेनें वागणें, त्यांना घालून पाडून बोलणें, उठल्या सुटल्या त्यांच्या जिव्हारीं लागेल अशा प्रकारची अभद्र भाषा किंवा शिवीगाळ करणें इस्लामनें धर्मबाह्य ठरविलें आहे. स्त्रीजात निर्माण

करतेवेळीं मांगल्य व चांगुलपणा यांचा भरपूर उपयोग केल्यामुळें त्या जातीची अवहेलना करणें किंवा तिच्याशीं दुष्टपणानें वागणें म्हणजे परमेश्वरास प्रिय असणाऱ्या व्यक्तीबद्दल तिरस्कार व्यक्त करण्यासारखें आहे. स्त्रियांना दुखवून परमेश्वराला नाराज न करतां, त्यांच्याशीं अत्यंत सहानुभूतीनें व प्रेमळपणानें वागणें हें प्रत्येक मुस्लिमाचें कर्तव्य आहे.

"स्त्रियांना चांगल्या तऱ्हेनें वागवा अशी परमेश्वराची आज्ञा आहे."

—हजरत मुहम्मद पैगंबर

स्त्रियांना वाईट रीतीनें वागविणें म्हणजे परमेश्वराच्या आज्ञेचा अवमान करण्यासारखें आहे असा स्पष्ट इशारा हजरत पैगंबरांनीं दिला आहे. स्त्रियांच्या भावना दुखावतील असें कोणतेंही कृत्य करण्यापासून मनुष्यानें परावृत्त झालें पाहिजे. निष्पाप व सालस स्त्रियांची बदनामी हें त्यांच्या वर्मी लागणारें शल्य होय. बदनामी करणारा नीच गृहस्थ कांहींतरी अभद्र बोलून जातो, त्याचे शब्द हवेंत विरतात, पण स्त्रियांच्या अंतःकरणावर त्यामुळें केवढी खोल जखम होते याची त्याला कल्पनाही नसते. अशा असभ्य मनुष्याच्या मनगटास पकडून बदनामी कां करतोस असें विचारणें त्यांना शक्य होत नाहीं. कायदा निसरडा असल्यामुळें कायद्यानें त्या माणसाचा बंदोबस्त करणें दुरापास्त ठरतें. त्यांच्यापुढें एकच मार्ग म्हणजे व्यथित अंत:करणानें अश्रु ढाळणें हा होय. स्त्रियांना बदनाम करणाऱ्या व्यक्तीबद्दल इस्लामला विलक्षण चीड वाटते. अशी व्यक्ति अव्वल दर्जाची नीच व बदमाश समजून त्याच्यापासून चार हात दूर राहण्याची इस्लामची आज्ञा आहे.

“ जे लोक पवित्र स्त्रियांची बदनामी करतात त्यांचा या जगांत धिक्कार होतो आणि त्यांना या लोकीं व परलोकीं विलक्षण यातना भोगाव्या लागतात.”

—पवित्र कुराण २४:२३.

स्त्रियांची बदनामी करणारा या जगांत धिक्कार तर पावतोच पण परलोकांतही त्याला या पापाबद्दल जबाबदार धरलें जातें; यावरून त्याचें हें पाप किंवा अधम कृत्य किती अक्षम्य असलें पाहिजे याची आपणांस कल्पना येते. पवित्र कुराणच्या ‘ अल् हमझा ’ या अध्याया-मध्यें निंदाखोर व बदनाम करणाऱ्यांचा खरपूस समाचार घेण्यांत आला आहे.

इस्लामच्या उदार शिकवणीमुळें जनतेचा दृष्टिकोण अजिबात बदलून गेला; तिच्या स्त्रीविषयक विचारप्रणालींत आमूलाग्र फरक झाला. जेथें मुलीला दफन करण्याची प्रथा होती तेथें मुलीच्या जन्माचा सोहळा मोठ्या थाटानें करण्यांत येऊं लागला. मुस्लिम कुटुंबांत मुलीच्या जन्माचें स्वागत कपाळावरील आठ्या व सुस्कारे यांऐवजीं आनंदोत्सवानें करण्यांत येऊं लागलें. मुलांइतकेंच किंबहुना मुलापेक्षां जास्त लाड व कौतुक करून घेण्याचें भाग्य मुस्लिम कन्यकांना लाभूं लागलें.

“ ज्याला कन्या आहे आणि जो तिला जिवंत दफन करीत नाहीं किंवा तिच्यावर रागावत नाहीं किंवा इतर मुलांशीं वागतांना तिच्याशीं पक्षपात करीत नाहीं त्याला परमेश्वर स्वर्ग देतो.”

—हजरत मुहम्मद पैगंबर

आपल्या मुलींना ममतेनें वागविणें हें स्वर्गप्राप्तीचें साधन आहे

अशी हजरत पैगंबरांनीं शिकवण दिली आहे. तिच्यावर रागावणें किंवा तिला दुखविणें ही गोष्ट त्यांना संमत नाहीं. मुलींबद्दल त्यांनीं केवढ्या हळुवार भावना प्रदर्शित केल्या आहेत हें पैगंबरांच्या खालील वाक्यावरून सिद्ध होतें.

"सद्‌गुणांमध्यें श्रेष्ठ सद्‌गुण कोणता आहे ? घटस्फोट झाल्या-नंतर असाहाय्य परिस्थितींत तुमच्या घरीं परत येणाऱ्या तुमच्या मुलीस दयार्द्रतेनें वागविणें हाच तो श्रेष्ठ सद्‌गुण होय."

—हजरत मुहम्मद पैगंबर

पत्नीबद्दलही विलक्षण आदराची भावना बाळगण्यास इस्लाम शिकवितो. पत्नी म्हणजे आपण सांगूं तसें वागणारीं किंवा आपली लहर सांभाळणारी दासी नसून आपल्या जिवास जीव देणारी मैत्रीण, संकटकालीं आपल्या साहाय्यास धांवून येणारी मदतनीस आहे असें आपण समजलें पाहिजे. तिची थोर भूमिका समजावून घेऊन तिला मोठ्या सन्मानानें वागविलें पाहिजे. तिच्याकडे तुच्छतेनें न पाहतां आपल्या बरोबरीचें स्थान तिला दिलें पाहिजे. एकदां एका खाष्ट गृहस्थानें आपल्या पत्नीला कसें वागवावें असें हजरत पैगंबरांना विचारल्यानंतर हजरत पैगंबर म्हणाले, "ज्या वेळीं तुम्ही खातां त्या वेळीं तिला खावयास द्या; ज्या वेळीं तुम्ही कपडे करतां त्या वेळीं तिलाही कपडे करा; तिला मारूं नका किंवा शिवीगाळ करूं नका; किंवा नाराज होऊन तिच्यापासून विभक्त राहूं नका." आपणांस सुग्रास भोजन आणि आपल्या पत्नीस कदान्न, आपणांस चांगले कपडे आणि पत्नीस ठिगळ लावलेली गोधडी ही गोष्ट आपणांस असह्य वाटली पाहिजे. तिला मारपीट करणें, शिव्या देणें किंवा रागावून तिचें तोंड देखील पाहावयाचें नाहीं असा निर्घृण

निश्चय करणें हीं धर्मबाह्य कृत्यें आहेत असें प्रत्येक मुस्लिमानें समजलें पाहिजे.

" पत्नीशीं वागतांना परमेश्वराची भीति बाळगा; त्या तुमच्या साहाय्यक आहेत. परमेश्वराच्या जमानतीवर तुम्हीं तिचा स्वीकार केला आहे."

—हजरत मुहम्मद पैगंबर

आपल्या पत्नीला आपण वाटेल तसें वागविलें तर आपणांस कोण विचारणार आहे या उर्मटपणास इस्लाममध्यें स्थान नाहीं. आपण पत्नीचा स्वीकार करतों तो परमेश्वराच्या जमानतीवर. उद्यां आपण आपल्या पत्नीस वाईट रीतीनें वागविलें तर परमेश्वर आपणांस जबाबदार धरील ही भीति आपण सदैव मनांत बाळगली पाहिजे. स्त्री ही आपली साहाय्यक आहे, मदतनीस आहे. आपल्या साहाय्यकाला आपण दुखविलें किंवा वाईट रीतीनें वागविलें तर त्याच्यापासून अंतःकरणपूर्वक मदतीची किंवा साहाय्याची अपेक्षा करितां येईल काय ? पत्नीला वागवितांना हे विचार मनांत सदैव बाळगले पाहिजेत.

" मुस्लिम म्हणविणाऱ्यानें आपल्या पत्नीचा द्वेष करूं नये; तिच्या एकाद्या खोडीमुळें नाखुष असेल तर त्यानें तिच्या इतर सद्गुणांकडे पाहून प्रसन्नचित्त व्हावें."

—हजरत मुहम्मद पैगंबर

कोणतीही स्त्री घेतली तर तिच्यामध्यें एकादें न्यून दिसून येणें साहजिक असतें. पण त्यालाच महत्त्व देऊन आपल्या पत्नीबद्दल राग किंवा द्वेष बाळगणें कदापिही योग्य ठरणार नाहीं. तिच्या अंगीं

वास करणाऱ्या दुसऱ्या एकाद्या सद्गुणाबद्दल आपण प्रसन्नचित्त झालें पाहिजे. उदाहरणार्थ, एकाद्याची पत्नी तोंडाळ असूं शकेल पण त्यामुळें नाराज न होतां, तिच्या प्रेमळवृत्तीकडे पाहून तिच्या पतीनें प्रसन्न झालें पाहिजे.

" तुमच्या पत्नीला संतुष्ट राखा."

—पवित्र कुराण ६६:१.

आपली पत्नी दु:खीकष्टी होईल किंवा तिचें मन उद्विग्न होईल असें वर्तन आपण कदापिही करतां कामा नये. आपला संसार सुखाचा व्हावा अशी सदिच्छा बाळगणारांनीं पवित्र कुराणमधील वरील वाक्याचें काळजीपूर्वक मनन केलें पाहिजे. पत्नीचें समाधान, तिची संतुष्टवृत्ति हेंच आपल्या सुखाचें अधिष्ठान आहे हें आपण कदापिही विसरूं नये. त्याचप्रमाणें इस्लामनें आईचा दर्जा केवढ्या पराकोटीला पोहोंचविला आहे हें ' आईच्या पायाखालीं स्वर्ग आहे ' या वाक्यावरून मागील एका प्रकरणांत स्पष्ट झालें आहे.

इस्लामनें स्त्रीजातीबद्दल नुसता आदर व सहानुभूति बाळगून तिची बोळवण केली नाहीं तर तिच्या अभिजात हक्काबद्दल जागरूक राहण्याचा आदेश दिला आहे. सर्व जगांत स्त्रियांची उपेक्षा होत असतां, त्यांच्याभोंवतीं पारतंत्र्याचे पाश करकचून आवळले जात असतां, इस्लामनें प्रथमच त्यांच्या स्वातंत्र्याचा, त्यांच्या हक्कांचा पाठपुरावा केला ही गोष्ट कदापिही दृष्टिआड होण्याजोगी नाहीं.

" जितके पुरुषांचे हक्क स्त्रियांवर आहेत, तितकेच स्त्रियांचेही पुरुषांवर आहेत."

—पवित्र कुराण २:२२९

पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाही हक्क असूं शकतात हें इस्लामनें जाहीर करण्याचें औदार्य दाखविलें आहे. आपल्या शब्दाप्रमाणें त्यांनीं वागलेंच पाहिजे, आपल्या इच्छापूर्तीकरितां स्त्रियांनीं आपल्या आशाआकांक्षा आणि हक्क यांचा होम केला पाहिजे ही पुरुषांची मिरासदारी इस्लाम मान्य करीत नाहीं. स्त्रियांना आपलीं कर्तव्यें काय आहेत हें त्यांना पूर्णपणें माहित आहे; आपल्या हक्कांची त्यांना जाणीव आहे. त्यामध्यें हस्तक्षेप किंवा ढवळाढवळ करण्याचा पुरुषांना अधिकार नाहीं.

"स्त्रियांचे हक्क पवित्र आहेत. त्यांना दिलेले हक्क अबाधित राहतील अशी खबरदारी घ्या."

—हजरत मुहम्मद पैगंबर

स्त्रियांचे हक्क पवित्र असून त्यांची पायमल्ली होणार नाहीं अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे. वयांत आल्याबरोबर, स्वतंत्र व्यक्ति या दृष्टीनें जितके हक्क मिळतात तितके सर्व हक्क कायद्यानें स्त्रियांना देण्यांत आले आहेत. एक आंग्ल विदुषी म्हणते, "पवित्र कुराणानें स्त्रियांच्या जीवनांत विलक्षण क्रांति घडवून आणली आहे. कायदे-कानूच्या इतिहासांत पहिल्या प्रथमच स्त्रीपुरुषांमधील समतेचा हक्क देण्यांत आला आणि तो परिणामकारक रीतीनें अंमलांत आणला गेला."*

इस्लाम धर्मांत आईबापांच्या इस्टेटीवर तिच्या भावाप्रमाणें तिचाही पण हक्क आहे. कौटुंबिक मिळकतींत तिला वांटणी मिळते. लग्न झाल्यानंतरही तिच्या इस्टेटींत नवऱ्याला ढवळाढवळ करतां येत

* "Women Under Islam" by Miss Garnatt, P. 21.

नाहीं किंवा तिची उधळपट्टीही करतां येत नाहीं. स्वतःचा पती निवडण्याचा तिला संपूर्ण अधिकार आहे. पैशाच्या, मोठेपणाच्या किंवा मानसन्मानाच्या आहारीं जाऊन आपण सांगूं त्यांच्याशींच आपल्या मुलीनें लग्न केलें पाहिजे अशी तिच्या बापास सक्ति करतां येत नाहीं. प्रत्यक्ष लग्नविधीच्या समयीं तिची संमति विचारण्यांत येते. तत्प्रसंगीं आपणांस वर पसंत नाहीं असें तिनें सांगितलें तर लग्न रद्द होतें. मुलगी अल्पवयी असली तर लग्नास बापाची संमति लागते. आपला स्वार्थ साधण्याकरितां बापानें अल्पवयांतच मुलीचें लग्न करावयाचें ठरविलें तर मुस्लिम कायद्यानें तिला आणखी एक संरक्षण दिलें आहे. लग्न झाल्यानंतर ती वयांत आली आणि झालेला लग्नसंबंध नकोसा वाटला तर तें लग्न रद्द होतें. वयांत आलेल्या मुलीला लग्नाच्या वेळीं व अल्पवयी मुलीला वयांत आल्यावर लग्नानंतर आपणास सदर विवाह मान्य आहे किंवा नाहीं हें ठरविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

लग्नानंतर मुस्लिम मुलीचें व्यक्तित्व नष्ट होत नाहीं ही महत्त्वाची गोष्ट आहे. लग्न झालें म्हणून समाजामधील स्वतंत्र व्यक्ति म्हणून वावरावयाचें बंद होत नाहीं, किंवा तिचें व्यक्तित्व नवऱ्याच्या व्यक्तित्वांत लोप पावत नाहीं. पतीच्या घरीं आल्यानंतरहीं, समाजाची घटक या नात्यानें जितके हक्क एकाद्या व्यक्तीला असतात तितके सर्व हक्क तिला मिळूं शकतात. आपल्या नांवावर ती कारारमदार करूं शकते. या बाबतींत पतीला ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाहीं. एकाद्या व्यक्तीविरुद्ध ती स्वतंत्रपणें न्यायालयांत जाऊं शकते. त्याकरितां नवऱ्याचें सहकार्य घ्यावयाची तिला आवश्यकता नाहीं. नवऱ्याच्या नांवाखालीं वावरण्याचें तत्त्व ( Doctrine of cover-

ture ) इस्लामला मंजूर नाहीं. तिच्या संपत्तीवर सर्वस्वीं तिचा हक्क असतो. नवऱ्याची परवानगी घेतल्याशिवाय आपल्या संपत्तीचा विनियोग ती करूं शकते. पत्नीनें स्वतःच्या परिश्रमावर मिळविलेल्या संपत्तीची उधळपट्टी करण्याचा पतींला अधिकार नाहीं किंवा तिला क्रूरपणें वागविण्याचा हक्क नाहीं. सर विल्यम जोन्स आणि सर सय्यद अमीर अली या विख्यात कायदेपंडितांनीं मुस्लिम कायद्यावर लिहिलेले ग्रंथ या दृष्टीनें अभ्यासण्यासारखे आहेत.

पुरुषांना घटस्फोटाचा अधिकार आहे; पण या अधिकाराचा वापर सहसा होणार नाहीं अशीं बंधनें घालण्यांत आलीं आहेत. ' घटस्फोट जरी कायदेशीर असला तरी तो परमेश्वरास पसंत नाहीं ' असे हजरत पैगंबरांनीं उद्गार काढले; आहेत. घटस्फोट द्यावयाचा ठरला तर स्त्रीवर्गाला घटस्फोटानंतरची झळ लागूं नये अशी खबरदारी घेण्यांत आली आहे. घटस्फोट ही बाब अत्यंत खासगी स्वरूपाची समजण्यांत येते. भर कोर्टांत जाऊन स्त्रियांची मानहानि होईल अशीं घटस्फोटाचीं कारणें सांगण्याचा पुरुषांना अधिकार नाहीं. मीं तुझ्याशीं काडीमोड केली आहे असें नवऱ्यानें एकाच वेळीं सांगण्यानें घटस्फोटाला कायदेशीर स्वरूप येत नाहीं किंवा तो तडकाफडकीं होऊं शकत नाहीं. घटस्फोट परिपूर्ण व्हावयास तीन महिन्यांचा अवधी जावा लागतो. महिन्यांतून एक वेळ याप्रमाणें तीन वेळां ' मीं तुला घटस्फोट दिला आहे ' अशा शब्दांत घटस्फोट उच्चारावा लागतो. घटस्फोट उच्चारतेवेळीं ती स्त्री रजस्वला नसली पाहिजे. पहिल्या प्रथम घटस्फोटाचा उच्चार केल्यानंतर तीन महिनेपर्यंत नवराबायकोनें एकाच घरीं व व्रतस्थ राहिलें पाहिजे. तीन महिन्यांमध्यें तीन वेळां घटस्फोट उच्चारल्यानंतर तो घटस्फोट

कायदेशीर व संमत मानण्यांत येतो. भावनेच्या भरांत किंवा संतापांत एकाद्या स्त्रीचें जन्माचें नुकसान होऊं नये म्हणून तीन महिन्यांचा अवधी ठेवण्यांत आला आहे. दोन महिन्यांत दोनदां घटस्फोट उच्चारल्यानंतर नवऱ्याला उपरति झाली किंवा त्याचें डोकें थोडें शांत झालें तर पुन्हां दोघेही नवराबायको या नात्यानें राहूं शकतात व तो घटस्फोट रद्द होतो.

पतीनें पत्नीला दिलेल्या घटस्फोटास 'तलाख' अशी संज्ञा आहे. त्याचे दोन प्रकार आहेत; एक "तलाख-इ-सुन्नत" व दुसरा "तलाख-इ-बिदत." पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें तीन महिन्यांच्या अवधीनंतर तीन वेळां घटस्फोटाची घोषणा केल्यामुळें जो घटस्फोट मंजूर होतो त्यास 'तलाख इ-सुन्नत' असें नांव आहे. कोणतीही मुदत न घेतां एकदम तीन वेळां घटस्फोटाची घोषणा करितात त्यास "तलाख-इ-बिदत" असें म्हणतात. शेवटचा प्रकार अपवादात्मक समजला जातो. हजरत पैगंबरांच्या वेळीं ओव्हमर नांवाच्या गृहस्थानें आपली पत्नी बदकर्म करीत असतां प्रत्यक्ष पाहिलें व त्यानें प्रक्षुब्ध होऊन एकदम घटस्फोट दिला. जारकर्मा-सारखा अक्षम्य गुन्हा प्रत्यक्ष आपल्या डोळ्यानें पाहिल्यानंतर त्यानें दिलेला घटस्फोट 'अपवाद' म्हणून मान्य करण्यांत आला. या-खेरीज 'तलाख-इ-बिदन'चें दुसरें उदाहरण हदीसमध्यें दिसून येत नाहीं. असा अपवाद वगळून एकाद्यानें एकदम घटस्फोट दिला तर तो कायदेशीर मानला जात नाहीं.

दुर्दैवानें घटस्फोट परिपूर्ण झाला तर लग्नाच्या वेळीं कबूल केलेली रकम (मेहेर) नवऱ्याला ताबडतोब द्यावी लागते. घटस्फोटाच्या वेळीं ती स्त्री गर्भवती असेल तर तिला घराबाहेर न काढतां ती

प्रसूत होईपर्यंत तिचा संभाळ नवऱ्यानें केला पाहिजे. त्या अपत्याचें संगोपन करण्याकरितां नवऱ्यानें सर्व खर्च करावा लागतो.

घटस्फोट देतांना नवऱ्यानें आपल्या पत्नीशीं किती सहृदयतेनें वागावें लागतें याचें हृद्य वर्णन अल्-गझ्झाली यांनीं केलें आहे. ते म्हणतात, "घटस्फोट द्यावयाचा झाला तर मनुष्यानें अत्यंत सहृदयतेनें वागलें पाहिजे. राग, द्वेष किंवा कांहीं एक कारण नसतां घटस्फोट देतां येणार नाहीं. घटस्फोट दिलाच तर त्यानें आपल्या पत्नीला उदरनिर्वाहाकरितां देणगी दिली पाहिजे. अमुक कारणाकरितां पत्नीला घटस्फोट द्यावा लागला याचा परिस्फोट त्यानें कधींही करतां कामा नये. एकदां एका गृहस्थानें प्रथम घटस्फोटाची घोषणा केल्यानंतर त्याला दुसऱ्या एका उपद्व्यापी गृहस्थानें आपण घटस्फोट कां देत आहांत असें विचारलें. तो गृहस्थ उत्तरला, "मी माझ्या पत्नीचें गुपित उघड करूं इच्छित नाहीं." घटस्फोट परिपूर्ण झाल्यानंतर तोच प्रश्न विचारण्यांत आल्यावर तो गृहस्थ म्हणाला, "आतां माझ्या पत्नीचा व माझा कांहीं संबंध नसल्यामुळें तिच्या खाजगी गोष्टीची वाच्यता करण्याचें मला कांहींच कारण नाहीं."

इस्लाममध्यें पतीप्रमाणें पत्नीलाही घटस्फोट देण्याचा अधिकार आहे. या घटस्फोटास 'खुला' अशी संज्ञा असून पवित्र कुराणच्या 'अन्-निसा' या अध्यायामधील २२९ ऋचेंत त्याचा उल्लेख करण्यांत आला आहे. बायकोशीं पटत नाहीं म्हणून नवऱ्यानें तिला घटस्फोट द्यावा आणि नवऱ्याशीं जमत नसलें किंवा त्याच्यामध्यें सदैव खटके उडत असले तर तिला मात्र नवऱ्याच्या जाचांतून मुक्त होतां येऊं नये ही निव्वळ अन्यायाची गोष्ट आहे. हा अन्याय दूर

करण्याकरितां इस्लाममध्यें स्त्रियांना घटस्फोटाचें स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे. नवरा वाटेल तेवढा बदमाश असला, दुर्वर्तनी असला, त्यानें वाटेल तेवढी मारझोड केली किंवा तिला क्रूरपणें वागविलें तर एक शब्दही न उच्चारतां त्याच नवऱ्याजवळ जन्मभर आयुष्य कंठलें पाहिजे, अशा त्या काळीं प्रचलित असलेल्या कायद्यास कायमची मूठमाती देऊन इस्लामनें स्त्रीजगतावर विलक्षण उपकार करून ठेविले आहेत.

इस्लाममध्यें स्त्रियांबद्दल इतका उदारमतवाद असतां बहुपत्नीकत्वाची पद्धत कां असावी असा कोणी प्रश्न विचारला तर तो योग्यच ठरेल. इस्लाम धर्मांत जास्तींत जास्त चार स्त्रिया करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. ज्या वेळीं ही परवानगी देण्यांत आली त्या वेळीं ओहोदची लढाई नुक्तीच संपली होती. त्या लढाईंत मुस्लिम मारले गेल्यामुळें असंख्य स्त्रिया विधवा झाल्या व अनेक मुलें पोरकीं व अनाथ झालीं. या विधवांचा व मुलांचा संभाळ करण्याकरितां ही पद्धत रूढ करावी लागली. पवित्र कुराणचा आधार घेतला तर चार स्त्रियांशीं लग्न करण्याची आज्ञा दिली नसून तसें करण्याची परवानगी आहे असें आढळून येतें. तशी परवानगी जरी असली तरी तिला जी अट लावली आहे ती पाहिली म्हणजे चार स्त्रियांशीं विवाहबद्ध होणें तितकें सोपें नाहीं असें दिसून येईल.

"त्यांच्याशीं सारख्या न्यायानें वागतां येणें शक्य नाहीं असें तुम्हांस वाटत असेल तर फक्त एक स्त्रीशींच लग्न करा."

—पवित्र कुराण ४:३

सर्व म्हणजे चारी स्त्रियांशीं भेदभाव न करतां वागलें पाहिजे. अमुक एक आवडती किंवा दुसरी नावडती असा भेदाभेद करतां कामा नये. सर्वांना सारखी वागणूक दिली पाहिजे, सर्वांवर सारखें प्रेम केलें पाहिजे; आणि असें जर होत नसेल, सर्व स्त्रियांशीं सारख्या न्यायानें वागणें जमत नसेल तर 'फवा-हिदतन्' म्हणजे फक्त एकाच स्त्रीबरोबर लग्न करा असा पवित्र कुराणचा आदेश आहे. नवऱ्याच्या मर्जींतल्या एकाच स्त्रीनें सुखांत राहावें आणि बाकीच्या तीन स्त्रियांना मानसिक त्रास, उपमर्द किंवा अन्याय सोसावा लागावा ही गोष्ट पवित्र कुराणच्या आदेशाविरुद्ध असल्यामुळें एकपत्नी व्रत हेंच श्रेयस्कर ठरतें.

मुस्लिम स्त्रियांचें अस्तित्व चार भिंतींपलिकडे दिसून येत नाहीं असा जो प्रवाद आहे तो सर्वस्वीं निराधार आहे. केवळ अज्ञानामुळेंच तो फोफावूं शकला असें आपणांस म्हणावें लागेल. मुस्लिम स्त्रियांचें कर्तृत्व फक्त चूल आणि मूल यांपुरतेंच मर्यादित नसून राजकारण, समाजकारण, तत्त्वज्ञान, वक्तृत्व इत्यादि क्षेत्रांत तें व्यापून राहिलें आहे. विशेषत: प्रत्यक्ष रणांगणांवर त्यांनीं दाखविलेलें शौर्य व पराक्रम यांची नोंद इस्लामी इतिहासांत सोन्याच्या अक्षरांनीं करण्यांत आली आहे. हजरत पैगंबरांच्या कुटुंबांतील स्त्रिया अत्यंत पुढारलेल्या होत्या. हजरत पैगंबरांच्या प्रिय पत्नी हजरत आयेषा या तर नांवाजलेल्या विदुषी आणि कवियित्री होत्या. त्यांच्या विद्वत्तेबद्दल अनेकांनीं त्यांना धन्यवाद दिले आहेत. त्यांचें वक्तृत्व इतकें अमोघ व श्रेष्ठ दर्जाचें होतें कीं, खलिफा मुआविया यांनीं 'हजरत आयेषाइतकें अव्वल दर्जाचें वक्तृत्व अद्याप माझ्या तरी ऐकण्यांत आलें नाहीं' असे उद्गार काढले आहेत. रणांगणांतून पळत सुटलेल्या

गलितधैर्य सैनिकांच्या अंगीं त्यांनीं आपल्या प्रभावी वक्तृत्वानें वीरश्री भरली आहे. त्या प्रत्यक्ष रणांगणावर हातांत समशेर घेऊन लढत. जमाल नांवानें ओळखल्या जाणाऱ्या युद्धांत त्या निर्भयपणें लढल्या आहेत. त्या लढाईंत अनेक सैनिकांनीं काढतां पाय घेतला असतां त्यांनीं धीरोदात्त वृत्तीनें शत्रूंशीं लढा दिला आहे.

अस्मा या हजरत आयेषा यांच्या थोरल्या भगिनी होत. सीरियामध्यें रोमन लोकांविरुद्ध झालेल्या भीषण लढाईंत त्या आपले पती झुबैर यांच्या खांद्याशीं खांदा लावून लढत होत्या. एकदां त्यांचा मुलगा अबदुल्ला आपल्या सैन्यासह मक्केमध्यें शत्रूकडून वेढला गेला. शत्रूची कोंडी फोडण्याचे सर्व प्रयत्न वायां गेल्यानंतर त्यानें आपल्या आईला शत्रूला शरण जाऊ का असें विचारलें. त्या सरशीं अस्मा म्हणाल्या, "शत्रूला शरण जाऊन आपल्या खानदानचें नांव कलंकित करण्यापेक्षां हातांत तलवार घेऊन वीराचें मरण पत्कर." हजरत पैगंबरांच्या आत्या सफीया यांनीं मदिनेच्या आसमंतांत झालेल्या अनेक लढायांत भाग घेतला होता. हरीस यांच्या कन्या उम्मुल खैर या हजरत अलीसह सिफेन नांवाच्या लढाईंत प्राणपणानें लढत होत्या. अमीया गफ्फारी या शूर स्त्रीनें हजरत पैगंबरांच्या नेतृत्वाखालीं, शत्रूंना दाद न देतां जखमी झालेल्या सैनिकांची शुश्रूषा केली आहे. उम्मी नसीबा, उम्मी सल्मा या रणमर्द स्त्रियांनीं तर हजरत पैगंबरांना वांचविण्याकरितां आपल्या पराक्रमाची शर्थ केली. झुबैर यांच्या भगिनी जयनब, अस्मा अन्सारी, खोला, आगा बेगी, जरका, सौदा अशा अनेक शूर स्त्रिया इस्लामच्या इतिहासांत आढळून येतात.

मुस्लिम स्त्रियांनीं राजकारणांत भाग घेतलाच पण स्वतंत्रपणें व

यशस्वी रीतीनें राज्यशकट हांकण्याचें श्रेय त्यांनीं मिळविलें आहे. इराणमध्यें तर अनेक स्त्रियांनीं राज्य चालविलें आहे. त्यांमध्यें पादशहा खातून, लाला खातून, तंदू या विशेष प्रसिद्ध आहेत. मध्य इराणचा बादशहा मजदूदद्दौला यांच्या मातोश्री सय्यदा यांनीं कित्येक वर्षें राज्य केलें. दौलत खातून या खुर्शिदिया घराण्यांत प्रसिद्ध असून त्या कार्यक्षम व हुषार राज्यकर्त्या म्हणून नांवाजलेल्या आहेत. इजिप्तमध्यें होऊन गेलेल्या शजरतुत दूर या राज्ञीचें नांव तर अमर झालें आहे. ती साधी गुलामकन्या पण आपल्या असामान्य कर्तृत्वानें राज्यसत्ता मिळवून ईजिप्तची राज्ञी होण्याचा तिनें मान मिळविला. सुलतान सलाहुद्दीन यांची पुतणी सफीया खातून राजकारणधुरंधर म्हणून प्रसिद्ध आहे. तिनें सीरियावर स्वतंत्रपणें राज्य केलें आहे. हिंदुस्थानमध्यें रझिया, नूरजहान, चांदबिबि, बिबी राजी, नादिरा बेगम यांनीं राज्य केल्याचें सर्वांना माहित आहेच.

तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र वगैरे क्षेत्रांत अनेक मुस्लिम विदुषी होऊन गेल्या. हजरत पैगंबरांच्या पत्नी हजरत आयेषा यांच्या विद्वत्तेबद्दल अनेक पंडितांनीं धन्योद्गार काढले आहेत. कित्येक मुस्लिम पंडित त्यांच्याजवळ इस्लामी कायद्याचें ज्ञान घेत. इब्राहीम मुक्कयसी, जमालुद्दिन अहमद तिब्रीस्तानी या विद्वानांच्या कन्यका ‘ फातिमा ’ या एकाच नांवानें नामांकित विदुषी म्हणून ओळखल्या जातात. बगदाद येथें अब्बास नांवाचा पंडित होता. त्याच्याही कन्येचें नांव फातिमा होतें. त्या मशिदीमध्यें धर्मशास्त्रावर प्रवचनें करीत. त्या इतक्या विद्वच्छ्रेष्ठ होत्या कीं, आपण त्यांच्याशीं वादविवाद करूं शकत नाहीं असे त्या काळच्या सद्रुद्दिन नांवाच्या जाडया पंडितानें

उद्गार काढले आहेत. शरीफची कन्या मलिका, अबदुल्ला अस्किलानी यांची कन्या निसवान्, अबदुर रहिमान मकदसी यांच्या भगिनी हबीब, इब्री यांच्या कन्या हबीब रुकीया, जैनुल अरब, जयनब, सित्तुल अरब, सित्तुल फुकहा, सित्तुल कुरैश, सित्तुल वोजरा, ताहेरा, सफीया इत्यादि अनेक मुस्लिम विदुषी विख्यात पावल्या आहेत.

शैक्षणिक क्षेत्रांत मुस्लिम स्त्रियांनीं फार मोलाची कामगिरी बजावली आहे. ठिकठिकाणीं शिक्षणसंस्था, विद्यालयें प्रस्थापित करण्याचें श्रेय त्यांनीं मिळविलें आहे. खलिफा हारून अल्-रशीद यांची पत्नी शिक्षणाची श्रेष्ठ पुरस्कर्ती होती. तिनें आपल्या खर्चानें अनेक शिक्षणसंस्था सुरू केल्या होत्या. आजादुद्दौला या इराणच्या बादशहाची बायको अत्यंत सुसंस्कृत होती. तिनें सर्व इराणभर विद्यालयें प्रस्थापित केलीं. खातून मलिक अश्रफ या विदुषीनें दमास्कस येथें महाविद्यालय उघडण्याचें श्रेय घेतलें. सीरियामध्यें नसीरउद्दौला यांची पत्नी झमरूद खातून ही नामांकित विदुषी समजली जात होती. तिनेंही एक महाविद्यालय सीरियामध्यें प्रस्थापित केलें.

वक्तृत्वांत तर हजरत पैगंबरांच्या कुटुंबांतील व नात्यांतील स्त्रियांनीं अग्रपूजेचा मान मिळविला आहे. हजरत पैगंबरांच्या पत्नी हजरत आयेषा यांच्या असामान्य वक्तृत्वाबद्दल मागें उल्लेख आला आहेच. हजरत पैगंबरांच्या कन्या हजरत फातिमा व नात जयनब यांचें वक्तृत्व उत्कृष्ट दर्जाचें समजलें जाई. हजरत हुसेन यांच्या कन्या सुकैना यांचाही पण तसाच लौकिक होता. सितुल उल्मा या तर इतकें सुंदर वक्तृत्व करीत कीं त्यांना 'बुलबुल' अशी संज्ञा देण्यांत आली होती. खौला, जरका, दारिमिय्या यांचीही वक्तृत्वा-

बद्दल प्रसिद्धी आहे. स्पेनमधील ग्रानडाचा शेवटचा राजा सुलतान अबदुल्ला यांची पत्नी आयेषा तर अंतःकरणाचा ठाव घेणाऱ्या वक्तृत्वाबद्दल सबंध युरोपमध्यें प्रसिद्ध होत्या. त्यांच्या मुलानें आपली राजधानी शत्रूच्या हवालीं केल्यानंतर त्या म्हणाल्या, "नीचा! अरबांचा वंशज म्हणवून घ्यावयास तूं लायख नाहींस. तुझ्या-सारख्या अधमास माझा मुलगा म्हणवून घेण्याची मला लाज वाटते. तुझ्या ऐवजीं मीं एकाद्या फत्तराला जन्म दिला असता तर फार बरें झालें असतें. मर्दासारखा छातीचा कोट करून प्रतिकार करण्याच्या वेळीं भेकड भागुबाईसारखा अश्रु ढाळतोस! इस्लामच्या झेंडयाखालीं लढण्यास तयार असलेल्यांची मदत तुला मागतां आली नसती काय? तुझ्या पूर्वजांनीं खिश्चनांस कित्येक लढाईंत धूळ चारली. तुझ्या हातून तें झालें नाहीं तर निदान आपल्या घराचें तरी संरक्षण करावयाचें होतेंस."*

## ज्ञानार्जन

समाजामध्यें सौख्य, समाधान आणि स्थैर्य निर्माण करण्याचें कार्य सुसंस्कृत माणसांकडूनच होत असतें. मानवी जीवनाचीं शाश्वत मूल्यें कोणतीं आहेत हें पारखण्याची दृष्टि त्यांना आलेली असते. समाजाला योग्य मार्गदर्शन करून तो सुखी व सर्व दृष्टींनीं संपन्न करावयाचें कार्य अशाच सुसंस्कृत व्यक्तींकडून होत असतें. इस्लाम अशा व्यक्तींकडे सदैव गौरवाच्या दृष्टीनें पाहतो, अत्यंत आदराच्या भावनेनें बघतो. सुसंस्कृत व्यक्ति म्हणजे समाजाचें भूषण अशी त्याची भावना आहे. समाजांतील प्रत्येक घटक सुसंस्कृत व्हावा

---

* Outline of Islamic Culture, Page 767.

असा इस्लामचा आग्रह आहे आणि म्हणूनच मनुष्यास सुसंस्कृत बनविणाऱ्या शिक्षणाचा किंवा ज्ञानार्जनाचा इस्लामनें हिरीरीनें पुरस्कार केला आहे.

"ज्ञानप्राप्ति करून घेणें हें प्रत्येक मुस्लिम स्त्रीपुरुषाचें कर्तव्य आहे."

—हजरत मुहम्मद पैगंबर

फक्त पुरुषांनीं शिक्षण घ्यावें, ज्ञानार्जन करावें आणि स्त्रियांना त्यापासून अलिप्त ठेवावें असा पंक्तिप्रपंच इस्लाम करीत नाहीं. पुरुषांप्रमाणें स्त्रियांनींही शिक्षण घेऊन ज्ञानसंपन्न झालें पाहिजे असा त्याचा आग्रह आहे. समाजाची प्रगती व उत्कर्ष दोघांकडून होत असतो. फक्त पुरुषवर्गानें कितीही प्रगती करून घेतली आणि स्त्रियांना अज्ञानांत ठेवलें तर समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीनें त्याचा फारसा उपयोग नाहीं. समाजाची सर्वांगीण उन्नति व्हावयाची असेल तर स्त्रियांनीं ज्ञानार्जन केलेंच पाहिजे.

"ज्ञानसंपादन करण्याकरितां चीन देशास जा."

—हजरत मुहम्मद पैगंबर

आपल्या शहरांत किंवा देशांत पुरेसें ज्ञान मिळत नाहीं म्हणून स्वस्थ न बसतां, ज्या ठिकाणीं ज्ञान मिळूं शकेल त्या ठिकाणीं जाण्यास आपण सिद्ध झालें पाहिजे. आपणांमध्यें ज्ञानाची लालसा इतकी प्रकर्ष पावली पाहिजे कीं सातांसमुद्रांपलीकडे जाण्यास आपण तयार झालें पाहिजे. वरील वाक्यांत 'चीन देश' असा शब्द वापरला, त्यांत फार मोठा अर्थ आहे. त्या काळीं कोणतींही वहातुकीचीं साधनें नव्हतीं. मजल दर मजल करीत अरबस्तानची रखरखीत सरहद्द

सोडावयाची, हिंदुस्थानचा संबध प्रदेश पायांखालीं घालावयाचा आणि नंतर हिमालय लगतचा दऱ्याखोऱ्यांचा निर्जन प्रदेश ओलांडून चीनमध्यें प्रवेश करावयाचा म्हणजे केवढें दिव्य आहे याची आपण कल्पना करूं शकतों. त्या काळीं चीन देशास जाणें म्हणजे मृत्यूला आव्हान करण्यासारखेंच होतें; पण शिक्षण संपादन करण्याकरिता इतका मोठा धोका पत्करला पाहिजे असा हजरत पैगंबरांनीं आदेश दिला आहे.

"रात्रभर प्रार्थना करीत बसण्यापेक्षां रात्रीचा एक तास दुसऱ्यांना शिकविण्यांत किंवा ज्ञान देण्यांत खर्च केला तर तो अधिक चांगला."

—हजरत मुहम्मद पैगंबर

इस्लाम धर्मास ज्ञानार्जनाची केवढी मातब्बरी वाटते हें वरील वाक्यावरून सहज दिसून येणार आहे. रात्रभर प्रार्थना करून मनुष्य थोडेंफार पुण्य मिळवूं शकेल; पण त्यापेक्षां फक्त एक तासच कां होईना लोकांना ज्ञानदान देण्यानें मिळालेलें पुण्य अधिक मोलाचें आहे. ज्ञानदान ही परमेश्वराची भक्तीच समजली जाते.

"हुतात्म्याच्या रक्तापेक्षां विद्वान माणसाच्या लेखणींतला एक थेंब अधिक पवित्र आहे."

—हजरत मुहम्मद पैगंबर

हुतात्म्याकडे आपण अत्यंत गौरवपूर्ण दृष्टीनें पाहतों, त्याची योग्यता असामान्य आहे असें आपण समजतों. त्याला नरश्रेष्ठ मानून त्याला पुष्पांजलि वाहतों, त्याचें गुणगान करतों. इस्लामच्या दृष्टीनें

हुतात्म्यापेक्षां एक श्रेष्ठ व्यक्ति या जगतांत आहे आणि ती म्हणजे विद्वान् गृहस्थ होय. हुतात्म्याच्या रक्तापेक्षां त्या विद्वानाच्या लेखणींतला शाईचा एक थेंब अधिक मोलाचा आहे, अधिक पवित्र आहे. आपल्या लेखणींतील शाईच्या एकेक थेंबागणिक तो हुतात्मा निर्माण करूं शकतो या महान् व प्रभावशाली तत्त्वज्ञानाचें जनकत्व इस्लामकडे आहे हें आपण कदापिही विसरतां कामा नये.

इस्लामनें शिक्षणाचा केलेला जबरदस्त पुरस्कार, ज्ञानोपासनेबद्दल दाखविलेली नितांत आसक्ति, विद्वान् माणसाला प्राप्त करून दिलेलें श्रेष्ठ स्थान यांमुळें विद्येचे अव्वल दर्जाचे उपासक म्हणून मुस्लिमांचा गौरव झाला अशी इतिहास साक्ष देत आहे. तत्त्वज्ञान, साहित्य, विज्ञान वगैरे ज्ञानक्षेत्रांत मुस्लिमांनीं केवढें प्रशंसनीय कार्य केलें आहे याची कल्पना पुढील एका प्रकरणावरून वाचकांना येईल. इस्लामची उदात्त शिकवण आपल्या समोर ठेवून मुस्लिम नेते, खलिफा व बादशहांनीं विद्येची व ज्ञानाची जी अमोल सेवा केली आहे तिचा इतिहास कदापिही पुसला जाणार नाहीं. त्यांनीं विद्येला दिलेलें प्रोत्साहन, विद्वानांना दिलेला उदार आश्रय, साहित्यिकांचा केलेला गौरव, ठिकठिकाणीं प्रस्थापित केलेलीं विद्यापीठें व ज्ञानकेंद्रें या सर्व गोष्टी त्यांच्या सुसंस्कृततेची सदैव साक्ष देत राहतील.

पवित्र इस्लामच्या आदेशानुसार मुस्लिम खलिफा व राज्यकर्ते विद्येस कसें प्रोत्साहन देत याचें वर्णन प्रो. शुस्तरी यांनीं केलें आहे. " हारून-अल्-रशीद व त्यांचा मुलगा यांच्या कारकीर्दींत असंख्य विद्यालयें उघडलीं गेलीं, विद्यापीठें प्रस्थापित झालीं, ग्रंथालयांची प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली, वेधशाळा बांधण्यांत आल्या. पुष्कळ विद्यालयांत मुस्लिम व परधर्मीय विद्यार्थी एकत्र अभ्यास

करीत. जात किंवा धर्म यांचा विचार न करतां विद्वानांचा सत्कार करून त्यांना देणग्या देण्यांत येत. विद्येस भरपूर आश्रय देणें; शास्त्र, तत्त्वज्ञान व धर्मशास्त्र या विषयांवर वादविवाद करण्याकरितां मुद्दाम विद्वानांना दूर दूर ठिकाणांहून पाचारण करणें, सार्वजनिक ग्रंथालयांकरितां पुस्तकांचा संग्रह जमविणें ही तर राज्यकर्ते, मंत्रि आणि श्रीमान् लोक यांची नित्याचीच बाब झाली होती. खलिफा अल् अजीझ यांनीं ईजिप्तमध्यें प्राध्यापक व विद्यार्थी यांना राहण्याकरितां सुंदर व भव्य प्रासाद बांधले होते. त्यांना भरपूर तनखा व शिष्यवृत्त्या देण्यांत येत. सेल्जुक घराण्यांतील निजाम-उल्-मुल्कनीं तर शैक्षणिक पद्धतींत नमुनेदार सुधारणा केल्या. त्यांनीं अनेक विद्यालयें व विद्यापीठें प्रस्थापित करून त्या सर्वांना खास सरकारी आश्रय दिला. विद्वान् लोकांची निवड करून त्यांची महाविद्यालयांत प्राध्यापक म्हणून नेमणुका केल्या.....याखेरीज समरकंद, बल्क, अल्लेपो, दमास्कस, गझनी इत्यादि मोठ्या शहरांत महाविद्यालयें प्रस्थापित झालीं.....स्पेनमधील मुस्लिमांमध्यें तर विद्येची एवढी अभिरुची होती कीं बादशहापासून तो गरीब नागरिकापर्यंत सर्व अभ्यासाकरितां एकत्र येत आणि ज्ञानसंपादनार्थ लांब लांब दौरे काढीत. तेथें सेव्हेली, ग्रानडा आणि क्रोडोवा शहरीं महाविद्यालयें व ग्रंथालयें प्रस्थापित करण्यांत आलीं....सीरियामध्यें अल्-रिसीय्या, अमानिय्या, तर्खनिय्या, खातुनिय्या, आणि शरीफिया हीं महाविद्यालयें प्रसिद्ध होतीं. इजिप्तमध्यें रम्बीया, नसरिय्या, सलाहिय्या या विद्यापीठांचें नांव सर्वत्र गाजलें होतें."†

जनतेच्या ज्ञानार्जनांत भर पडावी म्हणून ठिकठिकाणीं ग्रंथालयें

† Outline of Islamic Culture, Vol. I, Page 165–70.

प्रस्थापित करण्यांत आलीं. जगांतील सर्व भागांतून उत्कृष्ट ग्रंथसंभार जमविण्यांत आला, कित्येक ठिकाणीं धूळ खात पडलेली मौल्यवान हस्तलिखितें मोठ्या आस्थेनें गोळा करण्यांत येऊन त्यांना ग्रंथालयांत स्थान देण्यांत आलें. मुस्लिम खलिफांनीं व श्रीमानांनीं ग्रंथालयांची वाढ होण्याकरितां मुक्त हस्तानें मदत केली. ग्रंथालयें म्हणजे ज्ञानाचें जिवंत भांडार असें ते मानीत. मुस्लिम बादशहा तर त्यांना इतकें महत्त्व देत कीं एकदां शत्रूंचा पराभव केल्या-नंतर त्यांचा विस्तृत प्रदेश हस्तगत करण्याऐवजीं त्यांच्या संग्रहीं असलेलें उत्कृष्ट ग्रंथभांडार घेणें हेंच त्यांना महत्त्वाचें वाटत असे. फक्त ग्रंथालयें हवालीं करण्याच्या अटींवर लढाई थांबवून तहनामा करण्यांत आल्याचीं उदाहरणें पाहिल्यानंतर ग्रंथालयांबद्दल मुस्लिमांच्या किती उच्च भावना होत्या याची आपणांस कल्पना येईल.

मुस्लिमांच्या कारकीर्दींत ग्रंथालयांचा केवढा पसारा वाढला होता याचें वर्णन त्याच ग्रंथकारानें केलें आहे. तो म्हणतो, "इराणचा राजा आझाद उद्दौला यानें सिराझ येथें प्रचंड ग्रंथालय प्रस्थापित केलें. असंख्य ग्रंथांखेरीज, सुंदर व बादशाही इमारत, सामानसुमान आणि आदर्श व्यवस्था यांबद्दल तें ग्रंथालय प्रसिद्ध होतें. सभोंवार लहान लहान बगीचे असलेल्या त्या इमारतीमध्यें ३८० खोल्या व दिवाणखाने होते. बगदादमध्यें जें ग्रंथालय प्रस्थापित करण्यांत आलें, त्यामध्यें एक लक्ष चाळीस हजारपर्यंत मोठमोठे ग्रंथ होते. ....तेहरानजवळ रे शहरामध्यें जें ग्रंथालय होतें, त्यामध्यें ४०० उंटांवर लादून नेतां येतील इतके ग्रंथ होते. कायरो येथील ग्रंथा-लयाचा खर्च दरमहा एक हजार सुवर्ण दिनार होता. बैतुल हिकमत विद्यापीठास जोडून एक प्रचंड ग्रंथालय होतें. त्यामध्यें, वीस लाख

ग्रंथांचा संभार होता. सीरियामधील ट्रीपोली येथील ग्रंथालयांत तीस लाख ग्रंथ होते. स्पेनमधील कोर्डावा येथील ग्रंथसंग्रहालयांत चार लाख ग्रंथांचा संग्रह होता. हीं सर्व पुस्तकें एका इमारतीमधून दुसऱ्या इमारतींत हलवावयाचीं झाल्यास सहा महिने लागत. अल्-हकीमच्या स्वतःच्या ग्रंथालयांत ४० दिवाणखाने असून प्रत्येक दिवाणखान्यांत अठरा हजार ग्रंथ संग्रहित करण्यांत आले होते." †

ज्या काळीं शिक्षणाविषयीं, ज्ञानाविषयीं उदासीनता होती अशा मध्ययुगीन काळांत इतका प्रचंड ग्रंथसंभार मुस्लिम राजवटींत ठिकठिकाणीं आढळून यावा, यावरून मुस्लिम खलिफांचा व राज्यकर्त्यांचा सांस्कृतिक दर्जा केवढा श्रेष्ठ असला पाहिजे याची आपणच कल्पना करावी. त्यांच्या औदार्यामुळें जगाच्या ज्ञानांत एवढी प्रचंड भर पडली. प्रथितयश विद्वान पंडितांकडून मुद्दाम ग्रंथ लिहवून घेण्याकरितां मुस्लिम खलिफा पाण्यासारखा पैसा खर्च करीत. निरनिराळ्या देशांत आपलीं माणसें पाठवून तेथील विद्वानांस बोलावीत व त्यांच्याकडून ग्रंथलेखनाचें काम करून घेत. या कार्याबद्दल त्यांनाच काय पण त्यांच्या मुलाबाळांना पुरून उरेल इतकें द्रव्यसाहाय्य त्यांना देण्यांत येई. या दृष्टीनें बगदादचे खलिफा अल्-मामून या चतुरस्र खलिफाचें उदाहरण आदर्शवत् नव्हे तर रोमांचकारक आहे. अल्-मामून यांना एका संस्कृत ग्रंथाचें अरबी भाषांतर करून घ्यावयाचें होतें. त्या काळीं काशी हें संस्कृत विद्येचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध होतें. तेथील माणिकशास्त्री नांवाच्या संस्कृत पंडितास बगदाद येथें आणण्याकरितां खलिफा अल्-मामूननीं काशीस खास शिष्टमंडळ पाठवून दिलें. इतका विद्वान व जाडा पंडित पण त्याच्या

† Outline of Islamic Culture, Vol. I, P. 167–68.

घरचें अठरा विश्वे दारिद्र्य पाहून त्या शिष्टमंडळास अचंबा वाटला. त्यांनीं खलिफांचा नजराणा म्हणून दिनारांनीं भरलेलें ताट त्याच्या हवालीं केलें व आपला हेतु निवेदन केला. पंडित माणिकशास्त्रयांनीं नजराण्याचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार केला. आपल्या कुटुंबांतील मंडळींची व्यवस्था करून ते बगदादेस निघाले. बगदाद येथें पोहोंचल्यानंतर त्यांना खलिफांचे भेटीस नेण्यांत आलें. त्या वेळीं दरबार भरला होता. माणिकशास्त्री शाही दरबारांत येतांच खलिफांनीं त्यांना उत्थापन दिलें व उच्चासनावर बसविलें. परधर्मीयाचा इतका आदरसत्कार पाहून दरबारी मंडळी चकितच झाली. त्या वेळीं अल्-मामून यांनीं काढलेले उद्गार अंतःकरणावर कोरून ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणाले, "हा मानसन्मान, हा आदरसत्कार माणिक-शास्त्री या व्यक्तीचा नाहीं तर तो आपल्या परमपूज्य हजरत पैगंबरां-चा सत्कार आहे असें मी समजतों. 'विद्वानांचा सन्मान हा माझा सन्मान आहे' अशी हजरत पैगंबरांची आपणा सर्वांस आज्ञा आहे. त्या आज्ञेचें पालन करावयाची संधि मला मिळाली याबद्दल मला आनंद वाटतो." पंडित माणिकशास्त्र्यांनीं भाषांतर करण्याचें कार्य पुरें केल्यानंतर त्यांना मोबदला म्हणून त्यांच्या वजनाइतकें सोनें बहाल करण्यांत आलें, आणि पंडित माणिकशास्त्र्यांची स्मृति कायम राहावी म्हणून त्या भाषांतरित ग्रंथास "अल-मन्याक" असें नांव देण्यांत आलें. अद्याप हा ग्रंथ बगदादच्या लायब्ररींत जपून ठेवण्यांत आला आहे. शेवटीं पंडित माणिकशास्त्री यांना मोठ्या इतमामानें काशीस पोहोंचविण्यांत आलें. मुस्लिमांची विद्येविषयीं एवढी आसक्ति व विद्वानांविषयीं एवढा आदर हाच इस्लामी तत्त्वज्ञानाचा मानबिंदु होय.

प्रकरण ५ वें

# इस्लाम आणि राज्यशास्त्र

" सर्व धर्मांत, इस्लाम हा लोकसत्ताक राज्यपद्धतीचा पुरस्कार करणारा धर्म आहे. मानव जातीस. पूर्णपणें समतेच्या पातळीवर आणण्याचें श्रेय त्यानें घेतलें आहे....पॅसिफिक महासागरापासून तो अटलांटिक महासागरापर्यंत इस्लामनें जी जागतिक प्रगती केली याचें कारण त्याचें उदार धोरण होय."*

—सर प्रफुल्लचंद्र रॉय

धर्म आणि समाजशास्त्र एवढयापुरतेंच इस्लामचें क्षेत्र मर्यादित नाहीं. त्याच्या कक्षेत राज्यशास्त्राचाही प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. इस्लामनें धार्मिक कल्पनांना नवें वळण लावून दिलें, समाजाच्या आचारविचारांत क्रांति करून टाकली आणि राज्यशास्त्रांत अभिनव योजना प्रसृत करून टाकल्या. धर्म, समाज आणि राजकारण या तिन्हींचें अधिष्ठान मात्र एकच आहे आणि तें म्हणजे अद्वैतवाद हेंच होय. अद्वैतवाद म्हटला कीं त्या ठिकाणीं नैतिक मूल्यांचा आविष्कार आलाच. नैतिक मूल्यांचें उच्चाटन झालें तर धर्म, समाज आणि राजकारणामध्यें विकृती निर्माण होणें अपरिहार्य आहे असें इस्लाम मानतो.

इस्लाम राज्यशास्त्राचें महत्त्व अत्यावश्यक मानतो. समाजाच्या

* The Glory of Islam, Page 233.

रक्षणासाठीं राज्यतंत्राची फार मोठी आवश्यकता आहे. समाजाचें स्वास्थ्य, स्वातंत्र्य आणि कल्याण साधण्याचें श्रेष्ठ कार्य राज्यतंत्राकडून होत असतें. नुसता धर्म उराशीं बाळगून भागत नाहीं किंवा समाजसुधारणेचें कार्य झालें कीं कार्यभाग झाला असें समजून चालणार नाहीं. धर्म किंवा समाज टिकणें हें सर्वस्वीं राज्यतंत्रावर अवलंबून असतें. राज्यतंत्र नसेल तर देशामध्यें अशांतता फैलावेल, ज्याच्या मनगटांत जोर तो शिरजोर ठरेल, दुर्बलांचा त्राता कोणी राहणार नाहीं किंवा जनतेचें जीवित आणि वित्त यांचें संरक्षण होणार नाहीं.

लोकांच्या विचारानें, संमतीनें निर्माण झालेलें राज्यतंत्र श्रेष्ठ दर्जाचें समजलें जातें. नुसत्या बलावर राज्यतंत्र निर्माण होऊं शकत नाहीं आणि झालें तर फार दिवस टिकूं शकत नाहीं. बल हा एक आनुषंगिक भाग आहे. बलापेक्षां जनतेची संमती अधिक महत्त्वाची मानली जाते. जनतेच्या भावना, नैतिक शक्ति आणि संमती हाच राज्यतंत्राचा किंवा राज्यांतील अधिसत्तेचा कणा समजला जातो. हॉब्स, लॉक किंवा रूसो यांच्यासारख्या तत्त्वज्ञांनीं वरील विचारसरणींचा पुरस्कार केलेला आहे.

इस्लामच्या दृष्टीनें असें राज्यशास्त्र आवश्यक असलें तरी त्या राज्यशास्त्रांत सत्तेचा अभिलाष, वैयक्तिक बडेजाव किंवा निव्वळ बलाची उपासना असतां कामा नये असा त्याचा कटाक्ष आहे. राज्यशास्त्राचें 'परमेश्वर एक आहे' हें ध्येयवाक्य असलें आहे. आदर्श राज्यशास्त्र परमेश्वराची आज्ञा काय आहे याचा प्रथम विचार करतें. मानवजातीचें कल्याण हा त्या आज्ञेचा निष्कर्ष असल्यामुळें मानव्याला विघातक होईल असा कोणताही कार्यक्रम तें राज्य-

शास्त्र पत्करूं शकत नाहीं. जनतेच्या स्वातंत्र्याची गळचेपी करणें, तिच्या भावना दडपून टाकणें, अन्याय व अत्याचार करून तिला त्राहीं भगवान् करून सोडणें या गोष्टी राज्यशास्त्रानें निषिद्ध मानल्या आहेत. राज्यसूत्रें धारण करणारे पहिले मान्यवंत खलिफा हजरत अबू बक्र यांनीं जी प्रथम घोषणा केली ती या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे. ते म्हणाले, "सज्जनांनो, जें न्याय्य असेल तें मी करीन तर मला सहाय्य करा; परंतु माझ्या हातून अयोग्य घडत असेल तर मला सन्मार्गावर आणा. जर परमेश्वराची व पैगंबरांची आज्ञा मी मान्य करीत असेन तर माझ्या आज्ञा तुम्हीं पाळा; माझ्या हातून तसें घडत नसेल तर माझ्या आज्ञा पाळूं नका." या वक्तव्यावरून अयोग्य व अन्यायाचा पुरस्कार करणारें राज्ययंत्र किंवा शासनपद्धति इस्लामला मान्य नाहीं हें सिद्ध होतें.

"तुमच्या मागून खऱ्या न्यायाला आवाहन करणारे, योग्य मार्गाचा अवलंब करणारे आणि अयोग्य मार्गापासून परावृत्त होणारे लोक निर्माण होवोत."

—पवित्र कुराण ३:१०२

राज्यतंत्र चालविणारांपुढें इस्लामनें वरील आदर्श ठेविला आहे. वाटेल त्या अयोग्य मार्गाचा अवलंब करून, न्यायाची गळचेपी करून राज्यतंत्र चालविणें इस्लाम कधींही मान्य करीत नाहीं. राजशाही असो वा लोकशाही असो, त्यांच्या राज्यपद्धतींत पवित्र कुराणच्या वरील आदेशाचें प्रतिबिंब पडलेलें असलें पाहिजे. प्रसिद्ध पर्शियन कवि सादी यानें आपल्या 'बोस्तान' नांवाच्या महाकाव्यांत (पहिलें पर्व) राज्यशास्त्र कसें असावें याविषयीं कल्पना दिली आहे. त्यामध्यें नौशेरवान आपल्या मुलास म्हणतो, "दुर्बल व अनाथ यांचें

संरक्षण कर. त्याबरोबर दारिद्र्य किंवा दुर्दैव यांपासून त्यांची सुटका करून त्यांना स्वास्थ्य मिळेपर्यंत विश्रांति घेऊं नकोस."

आजच्या पाश्चात्य राष्ट्रांना लोकशाहीचा मोठा अभिमान वाटतो. आज सर्व जग लोकशाहीकडे भरधांव जात आहे; पण ही लोकशाही जगामध्यें पहिल्या प्रथम प्रस्थापित करण्याचा मान इस्लामनें मिळविला आहे असें जागतिक राजकारणाचा अभ्यास करणारांना दिसून येईल. ज्या काळीं सर्व जगांत साम्राज्यशाहींचा उदो उदो चालला होता, सरंजामशाहीला प्रोत्साहान मिळत होतें, ज्याच्या मनगटांत जोर तो सत्ताधीश अशी परिस्थिती होती, जनतेचें मन किंवा संमती कस्पटासमान मानली जात होती अशा काळांत इस्लामनें लोकशाहीचा प्रथमच पुकारा केला. सोळाव्या शतकांत राजा व प्रजा यांच्यामधील यादवीस सुरुवात झाली; त्याचें पर्यवसान सन १६८८ सालीं फ्रेंच क्रांतीमध्यें होऊन लोकशाहीचीं बीजें पेरलीं गेलीं. तेव्हांपासून युरोपमध्यें लोकशाहीचा अवतार झाला असें आपणांस म्हणावें लागेल. या लोकशाहीच्या जवळ जवळ एक हजार वर्षे अगोदर जंगली समजल्या जाणाऱ्या अरबस्तानांत लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवण्यांत येऊन, हजरत पैगंबरांना लोकांनीं निवडून दिलेला पहिला सर्वाधिकारी होण्याचा मान मिळाला. त्यांच्यानंतर हजरत अबूबक्र हे खलिफा झाले.

राज्याचा प्रमुख म्हणून जनतेनें निवडून दिलेल्या सर्वाधिकाऱ्यास खलिफा, इमाम किंवा अमीरुल मोमीनीन अशा संज्ञा आहेत. निवडून आल्यानंतर खलिफांनीं आपल्या सहकाऱ्यांशीं विचारविनिमय करून कोणताही निर्णय घ्यावयाचा असतो. एकदां निवडून

आल्यानंतर, आपल्या मनास वाटेल तसा राज्यकारभार करण्याचा कोणालाही अधिकार नाहीं.

" विचारविनियम करून निर्णय घ्या."

—पवित्र कुराण ३:१५९

अशी पवित्र कुराणची आज्ञा असल्यामुळें राजकारणांत एका व्यक्तीच्या मताला महत्त्व नाहीं. एकमतानें किंवा बहुमतानें जो निर्णय होईल तोच सर्वाधिकाऱ्यानें किंवा खलिफानें स्वीकारावयाचा असतो. हजरत पैगंबरांच्या वेळीं एक पेंचप्रसंग निर्माण झाला होता. ओहोदची लढाई उघडया मैदानावर देऊं नये असें पैगंबरांचें म्हणणें होतें, पण त्यांच्या सहकाऱ्यांनीं उघडयावरच लढाई द्यावी असा एकमतानें निर्णय घेतल्यामुळें हजरत पैगंबरांनीं तो निर्णय मान्य केला. ' विचारविनियमाखेरीज कोणतेंही राज्य चालणें शक्य नाहीं ' असें खलिफा हजरत उमर सदैव म्हणत. इस्लामनें पुरस्कार केलेल्या राज्यशास्त्राचा विचार करतांना मौ. शिबली म्हणतात, " कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर सल्लागार मंडळाला बोलाविण्यांत येत असे. विचारविनियम केल्याखेरीज व बहुमत झाल्याखेरीज कोणताही निर्णय घेण्यांत येत नसे."*

खलिफाला मार्गदर्शन करणाऱ्या मंडळाला ' मजलिसे शूरा ' असें संबोधण्यांत येई. आजकालच्या कायदेमंडळाचें त्याला स्वरूप होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. कोणतेही कायदेकानू करतांना इज्तेहाद, बुद्धिवाद व इज्मा यांचा उपयोग करण्यांत येई. राज्यतंत्र चालविणाऱ्या खलिफाच्या दिमतीस कार्यकारी मंडळ देण्यांत येत

---

* Al-Faruq Part II, Page 15.

असे. तें कार्यकारी मंडळ " अरबाबे हल व अक्द " या नांवानें ओळखलें जाई. राज्यकारभाराचे दैनंदिन प्रश्न हाताळण्याचें कार्य या कार्यकारी मंडळाच्या साहाय्यानें करण्यांत येई.

अल-मवर्दी नांवाच्या विख्यात ग्रंथकारानें आपल्या ' अहकामुस्सुलतानिया ' या राजकीय ग्रंथांत राज्यशास्त्राची साद्यंत व हृद्य हकीकत दिली असून, खलिफा होऊं इच्छिणाऱ्या व्यक्तीच्या अंगीं कोणते गुण लागतात, निवडणुकी कशा कराव्या, लोकमंत्र्यांचे अधिकार कोणते, सर्वाधिकाऱ्याचें अधिकारक्षेत्र किती इत्यादि गोष्टींचा संपूर्ण उहापोह केला आहे. या ग्रंथांत राज्यशास्त्र हें लोकांचें हित व कल्याणाकरितां असलें पाहिजे, इस्लामचें क्षेत्र मानवजातीस व्यापून टाकणारें असल्यामुळें सर्व मानवांमध्यें समता व स्वास्थ्य कायम राहील असा कटाक्ष राज्यशास्त्रानें ठेविला पाहिजे वगैरे गोष्टींचें सविस्तर विवरण करण्यांत आलें आहे.

राज्यशास्त्रांत खलिफाची जबाबदारी मोठी समजली जाते आणि त्याकरितां त्याची निवड करतांना अनेक महत्त्वाच्या गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात. खलिफा हा सर्वाधिकारी म्हणूनच नव्हे तर तो आदर्श नागरिक म्हणून ओळखला जातो. त्याच्या दैनंदिन व्यवहारांत लोक बोध घेतील अशा प्रकारचें आचरण त्याला ठेवावें लागतें. मोठेपणा, बडेजाव किंवा सत्तेचा मद यांपासून त्याला सदैव अलिप्त राहावें लागतें. या दृष्टीनें इस्लामच्या इतिहासांत पहिल्या चार खलिफांचीं चरित्रें अभ्यासण्यासारखीं आहेत. इब्न जौजी यानें ' शिरतुन् लिल उमर ' या आपल्या ग्रंथांत खलिफा हा जनतेचा सेवक कसा असतो याचें सुंदर चित्र रंगविलें आहे. मदिनेहून तीन मैल अंतरावर एका ठिकाणीं खावयास कांहीं न मिळाल्यामुळें एक

अनाथ स्त्री व तिचीं दोन मुलें आसन्नमरण झालीं होतीं. हजरत उमर यांनीं तें हृदयद्रावक दृश्य पाहिल्यानंतर शहरांतून पीठ व खजूर आणण्याकरितां आपल्या नोकरास पाठविलें. जिन्नस आणल्यानंतर ते स्वत: चुलीजवळ बसले; स्वयंपाक तयार झाल्यानंतर त्यांना प्रेमानें खावयास घालून त्या अनाथांची उदरनिर्वाहांची कायमची व्यवस्था हजरत उमरनीं सरकारी खजिन्यामधून केली.

राज्यशास्त्रांत आर्थिक सुस्थितीला महत्त्वाचें स्थान आहे. राष्ट्रामध्यें आर्थिक व्यवस्था व परिस्थिति चोख राहावी हें तेथील राज्यशास्त्रास केव्हांही भूषणास्पदच आहे; पण याच्या उलट परिस्थिति असेल तर मात्र तें राज्यशास्त्र कोठेंतरी चुकत असलें पाहिजे किंवा त्यामध्यें मुळांतच कांहीं दोष राहिला असला पाहिजे असा निष्कर्ष निघतो. देशामध्यें अगदीं मोजक्या लोकांजवळ पैशाचा ढीग पडून राहावा आणि सर्वसाधारण जनतेची कंगाल अवस्था असावी, श्रीमंतांनी लहर किंवा व्यसनाखातर पाण्यासारखा पैसा खर्च करावा आणि गरिबांजवळ त्यांच्या आवश्यक गरजा भागविण्याकरितां एक कपर्दिकाही नसावी ही गोष्ट खचित भूषणावह नाहीं. राष्ट्रांतील संपत्तीची विषम वांटणी हा त्या राष्ट्राला शाप आहे असें इस्लाम समजतो. राष्ट्रामध्यें भांडवलशाहीचें प्रस्थ वाढूं नये आणि शक्य तितकी आर्थिक समता राहावी अशी परिस्थिति राज्यशास्त्रानें निर्माण केली पाहिजे. 'परमेश्वर एक आहे' या विश्वासामुळें आर्थिक समतेचा प्रश्न हाताळावयास फार मोठी मदत होते. आपण सर्व एकाच कुटुंबांतील असून एकमेकांच्या स्वास्थ्याचा विचार करणें हें आपलें कर्तव्य आहे या विचारसरणीचा पगडा मनावर असल्यामुळें आर्थिक परिस्थिति चिघळण्याच्या अवस्थेपर्यंत जात नाहीं. श्रीमंत कोणी परके

नाहींत, त्या संपत्तींत गरजू व गरीब यांचा हिस्सा ठरलेला आहे ही इस्लामची शिकवण राष्ट्राच्या आर्थिक सुस्थितीस पोषकच झाली आहे.

राष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीस धोका पोहोंचविणारी भांडवलशाही अस्तित्वांत येऊं नये म्हणून इस्लाममध्यें खास कायदे करण्यांत आले आहेत. त्यांपैकीं महत्त्वाचा म्हणजे वारसा कायदा होय. या कायद्यामुळें संपत्तीचा एकत्र होणारा सांठा विभागला गेला. श्रीमान् गृहस्थांच्या संपत्तीचा वारस एकटा त्याचा मुलगाच होऊं शकत नाहीं. पत्नी, मुलें, आई व निकटचे नातेवाईक यांच्यामध्यें ती विभागली जाते. अशी विभागणी करूनही प्रत्येकास खूप संपत्ति मिळून तो भांडवलवाला होऊं नये म्हणून जकातचें दुसरें बंधन घालण्यांत आलें आहे. ज्यांच्याजवळ संपत्ति आहे त्यांना इस्लामी आदेशाप्रमाणें जकात द्यावी लागते. दरसाल शंभर रुपयांस अडीच रुपये याप्रमाणें गोरगरिबांकरितां जो कर द्यावा लागतो त्याला ‘ जकात ’ असें म्हणतात. एकाद्या श्रीमान् गृहस्थास दोनच मुलें असतील आणि त्यांच्या वांटणीस प्रत्येकीं पांच लाख रुपये आले असतील तर त्यांना जकात म्हणून प्रत्येकीं साडेबारा हजार रुपये प्रमाणें दोघांनीं २५ हजार रुपये दिलेच पाहिजेत. जकातीचे पैसे सरकारी खजिन्यांत भरले जातात. गोरगरीब, अनाथ, अपंग यांच्यासाठीं हे पैसे खर्च केले जातात.

“ श्रीमंतांकडून जकात घेऊन ती गोरगरिबांमध्यें वांटावयाची असते.”

—हजरत मुहम्मद पैगंबर

जकातीपासून दोन स्तुत्य उद्देश साधले जातात. एक, मानव

जातीबद्दल वाटणाऱ्या प्रेमामुळें आपल्यामध्यें त्या प्रेमास पोषक होणारे सद्गुण वाढीस लागतात. स्वतःच्या स्वार्थापेक्षां किंवा सौख्यापेक्षां मानवांचें कल्याण हेंच श्रेष्ठ आहे अशी भावना आपल्या अंतःकरणावर संक्रांत होते. दुसरा उद्देश हा कीं, आपल्या जकातीच्या पैशापासून गोरगरीब, अनाथ, अपंग किंवा विधवा यांना जें साहाय्य मिळतें त्यामुळें त्यांना भीक मागण्याचा किंवा आपला स्वाभिमान गमावण्याचा संभव नष्ट होतो. भांडवलशाहीचा संकोच करणारा तिसरा उपाय म्हणजे व्याजबट्ट्याचा व्यवहार बेकायदेशीर, निषिद्ध मानण्यांत आला आहे. गोरगरिबांना पिळून काढणाऱ्या या सामाजिक दोषांपासून समाजाला इस्लामनें कायमचें मुक्त केलें आहे. वेळ निभावून नेण्याकरितां काढलेल्या ऋणाची दामदुपटीनें किंवा चौपटीनें फेड करावी ही गोष्ट अन्यायाची आहे असें इस्लाम समजतो. व्याज घेणारा मनुष्य इस्लाममध्यें अत्यंत हीन व तत्त्वभ्रष्ट समजला जातो. या उपायामुळें संपत्तीची भूमितिश्रेढीनें होणारी वाढ कायमची खुंटली गेली. त्याचप्रमाणें सर्वांची नागवणूक करून एकालाच श्रीमंत करणारा 'जुगार' इस्लाममध्यें निषिद्ध मानण्यांत आला आहे. जुगार किंवा शर्यत खेळणें हें परमेश्वराच्या आज्ञेविरुद्ध आहे असा आदेश देण्यांत आला आहे.

निरनिराळ्या कराच्या रूपानें जमणारी संपत्ति समाजाच्या कार्याकरितां खर्चावयाची असते. उशर, खिराज, जझिया, सदाकत असे महत्त्वाचे कर राज्यशास्त्रांत प्रचलित होते. खासगी मोठी इस्टेट किंवा जमीनजुमला ठेवण्यास इस्लामनें मनाई केली आहे. या बाबतींत एका प्रसिद्ध इतिहासकारानें काढलेले उद्गार मननीय आहेत. तो म्हणतो, "अरबांना लोकशाहीबद्दल वाटणारा जो आवेश होता,

त्यामुळें खाजगी व्यक्तींना मोठमोठ्या इस्टेटी करण्याचा मार्ग बंद झाला आणि अशा रीतीनें लहान लहान शेतकऱ्यांना आपला उत्कर्ष करून घेण्यास चांगली संधी मिळाली." †

एकाद्या व्यक्तीकडे त्याच्या गरजेपेक्षां जास्त जमीनजुमला ठेवण्यास सक्त मनाई करण्यांत आली आहे. तसेंच शेतकऱ्यांनीं मरेपर्यंत राबावें आणि शेतींचा फायदा एकट्या मालकानें लाटावा हीं विषमता आपणांस इस्लाममध्यें दिसून येणार नाहीं. जो जमीन कसतो, रात्रंदिवस हाडाचीं काडें करतो त्याला व त्याच्या कच्चाबच्चांना पोटभर अन्न किंवा अंग झाकण्यापुरता कपडाही मिळूं नये हा धडधडीत अन्याय आहे असा इस्लामचा दावा आहे. जमिनीच्या मालकाला त्याला स्वतःला कसतां येईल तेवढीच जमीन आपल्या मालकीची म्हणून ठेवतां येईल. दुसऱ्यांना जमीन कसावयास देऊन त्यावर घर बसल्या वाटेल तेवढा पैसा मिळविण्याचा त्याला हक्क नाहीं. हजरत पैगंबरांच्या सहवासांत असणाऱ्या अनेकांनीं आपल्या जमिनी दुसऱ्यास कसावयास दिल्या होत्या; पण नंतर इस्लामच्या तत्त्वानुसार त्यांनीं ती पद्धत बंद केली. अबदुल्ला बिन उमर नांवाच्या श्रीमंत जमीनदारानें आपल्यापुरती आवश्यक तेवढी जमीन ठेवून बाकीची जमीन त्यानें जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना बहाल करून टाकली. हजरत पैगंबर एकदां म्हणाले, "तुमच्यापैकीं जो जमिनीचा मालक असेल त्यानें ती जमीन स्वतः कसावी किंवा विनावेतन दुसऱ्याला कसावयास देऊन टाकावी." आपली नैतिक जबाबदारी ओळखण्याचें जमिनीच्या मालकांनीं टाळलें आणि सबंध जमीन आपल्याकडेच ठेवण्याचा अट्टाहास केला तर त्याच्याजवळून सरकारनें ती

† Historians' History of the World, Vol. 8, Page 323.

जमीन सक्तीनें काढून घ्यावी आणि गरजू लोकांना वांटून टाकावी हा इस्लामी दंडक हजरत उमर यांनीं बिलाल बिन हरिस मंझी याच्या बाबतींत अमलांत आणून दाखविला.

जनतेच्या उपजीविकेस आवश्यक असणारे जिन्नस योग्य भावानें विकले पाहिजेत अशी सक्ति करण्यांत आली आहे. वाजवीपेक्षां भरमसाट फायदा घेऊन लोकांच्या आर्थिक परिस्थितीस अधिक ताण देणें हा गुन्हा समजण्यांत येतो. गरीब जनतेला पिळून पैसा मिळविणें हें पाप आहे असें प्रत्येकानें समजलें पाहिजे. या बाबतींत हजरत पैगंबरांनीं काढलेले उद्गार अत्यंत मननीय आहेत.

"जो स्वस्त दरांत विकत घेतो व स्वस्त दरांत विकतो त्याला मोठ्या फायद्याचें श्रेय मिळतें आणि जो जिन्नस विकत घेऊन त्याचा सांठा करतो आणि जास्त भावानें विकतो त्याच्यावर परमेश्वराचा कोप होतो."

—हजरत मुहम्मद पैगंबर

इस्लामनें सांठेबाजांना दिलेला इशारा मनन करण्यासारखा आहे. स्वस्त दरानें माल घेऊन तो सांठवून ठेवणारा आणि माल भरमसाट भावानें विकणारा मनुष्य मानवजातीचा शत्रू समजला पाहिजे. अशा रीतीनें मानवांना छळणारावर परमेश्वर कधींही प्रसन्न होत नाहीं; त्याचप्रमाणें जनतेच्या कल्याणाकरितां आपली संपत्ति खर्च न करतां ती सांठवून ठेवणारा तितकाच दोषी समजला जातो.

"जो सोनें व चांदीचा सांठा करून ठेवतो आणि अल्लाच्या कार्याकरितां खर्च करीत नाहीं त्यांना जबर हाल भोगावे लागतील असें जाहीर करा."

—पवित्र कुराण ९:३४.

अल्लाचें कार्य म्हणजे मानव्याचें कार्य; त्या कार्याकरितां आपली संपत्ति खर्च करणारास इस्लाममध्यें थोर दर्जा आहे. जनतेच्या कल्याणाकरितां किंवा स्वास्थ्याकरितां आपल्या गडगंज संपत्तींतून एक पैसाही न खर्च करतां त्या संपत्तीचा सांठा करणारा गृहस्थ तुच्छ व हीन मनोवृत्तीचा समजला जातो. अशा गृहस्थास असह्य हाल भोगावे लागतात असें इस्लाम समजतो. संपत्ति मिळविण्याचे सर्व मार्ग आपल्या मालकीचे करण्यास इस्लामचा सक्त विरोध आहे. व्यापार किंवा उद्योगधंद्यांतील मक्तेदारीस इस्लाममध्यें स्थान नाहीं. मालाचें उत्पादन किंवा विक्री करण्याचा एकमेव हक्क देण्यास इस्लाम मनाई करतो. अनेकांच्या परिश्रमावर एका व्यक्तीचा अफाट फायदा हें दुष्ट तत्त्व यांच्या बुडाशीं असल्यामुळें तें ग्राह्य मानलें जात नाहीं. या ऐवजीं इस्लामनें एक नवीन योजना प्रसृत केली आहे. एकटयानें जमिनीचें पीक किंवा मालाचें उत्पादन करण्यापेक्षां तें सामुदायिक रीतीनें करणें अधिक श्रेयस्कर आहे. सामुदायिक रीत्या शेती करावयाच्या पद्धतीस ' मुजारअत ' अशी संज्ञा आहे. खेड्यांतील जमीन तेथील सर्व शेतकऱ्यांना कसावयास देणें किंवा सरकारनें स्वतः आपल्या संबंधी खात्याकडून त्या जमिनीची मशागत करून पीक काढणें हें दोन्ही प्रकार वरील पद्धतींत समाविष्ट होतात. खेड्यांतील सर्व शेतकऱ्यांना जमीन देण्यांत आली तर त्यांच्या गरजा व उदरनिर्वाह यांपुरतें अन्नधान्य राखून ठेवून बाकीचें सर्व सरकारचें हवालीं करावयाचें असतें.

वैयक्तिक व्यापार करण्याची परवानगी देण्यांत आली आहे; मात्र त्या व्यापाऱ्याला व्यापाराची मक्तेदारी कधींही मिळत नाहीं. व्यापार किंवा धंदा यांवर सरकारनें नियंत्रण ठेवावयाचें आहे.

मोठ्या व्यापाऱ्यांकडून गोरगरीब नागविले जाणार नाहींत याबद्दल सक्त खबरदारी घेण्यांत येते. पदार्थांच्या किंमती ठरविण्याचा अधिकारही सरकारचा आहे. सहकारी पद्धतीनें व्यापार करण्यास उत्तेजन देण्यांत आलें आहे. या पद्धतीस ' मुजारबत ' (सामुदायिक व्यापार) अशी संज्ञा देण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें ' मुशारकत ' (सामुदायिक उद्योगधंदे) नांवाची जी पद्धत आहे त्यामुळें सामुदायिक उद्योगधंद्यास चालना देण्यांत आली आहे. अशा रीतीनें सामुदायिक रीत्या शेती, व्यापार किंवा उद्योगधंदे केल्यास त्यामुळें सहकार्य, सहानुभूति वगैरे गुण वाढीस लागतात. एका व्यक्तीला सर्व फायदा न मिळतां तो अनेकांमध्यें वांटला जातो याकरितां ही पद्धत इस्लामनें अधिक श्रेयस्कर मानली आहे.

राष्ट्रामध्यें आर्थिक परिस्थिति सुस्थिर रहावी याप्रीत्यर्थ इस्लामनें ज्या प्रशंसनीय उपायांचा अवलंब केला आहे त्यांचें आपण विहंगमदृष्ट्या अवलोकन केलें आहे. इतकेंही करून आर्थिक परिस्थिति काबूंत राहिली नाहीं तर ती आटोक्यांत आणण्याकरितां शक्य त्या उपायांचा अवलंब करण्यास इस्लामनें प्रचलित सरकारास संपूर्ण अधिकार दिला आहे. त्याचप्रमाणें राष्ट्रांत दुष्काळ पडून जनतेची उपासमार होऊं लागली तर 'जरियाब' नांवाचा कर श्रीमंतांवर बसविण्यास सरकारला हक्क दिला आहे. अल्लामा इब्न हाजम लिहितात, "सरकारी खजिन्यामधून गोरगरीब व गरजू यांच्या आर्थिक गरजा भागवितां आल्या नाहींत तर श्रीमंत लोकांवर खास कर बसविण्याचा खलिफांना अधिकार देण्यांत आला आहे. श्रीमंतांनीं जर नकार दिला तर त्यांच्याकडून सक्तीनें कर वसूल करणेचा आहे."

राष्ट्रांतील अनाथ मुलें, विधवा, अपंग व वृद्ध यांची आबाळ

होऊं नये म्हणून इस्लामनें फार खबरदारी घेतली आहे. त्याकरितां खलिफा हजरत उमर यांच्या कारकीर्दींत 'दिवान' नांवाचें स्वतंत्र खातें उघडण्यांत आलें. तत्संबंधी लिहितांना एक मुस्लिम पंडित म्हणतो, "ठराविक मुदतीनंतर खानेसुमारी करून त्या खानेसुमारीच्या आधारावर (१) विधवा व अनाथ मुलें (२) हजरत पैगंबरांच्या वेळीं लढाईंत निकामी झालेले अपंग (३) आजारी, लुलेपांगळे व वृद्ध नागरिक यांना वार्षिक तनखा देण्याकरितां 'दिवान' नांवाचें एक खास खातें हजरत उमर यांनीं सुरू केलें. या योजनेनुसार प्रत्येकास कमींत कमीं २५० दिनारांचा तनखा मिळत असे. नुक्त्याच जन्मलेल्या बालकांना त्यांच्या आईबापांना मिळणारा तनखा देण्यांत येऊं लागला. आपल्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षीं हजरत उमर म्हणाले, "परमेश्वरानें मला आणखी आयुष्य दिलें तर सना पर्वतासारख्या निर्जन स्थळीं राहणाऱ्या एकाकी धनगरासही तनखा मिळेल अशी मी पराकाष्ठा करीन."* याही पुढें जाऊन, हजरत उमर यांनीं आणखी एक अभिनव उपक्रम केला असें वरील ग्रंथांत (पृष्ठ २१९-२०) नमूद केलें आहे. प्रत्येक मनुष्यास त्याचें आरोग्य आणि ताकद टिकविण्याकरितां साधारण-पणें किती अन्न लागतें हें अजमावण्यासाठीं त्यांनीं तीस लोकांवर प्रयोग करून पाहिला. त्यानंतर त्यांनीं एक खास निवेदन काढून तितकें अन्न प्रत्येकास सरकारकडून देणेंत यावें असा हुकूम केला. आपल्या राष्ट्रांमधील दारिद्र्य व उपासमार नाहींशी व्हावी म्हणून इस्लामनें राज्यकर्त्यांस जे प्रयोग करावयास प्रवृत्त केलें आहे ते आजच्या काळांतही उद्बोधक वाटतील.

---

* See Ibn Sa'd Vol. III, P. 213–17.

आपला स्वार्थ, अप्पलपोटेपणा, संपत्तीची हांव बाजूला ठेवून माणुसकीच्या दृष्टीनें आपण राष्ट्राकडे पाहूं लागलों तर आर्थिक दुःस्थिति दूर व्हावयास फारसा वेळ लागणार नाहीं. या दृष्टीनें पवित्र कुराणनें दिलेला आदेश प्रत्येकानें आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवण्यासारखा आहे.

"त्यांना सांगा कीं आपल्या गरजेपेक्षां जास्त असेल तें सर्व दुसऱ्यांना देऊन टाका."

इस्लामचा हा बहुमोल उपदेश जर आचरणांत आणून दाखविला तर जनतेच्या आर्थिक स्वास्थ्यास केवढी तरी मदत होणार आहे. अशा तऱ्हेचें औदार्य जर प्रत्येकानें दाखविलें तर आर्थिक अनावस्था हा शब्द अस्तित्वांत देखील राहणार नाहीं. वरील वाक्यांत बंधुतेला आवाहन करण्यांत आलें आहे. बंधुत्वाच्या भावनेनें दुसऱ्याशीं वागा हाच अर्थ त्यामध्यें अभिप्रेत आहे. जनतेमध्यें बंधुत्वाच्या भावना जितक्या जास्त प्रमाणांत फैलावतील तितक्या प्रमाणांत आर्थिक परिस्थिति निवळत जाईल. इस्लामनें राज्यशास्त्रांत बंधुतेला जें महत्त्व दिलें आहे तें यामुळेंच.

समता हा लोकशाहीचा फार मोठा आधार आहे. ज्या ठिकाणीं समता नाहीं त्या ठिकाणीं निर्भेळ लोकशाही संभवत नाहीं. ज्या राष्ट्रामध्यें काळागोरा असा भेद केला जातो, उच्चनीचपणाचे कप्पे पाडले जातात, स्पृश्यास्पृश्य असा भेद केला जातो त्या राष्ट्रानें लोकशाहीचा कितीही डांगोरा पिटला तरी ती लोकशाही या नांवास कदापिही पात्र होऊं शकणार नाहीं. लोकशाही म्हटली कीं त्या

ठिकाणीं कोणताही भेदभाव, पंक्तिप्रपंच दिसून येतां कामा नये. इस्लाममध्यें समता किती प्रकर्षानें दिसून येते याचें विवेचन मागील एका प्रकरणांत येऊन गेलें आहे. गरीब-श्रीमंत सोडून द्या पण मालक व नोकर यांच्यामध्यें समता कशी असते हें आपण पाहिलें आहे. पाटणा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसमोर भाषण करतांना देवी सरोजिनी नायडू ( तारीख १३ आक्टोबर १९१७ इसवी रोजीं ) म्हणाल्या, " भिकारी आणि राजा समसमान मानण्याची शिकवण इस्लाम धर्मांत आहे. प्रजासत्ताक राज्यघटनेचें बीज या शिकवणी-मध्यें आहे." याच समतेवर इस्लामनें राज्यशास्त्र आधारलें आहे. सर्वाधिकाऱ्यापासून भिकाऱ्यांपर्यंत सर्वांना सारख्या न्यायानें वागविण्यांत येतें. मुस्लिमांना एक कायदा व मुस्लिमेतरांना एक कायदा असा भेद त्या राज्यशास्त्रांत कधींही दिसून येत नाहीं; मुस्लिमांना खास सवलती आणि परधर्मीयांच्या हक्कांचा संकोच अशी विषमता कधींही दृष्टीस पडत नाहीं. संख्येच्या जोरावर सर्व हक्क लाटावयाचे, इतरांची कुचंबणा करावयाची याला लोकशाही म्हणतां यावयाचें नाहीं; फार झालें तर बहुसंख्याकांचें राज्य म्हणतां येईल. राष्ट्रामध्यें एकादा लहानसा गट असला तरी त्याला तें आपलें राज्य आहे असें वाटलें पाहिजे. असा विश्वास ज्या ठिकाणीं निर्माण होतो त्या ठिकाणीं खरी लोकशाही नांदत असते.

अशा लोकशाहींत जात किंवा वशिला याला स्थान नसून मनुष्याची कर्तबगारी व योग्यता यांवरच जास्त भर दिला आहे. अबू मुसा अल अशरी नांवाचे मुस्लिम गृहस्थ एक मोठी सरकारी नोकरी मागण्याकरितां आले असतां हजरत मुहम्मद पैगंबरांनीं त्याला दिलेलें उत्तर मननीय आहे. ते म्हणाले, " परमेश्वराला

स्मरून मी सांगतों कीं जो गृहस्थ ही जागा मागतो किंवा त्या जागेची अभिलाषा बाळगतो त्याला आम्ही त्या जागेवर कधींच नेमत नाहीं."* वशिला, जात किंवा दडपण याचा काडीमात्र विचार न करतां योग्यतेवर नेमणुका करण्याची प्रथा त्यांच्या राज्यशास्त्रांत दिसून येते. त्या राज्यशास्त्राचें स्वरूप कसें जातिनिरपेक्ष होतें व त्यामध्यें सर्वांना सारखा वाव कसा होता याचें वर्णन डॉ. अब्दुल हमीद काझी यांनीं 'New Humanity' या आपल्या ग्रंथांत केलें आहे. ते म्हणतात, "मानवांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होईल व बंधुतेचें ध्येय प्रत्यक्ष अमलांत येईल असें आदर्श राज्य हजरत पैगंबरांनीं प्रस्थापित केलें. त्या राज्यांत मुस्लिम, ख्रिश्चन व ज्यू लोकांना सारख्या रीतीनें वागविलें जात होतें. त्या राज्यांत नीति आणि राजकारण यांचा संगम झालेला दिसून येईल. नागरिकांच्या आर्थिक गरजांकडे लक्ष देण्यांत येई. अन्न आणि वस्त्र यांच्या अभावीं कोणीही नागरिक आढळून येत नसे. राज्याधिकारी आणि इतर यांच्यामध्यें भेदभाव नव्हता. तेथील पुढारी आपल्या अनुयायांप्रमाणेंच साध्या रीतीनें रहात. सर्वजण एकमेकांकडे समतेच्या भावनेनें पहात व सर्वांच्या कल्याणाकरितां सारखेच झटत. ..... मुस्लिम व मुस्लिमेतर यांना सारखेच आर्थिक व राजकीय हक्क होते. ते दोघेही राष्ट्राच्या संरक्षणार्थ भाग घेत. मुस्लिमेतरांना मतस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य आणि धर्मस्वातंत्र्य देण्यांत आल्यामुळें ते संपूर्ण सांस्कृतिक स्वातंत्र्य उपभोगीत. आपल्या धर्मसांप्रदायाप्रमाणें ते परमेश्वराची प्रार्थना करीत. ज्याप्रमाणें मशिदीचें संरक्षण करण्यांत येई, त्याप्रमाणें परधर्मीय

* (Al-Bukhari & Muslim on the Authority of Abū Mūsā.)

धर्ममंदिरांचेंही संरक्षण करण्यांत येई. मुस्लिमेतरांचे कज्जे त्यांच्या न्यायाधिशांकडून त्यांच्या कायद्यांप्रमाणें चालविले जात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हजरत पैगंबरांनीं प्रस्थापित केलेलें राज्य हें न्याय, समता आणि बंधुता यांवर आधारलेलें 'अल्लाचें राज्य' होतें असें म्हणावयास हरकत नाहीं."

त्या राज्यशास्त्रांत प्रत्येक व्यक्तीला धर्म, आचार व विचार-स्वातंत्र्य आहे. मुस्लिम राजवट म्हणून परधर्मीयांच्या धर्मावर गदा आणावयाची, त्यांचें आचारविचारस्वातंत्र्य काढून घ्यावयाचें किंवा त्यांना निरनिराळ्या मार्गांनीं छळावयाचें हें आततायी व लोक-शाहीला काळीमा लावणारे प्रकार निषेधार्ह समजण्यांत आले आहेत. त्या काळीं जेत्यांनीं पराभूत केलेल्या परधर्मियांचें शिरकाण करण्याची प्रथा होती. राज्य मिळविण्यापेक्षां परधर्मीय नागरिकांची कत्तल करणें हें अधिक महत्त्वाचें समजलें जात होतें. मध्ययुगीन काळांत, अशा अत्याचारांनीं सबंध इतिहास रक्ताळलेला आहे. कित्येक वेळां प्रतिक्रिया म्हणून एकाद्या मुस्लिम राज्यकर्त्यांस असे अत्याचार करण्याचा मोह उत्पन्न झाल्यानंतर त्याला कसें परावृत्त करण्यांत येई याचें वर्णन प्रसिद्ध इतिहासकार एडमंड ऑलिव्हर यानें केलें आहे. तो म्हणतो, "कित्येक वेळां सुलतानास रक्ताचा सूड घेण्याची बुद्धि होत असे पण तशा प्रत्येक वेळीं मुफ्ती 'पर-धर्मियांची कत्तल करणें किंवा त्यांच्या धार्मिक आचारविचारांवर बंधन घालणें हें पवित्र कुराणच्या आज्ञेविरुद्ध आहे' असें स्पष्टपणें सांगत व सुलतानही त्याप्रमाणें वागे."*

* Cessel's History of Russo-Turkish War, Vol. I, Page 269.

देश पादाक्रांत केल्यानंतर तेथील प्रजाजनांना सक्तीनें आपल्या धर्माची दिक्षा देण्याचा रिवाजच होता; अर्थातच धर्मांतर केलें नाहीं तर त्यांच्या नशीबीं मृत्यु हा ठेवलेला असे. इस्लामनें ही अमानुष पद्धत बदलून टाकली. स्टॅन्ले लेनपूल म्हणतो, "गॉथ लोकांनीं ज्यू लोकांवर अनन्वित अत्याचार करून त्यांचे सक्तीनें धर्मांतर केलें हें लक्षांत न घेतां, अरब मुस्लिमांनीं परधर्मियांना संपूर्ण धर्म व प्रार्थनास्वातंत्र्य दिलें." पुढें हाच ग्रंथकार म्हणतो, "आपल्या मुस्लिम राज्यकर्त्यांबद्दल परधर्मियांना केवढें समाधान वाटत होतें याचा उत्कृष्ट पुरावा म्हणजे सबंध आठव्या शतकांत एकही धार्मिक बंड झालें नाहीं हें होय."

कित्येक ठिकाणीं सक्तीचें धर्मांतर जरी करण्यांत आलें नाहीं तरी परधर्मियांनीं जाहीरपणें केलेलीं धार्मिक निदर्शनें किंवा विधी यांवर सक्त बंदी घातलेली दिसून येते. हा एक प्रकारचा अत्याचारच आहे असें इस्लाम समजतो. जाहीर धार्मिक निदर्शनें किंवा विधी करण्याचा परधर्मियांचा हक्क त्यानें मान्य केला आहे. याविषयीं जॉन मिल म्हणतो, "मुस्लिम अमदानींतील धार्मिक स्वातंत्र्य आणि सहिष्णुता यांचा विचार केला असतां, ख्रिश्चन नागरिकांना तक्रार करावयास जागाच नाहीं.... चर्चमध्यें घंटा वाजविल्या जातात, क्रॉस आणि चित्रें यांची मिरवणूक काढली जाते आणि धार्मिक वेष घालून फिरण्याची पूर्ण मुभा आहे." *

कांहीं ठिकाणीं धर्मस्वातंत्र्य असतें; पण परधर्मियांचा उत्कर्ष पाहवला जात नाहीं. श्रीमंत परधर्मीय पाहिला कीं कित्येकांचा कपाळशूळ उठतो. पैसे मिळविण्याचे त्यांचे मार्ग गुप्तपणें बंद

* The Ottomans in Europe, Page 284.

करण्याचा प्रयत्न केला जातो. कोणीकडून तरी त्यांचा उत्कर्ष होऊं नये हीच त्यांची मनीषा असते. याविषयीं History of the World या ग्रंथांत जो उल्लेख आढळतो, तो मननीय आहे. "आपल्या धर्माच्या निष्ठेनें भारावून जाऊन मुस्लिमांनीं परधर्मियांचे संपत्ति मिळविण्याचे मार्ग कधींहीं बंद करून टाकले नाहींत हें अत्यंत स्पष्ट सत्य आहे."

परधर्मीय नागरिकांशीं हमरीतुमरी न करतां किंवा त्यांच्याविषयीं द्वेष न बाळगतां त्यांच्याशीं सभ्यपणाचें व अदबीचें वर्तन करण्या-बद्दल सरकारी नोकरांना सक्त हुकूम देण्यांत येत. जनतेचें स्वास्थ्य पाहणें व त्यांच्या गैरसोयी दूर करणें हें सरकारी नोकरांचें काम असतें. त्यांनीं दुसऱ्या कोणत्याही उचापती न करतां आपलें कर्तव्य नीट बजाविलें पाहिजे. जनता म्हटली कीं तिच्यांत सर्वधर्मीय लोक आले. त्या सर्वांची सेवा करणें हें नोकरांचें काम आहे असा दंडक घालण्यांत आला होता. हजरत उमर यांच्या अमदानींत एका मुस्लिम अधिकाऱ्यानें ख्रिश्चन लोकांशीं उद्धटपणें वर्तन केलें म्हणून त्या-बद्दल त्याला राजीनामा देण्यास खलिफांनीं भाग पाडलें. राज्या-मधील परधर्मियांना किती सहृदयतेनें वागविलें पाहिजे याचा उल्लेख किताबुल खिराजमध्यें (खंड २ पृ. ७७) आढळून येतो. तो उल्लेख असा :—

"लक्षांत ठेवा! जो परधर्मीय प्रजाजनांवर अन्याय करतो, किंवा त्याला दिलेल्या कराराचा भंग करतो, किंवा त्याला असह्य होईल असा त्याच्यावर जुलूम करतो, अथवा त्याच्या संमतीवांचून

एकादी वस्तु काढून घेतो त्याच्याविरुद्ध पुनरुथ्थाना दिवशीं मी माझी फिर्याद दाखल करीन."

—हजरत मुहम्मद पैगंबर

हजरत पैगंबरांना परधर्मीय नागरिकांबद्दल किती सहानुभूती वाटत होती हें त्यांच्या वरील वक्तव्यावरून दिसून येतें. हजरत पैगंबरांनीं सहानुभूतीचा किंवा सहिष्णुतेचा नुसता उपदेशच केला नाहीं तर ती सहिष्णुता प्रत्यक्ष अमलांत आणून दाखविली. मदिनेचे सर्वाधिकारी झाल्यानंतर व सर्व राज्यसूत्रें हातीं आल्यानंतर त्यांनीं एक खास सरकारी फर्मान काढून परधर्मियांना अभय दिलें आहे. त्या फर्मानांतील कलमें अशीं :—

(१) जो कोणी आमचा नागरिक या जाहीरनाम्याचें उल्लंघन करील तो विश्वासघातकी ठरून परमेश्वराचें वचन मोडल्याचें पाप त्याच्या पदरीं पडेल. जाहीरनाम्याचें उल्लंघन करणारा मग तो राजा असो, रस्त्यांतील भिकारी असो वा कोणीही असो, तो शिक्षेस पात्र होईल.

(२) ख्रिश्चन लोकांचे धर्मगुरु यांना प्रवास करतांना एकाद्या पर्वतावर अगर खेड्यामध्यें अगर प्रार्थनामंदिरांत उतरण्याचा प्रसंग आला तर सर्व ठिकाणीं मी आहें असें समजून त्यांच्या मालमत्तेचें व त्यांचें संरक्षण केलें पाहिजे. कारण ते माझे नागरिक आहेत याबद्दल मला अभिमान वाटतो.

(३) मी सर्व अंमलदारांस हुकूम करतों कीं त्यांनीं ख्रिश्चन लोकांपासून कर वसूल करूं नये किंवा त्यांचेकडून इतर पैसेही उकळूं नयेत.

(४) ख्रिश्चन लोकांचे न्यायाधीश किंवा प्रांताधिकारी यांना बडतर्फ करावयाचा अधिकार कोणालाही नाहीं. ते आपल्या अधिकारावर कायम राहतील.

(५) प्रवास करतेवेळीं कोणाही ख्रिश्चन माणसाला कोणीही त्रास देऊं नये.

(६) त्यांच्या प्रार्थनामंदिरांत ते जात असतां त्यांना कोणीही प्रतिकार करावयाचा नाहीं.

(७) युद्धाचे वेळीं युद्धामध्यें सामील होण्याकरितां त्यांच्यावर जबरदस्ती केली जाणार नाहीं किंवा युद्धाकरितां त्यांचेजवळून करही वसूल केला जाणार नाहीं.

(८) एकाद्या ख्रिश्चन स्त्रीनें मुस्लिमाशीं विवाह केला तर त्या मुस्लिमास आपल्या ख्रिश्चन स्त्रीला तिच्या इच्छेविरुद्ध तिच्या धर्मापासून परावृत्त करण्याचा हक्क नाहीं.

(९) प्रार्थनामंदिरें बांधतांना ख्रिश्चन लोकांची गैरसोय कोणीही करूं नये. प्रार्थनामंदिरें किंवा मठ बांधतांना त्यांना मदतीची जरूरी लागेल तर मुस्लिमांनीं त्यांना मदत केली पाहिजे.

(१०) त्यांच्याविरुद्ध कोणीही शस्त्र उचलतां कामा नये. उलट त्यांच्याकरितां मुस्लिमांनीं लढावयास तयार झालें पाहिजे. आपल्या राज्याबाहेरील ख्रिश्चन लोकांशीं मुस्लिमांनीं युद्ध पुकारलें तर आमच्या येथील ख्रिश्चन नागरिक आपल्या शत्रूचा धर्मबंधू आहे म्हणून मुस्लिमांनीं त्याचा द्वेष किंवा तिरस्कार करूं नये.

(११) माझ्या कोणीही नागरिकानें या जाहीरनाम्याचा

भंग करूं नये. एकादा मुस्लिम या जाहीरनाम्याविरुद्ध वागला तर तो परमेश्वराचा व आमचा गुन्हेगार होईल.

वरील कलमें वाचल्यानंतर इस्लामनें राज्यशास्त्रांत सहिष्णुतेस केवढें उच्च स्थान दिलें आहे आणि परधर्मियांच्या स्वातंत्र्याविषयीं केवढी जागरूकता प्रदर्शित केली आहे हें स्पष्टपणें दिसून येईल.

इस्लामनें राजकारणांत न्यायास अग्रपूजेचा मान दिला आहे. न्यायानें वागणें म्हणजे परमेश्वराच्या आज्ञेचें परिपालन करणें होय असें इस्लाम मानतो. निस्पृह न्यायदान हें लोकशाहीचें वैभव आहे अशी इस्लामाची शिकवण आहे. न्यायाचें स्थान सदैव उच्च आहे असें समजण्यांत येतें. राष्ट्रांतील अधिसत्तेच्या लहरीनुसार न्याय दिला जात नाहीं, उलट त्या अधिसत्तेला मार्गदर्शन करण्याचें श्रेष्ठ कार्य न्यायाकडून होत असतें. इस्लामनें अधिसत्ता अन्यायाच्या, असत्याच्या मार्गानें जाऊं लागली तर तिला योग्य मार्गावर आणण्याचा अधिकार न्यायाला दिला आहे. ज्यांच्या हातांत सत्ता आहे त्यांना न्यायदानांत मुळींच ढवळाढवळ करतां येत नाहीं किंबहुना अशा सत्ताधिकाऱ्यांना न्यायदेवता जाब विचारूं शकते. ज्या ठिकाणीं राज्यकर्त्यांच्या मर्जीवर न्याय अवलंबून असतो, ते सांगतील त्याप्रमाणें न्याय दिला जातो त्या ठिकाणीं किंवा त्या राष्ट्रांत कधींही स्वास्थ्य नांदणें शक्य नाहीं. न्यायाच्या स्वातंत्र्यावर, स्थैर्यावर व इभ्रतीवर राष्ट्र जगत असतें व प्रगत पावत असतें. जातपात, धर्म, गरीब-श्रीमंत, सत्ता किंवा गणगोत यांचा विचार न करतां ज्या राष्ट्रांत न्याय दिला जातो तें राष्ट्र, ती राजवट किंवा ती लोकशाही सदैव उत्कर्ष पावत असते; याच्या उलट परिस्थिति असल्यास ती राष्ट्रास

मारक ठरते असें इस्लाम आग्रहानें सांगतो. मकझम वंशांतील एका श्रीमंत व्यक्तीनें गुन्हा केल्यावर, त्याबद्दल रदबदली करण्याकरितां उसमा बिन झैद नांवाचे त्या व्यक्तीचे वजनदार नातेवाईक हजरत पैगंबरांकडे आले असतां हजरत पैगंबर म्हणाले, "परमेश्वराच्या कायद्याविरुद्ध मीं ढवळाढवळ करावी या हेतूनें आपण माझ्याकडे आला आहांत काय?" हजरत पैगंबरांनीं एक सभा बोलाविली व वरील प्रकारास उद्देशून ते म्हणाले, "आपल्या अगोदरचीं जीं राष्ट्रें होतीं, त्या राष्ट्रांत गरिबांना शिक्षा करावयाची व श्रीमंताच्या बाबतींत कायदा सैल करावयाची जी वृत्ति होती त्यामुळेंच तीं राष्ट्रें रसातळास गेलीं."

> "तुमच्या, तुमच्या आईबापांच्या, नातेवाईकांच्या किंवा गरीब-श्रीमंतांच्या विरुद्ध न्याय द्यावा लागला तरी त्याची पर्वा न करतां परमेश्वरास साक्ष ठेवून न्यायाचें परिपालन करा."
>
> —पवित्र कुराण ४:१३५.

आपले आईबाप, आप्तेष्ट यांच्या विरुद्धही न्याय द्यावा लागला तर तो आपण निस्पृहपणें दिला पाहिजे. एकाद्या श्रीमंत गृहस्थाच्या विरुद्ध आपण आपलें मत प्रदर्शित केल्यास त्याचा रोष आपणांस सोसावा लागेल याबद्दल भीति बाळगतां कामा नये; इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष आपल्याविरुद्ध एकादा आरोप केला गेला तर तो लपविण्याचा प्रयत्न न करतां आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे किंवा आपण अपराधी आहोंत असें कबूल केलें पाहिजे. प्रत्येक व्यक्तीनें इतकें नीतिधैर्य दाखविलें तर जगामध्यें सत्ययुग प्रत्यक्षांत उतरल्याखेरीज राहणार नाहीं. इस्लामच्या या उज्ज्वल संदेशाप्रमाणें निस्पृह न्यायदान केल्याचीं अनेक उदाहरणें आपणांस

आढळून येतील. आपल्या मुलाच्या पाठीवर कोरडे मारणारे हजरत उमर यांचें उदाहरण आपल्या समोर आहेच. सुलतान महमूद यांचें उदाहरणही आदर्श व रोमांचकारक आहे. एका शहरांत त्यांच्या सैन्याचा तळ पडला असतां, त्या शहरांतील एका मुस्लिमेतर नागरिकानें सुलतानाजवळ आपली फिर्याद गुदरली. तो म्हणाला, "शहेनशहा, राजघराण्यांतील एक तरुण दररोज रात्रीं माझ्या घरांत शिरतो व माझ्या तरुण मुलीची बेअदबी करतो. मला या बाबतींत न्याय मिळावा एवढीच माझी मागणी आहे." ही हकीकत ऐकतांच सुलतान महमूद क्रुद्ध झाले. त्यांच्या सैन्याबरोबर राजघराण्यांतील दुसरा तिसरा कोणी पुरुष नसून त्यांचा स्वतःचा मुलगा होता. आपल्या मुलानें असें नीच कृत्य करावें याबद्दल त्यांना विषाद वाटला. त्यांनीं त्या फिर्यादीस पुन्हाः तो तरुण आल्याबरोबर वर्दी दे, असें सांगितलें. तिसऱ्या दिवशीं फिर्यादीनें वर्दी दिल्याबरोबर सुलतान महमूद यांनीं आपली तलवार घेतली व तडक त्या फिर्यादीच्या घरीं प्रयाण केलें. तो तरुण त्या गृहस्थाच्या घरीं झोपला होता. सुलतान महमूद यांनी त्या खोलींतला दिवा मालविण्यास सांगितलें. दिवा मालविण्यांत आल्यावर सुलतानांनीं त्या तरुणास जागें केलें व तलवारीच्या एका फटकाऱ्यासरशीं त्याचें डोकें उडविलें. दिवा लागल्यानंतर सुलतानांनीं त्या तरुणाकडे पाहिलें व गुडघे टेंकून परमेश्वराची अनन्यभावानें प्रार्थना केली. तो बिचारा फिर्यादी हा सारा प्रकार पाहून भांबावून गेला. सुलतान म्हणाले, "तुला मीं दिवा मालविण्यास सांगितलें, तें एवढयाकरितांच कीं उजेडांत माझ्या मुलाचें तोंड पाहिल्यावर माझें पितृप्रेम जागृत होऊन, माझ्या कर्तव्यापासून परावृत्त होईन अशी मला भीति

त्या वेळीं त्यांची इतकी विपन्नावस्था होती कीं त्यांना सार्वजनिक बागेंतील कंदिलाच्या प्रकाशांत वाचन करावें लागे. उदरनिर्वाहाकरितां त्यांनीं रखवालदाराची नोकरी पत्करली. एक दिवस तेथील राजपुत्राच्या मुलाखतीचा योग प्राप्त झाला. अल्-फराबी यांची असामान्य विद्वता पाहून त्यांना दररोज ४ दिनार देण्याचा राजपुत्रानें हुकूम केला. या मर्यादित उत्पन्नावर संतुष्ट होऊन आपल्या आवडत्या विषयाचा अभ्यास व लेखन करीत त्यांनीं आपलें उर्वरित आयुष्य घालविलें. त्यांनीं शंभरावर ग्रंथ लिहिले असून त्यांपैकीं पन्नासहून अधिक निरनिराळ्या तत्त्वज्ञांचा परामर्ष घेणारे आहेत. तत्त्वज्ञानाच्या सर्व अंगोपांगावर त्यांचें एवढें प्रभुत्व होतें कीं त्यांना ' दुसरे अरिस्टॉटल ' अशी मानाची संज्ञा देण्यांत आली होती.

प्रथम अत्यंत सात्त्विक वृत्तीचे मुस्लिम व नंतर विख्यात तत्त्वज्ञ अशी त्यांची भूमिका होती. प्लेटो व अरिस्टॉटलचा वैचारिक सांप्रदाय व इस्लामची शिकवण यांमध्यें एकवाक्यता आहे हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. प्लेटो व अरिस्टॉटल यांच्या तत्त्वज्ञानामध्यें फरक असला तरी त्याचा मतितार्थ एकच आहे असा त्यांचा दावा होता. आध्यात्माकडे त्यांचा विशेष ओढा असल्यामुळें, त्या विषयावर त्यांनीं लिहिलेले ग्रंथ आधारभूत मानले जातात. तर्कशास्त्राचाही त्यांचा अभ्यास मोठा होता. कारा डी होक्स या विद्वानाच्या मतें अल्-फराबींच्या तर्कशास्त्राचा, युरोपियन तर्कशास्त्रावर कायमचा ठसा उमटला आहे. याशिवाय सूफी तत्त्वज्ञानाचा आविष्कार करणारे अल्-फराबी हे पहिले तत्त्वज्ञ होत. वैद्यक व गणितशास्त्रांतही ते निष्णात होते. त्यांच्यापासून रॉजर बेकन यांनीं

गणितशास्त्राचें शिक्षण घेतलें. अल्-फराबी हे युरोपमध्यें Alpharabius या नांवानें ख्यात आहेत.

अबू अली सीना ( Avicenna ) या नामांकित शास्त्रज्ञाचा जन्म बुखाऱ्याजवळील एका खेडयांत इ. स. ९८० सालीं झाला. अबु अबदुल्ला नांवाच्या पंडिताजवळ त्यांनीं तर्कशास्त्र, गणितशास्त्र व खगोलशास्त्राचा अभ्यास केला. वयाच्या १७ व्या वर्षीच त्यांनीं आपलें अध्ययन पुरें केलें. एकविसाव्या वर्षी वैद्यक व तत्त्वज्ञान यांवर ग्रंथ लिहीण्यास सुरुवात केली. त्यांच्या असामान्य विद्वत्तेमुळें हमदाद इस्पहान दरबारीं त्यांना मानाची जागा मिळाली; पण त्यांच्या स्वतंत्र मतप्रणालीमुळें तेथें त्यांचें जीवित सदैव धोक्यांत असे. वैद्यक व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत तर त्यांचा हात धरणारा दुसरा कोणी नव्हता. या दोन्ही विषयांवरील त्यांचे ग्रंथ कित्येक शतकें युरोपांतील शिक्षणकेंद्रांत अभ्यासले जात होते. पर्शियन व अरबी भाषेंत त्यांनीं ग्रंथनिर्मिती केली आहे. पर्शियन भाषेमधील दानिश नामा आणि अरबी भाषेंतील ऐनुल हिकमत हे ग्रंथ श्रेष्ठ दर्जाचे समजले जातात. अरबी भाषेमधील वरील ग्रंथ दहा भागांत प्रसिद्ध करण्यांत आला आहे. बेहमन यार, अबुल मामून इस्पहानी, अबुल अब्बास आणि इब्न ताहेर हे प्रसिद्ध मुस्लिम तत्त्वज्ञ त्यांचे शिष्य होते. या शिष्यवर्गानें त्यांच्या तत्त्वज्ञानाची प्रथा पुढें चालू केली.

आपल्या उतारवयांत त्यांनीं आपली चीजवस्तु विकून टाकून, तो पैसा गीरगरिबांस वांटून टाकला. प्रत्येक दिवशीं ते कुराणवाचन करीत. आपल्या वयाच्या ५७ व्या वर्षीं रमजान महिन्यांत ते हमदाद येथें कालवश झाले. या तत्त्वज्ञाच्या कबरीस भेट देण्याकरितां जगांतील नामवंत तत्त्वज्ञ हमदाद येथें येत असतात.

मुस्लिम तत्त्वज्ञानाचें सुवर्णयुग म्हणजे दहाव्या आणि चौदाव्या शतकांमधील काळ होय. अकराव्या व बाराव्या शतकांत अबू रयहान, अल् बरूनी यांच्यासारखे विख्यात तत्त्वज्ञ झाले. त्यानंतर इब्न मालिका, जमखशरी, उमरखय्याम, इमाम गज्झाली, नझीर खुस्रो, इबने बाजा, रब्न तुफेल, शहाबुद्दिन सुहरवर्दि, इब्न रुश्द यांच्यासारख्या तत्त्वज्ञांनीं जगाच्या इतिहासांत आपलें नांव चिरंजीव केलें आहे.

अबू बक्र इबने बाजा (Avempace) नांवाचे शास्त्रज्ञ स्पेनमध्यें इ. स. ११३८ सालीं कालवश झाले. त्यांनीं अरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानावर लिहिलेले टीकाग्रंथ विद्वत्तापूर्ण समजले जातात. अल् फराबी व यांच्या तत्त्वज्ञानांत बराच फरक आहे. पारमार्थिकता साध्य करण्याकरितां मनन व तन्मयावस्था यांची आवश्यकता आहे असें अल् गज्झाली यांनीं प्रतिपादिलें आहे; वरील साध्याकरितां संन्यस्त वृत्ति हाच एक मार्ग आहे असा इब्न बाजा यांचा आग्रह आहे. दुसरें तत्त्वज्ञ इब्न तुफेल हे स्पेन देशांत इ. स. ११०० सालीं जन्मास आले व इ. स. ११८५ सालीं मोरोक्कोमध्यें त्यांचें देहवसान झालें. त्यांची तत्त्वज्ञ म्हणून कीर्ति आहेच; पण गणिती आणि कवी म्हणून सर्व जग त्यांना ओळखतें. तत्त्वज्ञानावर लिहिलेला त्यांचा अमूल्य ग्रंथ 'है बिन एकजान' या नांवानें प्रसिद्ध आहे.

शहाबुद्दिन सुहरवर्दी या तत्त्वज्ञाचा जन्म इ. स. ११५३ सालीं झाला. इराणमध्यें त्यांचा अभ्यास आटोपल्यानंतर इजिप्त व सिरियाचे सुलतान सलाहुद्दीन यांच्या विद्याप्रेमी चिरंजिवांनी त्यांना आपल्या पदरीं ठेविलें. तत्त्वज्ञानावर त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले आहेत. स्वतंत्र

विचारसरणीमुळें त्यांना धर्मपंडितांचा रोष सहन करावा लागला. दुर्दैवानें वयाच्या ३८ व्या वर्षीं त्यांचा शिरच्छेद करण्यांत आला. 'किताब नाकिझात,' 'हिकमतुल इशराक,' 'हयकल,' 'किताबुत तलवीहात' 'बलागत नामा' वगैरे अनेक ग्रंथांनीं यांची स्मृती मागे ठेविली आहे.

इमाम फक्रुद्दिन राझी नांवाच्या तत्त्वज्ञांचा जन्म इ. स. ११६६ सालीं झाला. तत्त्वज्ञानाच्या अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर त्यांनीं आपला मतभेद आपल्या अनेक ग्रंथांतून केला आहे. वयाच्या ६२ व्या वर्षीं म्हणजे इ. स. १२१२ सालीं ते मृत्यु पावले.

अल्-गज्झाली या तत्त्वज्ञांचें नांव तर सर्वतोमुखीं झालें आहे. त्यांचें संपूर्ण नांव हाज्जतुल इस्लाम इमाम मुहम्मद असून त्यांचा जन्म इ. स. १०७२ मध्यें झाला. वयाच्या ३४ व्या वर्षीं त्यांनीं एवढी विद्वत्ता संपादन केलीं कीं त्यांना बगदादच्या प्रसिद्ध निझामिया महाविद्यालयांत प्राध्यापक म्हणून नेमण्यांत आलें. त्यांनीं आपल्या पंचावन वर्षांच्या अल्प आयुष्यांत ७० ग्रंथ लिहून जगाच्या तत्त्वज्ञांनात फार मोठी भर घातली आहे. नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान वगैरे अनेक विषय त्यांनीं आपल्या ग्रंथांत हाताळलेले आहेत. त्यांच्या अनेक ग्रंथांपैकीं पुढील ग्रंथांची लॅटिन व जर्मन भाषांमध्यें भाषांतरें झालीं आहेत :–(१) अल् मुनकिज मिन दलाल (२) तहाफतुल फिलसफा (३) मीजानुल अमल (४) इहयाउल उल्म (५) वजीज (६) मिहकुन नजर (७) मियारुल इल्म (८) मकासिदुल फिलसफा.

चिकित्सावाद हें अल्-गज्झालींच्या तत्त्वज्ञानाचें खास वैशिष्ट्य आहे. ज्ञान हें अचुक असलें पाहिजे आणि तें अवलोकन व प्रयोग

यांच्याशिवाय मिळणें शक्य नाहीं असा त्यांचा आग्रह होता. विषयाचें विवरण संशयातीत झाल्याखेरीज तें ज्ञानाच्या कसोटीला उतरत नाहीं अशी त्यांची विचारसरणी होती; आणि ही विचारसरणी डेस्कार्टीसच्या कितीतरी वर्षें आधीं त्यांनीं जगापुढें मांडली. त्या काळीं अल्-गज्झालीचें हें चिकित्सावादी तत्त्वज्ञान सर्वत्र अभ्यासलें जात होतें. अल्-गज्झालीच्या योग्यतेबद्दल सुप्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ रेनॉन म्हणतो, "आधुनिक चिकित्सावादाचा जनक ह्यूम यानें देखील अल्-गज्झालीपेक्षां अधिक कांहींच सांगितलें नाहीं. निव्वळ अनुमानानें विचार करण्याची जी पध्दत आहे, त्या पद्धतीच्या मुळावर घाव घालणारी कँटची विचारसरणी ह्यूमच्या चिकित्सावादांतूनच स्फुरली होती हें ध्यानीं घेतलें म्हणजे ह्यूमच्या पूर्वीं ७०० वर्षें होऊन गेलेल्या अल्-गज्झालींचें ऐतिहासिक महत्त्व तात्काळ पटण्यासारखें आहे."

पाश्चात्य देशांतील शेवटचे महान मुस्लिम तत्त्वज्ञ म्हणजे इब्न रुश्द हे होत. युरोपमध्यें ते Averroes या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांचा जन्म कॉर्डोवा येथें इ. स. ११२६ सालीं झाला आणि इ. स. ११९८ सालीं त्यांचें देहावसान झालें. तत्त्वज्ञानाखेरीज धर्मशास्त्र, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादि शास्त्रांमध्यें त्यांनीं विलक्षण पारंगतता मिळविली आहे. वरील विषयांवर लिहिलेले त्यांचे ग्रंथ श्रेष्ठ दर्जाचे मानले जातात. 'मबादि उल फिलसफा' हा त्यांचा तत्त्वज्ञानावरील महत्त्वाचा ग्रंथ असून त्याचे १२ भाग आहेत. या ग्रंथाखेरीज आणखी २५ ग्रंथ तत्त्वज्ञानावर त्यांनीं लिहिले असून तत्त्वज्ञानाच्या अंगोपांगांची त्यामध्यें विस्तृत चर्चा केली आहे. अरिस्टॉटलवर लिहिलेला त्यांचा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. इब्न रुश्द

यांनीं नव्या संस्कृतीला अरिस्टॉटलची ओळख करून दिल्यामुळें सबंध युरोपांत त्यांची कीर्ति विद्युत्‌वेगानें फैलावली. विख्यात शास्त्रज्ञ रॉजर बेकन म्हणतो, "अरिस्टॉटलनें निसर्गाची ओळख जनतेला करून दिली तर इब्न रुश्दनें प्रत्यक्ष अरिस्टॉटलचीच ओळख करून दिली. इस्लामची शिकवण व अरिस्टॉटलचें तत्त्वज्ञान यांत विलक्षण मतैक्य आहे हें इब्न रुश्दनें सप्रमाण सिद्ध करून दिलें. आध्यात्म आणि मानसशास्त्राच्या अनेक मुद्यांवर त्यांनी अबू-अली सीना या तत्त्वज्ञाशीं आपला मतभेद प्रदर्शित केला आहे. आपल्या विधानांच्या समर्थनार्थ त्यांनीं पवित्र कुराणमधील अनेक ऋच्या उद्धृत केल्या आहेत. त्या काळीं युरोप खंडांत धार्मिक दुरभिमान व दांभिकतेचा सुळसुळाट झाला असतां, इब्न रुश्द यांनीं निधडेपणानें "बुद्धिरेव सत्यानुतस्य प्रतिष्ठा" या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचा पुकारा केला. बुद्धि आणि श्रद्धा, स्वातंत्र्य व अज्ञान यांमधील झगड्याला त्यांच्या तत्त्वज्ञानामुळें तोंड लागलें. बुद्धिवादी क्रांतिकारकांना त्यांच्या तत्त्वज्ञानामुळेंच स्फूर्ति झाली. इब्न रुश्द यांच्या तत्त्वज्ञानाचा पगडा सर्व युरोपवर जवळजवळ ५०० वर्षें होता.

नीतिशास्त्र म्हणजे व्यावहारिक तत्त्वज्ञानाचा (हिकमते अमली) एक महत्त्वाचा भाग अशी व्याख्या मुस्लिम तत्त्वज्ञांनीं केली आहे. नीतिशास्त्राचें महत्त्व लक्षांत घेऊन इब्न सीना व इब्न रुश्द या तत्त्वज्ञांनीं नीतिशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिले आहेत. या शास्त्रावर प्रथम लिहिणारा ग्रंथकार म्हणजे अबदुल्ला नांवाचा पंडित होय. इब्ने मुकाफा या नांवानें तो ओळखला जातो. त्यानें 'दुर्रुल यतीमा' नांवाचा ग्रंथ लिहिला असून 'पंचतंत्र' या संस्कृत ग्रंथाचें अरबी

भाषेमध्यें त्यानेंच पहिल्या प्रथम भाषांतर केलें आहे. नसीरुद्दिन तूसी या तत्त्वज्ञांचा जन्म इ. स. १२०० सालीं झाला असून नीतिशास्त्रावरील 'अखलाखे-नसीरी' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्धि पावला आहे. याशिवाय त्यांनीं तत्त्वज्ञान व खगोलशास्त्रावर ५६ ग्रंथ लिहिले आहेत. जलालुद्दिन दव्वानी हे श्रेष्ठ नीतिशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. 'अखलाखे जलाली' या ग्रंथानें त्यांना विलक्षण प्रसिद्धि मिळवून दिली आहे. 'शरहे हया किल,' 'इसबाते वाजिब,' 'रिसाल ये जौरा' हे त्यांचे ग्रंथ तितक्याच योग्यतेचे समजले जातात. आणखी अनेक मुस्लिम तत्त्वज्ञांनीं नीतिशास्त्रावर ग्रंथ लिहिले आहेत.

सूफी तत्त्वज्ञान हा मुस्लिम तत्त्वज्ञानाचा एक भाग समजला जातो. अकराव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत सूफी तत्त्वज्ञानाचा उत्कर्ष झाला. वरपांगीं आचाराविचारापेक्षां चित्तशुद्धीस जास्त महत्त्व आहे; प्रेमानें जगच काय पण प्रत्यक्ष परमेश्वरास देखील मनुष्य जिंकू शकतो; अंत:करण शुद्ध न ठेवितां, कितीही चांगलीं कृत्यें केलीं तरी त्या कृत्यांना महत्त्व प्राप्त होत नाहीं असे विचार सूफी तत्त्वज्ञानानें प्रसृत केले आहेत. सूफी तत्त्वज्ञानाचा खोल अभ्यास केला म्हणजे सूफी तत्त्वज्ञान व वेदांत यांमध्यें विचार-साम्य आहे असें दिसून येईल. आर्य आणि सेमेटिक आध्यात्मिक विचारांचा परिपाक म्हणजे सूफी तत्त्वज्ञान अशी आपणांस व्याख्या करावी लागेल.

इब्नुल अरबी या स्पेनमधील मुस्लिम तत्त्वज्ञानें सूफी तत्त्वज्ञानाचा मोठ्या हिरीरीनें पुरस्कार केला आहे. त्यांचें खास नांव मुहम्मद असें असून, त्यांना 'शेखुल-अकबर' या संज्ञेनें सर्वत्र ओळखिलें जातें. त्यांचा जन्म इ. स. ११६५ सालीं झाला असून ते शहाबुद्दिन

सुहरवर्दी, फरीदुद्दिन आतार, नजमुद्दिन राझी, जलालुद्दिन रूमी या पौर्वात्य तत्त्वज्ञान्यांचे समकालीन होते. त्यांनीं ३०० ग्रंथ लिहिले असून त्यांपैकीं १५० सध्यां उपलब्ध आहेत. त्यांचा प्रचंड ग्रंथ 'फुतुहातुल मक्कीया' या नांवानें ओळखला जातो. या ग्रंथाचीं ५६६ प्रकरणें असून त्या ग्रंथास सूफी तत्त्वज्ञानाचा ज्ञानकोश असें संबोधिलें जातें. 'फुसूसुल हिकम' या नांवाचा दुसरा मोठा ग्रंथ असून त्याचीं इंग्लिश व उर्दू भाषेंत भाषांतरें झालीं आहेत.

जलालुद्दिन रूमी यांचें नांव माहित नाहीं असा मनुष्य विरळा. त्यांचा जन्म बल्ख येथें इ. स. १२०७ मध्यें झाला. तेथील राजाच्या जुलुमामुळें त्यांचे वडील बहाउद्दिन यांना देशत्याग करावा लागला. प्रथम इराण, नंतर सीरिया व शेवटीं आशिया मायनरमधील कुनिया शहरीं ते स्थाईक झाले. जलालुद्दिन यांचा धर्मशास्त्र व तत्त्वज्ञानाचा मोठा व्यासंग होता. आपल्या शिष्यांच्या आग्रहावरून त्यांनीं 'मसनवी' या नांवाचा काव्यग्रंथ सहा विभागांत लिहिला. 'मसनवी' हें एक महाकाव्य समजलें जातें. त्यामध्यें ४७००० श्लोक असून सूफी तत्त्वज्ञानाचा संपूर्ण आविष्कार त्यामध्यें झाला आहे. त्यांनीं आपलें प्रत्येक विधान उदाहरणें देऊन तें अधिक सुगम केलें आहे. परमेश्वराचें वास्तव्य मशिदींत, देवळांत किंवा चर्चमध्यें नसून तें शुद्ध अंतःकरणांत असतें; परमेश्वरावर अढळ निष्ठा ठेवून मनुष्यानें कार्य करीत राहावें व फलाची अपेक्षा करू नये; अपकृत्य झालें असतां तें परमेश्वरी इच्छेवर न लादतां स्वतः मोकळ्या मनानें कबूल करावें; निस्वार्थ वृत्ति प्रत्यक्ष आचरणांत आणावी; मनुष्यानें स्वतःच्या स्वार्थाकरितां कार्य न करतां तें परमेश्वराकरितां करावें; प्रेम व कृतज्ञता यांचा अवलंब मनुष्यानें

केलाच पाहिजे; प्रेमामुळें मनुष्य सैतानाचें साधूंत रूपांतर करूं शकतो; धार्मिक विधीपेक्षां प्रेम व सहृदयता यांमुळें परमेश्वर प्रसन्न होतो असे अनेक उदात्त विचार ' मसनवी 'मध्यें विखुरलेले आहेत. मनुष्याला पूर्णत्व येण्याकरितां त्याला निरनिराळ्या अवस्थांमधून जावें लागतें या मानवी उत्क्रांतिवादाचा परामर्ष मौलाना रूमी यांनीं आपल्या महाकाव्यांत घेतला आहे.

मसनवी या महाकाव्याच्या खालोखाल ' गुलशने राझ ' या काव्याचें महत्त्व असून त्यामध्यें एक हजार श्लोक आहेत. सादुद्दिन मोहम्मद शहाबिस्तरी हे या काव्याचे जनक होत. त्यांचा जन्म इराणमध्यें इ. स. १२५० सालीं झाला. या काव्यामध्यें सूफी तत्त्वज्ञान निवेदिलें असून त्याचीं उर्दू, जर्मन आणि इंग्रजी भाषांतरें झालीं आहेत. ' इनसाने कामिल ' हा सूफी तत्त्वज्ञानावरील महत्त्वाचा ग्रंथ असून त्याचीं अनेक भाषांतरें झालीं आहेत. अब्दुल करीम या नांवाचा तत्त्ववेत्ता या ग्रंथाचा कर्ता असून तो इराणमध्यें इ. स. १३६५ सालीं जन्मला. वरील ग्रंथांखेरीज त्यांनीं आणखी वीस ग्रन्थ सूफी तत्त्वज्ञानावर लिहिले आहेत.

नुरुद्दिन जामी या नामांकित सूफी तत्त्वज्ञांचा जन्म इ. स. १४१४ सालीं खोरासान येथील जाम गांवीं झाला. त्यांच्या लेखनाचा पसारा प्रचंड असून अनेक विषयांवर त्यांनीं विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिले आहेत. काव्यक्षेत्रांतही त्यांनीं बहुमान मिळविला आहे. त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांपैकीं कांहीं महत्त्वाचे ग्रंथ पुढीलप्रमाणे :— ( १ ) नफहातुल उनस (२) अशिअतुल लमआत ( ३ ) सिलसिल तुझ् झहब ( ४ ) बहारीस्तान (५) नकदुन नुसूस (६) लवाइह. त्यांच्या शेवटच्या ग्रंथाचीं अनेक

भाषांतरें झालीं आहेत. पवित्र कुराणमधून घेतलेल्या महत्त्वाच्या ऋच्यांवर हा ग्रंथ आधारलेला असून कुराणमधील तत्त्वज्ञानाची त्यांनीं विस्तृत चर्चा केली आहे. सूफी तत्त्वज्ञानावर जे अनेक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत त्यांपैकीं कांहीं अत्यंत महत्त्वाचे ग्रंथ समजले जातात.

ग्रंथकार व त्या ग्रंथांचीं नांवें अशीं :—

(१) अबू नस्र कृत किताबुल लुमा फि तसव्वुफ
(२) अबुल कासीम कशायरी कृत रिसालये कुशयरिया
(३) अली कृत कशफुल महजूब
(४) इमाम गज्झाली कृत इह्याउल उलूम
(५) इब्नूल अरबी कृत फुतुहातुल मक्कीया
(६) ,, ,, ,, फुसूसुल हिकम्
(७) सुहरवर्दी कृत अवारिफुल मआरिफ
(८) मीर दर्द कृत इल्मुल किताब

सूफी तत्त्वज्ञानाचा विचार केल्यानंतर पुन्हां आपणांस पहिल्या विषयाकडे वळलें पाहिजे. चौदाव्या शतकानंतर फारसे मुस्लिम तत्त्वज्ञ निपजले नाहींत. चौदाव्या शतकांत हिलाली, इस्महानी, कुतूबुद्दिन राझी, शिराझी असे तत्त्वज्ञ होऊन गेले. घियासुद्दिन या नांवाचे तत्त्वज्ञ सोळाव्या शतकाच्या अखेरीस जन्मास आले. त्यानंतर १९ व्या शतकापर्यंत नांव घेण्यासारखी मुस्लिम तत्त्वज्ञ झाला नाहीं. १९ व्या शतकांत सय्यद जलालुद्दिन अफगानी, शहावलीउल्लाह्, सबजावारी, मिर्झा अबुल हसन आणि शेवटीं हिंदुस्थानचे बॅ. सर मोहम्मद इक्बाल हे जन्मास आले. डॉ. इक्बाल यांना आशिया खंडाचे मशहूर तत्त्वज्ञ समजलें जातें. त्यांचा जन्म

पंजाबमधील सियालकोट शहरीं इ. स. १८७६ सालीं झाला. एम्. ए. पदवी घेतल्यानंतर ते युरोपास गेले व तेथें अध्यात्म विषयावर एक विद्वत्तापूर्ण प्रबंध लिहिला. या प्रबंधामुळेंच त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसफी ही पदवी मिळाली. असरारे खुदी, रमूझे बेखुदी, झबूरे अजम, जावेदनामा आणि पयामे मश्रीक हे तत्त्वज्ञानानें भरलेले काव्यग्रंथ त्यांनीं पर्शियन भाषेंत प्रसिद्ध केले. या काव्यग्रंथांमुळें डॉ. इक्बाल हे 'तत्त्वज्ञ कवी' या संज्ञेनें सबंध आशिया खंडांत प्रसिद्धीस आले. त्यांच्या 'असरारे खुदी' या काव्य ग्रंथाचें भाषांतर केंब्रिज युनिव्हर्सिटीचे प्रो. निकोलसन यांनीं केल्यामुळें पौर्वात्य देशाप्रमाणें पाश्चिमात्य देशांतही त्यांचा बोलबाला झाला.

डॉ. इक्बाल यांनीं मुस्लिमांच्या, हल्लींच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक परस्थितीचें फार सुंदर विश्लेषण केलें आहे. Annihilation of Self चें तत्त्व आपल्या प्रगतीस व कर्तृत्वास मारक आहे असें त्यांचें स्पष्ट मत आहे. सर्वसंगपरित्याग हा इस्लाम घर्मास मुळींच संमत नाहीं, इतकेंच नव्हे तर मानवी प्रगतीच्या मार्गांतील ती एक मोठी धोंड आहे असें त्यांना वाटतें. डॉ. इक्बाल यांनीं Preserving Self चें तत्त्व फार जोरानें प्रतिपादलें आहे. कांहीं सूफी तत्त्वज्ञ म्हणतात त्याप्रमाणें Self negation तत्त्व त्यांना मान्य नाहीं; त्याऐवजीं त्यांनीं Self affirmation च्या तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. हजरत पैगंबर म्हणतात, 'परमेश्वराच्या विशेष गुणधर्मांशीं समरस व्हा.' परमेश्वराचे विशेष गुणधर्म म्हणजे निःसत्त्वपणा, अज्ञान, द्वेष किंवा भीरुता

नसून सत्त्वशीलता, ज्ञान, प्रेम किंवा शक्ति हीं होत. त्यामुळें Self negation चें तत्त्व घातुक व विषारी आहे. समाजांत निःसत्त्व वृत्ति, उदासीनता आणि शैथिल्य वाढत असल्यामुळें Self negation तत्त्वाचा त्याग करणें हेंच श्रेयस्कर आहे असें डॉ. इक्बाल यांनीं प्रतिपादिलें आहे.

प्रकरण ७ वें

# इस्लाम आणि विज्ञान

"लॅटीन मार्गानें नव्हे तर, अरबांकडून हल्लींच्या जगाला तेज आणि शक्ति यांची देणगी मिळाली आहे."†

—एच्. जी. वेल्स

विज्ञान आणि भौतिक शास्त्रांत मुस्लिमांनीं जें मानाचें स्थान मिळविलें आहे त्याबद्दल जगांतील मान्यवर शास्त्रज्ञांनीं गौरवाचे उद्गार काढले आहेत. वरील क्षेत्रांतील मुस्लिमांच्या असामान्य कर्तृत्वामुळें जगाच्या संस्कृतींत फार मोलाची भर पडली आहे. आज सर्वमान्य झालेल्या कित्येक शास्त्रांचें जनकत्व मुस्लिमांकडे आहे हें कळल्यानंतर कित्येकांना आश्चर्य वाटेल. मुस्लिमांनीं विज्ञान व भौतिकशास्त्रांत जी अमूल्य कामगिरी केली तिला उद्देशून आजचे विख्यात शास्त्रज्ञ एच्. जी. वेल्स यांनीं वरील उद्गार काढले आहेत. ते उद्गार लक्षांत घेतले म्हणजे मुस्लिमांनीं नुसत्या युरोपवर नव्हे तर साऱ्या जगावर केवढे उपकार करून ठेविले आहेत याची आपणांस कल्पना येते.

मानव जातीचा उत्कर्ष व सौख्य साधण्याकरितां इस्लामनें ज्या साधनांचा पुरस्कार केला आहे त्यांमध्यें विज्ञानाची प्रामुख्यानें गणना होते. इस्लाममध्यें विज्ञानाविषयीं अप्रीति नाहीं, निषेध तर नाहींच नाहीं; उलट विज्ञानास श्रेष्ठ स्थान देण्यांत आलें आहे.

† Outline of History, P. 432.

वैज्ञानिक प्रगति ही मानवी जीवन संपन्न व सौख्यपूर्ण करते असा इस्लामचा विश्वास आहे. मात्र त्या वैज्ञानिक प्रगतीवर नीतिशास्त्राचें बंधन राहिलें पाहिजे असा त्याचा आग्रह आहे. मानवांच्या कल्याणाकरितां, त्यांच्या स्वास्थ्याकरितां विज्ञानाचा उपयोग करण्यांत यावा; उलट तें मानव जातीच्या संहारास हातभार लावीत असेल तर त्या विज्ञानास स्थान नाहीं हा दृष्टिकोन समोर ठेवून मुस्लिमांनीं विज्ञानाच्या प्रगतीस हातभार लावला आहे.

इस्लाम धर्मांत विज्ञानास विरोध नाहीं हें मागें एका प्रकरणांत आपण पाहिलें आहे. आपल्या शिकवणीच्या अग्रभागीं चमत्कारा-ऐवजीं मानवी बुद्धिमत्तेस स्थान दिल्यामुळें विज्ञान किंवा तर्कशास्त्र यांना न पटणारें एकही वाक्य स्वीकारावयास इस्लाम तयार नाहीं. विज्ञानास न पटणाऱ्या चमत्कारापेक्षां, निसर्ग व जीवनाच्या शाश्वत चमत्कारांवर इस्लामनें जास्त भर दिला आहे. या बौद्धिक बैठकी-मुळेंच इस्लाममध्यें विज्ञानाचा पुरस्कार इतक्या प्रभावी रीतीनें होऊं शकला. हजरत मुहम्मद पैगंबरांनीं विज्ञानास उत्तेजन दिलें इतकेंच नव्हे तर वैज्ञानिक ज्ञानास पुण्याईचें स्थान मिळवून दिलें. त्यांनीं काढलेले उद्गार अभ्यासण्यासारखे आहेत—

" विज्ञानाचें शिक्षण द्या. जो हें ज्ञान घेतो तो परमेश्वरास भूषवितो; जो हें ज्ञान देतो त्याला ज्ञानधर्माचें पुण्य मिळतें; ज्याच्याजवळ हें ज्ञान आहे तो आदरणीय व उपकारकर्ता होऊं शकतो. विज्ञान हें भ्रम व पाप यांपासून वांचवितें. त्यानें नंदन-बनाचा मार्ग मोकळा होतो. विज्ञान हा आपल्या प्रवासामधील

स्नेही, निर्जन प्रदेशांतील विश्वास व एकांतवासामधील सोबती आहे. जीवनाच्या सुखदुःखांत विज्ञान मार्गदर्शन करतें.‡

इस्लामधर्म-प्रणेत्यांचा हा महान संदेश मुस्लिम राज्यकर्त्यांनीं आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवला व त्याबरहुकूम विज्ञान व शास्त्र यांचा विकास व उत्कर्ष व्हावा एतदर्थ त्यांनीं अविश्रांत परिश्रम केले. मध्ययुगांत बगदाद, कैरो, कोर्डोवा हीं मुस्लिम राजधानीचीं शहरें म्हणजे विद्या आणि संस्कृति यांचीं केंद्रें बनलीं होतीं. एक ग्रंथकार लिहितो, "त्या काळचा दरबार अत्यंत देदिप्यमान होता. शास्त्रज्ञ, साहित्यिक, कवी, वैद्यकविशारद आणि तत्त्वज्ञानी यांचा तेथें सत्कार होत असे. जातिभेदाचा विचार न करतां राजाश्रय देण्यांत येई. राजदरबारीं ज्यू व ख्रिश्चन यांचें सारखेंच स्वागत होई."† एस्. पी. स्कॉट नांवाचा ग्रंथकार या विद्याप्रेमी मुस्लिम खलिफांना धन्यवाद देतांना लिहितो, "इस्लाम धर्मानें अशा राज्यकर्त्यांची मालिका निर्माण केली कीं ज्यांचें ध्येय आपल्या प्रजाजनांना संपन्न करणें, ज्या योगें अनेक पिढयांना फायदा पोहोंचेल अशा विद्यांची संपदा मागें ठेवणें, कधींही निष्प्रभ होणार नाहीं अशा बुद्धिमत्तेचें वर्चस्व निर्माण करणें हें होतें."* "न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते" असें समजणाऱ्या सुविद्य खलिफांच्या कृपाछत्राखालीं मुस्लिमांनीं ग्रीक विद्या, कला व तत्त्वज्ञान यांचें पुनरुज्जीवन केलेंच; पण त्याही पुढें जाऊन निरनिराळ्या शास्त्रांचा शोध लावून त्यांनीं सर्व जगास उपकृत करून ठेविलें आहे. ग्रेयार्ड आपल्या ज्ञानकोशांत लिहितो, —

---

‡ Islam in the World, Page 96.
† Islam in the World, Page 109.
* The History of Spain, P. 115.

"मध्ययुगीन काळांत मुस्लिमांचा इतिहास म्हणजे जागतिक सुधारणेचा व संस्कृतीचा जिवंत इतिहास होय."

History of Inventions या ग्रंथांत बेकमन म्हणतो, – "अरब हे केवढे थोर लोक होते! विपुल ज्ञान व अत्यंत उपयुक्त ठरलेले वैज्ञानिक शोध यांची आम्हांस देणगी देऊन त्यांनीं आम्हांला कायमचे ऋणी करून ठेविलें आहे." ह्यूम बोल्ट नांवाचा विख्यात ग्रंथकार लिहितो, "युरोपमध्यें दोनशें वर्षें थैमान घालीत असलेला रानटीपणा अरबांनीं हांकलून दिला. ग्रीक तत्त्वज्ञानाचें मूळ त्यांनीं शोधून काढलें. त्या ज्ञानाचें पुनरुज्जीवन करून ते थांबले नाहींत तर त्यांत त्यांनीं अमोलिक भर घातली आणि निसर्गाचा अभ्यास करण्याकरितां नवे मार्ग शोधून काढले." वर उध्दृत केलेले विद्वानांचे विचार कितपत यथार्थ आहेत याचें आपणाला सिंहावलोकन करावयाचें आहे.

## खगोलशास्त्र ( Astronomy )

खगोलशास्त्राचा खोल अभ्यास व त्याचें संशोधन यांमुळें मुस्लिमांनीं त्या शास्त्रांत ज्ञानाची अपूर्व अशी भर घातली आहे. युरोपमधील खगोलशास्त्रवेत्ते अरब मुस्लिमांना अद्यापही आपले गुरु मानतात. पृथ्वीचा आकार, तिचें मोजमाप, चंद्रसूर्याच्या गतींचीं कोष्टकें, ताऱ्यांचे नकाशे, ग्रहणांचे वेध, ज्योतिर्यंत्रांचा शोध, ग्रहांची जंत्री वगैरे या शास्त्रांतील अनेक अंगोपांगांमध्यें मुस्लिमांनीं प्रावीण्य संपादिलें आहे. त्यांनीं या शास्त्रांत लावलेले शोध आजही मार्गदर्शक समजले जातात. भाई मानवेंद्र रॉय म्हणतात, "मनुष्याची दृष्टि व्यापक करणाऱ्या व निसर्गाच्या नियमांशीं ओळख करून

वाटली आणि प्रार्थना एवढ्याकरितां केली कीं त्या तरुणाचें तोंड पाहिल्यावर तो माझा मुलगा नव्हे असें मला आढळून आलें आणि असा नीच मनुष्य माझ्या पोटीं जन्मास घातला नाहीं म्हणून परमेश्वराला आळविलें.

प्रत्यक्ष राजप्रमुख असला तरी देखील त्याला अन्यायी वृत्तीबद्दल जाब विचारण्याचा जनतेला अधिकार आहे. राजप्रमुख गुन्हा करूं शकत नाहीं किंवा त्याला न्यायासनापुढें उभें करतां येत नाहीं असा इतरत्र असणारा दंडक इस्लामनें झुगारून दिला आहे. राजप्रमुख हा देखील आपल्यासारखाच एक माणूस आहे. एका गरीब माणसाला त्यानें केलेल्या गुन्ह्याबद्दल सजा व्हावी आणि राजप्रमुखाला तशाच गुन्ह्याबद्दल कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवावें हा अन्याय आहे असें इस्लाम समजतो. त्याची जबाबदारी लक्षांत घेतां त्याला न्यायाच्या बाबतींत एखाद्या गरीब माणसापेक्षां जास्त जबाबदार धरण्यांत आलें पाहिजे. न्यायासनासमोर गुन्हेगार म्हणून उभे राहणारे अनेक राजप्रमुख किंवा सर्वाधिकारी इस्लामच्या इतिहासांत आढळून येतील. सुलतान महमंद तघलक याचें नांव सर्वश्रुत आहे. त्यानें एका हिंदु मुलास निष्कारण फटके लगावले म्हणून त्या मुलानें काझीकडे फिर्याद नेली. काझीनें सुलतानास न्यायालयांत हजर राहण्यास फर्माविलें. सुलतान हजर झाल्यानंतर काझीनें जितके फटके या हिंदु मुलाला मारले तितके त्या हिंदु मुलानें सुलतानास मारावे असा निकाल दिला. सुलतान महमंद यांनीं आपली पाठ उघडी केली आणि त्या मुलानें एकवीस फटके लगावले.

इस्लामच्या या असामान्य न्यायी वृत्तीमुळेंच मुस्लिम ज्या ज्या ठिकाणीं गेले, त्या ठिकाणीं त्यांनीं तेथील नागरिकांचा विश्वास

संपादन केला आहे. एक ग्रंथकार म्हणतो, "आपण दिलेल्या वचनाचें अत्यंत निष्ठेनें परिपालन, सर्व जातीच्या लोकांना कोणताही भेदभाव न बाळगतां निस्पृहपणें दिलेलें न्यायदान, यांमुळें मुस्लिमांनीं जनतेचा विलक्षण विश्वास संपादन केला."†

निस्पृह न्यायदान हें लोकशाहीचें वैभव तर अनत्याचार ही तिची शक्ति आहे. अधिसत्ता टिकविण्याकरितां किंवा राजकारण यशस्वी करून दाखविण्याकरितां कित्येक वेळां अत्याचाराचा अवलंब करावा लागतो ही विचारसरणी त्या अधिसत्तेच्या किंवा राजकारणाच्या कमकुवतपणाची द्योतक आहे. न्यायाच्या व प्रेमाच्या जोरावर अधिसत्ता टिकते; अत्याचाराच्या जोरावर नव्हे. अत्याचारानें तात्पुरती शांतता नांदेल, पण ती वादळापूर्वीची शांतता होय. अत्याचारामुळें अधिसत्ता तर राहोच पण स्वतःचें अस्तित्व देखील धोक्यांत येतें हें जनतेनेंही पण लक्षांत घेतलें पाहिजे. केवळ द्वेषानें किंवा भावनेनें धुंद होऊन एकाद्या वर्गावर किंवा समाजावर अत्याचार करणें हें केव्हांही आत्मघातकीपणाचें आहे. आपण बहुसंख्याक आहोंत किंवा राज्य आपलें आहे म्हणून अल्पसंख्याकांवर जुलूम करणें किंवा त्यांना दडपून टाकणें हा पराक्रम तर नव्हेच पण कमकुवतपणा आहे. अत्याचार ही पराक्रमाची कसोटी नव्हे पण कमकुवतपणाची निशाणी आहे. योग्य मार्गाचा अवलंब न करतां एकदम अत्याचारास प्रवृत्त होणें हें शक्तीपाताचें लक्षण आहे.

राष्ट्रास किंवा आपल्या स्वतःस कमजोर करणाऱ्या अत्याचारी वृत्तीपासून आपण सर्वस्वीं अलिप्त राहिलें पाहिजे. मात्र आपल्या

† History of Dominions of Arabs in Spain.

मनामध्यें संभ्रम उत्पन्न होऊं नये म्हणून अत्याचाराची व्याख्या काय किंवा त्याची मर्यादा कोणती हें आपण समजावून घेतलें पाहिजे. रक्तपाताचें प्रत्येक कृत्य म्हणजे अत्याचार होऊं शकेल काय याचाही आपण विचार केला पाहिजे.

" जुल्म होत असतां एकाद्यानें प्रतिकार केला तर त्याला दोषी ठरवितां येत नाहीं."

—पवित्र कुराण ४२:४१.

अन्यायासाठीं झगडा म्हणजे अत्याचारी कृत्य नव्हे किंवा जुलुमाचा प्रतिकार म्हणजेही अत्याचार नव्हे. एकादें कृत्य अत्याचाराचें आहे किंवा नाहीं हें नीतीच्या निकषावर घांसून पहावें लागतें. नीतीच्या मर्यादा ओलांडून किंवा नैतिक मूल्यें पायदळीं तुडवून कोणतेंही कृत्य केलें तर तें अत्याचाराच्या सदरांत येऊं शकतें. अन्याय किंवा जुल्म यांचा प्रतिकार करीत असतां रक्त सांडलें गेलें तर तें कृत्य केव्हांही अत्याचाराचें होणार नाहीं. निरपराध माणसावर हल्ला झाला असतां किंवा एकाद्या नरपशूपासून सुशील स्त्रीच्या चारित्र्याचें रक्षण करीत असतां जर रक्ताचा सडा पडला तर तो अत्याचार होऊं शकत नाहीं. याच्या उलट एकाद्या अनाथ गृहस्थास आपण अपशब्द बोललों किंवा एकाद्या सज्जनास निष्कारण दुखविलें तर तो मात्र अत्याचार समजला जाईल. आपल्यासमोर धडधडीत अन्याय चालला असतां, नैतिक मूल्यांची धूळधाण उडविली जात असतां, डोळे मिटून उभे राहणें किंवा स्तब्धपणें बाजूला निघून जाणें हा अनत्याचार नव्हे तर चाललेल्या अत्याचारास प्रत्यक्ष प्रोत्साहन होय. अशा भ्याड वृत्तीचा इस्लामला मनापासून तिटकारा आहे. ज्या ज्या ठिकाणीं अन्याय किंवा अत्याचार

चालला असेल त्या ठिकाणीं प्रतिकार करा असा त्यानें आदेश दिला आहे. अशा तऱ्हेचा प्रतिकार करीत असतां जर मरण आलें तर तें शूराचें मरण आणि अत्याचारी माणसाची त्याच्या हातून हिंसा झाली तर ती अहिंसा असें इस्लाम मानतो. इस्लामनें आपल्या अनुयायांस शूराची अहिंसा किंवा अनत्याचार शिकविला आहे.

"परमेश्वर जुल्म किंवा अत्याचार करणारावर प्रेम करीत नाहीं."

—पवित्र कुराण ४२:४०

जुल्म, जबरदस्ती किंवा अन्याय यांना पायबंद घालण्याचें कार्य इस्लामचें असल्यामुळें अशा अत्याचारांचा धिक्कार करण्यांत आला आहे. निरपराधी लोकांवर जुल्म किंवा अत्याचार करणाऱ्या दुष्ट माणसावर परमेश्वर प्रेम करणें शक्य नाहीं. परमेश्वरास प्रिय असणाऱ्या मानवांचें स्वास्थ्य नष्ट करणें म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरास दुखविणें होय. मुस्लिम म्हणविणाऱ्या व्यक्तीनें असें घोर पातक कधींही करतां कामा नये. माणसाच्या आयुष्यांत कांहीं असे प्रसंग येतात कीं त्या वेळीं अत्याचार करण्याची वृत्ति सहज बळावते; पण परमेश्वराचें स्मरण ठेवून त्या दुष्ट वृत्तीस लगाम घातला पाहिजे. आपद्धर्म म्हणून एकादा बाका प्रसंग ओढवला तरी त्या वेळीं देखील आपण मोठा संयम दाखविला पाहिजे. उदाहरणार्थ, लढाईचा काळ म्हणजे अत्याचाराचा मोसम. अशा प्रसंगीं माणसाची सद्बुद्धि नष्ट पावते आणि तो संताप व द्वेष यांच्या आहारीं जातो. फक्त शत्रूशींच मुकाबला न करतां शत्रूच्या स्त्रिया, मुलें आणि वृद्ध आप्तेष्ट यांच्यावर अत्याचार केले जातात, त्यांची संपत्ति लुटली जाते, त्यांच्या अब्रूची धुळधाण करण्यांत येते. इस्लामनें या पाशवी अत्याचारांचा

धि:क्कार केला आहे. लढावयाचें तर तें शत्रूंशीं ! त्यांच्या स्त्रियांनीं किंवा कच्च्याबच्च्यांनीं आपलें काय वाईट केलें आहे, त्यांना काय म्हणून छळावयाचें, त्यांच्यावर काय म्हणून अत्याचार करावयाचे, त्यांचे काय म्हणून बळी घ्यावयाचे असा स्पष्ट सवाल टाकून त्या लढवय्यांना अत्याचारापासून परावृत्त करण्याचें कार्य इस्लामनें केलें आहे. त्या काळचा विचार केला म्हणजे इस्लामची मानवता विशेषपणें आपल्या डोळ्यांत भरते. त्या काळीं शत्रूंच्या स्त्रिया, मुलेंबाळें आणि वृद्धांची एकजात कत्तल करणें, त्यांच्या शेतांतील पिकें व फळझाडें उध्वस्त करणें, त्यांचीं प्रार्थनामंदिरें धुळीला मिळविणें, लूटमार करणें वगैरे अनन्वित प्रकार होत. अशा परिस्थितींत "स्त्रिया, मुलें व वृद्ध यांना ठार मारूं नका, त्यांचीं पिकें जाळूं नका, फळझाडें तोडूं नका, त्यांच्या प्रार्थनामंदिरांना धक्का लावूं नका आणि लूटमार करूं नका" अशी इस्लामनें दिलेली आज्ञा मागें कोठेतरी आपण पाहिलीच आहे.

युद्धामध्यें कैदी झालेल्या शत्रूंना किती माणुसकीनें वागविलें जातें याचें हृद्य वर्णन सर वुईल्यम मूर यांनीं केलें आहे. ते म्हणतात, "मुस्लिम सैनिक आपलें स्वतःचें अन्न कैद्यांना देत आणि आपण नुसत्या खजूरावर वेळ भागवीत. एक कैदी त्यांना म्हणाला, "मदिनेच्या मुस्लिमांवर परमेश्वरी कृपेचा वर्षाव होवो. आम्हांस वाहनावर बसून ते स्वतः पायीं चालत, त्यांच्याजवळ अगदीं थोडें अन्न असतां तें सर्व आम्हांला देऊन टाकीत." आजच्या सुधारलेल्या काळांतही शत्रूंना अमानुषतेनें वागविण्यांत येतें या गोष्टींचा विचार केला आणि इस्लामचा सहृदयतेचा वरील आदेश पाहिला म्हणजे

इस्लाम मानव्याचा केवढा श्रेष्ठ पुरस्कर्ता आहे याची आपणांस कल्पना येईल.

इस्लामी युद्धनीतीमध्यें मानव्याला व अनत्याचाराला कसें प्रधान स्थान आहे हें आपण वर पाहिलें आहे. लूटमारीसारखें कृत्यही त्या युद्धनीतीला मंजूर नाहीं. एकदां लढाईच्या वेळीं हजरत पैगंबरांची नजर चुकवून कांहीं सैनिकांनीं एका मेंढयांच्या कळपावर धाड घातली. त्यांपैकीं कांहीं मेंढया कापून त्यांचें मांस चुलीवर शिजत ठेविलें. हजरत पैगंबरांना ही वार्ता लागतांच ते तडक त्या ठिकाणीं गेले आणि मांस शिजणारें भांडें उपडें करून सैनिकांना म्हणाले, "अशा तऱ्हेचा लूट केलेला दुसऱ्याचा माल खाणें हराम (निषिद्ध) आहे." त्याचप्रमाणें सैनिकांनीं नागरिकांना त्रास दिला तर त्या नागरिकांना समक्ष बोलावून आणून आपल्या सैनिकांनीं केलेल्या अपराधाबद्दल दिलगिरी प्रदर्शित करीत, इतकेंच नव्हे तर त्यांना नुकसानभरपाईही देत.

इस्लामच्या या उदार शिकवणीमुळें जुल्म किंवा अत्याचार यां-पासून मुस्लिम सैनिक अलिप्त असत. आपल्या देशावर शत्रूची धाड म्हणजे लूटमार, आपत्ति, दुष्काळ आणि मूर्तिमंत हाहाःकार ही कल्पना इस्लामनें पार बदलून टाकली. शत्रू झाला तरी वागतांना सहृदयतेचा अवलंब केला पाहिजे, अनत्याचाराचें व्रत स्वीकारलें पाहिजे, माणुसकीनें वागलें पाहिजे असा नवा दंडक हजरत पैगंबरानीं घालून दिला. हजरत पैगंबरांना अत्याचाराबद्दल वाटत असलेला तिटकारा व त्याबद्दल त्यांनीं आपल्या अनुयायांना केलेला उपदेश यांवर एका आंग्ल ग्रंथकारानें स्वच्छ प्रकाश टाकला आहे. तो म्हणतो, "हजरत मुहम्मद पैगंबर न्यायी, विश्वासू आणि

सुसंबद्ध महाभाग असून अत्याचाराला किंवा धर्माच्या नांवाखालीं
होणाऱ्या आक्रमक वृत्तीला त्यांचा सक्त विरोध असे. बचावाचा
किंवा आत्मसंरक्षणाचा त्यांनीं सदैव पुरस्कार केला आहे. त्याच
बरोबर परधर्मियांशीं युद्ध किंवा बदला न घेण्यास बजावलें आहे.
या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर इजरत मुहम्मद यांनीं अत्या-
चाराचा निषेध केला आहे असें मला कबूल करावें लागतें.'' † महाज
बिन जबलची यमनचा गव्हर्नर म्हणून नेमणूक केल्यानंतर हजरत
पैगंबरांनीं त्याला जो उपदेश केला तो पाहिल्यावर हजरत पैगंबरांचा
अनत्याचारावर केवढा विश्वास होता हें सहज कळून येण्यासारखें आहे.
ते यमनच्या गव्हर्नरास म्हणाले, "तुम्हीं प्रजाजनांस अत्यंत दयाळू-
पणानें व विचारानें वागविलें पाहिजे. तुम्हीं त्यांच्यांशीं कठोरपणें
वागतां कामा नये, किंवा त्यांची संपत्ति लुटतां कामा नये.
दुःखितांचा शाप आपणांला भोंवतो हें लक्षांत ठेवा. त्रस्त लोकांचे
सुस्कारे परमेश्वरचरणीं लवकर रुजू होतात या गोष्टीची आठवण
असूं द्या.''

लोकशाहीमध्यें नागरिकांच्या स्वास्थ्यास मोठें महत्त्व आहे.
लोकांचें राज्य म्हणावयाचें आणि लोकांचा जीव धोक्यांत राहावयाचा,
त्यांना स्वास्थ्य लाभावयाचें नाहीं अशी परिस्थिति लोकशाहीला
खचित भूषणावह नाहीं. राष्ट्र म्हटलें कीं त्यांत निरनिराळ्या धर्मांचे,
विविध पक्षांचे किंवा मतप्रणालीचे लोक राहणारच. आपल्या
पक्षाच्या किंवा धर्माच्या लोकांकडेच जास्त लक्ष पुरवावयाचें, त्यांची
जास्त दखल घ्यावयाची आणि इतरांकडे दुर्लक्ष करावयाचें, त्यांच्या
संरक्षणाची काळजी घ्यावयाची नाहीं असा पंक्तिप्रपंच खऱ्या लोक-

† Islam–Her Moral & Spiritual Value by Leonard, P.72.

शाहीमध्यें कदापिही दिसून येत नाहीं. नागरिक म्हटला तर तो कोणत्याही धर्माचा, पक्षाचा वा मतप्रणालीचा असो त्याला स्वास्थ्य व संरक्षण मिळालेंच पाहिजे. सबंध राष्ट्रांत एकच परधर्मी नागरिक असेल तरी त्याला बिनधोक व सुखानें राहतां आलें पाहिजे असा इस्लामचा दंडक आहे. त्या राज्यशास्त्रांत परधर्मियांना इतकें अभय देण्यांत आलें आहे कीं त्यांनीं त्याबद्दल आपुलकी व संपूर्ण समाधान व्यक्त केलें आहे. स्टॅन्ले लेनपूल म्हणतो, "जनतेमध्यें समाधान नांदत होतें. त्यांच्या धर्माचे राज्यकर्ते असतां त्यांना जें समाधान होतें त्यापेक्षां जास्त समाधान व प्रसन्नता त्यांना मुस्लिम राजवटींत वाटत होती." † त्याचप्रमाणें त्यांना इतकी निर्भयता वाटत होती कीं रात्रौं द्वारें न लावतां ते झोपत असत असें रेव्हरंड डॉडस् या ख्रिश्चन धर्मोपदेशकानें लिहून ठेविलें आहे. तो म्हणतो, "गुन्हेगारी व बेकायदा वागणूक यांमुळें बदनाम झालेले प्रांत मुस्लिमांच्या सामर्थ्यवान राज्याखालीं येतांच इतके सुव्यवस्थित व सुरक्षित झाले कीं तेथील नागरिक रात्रीं दारें देखील लावीत नसत. जनावरांना बाहेर पडतां येऊं नये म्हणून एक कोलदांडा अडकविलेला असे.* मुस्लिम राज्यकर्त्यांविषयीं परधर्मियांना इतका विश्वास वाटे कीं, लढाईच्या वेळीं मुस्लिमांना विजय मिळावा अशी ते प्रार्थना करीत. लंडन युनिव्हर्सिटीमधील अरबी भाषेचे प्रो. अर्नोल्ड यांनीं Preaching of Islam नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्यें रोमन युद्धाचे वेळीं, मुस्लिम राज्यकर्त्यांविषयीं ख्रिश्चन लोकांनीं काय उद्गार काढले आहेत हें दाखविलें आहे. "आमच्यावर पुन्हां आपलें राज्य

† Moors in Spain, Page 43.

* Rew. Dodds, Page 106.

होवो आणि रोमन लोकांविरुद्ध आपणांस विजय मिळो अशी आम्ही परमेश्वराजवळ प्रार्थना करितों. त्यांचें आमच्यावर राज्य असतें तर त्यांनीं आम्हांला कांहीं दिलें नसतें पण सर्वस्वीं आम्हांला लुटलें असतें.'' † अगदीं अलीकडे टिपू सुलतानच्या राज्यांतील ब्रह्मवृंद टिपू सुलतानास युद्धामध्यें विजय मिळावा म्हणून अनुष्ठान करीत ही गोष्ट मराठा सैन्याचे नेते हरिपंत फडके यांनीं आपल्या पत्रांत स्पष्ट केली आहे. (ऐतिहासिक टिपणें, भाग ५, पृष्ठ २८) ते म्हणतात, "रंगस्वामीपाशीं व शिवालयीं ब्राह्मण अनुष्ठानास घालून प्रयोग चालले आहेत. एक ब्राह्मण जलांत मस्तक ठेवून दोन अडीच प्रहर वरते पाय करून अनुष्ठान करीत आहे. याशिवाय चाळीस ब्राह्मणांनीं दुसरा पर्याय चालविला.'' जनतेचा संपूर्ण विश्वास हा अधिसत्तेचा पाया असतो हें वरील उदाहरणांवरून स्पष्टपणें सिद्ध होतें.

नागरिक म्हणविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षाकरितां मनोभावानें झटलें पाहिजे. राष्ट्राची शक्ति क्षीण होईल किंवा ती दुभंगून जाईल असें कोणतेंही कृत्य करतां कामा नये. राष्ट्राच्या अभ्युदयार्थ अधिसत्तेनें आपली शक्ति केंद्रीभूत केली असतां ती शक्ति कमकुवत होणार नाहीं याबद्दल सदैव जागृत राहिलें पाहिजे.

> "देशांत स्थिरस्थावर झाल्यानंतर उपद्व्याप करूं नका."
>
> —पवित्र कुराण ७:५६

राष्ट्रास मारक ठरेल असें कोणतेंही कृत्य किंवा कट करण्यापासून आपण अलिप्त राहिलें पाहिजे. कांहींतरी उपद्व्याप करून

† Preaching of Islam, Page 61.

राष्ट्रांत बेदिली फैलावणें किंवा त्याच्या स्वास्थ्यांत बिघाड आणणें हा राष्ट्रद्रोह आहे असें आपण सर्वांनीं समजलें पाहिजे. स्वदेशाविषयीं, आपल्या राष्ट्राविषयीं अभिमान बाळगणें, आत्यंतिक आदर प्रगट करणें हा एक श्रेष्ठ सदाचार आहे. आपण ज्या राष्ट्रांत जन्म घेतला त्या राष्ट्राविषयीं इमान राखणें हें प्रत्येकांचें पवित्र कर्तव्य आहे. एका राष्ट्रांत जन्म घ्यावयाचा, त्या राष्ट्राचे नागरिक म्हणवावयाचें आणि त्याच राष्ट्रास विघातक होईल अशीं नीच कृत्यें करावयाचीं हा अधमपणा आहे, अक्षम्य अपराध आहे. अट्टल गुन्हेगाराचा महान् गुन्हा एक वेळ क्षम्य मानतां येईल पण देशाच्या स्वास्थ्यावर निखारे ठेवणाऱ्या गृहस्थाचा देशद्रोहाचा गुन्हा केव्हांही क्षम्य ठरणार नाहीं. देशद्रोह म्हणजे एकाद्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा नाहीं तर सबंध राष्ट्राविरुद्ध गुन्हा आहे. या गुन्ह्यास कदापिही माफी मिळूं शकत नाहीं. अशा देशद्रोही वृत्तीपासून, फितुरीपणापासून प्रत्येक मुस्लिमानें दूर राहून आपल्या राष्ट्रांची, देशांची अत्यंत इमानानें सेवा केली पाहिजे असा इस्लामचा आग्रह आहे.

हुब्बुल वतन मिनल इमान्

म्हणजे राष्ट्राची, आपल्या मातृदेशाची सेवा हा धर्माचा एक भाग आहे अशी इस्लामची शिकवण आहे. धर्माच्या सर्व शर्ती पाळणारा पण आपल्या स्वदेशाविषयीं बेफिकीर राहणारा किंवा त्याची सेवा न करणारा शंभर नंबरी मुस्लिम होऊं शकत नाहीं. स्वदेशाभिमान हा धर्माचा एक भाग असल्यामुळें त्याचें परिपालन झाल्याखेरीज धर्म परिपूर्ण होऊंच शकत नाहीं असा इस्लामचा दावा आहे. मुस्लिमानें स्वदेशाभिमान बाळगलाच पाहिजे; पण त्यानें स्वदेशाभिमान म्हणजे इतर देशांचा द्वेष करणें किंवा साऱ्या जगास तुच्छ

लेखणें असा मात्र त्याचा अर्थ करूं नये. इस्लामचा स्वदेशाभिमान हा सर्व जगास लाथाडणारा वेडा स्वदेशाभिमान नाहीं. त्या स्वदेशाभिमानाच्या पोटीं इतर राष्ट्रांविषयीं तुच्छता किंवा वैरभाव नसून आपुलकी व प्रेम आहे. आपल्या राष्ट्राविषयीं स्वाभिमान बाळगूनही तो इतर राष्ट्रांबद्दल सहानुभूति दाखवूं शकतो; इतर देशांवर प्रेम करूं शकतो. ज्याला आंतरराष्ट्रीय स्वदेशाभिमान म्हणतां येईल अशा स्वदेशाभिमानाचा इस्लामनें पुरस्कार केला आहे. मानवतेचें ध्येय इस्लामसमोर असल्यामुळें सर्व जगाविषयीं आपुलकी बाळगणें हें त्याचें कर्तव्यच ठरतें.

इस्लामच्या दृष्टीनें राज्यशास्त्राचें स्वरूप कसें असतें याची रूपरेषा 'Islam and Socialism' या ग्रंथांत दिसून येतें. त्या ग्रंथाचा कर्ता म्हणतो, " मुस्लिमांच्या अमलाखालीं सर्व लोकांना सारखे हक्क होते. प्रत्येकावर आपल्या गरीब व अनाथ देशबांधवांचें संरक्षण करण्याची सारखीच जबाबदारी होती. मोफत शिक्षण देण्यांत येई. महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना उदार आश्रय मिळे. वृद्ध किंवा काम करण्यास असमर्थ असलेल्या अपंग लोकांचा सरकारकडून चरितार्थ चालविण्यांत येई; मुलांचें संगोपन करण्यांत येई आणि लढाईंत पतन पावलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांकरितां व स्त्रियांकरितां फंड उभारण्यांत येई....कोणालाही जास्त पगार देण्यांत येत नसे. सर्वाधिकाऱ्यास किंवा सरकारी नोकरांस मामुली तनखा देण्यांत येई. लोकशाहीच्या सर्वाधिकाऱ्याला कोणताही खास अधिकार ( Power of Veto ) नव्हता. नोकरशाहीचा मागमूसही दिसत नसे....जमिनीवर सरकारची मालकी असे आणि हजरत उमरनें जमीनमहसुलाची पद्धत प्रथम जारी केली. वारसाहक्काच्या कायद्या-

मुळें भांडवलदारांचें अस्तित्व नष्ट झालें. प्रत्येक सधन व्यक्तीनें शेंकडा २॥ रुपये कर दिलाच पाहिजे असा कायदा करण्यांत आला. अशा रीतीनें श्रीमंतांच्या पैशांतून गरिबांची व्यवस्था करण्यांत आली."†

† Islam and Socialism by Khawja N. Ahmad, P. 7–8.

## प्रकरण ६ वें

# इस्लाम आणि तत्त्वज्ञान

"मुस्लिमांनीं जसें रोमन साम्राज्याचे प्रांत जिंकले, तसें तत्त्वज्ञान व शास्त्र हे प्रांतही त्यांनीं पादाक्रांत केले"‡

—डॉ. ड्रेपर

मुस्लिमांनीं तत्त्वज्ञान व भौतिक शास्त्रें यांचा एकनिष्ठपणें परामर्ष घेतला आहे. ग्रीक विद्या व तत्त्वज्ञान यांचा वारसा मुस्लिमांना प्राप्त झाला होता. त्याच्या आधारें पण स्वतंत्ररीत्या त्यांनीं आपलें तत्त्वज्ञान जगापुढें मांडलें आहे. इस्लामी तत्त्वज्ञान म्हणजे इस्लामी तत्त्वांचा प्रभाव असलेला पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विचारांचा परिपाक होय. ग्रीक तत्त्वज्ञान म्हणजे धार्मिक हटवादांविरुद्ध बंड तर इस्लामी तत्त्वज्ञान म्हणजे धर्म व तत्त्वज्ञान यांचा सुंदर मिलाफ असें आपणांस म्हणतां येईल. मुस्लिम तत्त्वज्ञांनीं जगाच्या तत्त्वज्ञानांत फार मोलाची भर घातली आहे असें विचारांतीं आपणांस कबूल करावें लागेल. अल्-गझ्झालीचा चिकित्सावाद आणि इब्न रुश्द यांची स्वतंत्र प्रज्ञता यांमुळें जागतिक तत्त्वज्ञान अधिक समृद्ध झालें आहे. लँग म्हणतो, "अरब संस्कृतीच्या विकासाबरोबर नव्या स्वतंत्र तत्त्वज्ञानाचा विकास करणारा इस्लाम धर्म सर्वांत अगदीं तरुण धर्म होय."*

‡ History of the Conflict between Religion & Science, P. 106.

* भौतिकवादाचा विकास, भाग १ ला, पृ. १७७.

हजरत पैगंबरांच्या मृत्यूनंतर जवळजवळ एक शतक, मुस्लिमांनीं निरनिराळे प्रदेश पादाक्रांत करण्यांत घालविले. त्या त्या ठिकाणीं स्थाईक झाल्यानंतर त्यांनीं तत्त्वज्ञान, साहित्य व आधिभौतिक शास्त्रें यांचा अभ्यास करण्यांत आपला वेळ खर्च केला. बगदादमध्यें खलिफा अल्–मन्सूरच्या कारकिर्दीपासून तो खलिफा अल् मामूनच्या कारकिर्दीपर्यंत जगांतील महान तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें मुस्लिमांनीं अरबी भाषेंत केलीं. पश्चिम आशिया व युरोपमध्यें कित्येक शतकें अरबी ही सर्वसामान्य भाषा होऊन राहिली होती. त्यामुळें ग्रीक, इराणी किंवा हिंदु तत्त्वज्ञानाची पाश्चात्य देशांना या अरबी भाषांतरित ग्रंथद्वारेंच ओळख झाली. प्लेटो व अरिस्टॉटल या विख्यात तत्त्वज्ञांची साऱ्या जगास ओळख करून देण्याचा मान प्रथम अरब मुस्लिमांनीं मिळविला आहे. अरबी ग्रंथांवरून ग्रीक तत्त्वज्ञानाचें रूपांतर निरनिराळ्या भाषांमधून झालें. एक ग्रंथकार लिहितो, " प्लेटो, अरिस्टॉटल, युक्लिड, अपोलोनिकस व टॉलेमी यांचे समग्र ग्रंथ, त्यांचेवरील ' विषमपद विमर्षिणी ' टीकेसहित नव्या युरोपच्या जनकांना प्रथम अरबी भाषेमधूनच वाचावयास मिळाले."* ग्रीक विद्येचें पुनरुज्जीवन करून मुस्लिमांनीं जगावर केवढे उपकार करून ठेविले आहेत याचें वर्णन करतांना तोच ग्रंथकार लिहितो, " ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनानें अज्ञान, लोकभ्रम व दुराग्रह यांचा नाश केला व युरोपमधील लोकांना ऐहिक वैभव, बौद्धिक प्रगती व आध्यात्मिक मुक्ति यांचा मार्ग दाखविला. आधुनिक बुद्धिवादाच्या पुरस्कर्त्यांना मुस्लिम तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञांकडून ग्रीक विद्येचा वारसा मिळाला. आधुनिक शास्त्रसंशोधनाचा आद्य

---

* Historical Roll of Islam, Page 79.

पुरस्कर्ता सर रॉजर बेकन हा अरब मुस्लिमांचा शिष्य होता.''† निष्प्रभ व मृतप्राय झालेल्या ग्रीक तत्त्वज्ञानाचें मुस्लिमांनीं पुनरुज्जीवन केलें म्हणूनच युरोपमध्यें बुद्धिवादाचा विकास होऊन धार्मिक अवडंबर व कुजकट मनोवृत्ती यांना मूठमाती मिळाली.

नवव्या व दहाव्या शतकांत जगामध्यें नामवंत समजले जाणारें बहुतेक सर्व तत्त्वज्ञान मुस्लिमांनीं अरबी भाषेंत आणिलें. हिंदु तत्त्वज्ञानाचा परिचयही अरबी भाषेच्या द्वारेंच 'झाला. त्या काळीं मुस्लिम विद्वानांनीं तत्त्वज्ञानाचें एवढें प्रचंड ज्ञानभांडार अरबी भाषेंत करून ठेविलें कीं कोणत्याही देशांतील ज्ञानपिपासूला तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याकरितां अरबी भाषेचें प्रथम अध्ययन करावें लागे. तेराव्या शतकापर्यंत म्हणजे ४०० वर्षे, पश्चिम आशिया व युरोपमध्यें अरबी भाषेचें वर्चस्व टिकून राहिलें. अकराव्या शतकापासून मुस्लिमांनीं स्वतंत्र्य तत्त्वज्ञान प्रसविण्याचें श्रेय मिळविलें आहे. सोळाव्या शतकापर्यंत साऱ्या जगास भूषणभूत होऊन राहणारे अल्-किंदी, अल्-फराबी, अल्-हसन, अबू सीना, इब्न रुश्द, अबू-बक्र, अल्-गझ्झाली यांच्यासारखे महान मुस्लिम तत्त्वज्ञ होऊन गेले.

अल्कंदी हे पहिले स्वतंत्रप्रज्ञ मुस्लिम तत्त्वज्ञानी होत. अबू युसफ याकूब हें त्यांचें संपूर्ण नांव असून त्यांचा जन्म नवव्या शतकाच्या सुरुवातीस झाला. त्यांचें वास्तव्य बगदाद शहरीं होतें. अव्वल दर्जाचा तत्त्ववेत्ता अशी त्या काळीं त्यांची ख्याति होती. त्यांनीं निरनिराळ्या विषयांवर २६३ ग्रंथ लिहिले असून 'अरिस्टॉटलचा इतिहास' या अरबी ग्रंथाची सुधारून बाढविलेली

† Historical Roll of Islam, Page 70.

आवृत्ति त्यांनीं प्रसिद्ध केली आहे. त्यांच्या असामान्य विद्वत्तेबद्दल एका ग्रंथकारानें पुढील गौरवपूर्ण उद्गार काढले आहेत. तो लिहितो, "तत्त्वज्ञानाचा अभ्यास गणितावर आधारला पाहिजे, तो निव्वळ काल्पनिक अनुमान असूं नये. अमूर्त विचारास तर्कशुद्ध विचाराचें पाठबळ असावें आणि त्याला आधार मूर्त सिद्धांत, नियम व उदाहरणें यांचा असला म्हणजे योग्य अनुमानें काढतां येतात. या नियमांनीं अभ्यास व विचार करावा असें सांगणारा हा तत्त्वज्ञ बेकन व डेकॉर्टिस यांच्यापूर्वीं सातशें वर्षें होऊन गेला हें मुस्लिम संस्कृतीला किती तरी गौरवास्पद आहे. एक हजार वर्षांपूर्वीं अरब तत्त्वज्ञान्यानें केलेला हा उपदेश आजही पुष्कळ तत्त्ववेत्त्यांना लाभदायक झाल्याखेरीज राहणार नाहीं."*

अल् फराबी हे दुसरे महान् मुस्लिम तत्त्वज्ञ असून त्यांचें संपूर्ण नांव अबू नसर मोहम्मद आहे. त्यांचा जन्म नवव्या शतकाच्या अखेरीस इराणमध्यें झाला. आपल्या वयाच्या ८० व्या वर्षीं इ. स. ९५० सालीं त्यांनीं इहलोकीची यात्रा संपविली. त्यांचे वडील सैन्यांत मोठे अधिकारी होते. कोंवळ्या वयांतच त्यांनीं आपली मातृभूमि सोडली व बगदाद येथें प्रयाण केलें. त्या ठिकाणीं त्यांनीं अरबी भाषा व तर्कशास्त्र यांचा अभ्यास केला. तत्त्वज्ञानाची त्यांना अत्यंत आवड असल्यामुळें त्याचा अभ्यास करण्याकरितां ते हरत येथील विख्यात विद्यामंदिरांत गेले. अरिस्टॉटल हा त्यांचा आवडता तत्त्वज्ञ. त्याच्या ग्रंथांची त्यांनीं २०० वेळां पारायणें केलीं. विद्याभ्यास संपविल्यानंतर अल्-फराबींनीं सीरिया व ईजिप्त देशांत खूप प्रवास केला. नंतर ते दमास्कस येथें स्थाईक झाले.

---

* Historical Roll of Islam; P. 86.

देण्याऱ्या खगोलशास्त्राची अरबांनीं अत्यंत कळकळीनें जोपासना केली आहे.... त्यांनीं खगोलशास्त्राचें मूळचें स्वरूप अगदीं पालटून टाकलें." †

इब्राहीम अल्-फझरी (इ. स. ७७८) यांनीं प्रथमच सूर्य व तारे इत्यादिकांची उंची काढणाऱ्या यंत्राचा शोध लावला. माशाल्ला (इ.स.८१५) यांनीं खगोल शास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले. खलिफा हारून अल्-रशीद यांचा मुख्य ग्रंथपालक फजल नांवाचा विद्वान् गृहस्थ होता. त्यानें इराणी भाषेंतील कित्येक खगोल शास्त्रावरील ग्रंथांचें अरबीमध्यें भाषांतर करून ठेविलें आहे. त्यांचा पुतण्या तर प्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ समजला जातो. अली इसा (इ. स. ८३२) यांनीं बगदाद व दमास्कस येथें अनेक वेध घेऊन त्यावर आपले विद्वतापूर्ण प्रबंध लिहिले आहेत. खलिफा अल मामूनच्या पदरीं एक विख्यात खगोलशास्त्रज्ञ होते. ते युरोपमध्यें Alfraganus या नांवानें प्रसिद्ध आहेत. 'खगोल शास्त्राचीं मूलतत्त्वें' या नांवाचा ग्रंथ त्यांनीं लिहिला असून लॅटिन भाषेमध्यें त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. उमर फारूकखान (इ. स. ८१५) या इराणी विद्वानांनीं खगोल शास्त्रावरील अनेक इराणी ग्रंथांचें अरबी भाषांतर केलें आहे. अबू मशर जाफर (इ. स. ८८६) यांनीं 'किताबुल मदखल' नांवाचा ग्रंथ लिहिला असून युरोपियन खगोल शास्त्रज्ञांनीं त्या ग्रंथाची विलक्षण स्तुति केली आंहे. सदर विद्वान गृहस्थ युरोपमध्यें Albumasar नांवानें ख्यात आहेत. अल् बतानी (इ. स. ९२९) हे सर्वांत श्रेष्ठ मुस्लिम खगोलशास्त्रज्ञ समजले जातात. त्यांनीं खगोलशास्त्रावर लिहिलेल्या अनेक ग्रन्थांचीं भाषांतरें युरोपियन

† Historical Roll of Islam, Page 79.

भाषांमध्यें झालीं आहेत. युरोपमध्यें हे शास्त्रज्ञ Al-bategnus या नांवानें मशहूर आहेत. अबू बक्र नांवाचे तितक्याच तोडीचे शास्त्रज्ञ इराणमध्यें होऊन गेले. ते युरोपमध्यें Albubather या नांवानें ओळखले जातात. त्यांच्या ग्रंथांचीं लॅटिनमध्यें भाषांतरें झालीं आहेत.

या शास्त्रज्ञांनीं 'ताऱ्यांची ओळख ' या नांवाचा ग्रंथ लिहिला असून त्याचेंही लॅटिनमध्यें भाषांतर झालें आहे. त्या काळीं इराणमध्यें खगोलशास्त्रासंबंधीं इतकी आवड उत्पन्न झाली होती कीं उमर खय्याम या विख्यात कवीनांही खगोलशास्त्राचा अभ्यास करण्याचा मोह आवरतां आला नाहीं. त्यांनीं या शास्त्रावर अभ्यासपूर्ण असे अनेक लेख लिहिले आहेत. पूर्वीची इराणी दिनदर्शिका बदलून नव्या पद्धतीची दिनदर्शिका त्यांनींच सुरू केली. ग्रीक खगोलशास्त्रज्ञांचे सिद्धांत खोडून काढणारा इब्न युनूस नांवाचा शास्त्रज्ञ होऊन गेला. त्याच्या 'जीजुल अकबर अलहाकिमी ' या महान् ग्रंथाचें भाषांतर उमर खय्याम यांनीं केलें आहे. साबित बिन कुर्रा नांवाच्या शास्त्रज्ञांनीं ग्रहांची गती नक्की केली, व सूर्याची चक्रगति ३६५ दिवस ६ तास ९ मिनिटें व १२ सेकंदांत पुरी होते असें सिद्ध केलें. आजच्या काळांत हा सिद्धांत बरोबर आहे असें मानलें जातें.

नभोमंडळाची व्यवस्थित पहाणी करण्याकरितां मुस्लिमांनीं ठिकठिकाणीं वेधशाळा बांधल्या. खलिफा मामून यांच्या आज्ञेनें दमास्कस येथें प्रथम मोठी वेधशाळा बांधण्यांत आली. या वेधशाळेचे अल् फरगानी, अब्बास जोहरी, सय्यद बिन अली आणि खालिद यांच्यासारखे विज्ञान दिग्दर्शक होते. मुसा बंधूंनीं

स्वत:च्या उपयोगाकरितां एक वेधशाळा उभारली होती. शरफुद्दिन बिन आजादुद्दौला यांनीं तर अनेक तज्ज्ञ खगोलशास्त्रज्ञांच्या देखरेखीखालीं स्वत:च्या बागेमध्यें वेधशाळा बांधली होती. सीरिया व स्पेनच्या राज्यकर्त्यांनीं आपआपल्या देशांत वेधशाळा बांधल्या होत्या. सर्वांत उत्कृष्ट वेधशाळा ईजिप्तमध्यें असून तिचें नांव 'रसदे हाकमी' असें आहे. स्पेनमधील वेधशाळेचा मात्र धर्मयुद्ध करणाऱ्या ख्रिश्चन लोकांनीं नाश करून टाकला. तैमूरचा नातू उलूघबेग यालाही पण खगोलशास्त्राची आवड होती. त्यांनीं घियासुद्दीनला हुकूम देऊन समरकंद येथें ( इ. स. १४३७ ) एक प्रचंड वेधशाळा बांधविली. रशियाच्या पुराणवस्तु संशोधन खात्यानें सन १९०० सालीं या वेधशाळेचा शोध लाविला. सुलतान मुरादनें तुर्कस्थानांत वेधशाळा बांधण्यास तकीऊद्दीन यांस फर्माविलें. पण तेथील सनातनी मुल्लांच्या विरोधामुळें तें कार्य तसेंच अर्धवट राहिलें. हिंदुस्थानामध्यें मुहम्मदशहाच्या कारकीर्दीत ( १७१९-४८ ) दिल्ली येथें नजमुद्दिन यानें वेधशाळा बांधली. राजा जयसिंगानें बनारस व जयपूर या शहरीं वेधशाळा बांधल्या. त्याच वेळीं खगोलशास्त्रावरील अरबी ग्रंथाचें संस्कृतमध्यें भाषांतर करण्यांत आलें. एक ग्रंथकार म्हणतो, "वेधशाळा उभारण्याची पद्धत मुस्लिमांकडून युरोपियन लोकांनीं घेतली व त्यांत सुधारणा केल्या. खगोलशास्त्रविषयक पुष्कळ उपकरणांचा शोध व त्यांमध्यें सुधारणा मुस्लिम खगोल शास्त्रज्ञांनीं केल्या आहेत."* मुस्लिमांनीं या विषयावरील ग्रंथसंभार मोठ्या प्रमाणांत केला आहे. खगोल व वैद्यक शास्त्रावर लिहिलेलीं ३६०० च्या वर पुस्तकें अद्यापही कैरोच्या लायब्ररींत आढळून येतात.

* Outline of Islamic Culture, Vol. I, Page 180.

मुस्लिमांनीं खगोल शास्त्राच्या क्षेत्रांत जी संस्मरणीय कामगिरी करून ठेवली आहे, त्यासंबंधी लिहितांना डॉ. ड्रेपर म्हणतो, "खगोलशास्त्रासंबंधी विचार केला तर असें दिसून येईल कीं त्यांनीं ग्रहांची केवळ जंत्री न करतां, नभोमंडळांत दृश्य असणाऱ्या ताऱ्यांचे नकाशेही बनविले. त्यांपैकीं आकारमानानें मोठ्या असणाऱ्या ग्रहांना त्यांनीं जीं अरबी नांवें दिलीं तीं अद्याप प्रचलित आहेत. त्यांनीं पृथ्वीच्या पृष्ठभागाची मोजणी करून तिचें आकारमान ठरविलें; तसेंच परमक्रांती वृत्ताची कल्पना बांधली. सूर्यचंद्रांच्या गतीचीं शुद्ध कोष्टकें छापलीं व वर्षाच्या कालमर्यादा ठरवून विषुवअयनांशांचा पडताळा पाहिला. ला प्लेसनें अल्-बत्तानीच्या ग्रहशास्त्र या ग्रंथाबद्दल गौरवपर उद्गार काढले आहेत. इ. स. १००० मधील इजिप्तच्या खलिफाचा आश्रित इब्न युनूस यानें लावलेल्या एका महत्त्वाच्या शोधाकडे नजर टाकण्यास सुचविलें आहे. त्यांत अल्-मन्सूरच्या वेळीं तारांचे अस्त, ग्रहांच्या युती, अयनान्त, विषुव व ग्रहणासंबंधी घेतलेल्या बऱ्याच वेधांचा उल्लेख आढळतो. त्यामुळें खगोलाच्या मोठमोठ्या घडामोडींचा अर्थ लावतां येतो. अरब खगोलवेत्त्यांनीं ज्योतिर्यंत्रांची रचना करणें व त्यांना पूर्णत्वास नेणें; सूर्यतबकडीसारख्या निरनिराळ्या साधनांनीं कालमापन करणें वगैरे गोष्टींत आपलें तनमनधन खर्च केलें आहे. कालमापनाला लंबकाचा त्यांनींच प्रथम उपयोग केला." †

## रसायनशास्त्र

" प्रयोगात्मक शास्त्रापैकीं रसायनशास्त्राचे अरब लोक उत्पादक

---

† History of the Conflict between Religion & Science, Page 116.

आहेत. नैट्रिक ॲसिड, सलफ्यूक ॲसिड, अल्कोहोल या महत्वाच्या द्रव्यांचा त्यांनींच शोध लावला.''*

रसायन शास्त्राच्या क्षेत्रांत मुस्लिमांनीं जें असामान्य कार्य केलें तें कदापिही विसरलें जाणार नाहीं. मानवी जीवन सौख्यपूर्ण व समृद्ध करणारीं जीं शास्त्रें आहेत त्यांमध्यें रसायनशास्त्राला अग्रेसरत्वाचा मान द्यावा लागेल. या दृष्टीनें रसायनशास्त्रास 'शास्त्राणां शास्त्रमुत्तमम्' असें यथार्थतेनें म्हटलें जातें. आपणांस रोगमुक्त करणाऱ्या औषधी, आपलें जीवन सुखमय करणारीं साधनें, आपलीं रंगीबेरंगी व आकर्षक वस्त्रप्रावरणें हीं रसायन शास्त्रामुळेंच जगास प्राप्त झालीं आहेत. सोनें, रुपें, रेडियम इत्यादि धातु, औषधें, रंग, खतें, कृत्रिम रत्नें, कांच, अत्तरें, कागद, कातडीं, तेल, चरबी, साबण, रबर, कृत्रिन रेशीम, तंबाकू, शाई, आगपेटया, चुना, सिमेंट इत्यादि बहुमोल पदार्थ, गंधकाम्ल, लवणाम्ल इत्यादि आम्लें हीं सारीं 'रसायन शास्त्राची' सत्कृति आहे.

आधुनिक रसायन शास्त्राचें जनकत्व अरबांकडे जातें अशी कबुली आजकालच्या प्रसिद्ध रसायन शास्त्रज्ञांनीं दिली आहे. हॅड्रोक्लोरिक ॲसिड, नैट्रिक ॲसिड, सल्फ़ूयक ॲसिड, आल्कोहल हीं महत्त्वाचीं रसानिक द्रव्यें अरबांनीं शोधून काढलीं. रसायनशास्त्रास आवश्यक असगारीं उपकरणें त्यांनीं तयार केलीं. बाष्पशुद्धिकरण (Distillation) उर्ध्वपातन (Sublimation) यां-

* History of the Conflict of Religion & Science by Dr. Draper, P. 116-17.

† "History of the Conflict between Religion & Science" by Dr. Draper, P. 116-17.

सारख्या अनेक रसायनक्रिया त्यांनींच करून दाखविल्या. Decantation ची उपयुक्त पद्धती त्यांनीं प्रचारांत आणली. त्यांनीं कित्येक रसायनें, आम्लें व क्षार अस्तित्वांत आणलीं व अनेक अमोल औषधींचा शोध लावला. प्रयोगपद्धतींनीं व संशोधनांनीं सध्यांच्या रसायनशास्त्राचा मजबूत पाया घालण्याचें श्रेय सर्वस्वीं अरबांनाचें दिलें पाहिजे.

एक ग्रंथकार म्हणतो, " रसायनशास्त्राचा प्रारंभ व विकास हा अरबांच्याच प्रयत्नानें झाला. बाष्पीकरणाचीं साधनें त्यांनींच शोधून काढलीं. घन, द्रव व वायुरूप पदार्थांची छाननी त्यांनींच प्रथम केली. आल्कली व आम्ल यांच्यांतील साम्यभेदाचे प्रयोगही त्यांनींच केले आणि अनेक खनिज पदार्थांचें गुणकारी औषधांत रूपांतरही त्यांनींच केलें."* डॉ. ड्रेपर यांनीं काढलेले उद्गार मननीय आहेत. ते म्हणतात, " रासायनिक प्रक्रियेसंबंधी–विशेषतः द्रव्यांच्या उर्ध्वपातनाला लागणाऱ्या प्रक्रियेसंबंधीं–त्यांनीं ( अरबांनीं ) मोठी सुधारणा केली. तीन महत्त्वाचे खनिज क्षार शोधले; वनस्पतिजन्य आणि खनिज अल्कलींतील फरक दाखविला; मद्यार्क तयार करण्याची क्रिया सुरू केली. अलीकडे रूढ असलेल्या द्रव्यांच्या नामाभिधानावरून रसायनशास्त्र अरबी लोकांचें केवढें ऋणी आहे हें सिद्ध होतें. वरील विधानाची सत्यता पटविण्यास अल्कोहल, अलेंबिक, अल्कली हे शब्दच पुरे आहेत."*

गिबर, मुसा, राझी या अरब रसायनशास्त्रज्ञांची गणना जगांतील प्रसिद्ध शास्त्रज्ञांमध्यें होते. त्यांनीं अनेक रासायनिक पद्धती शोधून काढल्या आणि अनेक शुद्ध औषधी क्षार तयार केले. रॉजर बेकन,

---

* Historical Roll of Islam, P. 80.

व्हॅलेंटाईन, टॉमस नॉर्टन, पॅरसेल्सस, हेल्मांट, ग्लावर, हेलवेसियस आदि विख्यात रसायनशास्त्रज्ञांनीं अरब शास्त्रज्ञांचें ऋण कबूल केलें आहे.

## प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र

" प्राणिशास्त्र व वनस्पतीशास्त्र यांचा सखोल अभ्यास करून त्या शास्त्रांत अरब लोकांनीं यशस्वी प्रगती करून दाखविली आहे* असे उद्गार एका ग्रंथकर्त्यानें काढले आहेत. वरील निसर्गशास्त्रांत मुस्लिमांनीं केलेली कामगिरी, पुढें होणाऱ्या शास्त्रज्ञांस मार्गदर्शक होऊन राहिली आहे. या विषयांवर त्यांनीं लिहिलेलीं पुस्तकें काळजीपूर्वक अभ्यासलीं जातात. अल्‌दमरीं या शास्त्रज्ञानें प्राणि-शास्त्रावर एक महत्त्वाचा ग्रंथ लिहून अजरामर कीर्ति मिळविली आहे. हा प्रसिद्ध ग्रंथ बफनच्या ७०० वर्षें अगोदर लिहिला आहे. अबू-उस्मान या शास्त्रज्ञानें प्राण्यांचा सविस्तर इतिहास लिहिला असून त्यामध्यें अनेक पशूपक्ष्यांची साद्यंत माहिती सांपडते. अल्‌बरुनी यांनीं हिंदुस्तानांत चाळीस वर्षें प्रवास करून निरनिराळे प्राणी व खनिज वस्तु यांची माहिती व गुणविशेष यांविषयीं एक ग्रंथ लिहिला आहे. या शिवाय त्यांनीं Precious Stones वर लिहिलेला प्रबंध निसर्गशास्त्रांत महत्त्वाचा समजला जातो. प्राणिशास्त्राचें यथातथ्य ज्ञान होण्याकरितां मुस्लिमांनीं पशुपक्ष्यांचीं अनेक संग्रहालयें प्रस्थापित केलीं होतीं.

वनस्पतिशास्त्रांत ( Botany ) तर अरब लोकांनीं मोलाची भर घातली आहे. वनस्पतींच्या दोन हजार जातींचा शोध लावून त्यांनीं

* History of Mohamadan Empire in Spain, P. 247.

वनस्पतिशास्त्र समृद्ध करून टाकिलें आहे. कोर्डोवा, फेज, कायरो आणि बगदाद या शहरीं, वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां मोठमोठे बगीचे तयार करण्यांत आले होते. राझी, अली बिन इब्न अब्बास आणि अबू सीना हे वनस्पतिशास्त्रज्ञ मोठ्या योग्यतेचे समजले जातात. इब्नुल बैतार ( इ. स. १२४८ ) यांची तर सर्व वनस्पतिशास्त्रज्ञांचा मुकुटमणि अशी कीर्ति आहे. त्यांनीं युरोप, आफ्रिका व आशिया खंडांत प्रवास केला असून या विषयावर तीन महान् ग्रंथ लिहिले आहेत. एका ग्रंथांत वनस्पतींच्या गुणदोषांची चर्चा केली आहे. दुसऱ्या ग्रंथांत खनिज वस्तूंची सविस्तर माहिती दिली आहे. तिसऱ्या ग्रंथांत प्राण्यांचा इतिहास दिला आहे. या शास्त्रज्ञाविषयीं जेम्स मर्फे नांवाच्या पाश्चात्य ग्रंथकारानें पुढीलप्रमाणें गौरवपूर्ण उद्गार काढले आहेत. "वनस्पतिशास्त्राची माहिती मिळविण्याकरितां त्यांनीं युरोप, आफ्रिका आणि आशिया खंडांतील प्रत्येक भागांत प्रवास केला. निसर्गाच्या तिन्ही राज्यांतील ( वनस्पति, खनिज व प्राणिशास्त्र ) प्रत्येक दुर्मिळ चीज काळजी-पूर्वक पाहून त्याची चिकित्सा केली आणि पौर्वात्य व पाश्चिमात्य देशांतून ज्ञानाची संपत्ति आपल्या माहेरघरीं आणली." या मुस्लिम शास्त्रज्ञांचा पुढें इतका गौरव करण्यांत आला कीं त्यांना दमास्कसचे मुख्य प्रधान नेमण्यांत आलें. इ. स. १२४८ सालीं ते त्याच शहरीं कालवश झाले. नामवंत अरब शास्त्रज्ञांची व्यवस्थित माहिती Haller's Bibliotheca Botanica या ग्रंथांत सांपडते.

## गणितशास्त्र

"गणितशास्त्राच्या मुख्य मुख्य शाखांचा विचार केला असतां, त्यांनीं ( अरब लोकांनीं ) नवीन शोध लावण्यांत अथवा सुधारणा

करण्यांत दाखविलेली बुद्धिमत्ता प्रशंसनीय आहे असें म्हणावें लागेल."*

गणितशास्त्राच्या एका महान् अभ्यासूचे वरील उद्गार वाचल्यानंतर त्या क्षेत्रांत अरबांनीं केवढें उल्लेखनीय कार्य करून ठेविलें आहे याची आपणांस कल्पना येईल. अरब लोकांनीं गणितशास्त्राचें ज्ञान जरी ग्रीक लोकांपासून घेतलें तरी त्यांत त्यांनीं पुष्कळ सुधारणा केल्या व नवीन पद्धति निर्माण केल्या. या शास्त्रांत अरबांनीं केलेलें संशोधन प्रशंसनीय मानलें जातें. हिंदी अंकगणित त्यांना अत्यंत व्यवहार्य वाटल्यामुळें तिचा अंगीकार केला आणि त्या विषयावर पुष्कळ संशोधन करून त्यांनीं अनेक पुस्तकें लिहून ठेविलीं आहेत.

बीजगणिताचे ( Algebra ) उत्पादक अरब आहेत असें कित्येक शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. ज्या विज्ञान् अरब गृहस्थानें बीजगणिताचा शोध लावला त्याच गृहस्याच्या नांवानें (अल् जबर) अद्यापही बीजगणिताचा उल्लेख केला जातो. साबित बिन कुर्रा आणि मोहम्मद बिन मुसा या दोन शास्त्रज्ञांनीं बीजगणितास व्यवस्थित स्वरूप दिलें. उमर बिन इब्राहीम या गणितज्ञानें बीजगणितावर एक महत्त्वाचा प्रबंध लिहिला आहे आणि हा प्रबंध हस्तलिखित स्वरूपांत लीडन युनिव्हर्सिटीच्या लायब्ररींत अद्यापही पहावयास मिळतो. डॉ. ड्रेपर यांनीं 'बीजगणिताचें मूळ ज्ञान आम्हीं अरब लोकांपासून घेतलें आहे.'* असे उद्गार काढले आहेत.

---

* Montucla, Hist. de Mathematiques, Vol. I, P. 362.

* History of the Conflict between Religion & Science by Dr. Draper, Page 305.

बगदादचे खलिफा अल् मामून यांच्या कारकिर्दींत भूमितीचा ( Geometry ) अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास केला गेला. त्यांच्या आश्रयाखालील विद्वान् अरब शास्त्रज्ञांनीं युक्लिड, थिओडोसियस्, हेप्सीक्लस, मेनलास आणि अपोलोनियस या शास्त्रज्ञांच्या भूमितीवरील महत्त्वाच्या ग्रंथांचीं भाषांतरें अरबी भाषेमध्यें केलीं. वरील विद्वानांच्या तोडीचे भूमितिशास्त्रज्ञ अरबांमध्यें निर्माण झाले. त्यांनीं भूमितीवर लिहिलेले ग्रंथ व प्रबंध अद्याप काळजीपूर्वक अभ्यासिले जातात. अरब भूमितिशास्त्रज्ञांविषयीं एक ग्रंथकार लिहितो :—

"ग्रीक विद्वानांच्या ग्रंथांवर ज्यांनीं अधिकारवाणीनें टीका केली आणि विशदीकरण केलें असे अनेक प्रख्यात भूमितिशास्त्रज्ञ अरबांमध्यें निर्माण झाले."*

त्रिकोणमिति (Trigonometry) सारख्या गणित शास्त्राच्या शाखेंत अरब लोकांनीं प्रावीण्य संपादिलें होतें. त्यांनीं त्रिकोणमितीस दिलेलें नवीन स्वरूप अजूनही कायम आहे. त्या शास्त्रांत Chord ऐवजीं Sines चा उपयोग करण्याची प्रथा त्यांनींच सुरू केली. मोहमंद बिन मुसा व मोहमंद अल्-बगदादी या शास्त्रज्ञांनीं त्रिकोण-मितीवर स्वतंत्र ग्रंथरचना केली आहे.

खलिफा अल् मामून यांना गणित शास्त्राच्या ज्ञानाबद्दल केवढा जिव्हाळा वाटत होता हें पुढील उदाहरणावरून सिद्ध होईल. त्या काळीं ग्रीक बादशहाच्या पदरीं लिओ नांवाचा अत्यंत विद्वान गणिती होता. त्याची कीर्ति ऐकून खलिफांनीं आपण होऊन लिओस स्वदस्तुरचें पत्र लिहिलें. त्या पत्रांत त्यांनीं लिओच्या

* History of Mahometan Empire in Spain, P. 253.

विद्वत्तेबद्दल त्याला धन्यवाद देऊन कांहीं दिवस आपल्या सहवासाचा लाभ देण्याबद्दल लिहिलें होतें. लिओ ग्रीक बादशहाच्या पदरीं असल्यामुळें खलिफाकडे जाणें त्याला अशक्य वाटल्यावरून त्यानें पत्राचें उत्तर दिलें नाहीं. शेवटीं खलिफानीं खुद्द बादशहाकडे आपला प्रतिनिधी पाठविला व त्याच्याबरोबर बादशहाला नजराणा म्हणून शंभर पौंड सोनें दिलें. प्रतिनिधीनें बादशहांची भेट घेऊन नजराणा अर्पण केला व लिओस थोडे दिवस कां होईना आपल्याकडे पाठविण्याची खलिफांची विनंती श्रुत केली. ग्रीक बादशहानें खलिफांच्या विनंतीचा स्वीकार केला नाहीं तरीं खलिफांनीं त्या शास्त्रज्ञाबद्दल जी आस्था दाखविली ती पाहून आपण लाजल्याचें त्यानें कबूल केलें.

बनू मुसा, ख्वा रझमी, अल्-कंदी, मुहम्मद, अहंमद मिसरी, अबदुल्ला, अबू सलमाह, इब्न इनूस, अबू बक्र, मोहम्मद नसीरुद्दीन, बहाउद्दिन अमली इत्यादि नामांकित गणितज्ञ मुस्लिमांमध्यें होऊन गेले. इराणमधील अबू वफा (इ. स. ९९८) याची मुस्लिमांमधील अव्वल दर्जाचा गणितज्ञ म्हणून ख्याति आहे.

## वैद्यकशास्त्र

"युरोपमध्यें वैद्यकशास्त्रांत अरब लोकांचें वर्चस्व सर्वांत अधिक काळ टिकलें."*

डॉ. डी. एस् **मार्गोलिओथ**, डी. लिट्.

अरब लोकांनीं वैद्यकशास्त्रांत जें अपूर्व संशोधन केलें आहे तें तर अभूतपूर्व आहे. या क्षेत्रांतील त्यांची कामगिरी म्हणजे

* Mohamedanism, Page 243.

मानवतेची अपूर्व सेवा असें मानलें जातें. रोगराईमुळें त्रस्त झालेल्या जगास त्यांच्या प्रयत्नामुळें आराम व विसांवा मिळाला आहे. रोगाचें बरोबर निदान करणें, त्यावर रामबाण इलाज शोधून काढणें, निरनिराळ्या रोगराईचें संशोधन करून प्रतिबंधक स्वरूपाची उपाय-योजना करणें, रोग्यांची योग्य निगा राहावी म्हणून रुग्णालयांची स्थापना करणें अशा अनेक संस्मरणीय गोष्टी अरब लोकांनीं वैद्यक-शास्त्रांत करून ठेवल्या आहेत. ज्या काळीं रोगराई आली म्हणजे युरोपमधील लोक नवस व अंगारेधुपारे करीत त्या काळीं रोगाचें बरोबर निदान करून त्यावर औषधोपचार करण्याची पद्धत पाहिली म्हणजे अरब लोक किती सुधारलेले व आघाडीवरचे लोक होते आणि वैद्यकज्ञानाबद्दल केवढी आस्था वाटत होती हें सिद्ध होतें. प्रसिद्ध ग्रंथकार एडवर्ड गिबन यानें "वैद्यकशास्त्राचा विचार केला असतां अरब लोकांची मुक्त कंठानें प्रशंसाच करणें योग्य ठरेल" असें त्यांच्याबद्दल उद्गार काढले आहेत.

अरबांनीं वैद्यकशास्त्राचें ज्ञान ग्रीक व सीरियन लोकांपासून घेतलें तरी त्यामध्यें त्यांनीं एवढी भर घातली आहे कीं अरब लोकच वैद्यकशास्त्राचे प्रणेते आहेत असें समजलें जातें. जाति-धर्माचा विचार न करतां त्यांनीं मुस्लिमेतर विद्वानांस उदार आश्रय देऊन त्यांच्याकडून ग्रीक, सीरियन, पर्शियन भाषेंतील वैद्यकशास्त्रा-वरील बहुमोल ग्रंथांचें अरबीमध्यें भाषांतर करवून घेतलें. त्या काळीं अल्-मन्सूरनें अरबी भाषेंत वैद्यकशास्त्रावर अमूल्य ग्रंथसंभार निर्माण केला. १७ व्या शतकापर्यंत म्हणजे जवळजवळ पांचशें वर्षें युरोप-मध्यें वैद्यकशास्त्राची भाषा अरबी होती. वैद्यकशास्त्राचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणारास प्रथम अरबी भाषेचा अभ्यास केल्यावांचून

गत्यंतरच नव्हतें. एक ग्रंथकार म्हणतो, "अरबांनीं वैद्यकशास्त्र अरबी भाषेंत आणलें म्हणून आपण अल् मन्सूरचे आभारी राहिलें पाहिजे. त्यानें Gorge Baktishus नांवाच्या विद्वानाकडून ग्रीक, सिरियन आणि पर्शियन भाषेमध्यें असणाऱ्या अनेक वैद्यक ग्रंथांचें अरबी भाषेमध्यें भाषांतर करविलें."* नुसतीं भाषांतरें करून स्वस्थ न बसतां अरबांनीं त्या शास्त्रावर स्वतंत्रपणें अनेक ग्रंथ लिहून ते प्रसिद्ध केले. अबू बक्र मुहम्मद इब्न झकरिया अल्-राझी (इ. स. ८६५-९२५) नांवाचे वैद्यकशास्त्रांत पारंगत असे विद्वान् होऊन गेले. युरोपमध्यें ते Razes या नांवानें सुविख्यात आहेत. खलिफा अल-मन्सूरी यांनीं त्यांना उदार आश्रय देऊन त्यांच्याकडून 'वैद्यकशास्त्राचा ज्ञानकोश' लिहवून घेतला. या ज्ञानकोशाचे दहा खंड आहेत. या शिवाय अल्-राझी यांनीं वैद्यकशास्त्रावर २०० ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं बऱ्याच ग्रंथांचीं भाषांतरें व्हेनिसमध्यें १५१० सालीं प्रसिद्धिलीं गेलीं. त्यांचा महत्त्वाचा प्रबंध म्हणजे "देवीचा आजार व त्यावर उपाय" हा होय. या अरबी भाषेंतील प्रबंधाची ग्रींनहिलकडून इ. स. १८४७ सालीं ग्रीक, लॅटिन, जर्मन व इंग्रजी भाषांमध्यें भाषांतरें प्रसिद्ध करण्यांत आलीं. देवीच्या आजारावर संशोधन करणारा पहिला शास्त्रज्ञ म्हणून अल् राझींची कीर्ति चिरंजीव होऊन राहिली आहे.

अल् तबरी (इ. स. ९०४) नांवाच्या शास्त्रज्ञानें 'फिरदौस-उल्-हिकमत' नांवाचा अभूतपूर्व ग्रंथ लिहिला असून तो सात भागांत विभागला आहे. अली बिन अब्बासनें 'किताब-इ-मालकी' नांवाचा

* Friend's History of Medicine, Vol. II.

ग्रन्थ प्रसिद्ध केला असून तो वैद्यकशास्त्रावरील महत्त्वाचा ग्रन्थ समजला जातो.

दहाव्या शतकांत अबू सीना (इ. स. ९८०-१०३७) नांवाचे विद्वान शास्त्रज्ञ जन्मास आले. त्यांचें संपूर्ण नांव अबू अली-हुसेन इब्न अबदुल्ला इब्न सीना असें असून ते युरोपमध्यें Avicenna या नांवानें प्रख्यातीस आले. त्यांच्यासारखा वैद्यक शास्त्राचा अभ्यासू विद्वान झाला नाहीं असें म्हणतात. युरोपियन वैद्यक शास्त्रांत त्यांनीं आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. एक ग्रंथकार म्हणतो :—

> " अरब लोकांचा गॅलन ( Galen ) म्हणून अबू सीना यांना संबोधिलें जातें आणि खरोखरीच जगांत होऊन गेलेल्या अव्वल दर्जाच्या शास्त्रज्ञांमध्यें त्यांची गणना केली जाते."*

त्यांचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ अल्-कानून ( Canon of Medicine) अरबी भाषेंत रोम शहरीं प्रसिद्ध झाला. त्याचीं अनेक भाषांतरें झालीं आहेत. वैद्यक शास्त्रांत अत्यंत महत्त्वाचा ग्रन्थ म्हणून त्याची कीर्ति आहे. एक ग्रंथकार म्हणतो, "सोळाव्या शतकामध्यें युरोपमधील विश्वविद्यालयांत अल्-राझीचा ज्ञानकोश आणि अबू सीनाचा अल्-कानून या दोन ग्रंथांवरच आधारलेलीं व्याख्यानें होत असत."‡

अबू सीना नंतर अबुल वलीद मोहम्मद इब्न रुश्द (इ. स. ११२०-११९८) नांवाचे शास्त्रज्ञ स्पेनमध्यें होऊन गेले. ते युरोपमध्यें

---

* Europe's Debt to Islam by Zaidi, P. 23.

‡ The Arab Civilization by Joseph Hell, P. 91.

Averroes या नांवानें सर्वत्र ओळखले जातात. 'अल्-कुल्लीयात' (Colliget) या नांवानें प्रसिद्ध पावलेल्या महान ग्रंथाचें जनकत्व इब्न रुश्दकडे आहे. या शास्त्रज्ञांनीं वैद्यक शास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले असून त्यांची योग्यता अबू सीना यांच्या बरोबरीची समजली जाते. त्या दोघांबद्दल एक ग्रंथकार म्हणतो, "अबू सीना व इब्न रुश्द या दोघांनीं सोळाव्या शतकापर्यंत वैद्यकशास्त्रावर प्रभुत्व गाजविलें." *

बाराव्या शतकाच्या सुरुवातीस अबू मेरवान अबदुल मलिक इब्न जहूर नांवाचे शास्त्रज्ञ उदयास आले. सबंध युरोप त्यांना Avenzoar या नांवानें ओळखूं लागला. त्यांनीं लिहिलेला 'अत तयसीर' नांवाचा ग्रंथ अत्यंत उपयुक्त समजला जातो. त्यांनीं लावलेले अनेक वैद्यक शोध त्यामध्यें संग्रहित करण्यांत आले आहेत. या ग्रंथाचीं अनेक भाषांतरें झालीं आहेत. इब्न जहूर यांचा शारीर-शास्त्र (Anotomy) हा आवडता विषय असल्यामुळें त्यावर त्यांनीं केलेलें संशोधन प्रशंसनीय मानलें जातें.

यांखेरीज अनेक मुस्लिम शास्त्रज्ञांनीं वैद्यकशास्त्रांत आपल्या अनुभवाची व विद्वत्तेची भर घातली आहे. अबु बक्र मोहम्मद इब्न बाजा ( Avempace ) यांनीं वैद्यकशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहून ठेविले आहेत. अली इब्न ईसा, अबू याकूब इसहाक, उमर इब्न अली हे तर विख्यात नेत्रशास्त्रज्ञ होते. त्यांनीं नेत्ररोगावरील वाङ्मयांत मोलाची भर घातली आहे. त्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें लॅटिनमध्यें झालीं असून युरोपमध्यें इ. स. १७५० पर्यंत हीं पुस्तकें अभ्यासक्रमांत दाखल करण्यांत आलीं होतीं. मूसा इब्न मयमून

* Historian's History of the World, Vol. 8, P. 270.

( Mainonides ) या शास्त्रज्ञानीं आहार व आरोग्य यांवर ग्रंथ-रचना केली आहे. विषबाधा व त्यावर उपाय यावरही त्यांनीं विस्तृत प्रबंध लिहिला आहे. सुलतान सलाहुद्दीन यांच्या दरबारीं प्रमुख हकीम म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. इब्न वफीद ( Aben guifit ) यांनीं ' रोगावर सोपे उपाय ' या नांवाचें पुस्तक लिहिलें असून त्या उपयुक्त पुस्तकाच्या अल्पावधींत साठ आवृत्त्या निघाल्या आहेत. अरीब इब्न सैद अल् खतीब हे तर स्त्रियांच्या रोगाचे तज्ज्ञ म्हणून ख्यात होते. गर्भाची वाढ व गर्भवती स्त्रियांची निगा यांवर त्यांनीं विद्वत्तापूर्ण प्रबंध लिहिला आहे. अबुल हसन इब्न हैबतुल्ला नांवाचा शास्त्रज्ञ विशेष ख्यात आहे. मानवाच्या उत्पत्तीवर त्यांनीं " मकुला फी खलकिल इन्सान " नांवाचा ग्रंथ लिहिला असून शेवटच्या पन्नास प्रकरणांत त्यांनीं मानसशास्त्राचा विचार केला आहे. जयनुद्दिन इस्माईल यांनीं एक प्रचंड ग्रंथ लिहिला असून अबू सीनाकृत अल् कानूनच्या खालोखाल या ग्रंथाची योग्यता आहे. या ग्रंथाचे दहा भाग करण्यांत आले आहेत. यांखेरीज आणखी कितीतरी मुस्लिम विद्वानांनीं वैद्यकशास्त्रावर ग्रंथ लिहून ठेविले आहेत. एक ग्रंथकार म्हणतो, " एफ्. डस्टन-फील्ड ( इ. स. १८०८-१८९९ ) यांनीं वैद्यकशास्त्रावर ग्रंथ लिहिणारे ३०० वर मुस्लिम विद्वान् होते असें नमूद केलें आहे. ॲडॉल्फ फौंटन यांनीं आपल्या ' Zur Quellen kunde der persische ' या ग्रंथांत नुसत्या इराणी भाषेंतच मुस्लिमांनीं ४०० ग्रंथ वैद्यकशास्त्रावर लिहिले आहेत अशी माहिती सांपडते."†

निरनिराळ्या रोगांच्या संशोधनाबरोबर मुस्लिमांचें औषधें तयार

† Outline of Islamic Culture, Vol. I, P. 193.

करण्याचें कार्य सुरूच होतें. प्रयोगशाळेंत औषधांचे प्रयोग करून
त्यांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचें कार्य अरब लोकांनीं
प्रथमच केलें. लोकांची फसवणूक करणारीं नकली औषधें बाजारांत
विकलीं जाऊं नयेत याबद्दल विलक्षण दक्षता घेतली जात असे. एक
ग्रंथकार म्हणतो, "औषधें तयार कशीं करावीं याचीं पुस्तकें प्रसिद्ध
करण्याचें श्रेय अरब लोकांनीं प्रथम घेतलें आहे. औषधें तयार
करून विकणारीं दुकानें मॅजिस्ट्रेटच्या सक्त देखरेखेखालीं चालत.
अस्सल चीजा वापरल्या आहेत किंवा नाहींत व तीं योग्य
किंमतीस विकलीं जातात किंवा कसें या गोष्टींवर मॅजिस्ट्रेटचें
लक्ष असे."* वाटेल त्यानें उठावें व वाटेल तीं औषधें तयार करावीं
आणि विकावीं असा आंधळा कारभार नव्हता. तज्ज्ञांकडून औषधें
तयार करून घ्यावयाचीं आणि ज्यांना परवाने असतील त्याच
दुकानदारांनीं तीं योग्य किंमतीस विकावयाचीं ही पद्धत मुस्लिम
अमदानींत सर्वत्र रूढ होती.

दांतांच्या रोगाचें बरोबर निदान करून त्यावर उपाययोजना
करावयाचें महत्त्वाचें कार्य अरबांनींच सुरू केलें. दांत दुखूं लागला
कीं तो ईश्वरी कोप समजून त्यावर चमत्कारिक व हास्यास्पद उपाय
योजना करण्याचा प्रघात त्या काळीं युरोपमध्यें होता; पण अरब
लोक दंतरोगावर औषधी पाण्यानें चुळा भरून जंतुविनाशक
औषधांचा उपयोग करीत. किडलेला दांत काढून त्यामुळें झालेली
पोकळी भरून काढीत. पायोरिया नांवाच्या भयंकर दंतरोगाचा
शोध अबुल कासीम या विख्यात शास्त्रज्ञानें प्रथम लाविला. एक ग्रंथ-

* Beckmann's History of Inventions, Vol. II, P. 127.

कार म्हणतो, "ज्या वेळीं आजचा पुढारलेला युरोप हजारों वर्षें मागासलेला होता व तेथें दंतरोग असूं शकतो याची कल्पनाही नव्हती त्या काळीं मुस्लिमांच्या पदरीं कुशल व तज्ज्ञ दंतवैद्य होते. इनॉक्युलेशन करण्याची प्रथा कॉन्स्टँटिनोपल येथें मुस्लिमांनीं प्रथम सुरू केली. तेथून लेडी मेरी मॉंटेग्यू नांवाच्या स्त्रीनें १७२१ सालांत ती इंग्लंडमध्यें सुरू केली; त्या वेळीं पाद्री लोकांनीं व धर्मपंडितांनीं इनॉक्युलेशन विरुद्ध केवढें काहूर उठविलें होतें हें वाचकांना माहीत असेलच.

"प्राचीन लोकांस अगम्य असणाऱ्या अनेक शस्त्रक्रिया अरब लोक करीत असत."*

शस्त्रक्रियेचे अरब लोक प्रणेते मानले जातात. औषधांना दाद न देणारे असाध्य रोग शस्त्रक्रिया करून बरे करण्याचा प्रघात पहिल्या प्रथम अरबांनीं केला ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्याचप्रमाणें शस्त्रक्रिया करतांना रोग्यास वेदना होऊं नयेत म्हणून त्याला भूल (Tare) देण्याचा उपक्रमही त्यांनींच सुरू केला. त्या काळीं शस्त्रक्रियेंत अरबांनीं इतकी पारंगतता मिळविली होती कीं अखिल युरोपमधील लोक, खलिफांच्या दरबारीं असणाऱ्या मुस्लिम डॉक्टरांकडे येत. आजच्या सुधारलेल्या काळांतील शस्त्रक्रिया व अरब लोकांनीं ११ व्या शतकांत केलेल्या शस्त्रक्रिया यांत साम्य दिसून येतें. यावरून अरबांनीं शस्त्रक्रियेंत केवढें नैपुण्य मिळविलें असेल याची आपणांस कल्पना येते. एक ग्रंथकार म्हणतो :—

"अबुल कासीम हा अकराव्या शतकांतील विख्यात शस्त्रवैद्य

* Historian's History of the World, Vol. 8, P. 280.

होता आणि त्यानें त्या काळीं केलेल्या शस्त्रक्रिया आजच्या शस्त्रक्रियेच्या पद्धतीशीं साम्य दर्शवितात."†

—स्टॅन्ले लेनपूल

अबुल कासीम ( इ. स. १०१३-११०६ ) हे तर त्या काळीं निष्णात शस्त्रवैद्य समजले जात असत. त्यांनीं शस्त्रक्रियेंत इतकें विलक्षण प्रावीण्य संपादन केलें होतें कीं युरोपखंडांतील सर्व देशांतून उदयोन्मुख तरुण शस्त्रक्रिया शिकण्याकरितां त्यांच्याजवळ येत. त्यांच्या हाताखालीं शिकून गेलेल्या शस्त्रवैद्यांनींच युरोपमध्यें जाऊन शस्त्रक्रिया करण्यास सुरुवात केली. युरोपियन ग्रंथकारांनीं त्यांना 'शस्त्रक्रियेचा प्रणेता' अशी मानाची संज्ञा दिली आहे. अबुल कासीम हे पाश्चात्य देशांत Abulcasis या नांवानें सुविख्यात पावले आहेत. एक ग्रंथकार म्हणतो:—

"मध्ययुगीन काळांत अबुल कासीम हे अत्यंत विख्यात शस्त्रवैद्य आहेत असें सर्वत्र मानलें जाई."*

—जोसेफ हेल

अबुल कासीम यांनीं केलेल्या अनेक शस्त्रक्रियांची एक जंत्री जपून ठेवण्यांत आली आहे. शस्त्रक्रिया करण्याकरितां वापरण्यांत येणाऱ्या शस्त्रांना त्यांनीं जीं नांवें दिलीं आहेत तीं अद्यापही चालू आहेत. 'अल-तसरीफ' हें त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथाचें नांव असून तो ग्रंथ तीस भागांत विभागला आहे.

अरब लोकांनीं वैद्यकशास्त्रांत आणखी एका अभिनव कल्पनेचा

† Moors in Spain, P. 144.
* The Arab Civilization, P. 97.

पाया घातला. रुग्णालयें (Hospitals) काढण्याची प्रथा त्यांनींच सुरू केली आहे. गोरगरीब, अनाथ अशा रोग्यांची व्यवस्था होत नाहीं, त्यांच्या शुश्रूषेची आबाळ होते, याकरितां सार्वजनिक रुग्णालयें प्रस्थापित करण्याचें श्रेय त्यांनीं मिळविलें आहे. इ. स. १२८५ मध्यें सुलतान मन्सूरनें एक भव्य रुग्णालय बांधण्यास सुरुवात केली व तें कार्य त्याचा मुलगा नझीर यानें १२९३ मध्यें परिपूर्ण केलें. या रुग्णालयांत सर्व प्रकारची व्यवस्था ठेवण्यांत आली होती. एकाद्या राजप्रासादास लाजवील अशा प्रकारची आरामपूर्ण व्यवस्था त्या रुग्णालयामध्यें असे. रोग्यांना आल्हाद वाटण्याकरितां मधुर वाद्यांचे गोड आलाप दिवसभर ऐकूं येत. जोसेफ हेल म्हणतो :

" राजे लोकांच्या राजमहालाप्रमाणें त्या रुग्णालयांत ठिकठिकाणीं खळखळणारे निर्झर दृष्टीस पडत व दिवसभर गोड वाद्यें वाजविलीं जात."*

या रुग्णालयांचा खर्च खलिफा आपल्या खासगी पैशांमधून करीत. सुप्रसिद्ध ज्यू प्रवासी बेंजामिन हा १२ व्या शतकांत बगदाद येथें गेला असतां त्याला बगदाद शहरांत सहा सुसज्ज व ऐश्वर्यपूर्ण अशीं रुग्णालयें आढळून आलीं. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे रोगी बरा होऊन रुग्णालयाबाहेर आल्यानंतर त्याला पांच सोन्याचीं नाणीं देण्यांत येत. कांहीं दिवस तरी परिश्रम न करितां त्या रोग्याला राहतां यावें हाच उद्देश या औदार्याच्या बुडाशीं होता. स्त्रियांच्याकरितां खास " जनाना रुग्णालयें " त्याच काळीं अस्तित्वांत आलीं. या सर्व रुग्णालयांचें

* The Arab Civilization, Page 117-

खास वैशिष्टय म्हणजे "तीं ऋतुपरत्वें उष्ण किंवा थंड ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आली होती."*

त्याचप्रमाणें आंधळे, महारोगी व वेडे यांच्याकरितां स्वतंत्र रुग्णालयें प्रस्थापित करण्यांत खलिफा अल् वलीद यानें पुढाकार घेतला होता. सर्व रुग्णांना मोफत उपचार व अन्न देण्यांत येत असे. वेडयांच्या इस्पितळांत त्यांच्या खोल्या विशेष शृंगारलेल्या असत.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून वैद्यकशास्त्रांत मुस्लिमांनीं केवढें असामान्य कार्य करून ठेविलें आहे याची सर्वसाधारण कल्पना वाचकांना येईल.

## संकीर्ण शोध

मुस्लिमांनीं विज्ञानाच्या निरनिराळ्या शाखेंत केवढे शोध लाविले आहेत याचें विवेचन आतांपर्यंत थोडेंफार केलें आहे. याखेरीज त्यांनीं लाविलेल्या कांहीं संकीर्ण शोधांचा थोडक्यांत विचार करावयाचा आहे. कागद किंवा होकायंत्राप्रमाणें बंदुकीच्या दारूचे उत्पादक तेच आहेत. एक ग्रंथकार म्हणतो, "युरोपियन लोकांच्या स्वप्नांत देखील जी गोष्ट आली नाहीं त्या गोष्टीचें (बंदुकीची दारु) ज्ञान अरबांना सुपरिचित होतें. त्यांच्या या नव्या शोधामुळें जगाच्या लष्करी परिस्थितींत केवढी तरी क्रांती झाली. लढाईच्या वेळीं ते दारुगोळा तयार करीत व तो युद्धांत वापरीत. इ. स. ६९० सालीं मक्केच्या वेढयांत एक प्रकारचा स्फोटक गोळा त्यांनीं वापरला होता. अकराव्या शतकांत ट्युनिसचे राजे व

* The Arab Civilization, P. 118.

सेव्हेलीचे अमीर यांच्यामधील लढाईंत कितीतरी मार्गानें दारूचा उपयोग करण्यांत आला. इ. स. १२०५ मध्यें महादीयाच्या वेढया-मध्यें अमीर याकूबनें तोफखान्यांचा उपयोग केला. इ. स. १३४२ सालीं अलजे किरसचा वेढा पडला होता, त्या वेळीं दारु-गोळयाचा केलेला उपयोग लॉर्ड डर्बी व सॅल्सबरी या दोघां इंग्रज उमरावांनीं समक्ष पाहिला. या दारुगोळयाचा परिणाम या दोघांनीं पाहिल्यानंतर तें गुपित त्यांनीं आपल्या देशास नेलें. पुढें चार वर्षांनीं क्रेसीच्या समरभूमीवर त्याचा उपयोग त्यांनीं करून पाहिला. याखेरीज कानठळ्या बसविणारीं व आग ओतणारीं लष्करी आयुधें मुस्लिमांनीं आपल्या कारखान्यांत तयार केलीं. हॉव्हिट्झरचा शोध त्यांनींच लाविला आहे." † "मुस्लिमांनीं लावलेल्या कागद, बंदुकीची दारू व होकायंत्राच्या शोधामुळें आधुनिक युरोपचें स्वरूप पार पालटून गेलें आहे." * असे यथार्थ उद्गार एका इतिहास-कारानें काढले आहेत.

उदकस्थिति शास्त्र (Hydrostatics) व प्रकाश शास्त्र (Optics) या दोन शास्त्रांत मुस्लिमांनीं लावलेले शोध शिरोधार्य मानले जातात. या शास्त्रांसंबंधी प्रचलित असणारे सिद्धांत मुस्लिम शास्त्रज्ञांनीं संपूर्णपणें खोडून काढले आहेत. या संबंधी डॉ. ड्रेपर लिहितो,

"उदकस्थिति शास्त्रांतील द्रव पदार्थांच्या विशिष्ट गुरुत्वाचीं कोष्टकें त्यांनींच प्रथम बनविलीं आणि पाण्यांत बुडणाऱ्या व तरंग-णाऱ्या पदार्थांविषयीं चर्चात्मक प्रबंध लिहिले. 'प्रकाशाचे किरण डोळ्यांपासून निघून दृश्य पदार्थांवर पडतात' हा ग्रीक शास्त्रज्ञांचा

† Europe's Debt to Islam, Page 38.
* History of Mohamedan Empire in Spain, P. 320.

सिद्धांत त्यांनीं खोडून काढला व असें प्रतिपादलें कीं पदार्थापासून
येणारा किरण डोळ्यांत शिरतो.. त्यांना प्रकाशाचें परावर्तन व
वक्रीभुवन माहित होतें. अल्-हसननें वातावरणांतून येणाऱ्या
प्रकाशाच्या किरणांचा मार्ग वक्ररेषांचा बनलेला असतो, हा मोठा
शोध लाविला आणि त्यामुळें सूर्य व चंद्र उदयापूर्वीं व अस्ता-
नंतर थोडा वेळ दिसतात हें सिद्ध केलें."*

## शेती व उद्योगधंदे

इस्लामच्या दृष्टीनें शेती, उद्योगधंदे व व्यापार यांना मोठें स्थान आहे. आधिभौतिक शास्त्रांचा अभ्यास करण्यांत मुस्लिमांनीं जी तत्परता दाखविली तशीच ती मानवी जीवनास अत्यंत आवश्यक असणाऱ्या कृषिशास्त्रांतही दाखविली आहे. मुस्लिमांनीं युरोपमध्यें पदार्पण केलें त्या वेळीं युरोपियन लोक कृषिशास्त्रांत बरेच मागासलेले होते. शेताची मशागत, सुपीकता आणि नवीन लागवड या बाबतींत अरब लोक युरोपचे मार्गदर्शक बनले. तांदूळ वगैरेसारखीं अन्नधान्यें त्या वेळीं युरोपला माहित नव्हतीं. एक संशोधक म्हणतो, "तांदूळ, ऊंस, कापूस, केशर वगैरेची ओळख स्पॅनिश लोकांना मुस्लिमांनींच प्रथम करून दिली." † युरोपमध्यें कित्येक ठिकाणीं रुक्ष व उजाड जमिनी होत्या, त्या अरबांनीं सुपीक करून टाकल्या. स्पेन तर कंगाल देश समजला जात होता; पण अरब लोकांचें त्यावर अधिपत्य आल्यानंतर थोड्याच काळांत तो देश समृद्ध झाला. शेतीच्या उत्कर्षावर राष्ट्रांचें उत्कर्ष अवलंबून असतें ही खूणगांठ

* History of the Conflict between Religion & Science, P. 116–17.

† Backmann's History of Inventions, Vol. I, 4.

मनाशीं बांधून अरब मुस्लिमांनीं त्या क्षेत्रांत बरेंच संशोधन केलें आहे. बीं-बियाणें यांवर निरनिराळे प्रयोग करून शेतीला आवश्यक असणाऱ्या अनेक अवजारांचे शोध त्यांनीं लाविले आहेत. पाटबंधारे व कालवे यांचें जनकत्व तर त्यांच्याकडेच जातें. पर्वतावरून वाहणारे पाण्याचे प्रवाह अडवून त्यांचा उपयोग जमीन भिजविण्यांत ते करीत. समृद्ध पीक यावें याकरितां खताचा उपयोग त्यांनींच सुरू केला. एका खड्डयांत खत घालून तें ठराविक काळापर्यंत त्यांत ठेवीत व नंतर तें खत शेतीस वापरीत. कृषिशास्त्रामध्यें त्यांनीं केवढी पारंगतता मिळविली आहे याविषयीं एका ग्रंथकारानें काढलेले उद्गार मनन करण्यासारखे आहेत. तो म्हणतो, "हवा व माती यांचें पूर्ण ज्ञान करून घेऊन त्यांनीं शेतकीचें संशोधन केलें आहे.... अरबांच्या शेतकीशास्त्राइतकें अत्यंत उपयुक्त व परिपूर्ण शास्त्र युरोप, आशिया किंवा आफ्रिका खंडांतील एकाही राष्ट्रांत नव्हतें." † अबू उमर, अबू अब्दुल्ला व अबू झकीया या तज्ज्ञांनीं शेतकीशास्त्रावर अमूल्य ग्रंथ लिहून ठेविले आहेत.

मुस्लिम अमदानींत उद्योगधंद्यांना अत्यंत प्रशंसनीय असें उत्तेजन मिळाल्यामुळें उद्योगधंद्याचा विकास व उत्कर्ष झाला. सोनें, चांदी, लोखंड, शिसें वगैरे अनेक धातू खाणीमधून काढण्याचें शास्त्र त्यांना चांगलें अवगत होतें. पोलादाची प्रचंड प्रमाणावर त्यांनीं निर्मिती केली. या सर्व धातूंचे जिन्नस तयार करण्याचे अनेक कारखाने अरब मुस्लिमांनीं प्रस्थापित केले. यांखेरीज कांचसामान, मातीचीं डौलदार भांडीं, तलम कापड, रेशीम व लोकरीचे कपडे तयार करण्यांत त्यांनीं अग्रपूजेचा मान मिळविला आहे. "नुसत्या

† The History of Mahomedan Empire in Spain, P.260.

कोडावा शहरांतच रेशमाचे सोळा हजार माग होते. सेव्हीली शहरांत एक लक्ष तीस हजार विणकाम करणारे लोक होते. ''*

मुस्लिमांनीं कागदाची केलेली निर्मिती तर अत्यंत महत्त्वाची आहे. एक ग्रंथकार म्हणतो, ''अरबांनीं केलेल्या कागदाच्या उत्पादनामुळें जगाच्या संस्कृतीमध्यें मोलाची भर पडली आहे.'' ‡ कातडें कमावण्याची कला अरबांनींच सर्व जगाला शिकविली आहे. स्पेनमध्यें कातडयाचे मोठे कारखाने अस्तित्त्वांत होते. रसायनशास्त्र मुस्लिमांना अवगत असल्यामुळें कातडें रंगविण्यांत ते तरबेज होते. हल्लीं जें उत्कृष्ट कातडें समजलें जातें त्यास मोरोक्को व कोडावा या नांवांनीं अद्याप संबोधिलें जातें. शेतकी व उद्योगधंद्यामध्यें मुस्लिमांनीं जें मानाचें स्थान मिळविलें होतें त्याबद्दल विख्यात शास्त्रज्ञ एच्. जी. वेल्स यांनीं काढलेले उद्गार अत्यंत महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, ''कलाकुसरीची विविधता, सौंदर्य आणि पूर्णत्व या बाबतींत ते जगाच्या आघाडीवर होते. सोनें, चांदी, तांबें, ब्रॉंझ, लोखंड आणि पोलाद इत्यादि सर्व धातूंचा उपयोग ते करीत. विणकर कापडांत त्यांच्याइतकी कुणीही प्रगती केली नाहीं. अत्युत्कृष्ट अशी कांच व मातीचीं भांडीं ते तयार करीत. रंगकामाचें गुपित त्यांना माहित होतें; कागदाचें उत्पादन ते करीत. कातडें कमवण्याच्या त्यांच्या पुष्कळ पद्धती होत्या आणि त्यांचें हें काम सबंध युरोपमध्यें ख्यात होतें. ते अर्क व शरबतें तयार करीत; उंसापासून साखर काढीत; शास्त्रोक्त रीतीनें ते शेतकी करीत; पाटबंधारे यांच्या चांगल्या पद्धती त्यांनीं आत्मसात केल्या होत्या. बागाईतामध्यें तर त्यांचा हात

* Outline of Islamic Culture, Vol. I, P. 203.

‡ Europe's Debt to Islam, Page 32.

धरणारा कोणीही नव्हता. कलमें कशीं बांधावीं, विविध प्रकारचीं फुलें व फळें यांची निपज कशी करावयाची या बागाईत शास्त्रामध्यें तर त्यांची बरोबरी करणारे दुसरे कोणी नव्हते. पूर्वेकडील अनेक वृक्ष व वनस्पती यांची लागवड त्यांनीं पाश्चात्य देशांत केली आणि शेतकीवर शास्त्रोक्त असे प्रबंध लिहिले. " †

## व्यापार व आरमार

व्यापार हें मुस्लिम संस्कृतीचें एक महत्त्वाचें अंग आहे. व्यापार म्हणजे नुसते पैसे मिळविण्याचेंच साधन नसून आंतरराष्ट्रीय संबंध अधिक घनिष्ट करण्याचा तो एक उत्कृष्ट मार्ग आहे असें मुस्लिम समजतात. व्यापारामुळें जागतिक कुटुंबांतील एक घटक या नात्यानें राहण्याची मनोभूमिका तयार होते असा त्यांचा विश्वास आहे. याशिवाय मुस्लिमांच्या पवित्र धर्मग्रंथांत—पवित्र कुराणमध्यें—व्यापारास प्रोत्साहन देणें व त्याचा अवलंब करणें ही अत्यावश्यक गोष्ट आहे असें स्पष्टपणें नमूद केल्यामुळें व्यापार करणें ही एक धर्माज्ञाच आहे असें मुस्लिम मानतात. पवित्र कुराणाखेरीज कोणत्याही धर्मग्रंथांत व्यापारास धर्माज्ञेचें स्वरूप दिल्याचें आढळून येत नाहीं.

व्यापारामुळें मनुष्याचा आध्यात्मिक विकास होऊं शकतो. व्यापाराकरितां अनेक ठिकाणीं प्रवास केल्यामुळें मनुष्यस्वभावाचे निरनिराळे प्रकार, चालीरीति व प्रघात यांचा परिचय होऊन तारतम्य दृष्टी प्राप्त होते. 'अवलोकन व औत्सुक्य' यांमुळें जुन्या-पुराण्या कल्पना व रूढी यांचें वैफल्य चटकन नजरेंत भरतें.

† Outline of History, Page 434–35.

चिकित्सक दृष्टीनें विचार करण्याची वृत्ति अंगीं बाणते. व्यापार हें आध्यात्मिक क्रांतीचें एक महान साधन आहे असें इस्लाम मानतो.

मुस्लिम सत्ता ज्या ठिकाणीं प्रस्थापित झाली त्या ठिकाणीं व्यापाराचा उत्कर्ष होत गेला असें आपणांस दिसून येईल. मुस्लिम राजवटींत व्यापाराकरितां अनेक सवलती देण्यांत आल्या, इतकेंच नव्हे तर वाहतुकीकरितां खास रस्ते तयार करण्यांत आले; वालुकामय प्रदेशांत, रस्त्यालगत ठिकठिकाणीं विहिरी व तलाव खोदण्यांत आले; व्यापाऱ्यांना, प्रवाश्यांना उतरण्याकरितां सराई किंवा धर्मशाळा बांधण्यांत आल्या. निर्जन प्रदेशांतून जातांना व्यापारी काफिल्यावर हल्ला होऊं नये म्हणून त्यांस सरकारी संरक्षण देण्यांत येत असे. एक ग्रंथकार म्हणतो, "व्यापारी काफिल्यांना विश्रांतीकरितां विश्रांतिस्थानें बांधण्यांत आलीं, रस्ते तयार करण्यांत आले, टपालखात्याची सोय करण्यांत आली, आणि व्यापाऱ्यांना सर्व प्रकारच्या सवलती देण्यांत आल्या. व्यापारामुळें स्पेनपासून तो थेट चीनपर्यंत अरबी ही सर्वसामान्य भाषा झाली.... रेई, इस्पहान, हिरान, निशापूर हीं शहरें चीन व हिंदुस्थानच्या मार्गावर वसविलीं गेलीं. रशियांशीं व्यापार सुरू करण्यांत आला. युरोपियन व ज्यू व्यापाऱ्यांमार्फत इंग्लंड, नार्वे व स्वीडन देशांत त्यांचा व्यापार चालू होता हें त्या वेळीं प्रचलित असलेल्या व हल्लीं त्या देशांत सांपडलेल्या इस्लामी नाण्यांवरून सिद्ध होतें. खोरासान व खीवमधून रशियामधील होल्गा व डोन नद्यांच्या मुखापर्यंत मुस्लिम व्यापाऱ्यांनीं मजल मारली. फर, मेण व मध इत्यादि रशियन वस्तूंच्या मोबदल्यांत रेशीम, कापूस व कापड पुरविण्यांत

येत असे. ईशान्येस सैबिरिया व चिनी तुर्कस्थानांत व्यापारी काफिले घुसले." †

व्यापारामुळें मदिना, कुफा, बसरा, कायरो, दमास्कस, मोसल, बगदाद, कोर्डोवा, सेव्हेली, तालदो हीं प्रमुख मुस्लिम शहरें विलक्षण भरभराटीस आलीं. तोच ग्रंथकार म्हणतो, "मुस्लिमांच्या कारकिर्दीत १० लाखांपासून ४० लाख नागरिकांची वस्ती असलेलीं अनेक शहरें होतीं. फक्त ईजिप्तमध्येंच छत्तीस हजार मशिदी होत्या. बगदाद शहरांत साठ हजार स्नानगृहें होतीं. वर लिहिलेल्यांपैकीं अर्धी संख्या खरी आहे असें जरी मानलें तरी त्या शहरांच्या उत्कर्षाची आपणांस कल्पना येते. फ्रेंच ग्रंथकारांच्या आधारें तालदो शहराची २० लाख व कोर्डोवाची १० लाख लोकसंख्या होती. कोर्डोवाच्या मशिदींत आठ हजार दिव्यांची रोषणाई केली जात असे व त्याकरितां वीस हजार पौंड तेल वापरण्यांत येत असे." *

व्हिक्टर रॉबिनसन् नांवाच्या आणखी एका ग्रंथकारानें ज्या वेळीं मुस्लिम शहरें संस्कृतीचीं केंद्रें बनलीं होतीं, त्या वेळीं युरोप केवढा मागासलेला होता याचें वर्णन केलें आहे. तो म्हणतो, "सूर्यास्तानंतर युरोपमध्यें सर्वत्र अंधःकार तर कोर्डोवामध्यें सार्वजनिक दिव्यांचा झगझगाट असे; युरोप अस्वच्छ होता तर कोर्डोवामध्यें एक हजार सार्वजनिक स्नानगृहें होतीं; युरोपमध्यें सर्वत्र चिखल

---

† Outlines of Islamic Culture, Vol. I, P. 199–202.

* Outlines of Islamic Culture, Vol. I, Pages 201–203.

तर कोडोवाचे रस्ते फरसबंदी होते. युरोपांतील लोकांना सही करतां येत नव्हती तर कोडोवांतील मुलें शाळेंत गर्दी करीत. " †

आशिया, आफ्रिका व युरोप खंडामध्यें सर्वत्र मुस्लिमांनीं व्यापाराचें जाळें पसरलें होतें. या प्रचंड पसाऱ्याबद्दल एक ग्रंथकार म्हणतो, "बारा, तेरा आणि चौदाव्या शतकांत प्रचंड प्रमाणावर व्यापार सुरू होता. अल्मेरिया, मलगा, बार्सिलोना आणि कडीझ हीं मोठ्या प्रमाणावर मालाची निर्यात करणारीं बंदरें होतीं. स्पेन, बार्बरी, ईजिप्त, अबिसिनीया, हिंदुस्थान, चीन, कास्पियन समुद्रावरील सर्व वसाहती, मक्का, मदीना, कुफा, बसरा, दमास्कस व बगदाद इत्यादि ठिकाणीं व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यांत आले. आफ्रिका, हिंदुस्थान व मलाया द्वीपकल्पावर वसाहती स्थापन करण्यांत आल्या. स्पेन, सिसली, इटली व फ्रान्समध्यें नवीन व्यापारी केंद्रें प्रस्थापिण्यांत आलीं. उत्तर आफ्रिका, मध्य आशिया, उत्तर हिंदुस्थान व पर्शियन प्रदेशांमधून व्यापाराच्या सोयीचे मार्ग उघडण्यांत आले." *

मुस्लिमांच्या दुर्दम्य व्यापारी महत्त्वाकांक्षेला खुष्कीचे मार्ग अपुरे पडूं लागल्यामुळें त्यांनीं समुद्रामधून व्यापार करण्याचा विडा उचलला. समुद्रपर्यटण निषिद्ध आहे असा दंडक इस्लाममध्यें नसल्यामुळें त्यांच्या या नव्या कल्पनेचा संकोच कधींच झाला नाहीं. त्यांनीं उदकस्थितिशास्त्राचा अभ्यास केल्यामुळें समुद्रावर तरंगणारीं गलबतें बनविण्यांत त्यांना यश आलें. धाडसी स्वभाव व कल्पकता यांमुळें समुद्रमार्गें गलबतांमधून निर्वंधपणें व्यापार सुरू झाला.

† The Story of Medicine, P. 164.
* Europe's Debt to Islam, P. 35.

समुद्रामध्यें दिशा कळावी म्हणून होकायंत्र शोधून काढण्याचें श्रेय त्यांनींच मिळविलें आहे. मोठ्या प्रमाणावर माल नेण्याकरितां मोठ-मोठीं जहाजें मुस्लिमांनीं बांधलीं. दर्यावर्दीपणांत त्यांनीं इतकें प्रावीण्य संपादन केलें कीं नवीन नवीन बेटें त्यांनीं शोधून काढलीं. एक ग्रंथकार म्हणतो, "दहाव्या शतकांतच मुस्लिमांचीं जहाजें कँटनला पोहोंचलीं. तेथून त्या जहाजांनीं ईशान्येकडील कोरिया, जपान, फिलिपाईन्स बेटांकडे आपला मोर्चा वळविला. दक्षिणेकडे सुमात्रा, जावा, मलक्का इत्यादि बेटांचा शोध मुस्लिमांनींच लाविला. . . . मलबार व सिलोनशीं मुस्लिमांनीं जहाजांची वाहतूक ठेविली होती. मलबार किनाऱ्यावर लहान लहान मुस्लिम वसाहती स्थापन करण्यांत आल्या. हिंदुस्थानच्या भूमीवर पदार्पण करणाऱ्या वास्को-ड-गामाचा वाटाड्या अहंमद नांवाचा मुस्लिम नावाडी होता. अहंमदजवळ समुद्राचा नकाशा व होकायंत्रासारखी उपयुक्त अशीं उपकरणें होतीं. त्यानें हिंदी महासागर, तांबडा समुद्र, पर्शियाचें आखात, चिनी समुद्र यांवर प्रवास कसा करावा यांचा दर्यावर्दी इतिहास लिहिला आहे.....नाईल नदीमध्यें वहातूक करणारीं सव्वीस हजार लहानमोठीं गलबतें होतीं."*

जहाजांमधून माल उतरविण्याकरितां मुस्लिमांनीं ठिकठिकाणीं समुद्रकिनारीं धक्के बांधले. "बंदर किंवा धक्क्याच्या ठिकाणीं त्यांनीं आयात व निर्यात करणाऱ्या कचेऱ्या बांधल्या आणि जकात-नाकीं उघडलीं. व्यापारी पत्रकें व मासिकें काढलीं. व्यापारशास्त्रा-वर अबुल कासीम नांवाच्या तज्ज्ञानें अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत."†

* Outline of Islamic Culture, Vol. I, P. 205-6.

† Europe's Debt to Islam, P. 36.

चांचेगिरी करणाऱ्यांपासून व्यापारी जहाजांना सरंक्षण मिळावें म्हणून त्यांच्याबरोबर आरमार ठेवण्याची प्रथा मुस्लिमांनीं चालू केली. याच आरमाराचा पुढें लढाईत उपयोग करण्यांत येऊं लागला. एके काळीं तर तुर्कस्थानचें आरमार युरोपमध्यें अत्यंत बलाढ्य समजण्यांत येई. इकडे हिंदुस्थानांत अकबर बादशहानें आरमार बांधण्याचा थोडाफार प्रयत्न केला. टिपु सुलतानचें आरमार मंगलोर व कालीकत येथें सदैव सज्ज असे. म्हैसूरच्या इतिहासांत सर कर्नल विल्क्स यानें म्हैसूर राज्याच्या एकंदर उत्पन्नाचा १/४ भाग टिपु सुलतान आपल्या आरमारावर खर्च करीत असल्याचें नमूद करून ठेविलें आहे.

तत्त्वज्ञान, विज्ञान, साहित्य, व्यापार इत्यादि क्षेत्रांत असामान्य कार्य करून मुस्लिमांनीं मानवी संकृति किती समृद्ध केली आहे याची आपणांस थोडीफार कल्पना येईल. "मध्ययुगीन काळांतील संकृतीचे एकमेव प्रतिनिधी" † अशा शब्दांत इतिहासकारांनीं मुस्लिमांना गौरविलें आहे; इतकेंच नव्हे तर जगांतील रानटीपणा नष्ट करून तेथें माणुसकी प्रस्थापित करण्याचें त्यांनीं महान् कार्य केलें आहे असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे. लिओनार्ड म्हणतो, "इस्लामनें कोट्यवधि लोकांस हीना-वस्थेतून संस्कृतीच्या उच्च वातावरणांत नेऊन सोडलें आहे. त्यानें आफ्रिका आणि आशिया खंडांत बलिदानाचा पुरस्कार करणाऱ्या जुन्या धर्मपंथांची शुद्धी केली, चांगले व मानवतेस पोषक होणारे कायदे केले, व्यापार व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिलें आणि स्थिर राहणारी राज्यपद्धति प्रस्थापित केली. . . .इस्लामनें कधींही पुसला

---

† Historian's History of the World, Vol. 8, P. 271.

न जाणारा असा वज्रलेपासारखा ठसा मानव इतिहासाच्या पानावर उमटविला."* आज युरोप सुधारणेच्या आघाडीवर आहे पण त्यानें देखील मुस्लिमांचें ऋण कबूल केलें आहे. स्पेनमध्यें सातशें वर्षें आपल्या वैभवानें तळपणारी मुस्लिम राजवट सबंध युरोप खंडास भूषणभूत होऊन राहिली होती. स्पेनमध्यें मुस्लिम अधिसत्ता नसती तर युरोपचा रानटीपणा आणखी कित्येक शतकें तसाच कायम राहिला असता असा निर्वाळा निरनिराळ्या इतिहासकारांनीं दिला आहे. आशिया आणि युरोपमधील मुस्लिमांची राजवट म्हणजे कला व विद्येचें पुनरुत्थान, विज्ञान व तत्त्वज्ञान यांचा उत्कर्ष, सतत तेवत असलेला संस्कृतीचा नंदादीप. मुस्लिमांचें हें ऋण कबूल करतांना इतिहासकार लिहितात, "हल्लींच्या सुधारणांच्या प्रत्येक शाखेमध्यें अरब मुस्लिमांच्या कर्तृत्वाची छाप पडलेली दिसून येते. नवव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत साहित्याची प्रचंड निर्मिति झाली, उत्पादनाची वाढ झाली. त्या काळीं मानवी बुद्धिमत्तेनें केवढें श्रेष्ठ कार्य केलें आहे याची दखल नव्या कल्पना व शोध यांनीं दिली. सबंध युरोपवर त्यांची पडलेली छाप पाहिली म्हणजे अरब मुस्लिमांनीं सर्व गोष्टींमध्यें आम्हांस मार्गदर्शन केलें आहे हें मत ग्राह्य व योग्य वाटतें."†

---

* Islam—Her Moral and Spiritual Value, by Leonard, P. 152.

† Historian's History of the World, Vol. 8, P. 275.

प्रकरण ८ वें

# संस्कृतीचें सारसर्वस्व

" आशिया, युरोप आणि आफ्रिका खंडांत अरब केवढ्या जलद रीतीनें पसरले, त्यांनीं थोर संस्कृति व सुधारणा कशी घडवून आणली याची कथा म्हणजे इतिहासामधील एक चमत्कार होय."*

—पंडित जवाहरलाल नेहरू

अगदीं थोड्या काळांत इस्लामनें घडवून आणलेली वैचारिक क्रांति; प्रस्थापित केलेलीं शाश्वत नैतिक मूल्यें; आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत निर्माण केलेला क्रांतिकारक दृष्टिकोण; तत्त्वज्ञान व भौतिक शास्त्रामध्यें उघडलेली आघाडी या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर इस्लामनें मानवी संस्कृतींत केवढी मोलाची भर घातली आहे याची आपणांस कल्पना येईल.

संस्कृति म्हणजे धार्मिक जडवाद नव्हे किंवा भोंदू धर्मगुरूंनीं तयार केलेलें रूढींचें कुंपण नव्हे. संस्कृतीचा अर्थ विशाल आहे. जीवनाचें सौंदर्य व वैभव वाढविणारे नीतिनियम, आचारविचार, तत्त्वज्ञान, कला, कायदे व चालीरीति, राजकारण या सर्वांचा समावेश संस्कृतीमध्यें होऊं शकतो. संग्राहकता व उदात्तता हीं तिचीं वैशिष्टयें आहेत. संस्कृतीमध्यें अगतिकता किंवा पुराणमत-

* Glimpses of World History.

वा:दित्व यांना कधींच जागा मिळूं शकत नाहीं. संस्कृतीमध्यें बौद्धिक व मानसिक विकासास मानाचा दर्जा आहे, विज्ञान व आधिभौतिक शास्त्रांना श्रेष्ठ स्थान आहे.

इस्लामच्या इतिहासाची आपणांस जी ओझरती ओळख झाली त्यावरून आध्यात्मिकता व भौतिकता यांचा सुंदर समन्वय इस्लाममध्यें झाला आहे असें आपणांस म्हणावें लागेल. भौतिकता ही आध्यात्मिकतेला मारक नसून ती पोषकच आहे असें इस्लाम मानतो; भौतिकता हा शाप नसून वर आहे अशी इस्लामची श्रद्धा आहे. यामुळें इस्लाम धर्मांत आध्यात्मिकतेचा आधिभौतिक शास्त्राशीं केव्हांच विरोध दिसून येत नाहीं. भौतिक शास्त्रांचा उपयोग मानवांचें सुख किंवा दर्जा वाढविण्याकडे होईल; त्याचप्रमाणें त्याला गुलाम करून सोडणें किंवा संत्रस्त करणें यांकडेही करतां येईल. ज्या भावनेनें किंवा दृष्टीनें आपण त्यांचा उपयोग करूं, त्याप्रमाणें त्याचें इष्ट वा अनिष्ट फल आपल्या पदरांत पडूं शकेल. या शास्त्रांना आध्यात्मिकतेची जोड दिली तर हींच शास्त्रें ऐहिक जीवन सुखमय करतील, त्याच्या उत्कर्षाचीं द्वारें खुलीं करून देतील, त्याचा अकाली बळी घेणाऱ्या रोगराईचा नाश करतील, त्यानें कधींही अनुभविलें नाहीं अशा उच्च दर्जाचें सुख त्याला प्राप्त करून देतील असा इस्लामला विश्वास वाटतो. त्यामुळें मागील प्रकरणांत विज्ञान व आधिभौतिक शास्त्रांच्या निरनिराळ्या क्षेत्रांत मुस्लिमांनीं जी प्रगती केली तिच्या बुडाशीं मानवी जीवन सुखी करण्याचा प्रयत्न होता ही गोष्ट अधिक स्पष्ट होते.

इस्लाम हा स्वागतप्रेमी आहे हें त्याचें आणखी एक वैशिष्ट्य होय. मानव जातीच्या सौख्य व उत्कर्षास हातभार लावणाऱ्या

कोणत्याही तत्त्वज्ञानाचें किंवा वैचारिक सांप्रदायाचें तो सदैव स्वागतच करतो. मानव्याचा पुरस्कार करणारें किंवा महात्माजींच्या 'सर्वोदया'सारखें मानवी जीवन उन्नत करणारें कोणतेंही तत्त्वज्ञान असो त्याचें इस्लाम केव्हांही स्वागतच करील. इस्लाम हा हटवादापासून सर्वस्वीं अलिप्त असल्यामुळें कोणत्याही संस्कृतीशीं त्याचा संघर्ष झालेला आढळून येत नाहीं. उलट अन्य संस्कृतीशीं झगडा न करतां तिच्याशीं एकत्रित नांदण्याचा दिलदारपणा त्यानें दाखविला आहे. उदाहरण म्हणून सर जॉन मार्शल नांवाच्या इतिहासकारानें काढलेले उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणतो, "मुस्लिम आणि हिंदु संस्कृतीसारख्या अलग पण महान् व जोरांत विकास पावलेल्या दोन संस्कृति एकमेकांशीं मिसळत व एकत्रित होत असल्याचें दृश्य मानव जातीच्या इतिहासांत क्वचितच सांपडेल."* मानवांचें जीवन सुखी करणें हें संस्कृतीचें प्रधान कार्य असल्यामुळें मानव्याचा पुरस्कार करणाऱ्या त्या संस्कृतीस इस्लामकडून विरोध होणें कदापिही शक्य नाहीं.

मानव्य हा संस्कृतीचा निकष आहे असें इस्लाम मानतो. मानव्याला डावलणारें कोणतेंही तत्त्वज्ञान, आचारविचार, जातीय किंवा राष्ट्रीय भावना यांना खऱ्या अर्थानें संस्कृति असें कधींही म्हणतां येणार नाहीं. जातीयता म्हटली कीं त्या ठिकाणीं दुसऱ्या जमातीचा द्वेष न कळत आलाच. संस्कृतीच्या गोंडस नांवाखालीं जातीयतेचा पुरस्कार करणें, स्वजातीयांना दुसऱ्या जमातीविरुद्ध भडकावणें, त्यांच्यामध्यें द्वेष व तिरस्कार निर्माण करणें याला संस्कृति म्हणावयाचें कां संस्कृतीचें विडंबन ! जमात किंवा राष्ट्र यांना ओलांडून

* The Cambridge History of India, Vol. III.

जिची झेंप मानव्यापर्यंत पोहोंचते तिलाच संस्कृति हें नांव शोभून दिसेल. या विचारसरणीचा पुरस्कार इस्लामधर्म प्रणेते हजरत मुहम्मद पैगंबर यांनीं केला आहे. एक विद्वान् ग्रंथकार म्हणतो, "थोर मनुष्य हा मुख्यत्वेंकरून राष्ट्राभिमानी असतोच. प्रथम राष्ट्र आणि नंतर परमेश्वर व मानवता असें तो मानतो. हजरत पैगंबरांच्या बाबतींत याच्या उलट परिस्थिति होती. जन्मानें अरब पण त्यांनीं सर्वांपेक्षां परमेश्वर आणि मानवता यांनाच अग्रस्थान दिल्यामुळेंच ते मानवतावादी बनले. यामुळेंच ते त्या काळाच्या किती तरी पुढें होते." †

इस्लाम हा आजच्या काळांतही ताजातवाना व आकर्षक वाटतो, याचें कारणही त्यानें प्रस्थापित केलेला मानवतावाद हेंच होय. या उदार मतवादामुळेंच स्वतःचें हित पाहणाऱ्या व प्रसंगीं दुसऱ्यास ठोकरणाऱ्या अनेक राष्ट्रीय घटकांना आत्मसात करणारा आध्यात्मिक उत्साह इस्लाममध्यें संचारूं शकला असें आपणांस म्हणावें लागेल. इस्लामच्या कडव्या अद्वैतवादामुळें निरनिराळीं राष्ट्रें व जमाती यांमध्यें उभ्या असणाऱ्या अजस्त्र भिंती कोसळून पडल्या; निरनिराळ्या पंथांचा दुरभिमान गळून पडला; विस्कळित झालेली जनता एकत्र येऊं शकली; उच्च-नीच, काळा-गोरा व स्त्री-पुरुष हे कप्पे नष्ट झाले; परमेश्वर एक व सर्व मानव त्याचीं लेकरें ही विशाल दृष्टि आली. परमेश्वर एक आहे ही इस्लामची घोषणा म्हणजे मानवतावादाचा भरभक्कम पाया होय. परमेश्वरानें निर्माण केलेल्या यच्चयावत प्राणिमात्रांवर प्रेम करणें म्हणजेच परमेश्वरावर प्रेम करणें, त्याला

† Islam—Her Moral and Spiritual Value by :Leonard, Page 110.

प्रसन्न करणें या उदात्त विचारसरणीचा इस्लामनें पुकारा केला आहे. धार्मिक अवडंबरानें किंवा अर्थशून्य बडबडीनें परमेश्वर कधींच प्रसन्न होत नाहीं. परमेश्वर प्रसन्न होतो तो मानवांना सौख्य व आल्हाद देणाऱ्या सत्कृत्यानें. प्रत्येक सत्कृत्य म्हणजे परमेश्वर-चरणीं वाहिलेलें फूल. अशा फुलांचा परमेश्वर भोक्ता आहे.

" खरोखर परमेश्वर सत्कृत्य करणारावर प्रेम करतो."

—पवित्र कुराण २:१९५

इस्लामनें प्रत्येक व्यक्तीस सत्प्रवृत्त होण्यास आवाहान केलें आहे; पण त्याबरोबरच सत्प्रवृत्तीचा निकषही ठरवून टाकला आहे. भिन्नभिन्न जमातींचा दृष्टिकोन भिन्न असूं शकतो. एकाला वाटणारें सत्कृत्य दुसऱ्याच्या दृष्टीनें दुष्कृत्य ठरण्याचा संभव असतो. इस्लामनें केलेली सत्कृत्याची व्याख्या निःसंदिग्ध व स्पष्ट आहे. ज्यामध्यें सत्य, दया, शांति, न्याय, परोपकारादि परमेश्वरी गुणांचा आविष्कार होतो तें सत्कृत्य होय. वरील गुणांचा संकोच करणारें कोणतेंही कृत्य मानव्यास पोषक नसल्यामुळें त्याचा सत्कृत्यामध्यें समावेश होऊं शकत नाहीं. सत्कृत्य करीत असतां इतरांकडूनही दुष्कृत्य होऊं नये म्हणून आपण सदैव जागरूक राहिलें पाहिजे. सत्कृत्य करण्याची जितकी जबाबदारी आपणांवर आहे, तितकीच दुष्कृत्यांना पायबंद घालण्याचीही आहे हें विसरतां कामा नये.

" ज्या ज्या वेळीं दुष्कृत्य होतांना तुमच्या दृष्टीस पडेल, त्या त्या वेळीं तुम्ही आपल्या हातानें तें थांबवा; तेंही करण्याचें तुमच्या अंगांत सामर्थ्य नसल्यास वाणीनें त्याचा धिक्कार करा; असा धिक्कार करण्याचें धाडस होत नसेल तर अंतःकरणपूर्वक त्याचा

तिटकारा करा; पण अशा (नुसता तिटकारा करणाऱ्या) मनुष्या-मध्यें धर्माची भावना कमकुवत आहे असें समजावें."

—हजरत मुहम्मद पैगंबर

आपल्या सर्व सामर्थ्यानिशीं दुष्कृत्यास पायबंद घालणारासच इस्लामचा सच्चा अनुयायी म्हणतां येईल. अशा वेळीं दुष्कृत्य करणारा कोण आहे याचा विचार करतां कामा नये. कित्येक लोक खोटया अभिमानास बळी पडून, एकादें दुष्कृत्य आपल्या जमातीच्या लोकांनीं केल्यास तें लपवण्याचा प्रयत्न करतात; याही पुढें जाऊन दुष्कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांची बाजू घेऊन भांडावयास उठतात. ही मनोवृत्ति निंद्य आहे असें इस्लाम समजतो.

"गुन्हेगार लोकांची बाजू घेऊन भांडूं नका."

—पवित्र कुराण ४:१०५.

दुष्कृत्य करणारा आपल्या जमातीचा असला तरी त्याची बाजू कदापिही घेतां कामा नये. अशा माणसाचा पाठपुरावा करणें म्हणजे त्याला व इतरांना अशीं दुष्कृत्यें करण्यास प्रोत्साहन देण्यासारखें आहे. प्रत्येक जमात, प्रत्येक गट जर गुन्हेगारांना संरक्षण देऊं लागला व त्याच्याकरितां भांडूं लागला तर जगामध्यें न्यायाची व सत्कृत्याची व्याख्या करणेंच कठीण होऊन बसेल. या दृष्टीनें हजरत पैगंबरांच्या आयुष्यामधील एक प्रसंग उद्‌बोधक आहे. अरबस्तानांत इस्लामचा नुकताच प्रसार होऊं लागला होता. इस्लामचे अनुयायी व ज्यू यांच्यामध्यें विलक्षण वैमनस्य नांदत होतें. अशा परिस्थितींत एका मुस्लिमानें एक चिलखत चोरलें आणि तें एका ज्यू गृहस्थाच्या घरीं गुपचुपपणें ठेवून त्या ज्यू गृहस्थानें चोरी केली

असा ओरडा केला. इतर मुस्लिमांनींही त्याची साथ केली. हजरत पैगंबरांना हा प्रकार कळल्यानंतर त्यांनीं आपल्या अनुयायांची निर्भत्सना केली व त्या ज्यू गृहस्थास निर्दोषी म्हणून सोडून दिलें. तो काळ अत्यंत नाजूक व आणीबाणीचा होता. अगोदरच हजरत पैगंबरांचे अनुयायी कमी आणि तशांत आपल्या अनुयायांची निर्भत्सना करून त्या ज्यू गृहस्थास सोडणें म्हणजे आहे त्या अनुयायांचें अनुयायित्व गमावण्यासारखें होतें. पण हजरत पैगंबरां-नीं या गोष्टीचा विचार न करतां न्याय्य वृत्तीचा अवलंब केला. वरील ऋचा सदर प्रसंगास अनुलक्षून आहे. यावर भाष्य करतांना मौलाना मोहम्मद अली लिहितात, " गुन्हेगार इस्लामचा अनुयायी असला आणि ज्यांच्यावर अन्याय झाला आहे ते मुस्लिमेतर किंवा मुस्लिमांचे कट्टे वैरी असले तरी त्याचा विचार न करतां गुन्हेगारीस सजा मिळालीच पाहिजे हें विशाल तत्त्व वरील ऋचेवरून प्रस्थापित होतें. प्रत्येक मुकद्मा त्याच्या गुणधर्मानुसार निकालांत काढला पाहिजे आणि न्यायाचा समतोलपणा मुस्लिम व मुस्लिमेतर, मित्र व शत्रू यांमध्यें सारखा राखला पाहिजे."*

एकादें दुष्कृत्य करावयाचें आणि त्याचा कार्यकारणभाव दुसऱ्या चांगल्या गोष्टींशीं लावून पळवाट काढण्याचा प्रघातही त्याज्य मानण्यांत आला आहे. लूटमार किंवा डाकूगिरी करावयाची आणि तो पैसा एकाद्या चांगल्या कार्याकरितां खर्च करावयाचा हें इस्लामला शिष्टसंमत वाटत नाहीं. लूटमार किंवा डाकूगिरी म्हणजे उघड पाप, अन्याय व जुल्म. पाप करून, न्यायाचा खून पाडून, जुल्म जबरदस्ती करून लुटलेला पैसा इमानदारीचा आहे, निढळाच्या

---

* The Holy Quran by Mohamad Ali, Page 231.

घामाचा आहे, प्रामाणिकपणाचा आहे असें कोणताही समंजस गृहस्थ म्हणूं शकेल काय ?

जेथें कोणतेंही पाप, अन्याय किंवा जुलूम निषिद्ध मानण्याचा आदेश मिळाला आहे, तेथें त्यापासून मिळालेला पैसा किंवा संपत्ति निषेधार्ह मानणें क्रमप्राप्त आहे. चांगल्या कार्याकरितां वाईट मार्गानें किंवा दुष्कृत्य करून मिळविलेला पैसा खर्च करणें म्हणजे त्या चांगल्या कार्याचें विडंबन करण्यासारखें आहे. योग्य व चांगल्या मार्गांनीं मिळविलेला पैसा सत्कार्याकरितां खर्च केला पाहिजे. यालाच आपण ' साधनशुचिता ' म्हणूं. कार्याचें महत्त्वमापन साधनांच्या शुद्धतेवर व निर्मलतेवर अवलंबून असतें. अशुद्ध साधनांनीं कोणतेंही साध्य केव्हांही उच्च कोटीला जाऊं शकत नाहीं.

दुष्कृत्य किंवा कुकर्म यांची परतफेड करणें म्हणजे त्या दुष्कृत्यास योग्य उत्तर देणें अशी चुकीची कल्पना बनलेली असते. दुष्कृत्याचा बदला दुष्कृत्यांनीं देणें म्हणजे आणखी एका दुष्कृत्याची भर घालणें होय. दुष्कृत्य होत असतां तें थांबविणें किंवा त्याला पायबंद घालणें आणि दुष्कृत्याची परतफेड करणें या दोन गोष्टींमध्यें मोठें अंतर आहे. पहिली गोष्ट जितकी अभिनंदनास्पद तितकी दुसरी गोष्ट इस्लामनें त्याज्य मानली आहे. पहिल्या गोष्टीमध्यें न्यायाचा आविष्कार होतो तर दुसऱ्यामध्यें द्वेष किंवा सूडबुद्धीला प्रोत्साहन मिळतें. हजरत पैगंबरांनीं दुष्कृत्याची फेड सत्कृत्यांनीं केली आहे. त्यांच्या शत्रूंनीं निरपराध लोकांना छळलें म्हणून त्यांना तसेंच छळून सूड घेण्याचें निंद्य व अमानुष कृत्य त्यांनीं आपल्या उभ्या आयुष्यांत कधींही केलें नाहीं; उलट त्यांना दयाळूपणानें वागविल्याचीं अनेक उदाहरणें इस्लामच्या इतिहासांत दिसून येतील.

द्वेषाचे आणि सूडाचे विचार म्हणजे सद्भावनांचा संकोच आणि गळचेपी. मनुष्यामध्यें सूडाच्या भावना प्रबल होणें याचा अर्थ त्यानें मनुष्यत्वाला मुकणें होय. माणसांतला ‘ सैतान ’ जागा होतो तो सूड-भावनेमुळेंच. एखाद्या व्यक्तीनें किंवा जमातीनें अनन्वित अत्याचार केले तर बदला म्हणून तिच्या निष्पाप मुलाबाळांची कत्तल उडविणें, देवतातुल्य स्त्रियांवर अत्याचार करणें, घरांदारांची होळी करून देशोधडीला लावणें आणि उरलेल्यांच्या रक्तानें सर्व जमीन भिजवून टाकणें ही काय माणुसकी ! हा काय धर्म ! सूडबुद्धीनें निर्माण केलेला सैतान या गोष्टी करूं शकतो, मानव्याचा खून सहज लीलेनें पाडूं शकतो. हजरत पैगंबरांनीं द्वेष आणि सूडबुद्धीचा धिक्कार केला आहे. हजरत पैगंबरांचा, इस्लामचा आदर्श समोर ठेविल्यामुळें मुस्लिम जेत्यांनीं विजयमदानें धुंद होऊन प्रतिपक्षावर सूड न उगवितां, त्याच्यावर दया दाखविल्याचे अनेक दाखले इस्लामच्या इतिहासांत सांपडतात.

इस्लामच्या द्वेषानें वेडावून हजारों नव्हे लाखों मुस्लिमांना कंठस्नान घालणाऱ्या ख्रिश्चन धर्मीयांस त्यांचा पराभव केल्यानंतर मुस्लिमांनीं कसें वागविलें याचा ख्रिश्चन इतिहासकारांनीं रंगविलेला एक प्रसंग अत्यंत रोमांचकारक आहे. तो काळ धर्मयुद्धांचा ( Crusades ) होता. धर्माची विजयी पताका घेऊन युरोपमधील प्रचंड ख्रिश्चन सैन्य परधर्मियांना अक्षरशः रक्तस्नान घालीत जेरूसलेमच्या तटाजवळ येऊन पोहोंचले. जेरूसलेमवर मुस्लिमांचा ४०० वर्षे ताबा होता. घनघोर लढाईनंतर मुस्लिमांचा पराभव झाला व जेरूसलेमच्या तटावर ख्रिश्चनांचा झेंडा फडकला. ख्रिश्चन सैन्य धर्मद्वेषानें धुंद झालें होतें. त्यांनीं तीन दिवस अहोरात्र शहरांतील

मुस्लिमांची निर्घृण कत्तल चालविली. शहरांत सर्वत्र हाहाःकार उडाला; असहाय्य स्त्रियांच्या किंकाळ्यांनीं सर्व वातावरण भरून गेलें; असंख्य मुस्लिमांचे मुडदे पडूं लागले; सबंध शहर रक्तानें न्हाऊन निघालें. उरलेल्या मुस्लिमांनीं तेथील प्रचंड मशिदीकडे आश्रयार्थ धांव घेतली. "मुस्लिम नागरिकांनीं मशिदीमध्यें आश्रय घेतला. सैन्यानें त्यांची त्याच ठिकाणीं कत्तल उडविली. एकंदर एक लाख मुस्लिम ठार मारण्यांत आले व तितकेच कैदीही पण करण्यांत आले. वृद्ध स्त्रीपुरुषही त्यांच्या तावडींतून सुटले नाहींत."* जगामध्यें एकाच ठिकाणीं एवढा प्रचंड संहार पूर्वी कधींही झाला नसेल. एकाच शहरांत घडून आलेल्या एक लाख लोकांच्या संहाराचें इब्न झलन् या इतिहासकारानें केलेलें हृदयविदारक वर्णन तर अंतःकरणाचा ठाव घेणारें आहे.

थोडयाच काळांत ईजिप्तचा बादशहा सलाहुद्दीन याच्या प्रभावी नेतृत्त्वाखालीं मुस्लिमांनीं पुन्हां जेरूसलेमवर धडक मारून तें काबीज केलें. त्याच ठिकाणीं झालेल्या भीषण कत्तलीमुळें मुस्लिमांच्या अंतःकरणास झालेली खोल जखम भरून निघाली नव्हती; मागें झालेल्या प्रचंड संहाराची आठवण अद्याप बुजली नव्हती. शहरांतील प्रत्येक ख्रिश्चन नागरिकाची कत्तल करून भरपूर सूड उगविण्याची किंवा बदला घेण्याची या वेळीं सुवर्णसंधी चालून आली. सबंध शहराचें रक्तरंगण करून मुस्लिम संहाराचें भरपूर उट्टें काढण्याचा समय प्राप्त झाला.

याच वेळीं सलाहुद्दीनला हजरत मुहम्मद पैगंबरांनीं दिलेल्या मानव्याच्या हांकेचें स्मरण झालें; पवित्र कुराणचा संदेश आठवला.

* Historian's History of the World, Vol. 8, P. 352–53.

ख्रिश्चन सैनिकांवरील सूड निरपराध ख्रिश्चन जनतेवर काढण्याची कल्पना त्याला कशीशीच वाटली. आपल्या धर्मबांधवांच्या रक्ताचा बदला घेणें त्याला युक्त वाटलें नाहीं. इकडे सलाहुद्दिनच्या अंत:करणांत सद्भावनांचा कल्लोळ उडाला होता तर तिकडे ख्रिश्चन पुरुष, मुलें, स्त्रिया आदि आम जनतेचा थरकांप झाला होता. आपला मृत्यु आपल्या समोर आ वांसून उभा आहे याची त्यांना जाणीव झाली. आपल्या कच्च्याबच्च्यांना उराशीं धरून ख्रिश्चन माता आपले व आपल्या अर्भकांचे शेवटचे क्षण मोजीत बसल्या होत्या. त्या सर्वांना सलाहुद्दीनसमोर आणण्यांत आलें. हताश झालेले नागरिक, भीतीनें गांगरून गेलेल्या स्त्रिया आणि भेदरलेल्या मुद्रेनें त्यांना चिकटलेलीं गोजिरवाणीं बालकें पाहतांच सलाहुद्दीनचें अंत:करण कळवळलें. तो पराक्रमी योद्धा दयेचा सागर बनला. त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. तोच इतिहासकार लिहितो, " मृदु अंत:करणाच्या त्या योद्धयानें सहानुभूतीचे शब्द उद्गारले. त्याच्या अंत:करणाची कोमलता पाहून त्या स्त्रियांना धीर आला आणि त्याच्या एका शब्दाबरोबर आपली दुर्दशा नाहींशी होईल असे त्याच्यासमोर उद्गार काढले. . . . दयार्द्र अंत:करणानें त्या स्त्रियांच्या विनंतीप्रमाणें त्यानें सर्वांना मुक्त केलें, इतकेंच नव्हे तर त्यांना नजराणे बहाल केले."* या वेळीं जगांतील कारुण्य आणि भूतदया जेरूसलेमच्या पवित्र भूमीवर सलाहुद्दीनच्या स्वरूपांत प्रकट झाली होती, इस्लामचें सत्य स्वरूप अवतरलें होतें. अखिल जगास भूषणभूत होऊन राहाणारी ही अभूतपूर्व घटना इस्लामच्या इतिहासांत घडली. मानवतेचा हा हृदयंगम आविष्कार

* Historian's History of the World, Vol. 8, P. 377.

मुस्लिम राजवटींत झाला. हजरत मुहम्मद पैगंबरांची उदात्त शिकवण प्रत्यक्षांत उतरली. सर्व जगानें, विशेषतः मुस्लिमांनीं या घटनेपासून बोध घेतला पाहिजे; धर्माच्या लोकविलक्षण कल्पनांनीं अंध झालेल्या धर्मवेड्यांनीं या प्रसंगापासून धडा घेतला पाहिजे. शत्रूच्या लहान अर्भकांना एका खोल खड्डयांत जिवंत समाधी देणाऱ्या आणि नवजवान वृद्ध स्त्रीपुरुषांस गॅस चेंबरमध्यें घालून त्यांना ठार मारणाऱ्या आजच्या काळांतील नरपशूंनीं आतां परत शुद्धीवर आलें पाहिजे.

"अपशब्द बोलूं नका असें माझ्या सेवकांना ( मुस्लिमांना ) बजावून सांगा."

—पवित्र कुराण १७:५३

आपल्या शत्रूचा सूड किंवा बदला घेण्याची गोष्ट तर बाजूलाच राहूं द्या, पण त्यांच्याबद्दल अभद्र किंवा अपशब्द देखील बोलतां कामा नये अशी पवित्र कुराणची आज्ञा आहे. ज्यांनीं आपलें शत्रुत्व पत्करलें आहे किंवा ज्या परधर्मियांनीं आपल्यावर आग पाखडली आहे त्यांच्याबद्दल बोलतांना देखील सभ्यतेची भाषा वापरली पाहिजे. आपल्या वैऱ्याचा किंवा विरोधी लोकांचा भाषणांत उल्लेख करितांना बहुधा आपणांस अश्लिल, मग्रुर व असहिष्णु भाषा वापरण्याचा मोह होतो. मुस्लिम म्हणविणाऱ्यानें या मोहास बळी पडतां कामा नये. अपशब्द उच्चारणें किंवा अभद्र बोलणें म्हणजे अप्रत्यक्ष सूड उगविणें होय. वरील ऋचेवर भाष्य करतांना मौ. मोहम्मद अली लिहितात, "परधर्मियांनीं आमच्यावर निष्कारण जुलूम केला अशी तक्रार मुस्लिमांनीं हजरत पैगंबरांजवळ केल्यानंतर त्यांना सहृदयी बनण्याचा व प्रतिपक्षांवर सूड न उगविण्याचा आदेश देण्यांत

आला. या आदेशामागील मनाच्या मोठेपणास जगांत तोंड मिळणें शक्य नाहीं. परधर्मियांकडून मुस्लिमांचा अत्यंत क्रूरपणें छळ करण्यांत आला, त्यांना उपद्रव देण्यांत आला, त्यांना शिव्याशाप वाहण्यांत आले, इतक्यावरही संतुष्ट न होतां इस्लामचें अस्तित्त्वही नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू झाला. एवढा छळवाद व उपहास होत असतां त्याचा बदला कसा घ्यावा याबद्दलची इस्लामची आज्ञा काय आहे असें म्हणाल तर अशा जुलमी प्रतिपक्षीयांबद्दल मुस्लिमांनीं अपशब्द देखील बोलतां कामा नये ही होय. " *

" एकाद्या जमातीच्या द्वेषामुळें अन्यायानें वागूं नका. न्यायानें वागणें ही ईश्वरभक्तीच्या खालोखाल महत्त्वाची गोष्ट आहे."

—पवित्र कुराण ५:८

एकाद्या जमातीबद्दल किंवा पक्षाबद्दल केवळ द्वेष आहे म्हणून त्याच्यावर जुलूम जबरदस्ती करणें, त्याची अपशब्दानें संभावना करणें, त्याला न्याय्य वाटणारी गोष्ट पायदळीं तुडविणें, त्याच्या विचारांचा कोंडमारा करणें इत्यादि गोष्टी अन्यायाच्या असल्यामुळें त्यांपासून मुस्लिमांनीं परावृत्त झालें पाहिजे. कोणताही भेदभाव न ठेवतां त्याच्याशीं न्यायानें वागणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें मानलें पाहिजे. न्यायवृत्ति हा परमेश्वराचा एक गुणधर्म असल्यामुळें त्याचें परिपालन करणें म्हणजे परमेश्वराला संतुष्ट करणें, त्याची भक्ति करणें होय.

" जुलूम करण्याकरितां दुसऱ्याची मदत मागणारा किंवा आपल्या जमातीकरितां अन्यायानें झगडणारा किंवा अनाचार कर-

* The Holy Quran by Mohamed Ali, M. A., P. 570.

णाऱ्या आपल्या जमातीला मदत करतांना मरणारा गृहस्थ आमच्यापैकीं नव्हे."

—हजरत मुहम्मद पैगंबर

मुस्लिमाची परमेश्वरावर अढळ निष्ठा असल्यामुळें परमेश्वरास न आवडणाऱ्या गोष्टी करणारा मनुष्य मुस्लिम या नांवास पात्रच होत नाहीं. स्वतः दुसऱ्यावर जुलूम करणारा किंवा तो करण्यास दुसऱ्यास मदतीला बोलावणारा गृहस्थ मुस्लिम होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें जुलूम किंवा अनाचार करणाऱ्या पक्षाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत करणारा मनुष्यही मुस्लिम म्हणविला जाणार नाहीं. मुस्लिम कोणास म्हणावें याचें स्पष्टीकरण पवित्र कुराणमध्यें सांपडतें.

"न्याय व चांगुलपणा या बाबतींत दुसऱ्यांना मदत करा; अन्याय आणि दुष्टपणाच्या बाबतींत मदत करूं नका."

— पवित्र कुराण ५:२

न्याय व योग्य गोष्टींबद्दल श्रद्धा बाळगणारा व त्याकरितां दुसऱ्यांना मदत करणारा गृहस्थ मुस्लिम म्हणवूं शकतो. त्याच्या हातून कोणतेंहीं अपकृत्य, कोणताही अन्याय, कोणतेंहीं दुष्ट कृत्य घडतां कामा नये किंवा त्या बाबतींत त्याचें इतरांना सहाय्यही होतां कामा नये. जें सत्य, शिव आणि सुंदर असेल त्याचाच पुरस्कार करणारा गृहस्थ इस्लामचा अनुयायी होऊं शकतो.

इस्लामच्या या उदात्त मतप्रणालीमुळें जगांत सर्रास व राजरोस चाललेल्या अत्याचारास व सूड बुद्धीस पायबंद बसला आणि त्यामुळें मानवतेचा मार्ग अधिक सुकर झाला. क्रूरता आणि जुलूम यांपासून अलिप्त राहणारा समाज तयार करण्यांत इस्लामनें अपूर्व

यश मिळविलें आहे. एच्. जी. वेल्स नांवाचे जगद्विख्यात ग्रंथकार लिहितात, "पूर्वी जगामध्यें कधींही आढळून न येणारा आणि सार्वत्रिक क्रूरता व जुलूम जबरदस्ती यांपासून मुक्त असलेला समाज इस्लामनें निर्माण केला." † एडवर्ड गिबननें आपल्या "Decline and Fall of the Roman Empire" ग्रंथांत वरील विधानास पुष्टी देणारे उद्गार काढले आहेत. "त्यांनीं (मुहम्मद पैगंबर) जनतेमध्यें स्नेह व औदार्याचें तेज निर्माण केलें, सामाजिक सद्गुणांचा पुरस्कार केला, नियम व तत्त्वप्रणालीनें सूडाच्या भावनेस पायबंद घातला." *

आपल्या तत्त्वज्ञानानें इस्लामनें एकमेकांच्या रक्तास चटावलेल्या अनेक टोळ्या व जमातींमध्यें सहकार्य, प्रेम आणि एकोपा निर्माण केला आणि त्यांची वायां जाणारी शक्ति, पराक्रम व बुद्धिमत्ता मानवतेच्या महान कार्यावर केंद्रीभूत केली. अखिल मानवजातीचा उगम एकच आहे; सबंध मानवजात एक विश्वव्यापी कुटुंब आहे असा पुकारा करून इस्लामनें विश्वबंधुत्त्वाचा मार्ग अधिक सुकर केला.

"आम्ही तुम्हांस एकाच स्त्रीपुरुषां (आईबापां) पासून निर्माण केलें आहे."

—पवित्र कुराण ४९:१३

जगांतील सर्वत्र पसरलेल्या मानवांची उत्पत्ति एकाच आईबापापासून झाल्यामुळें यच्चयावत् मानवांबद्दल आपणांमध्यें सहोदराची भावना आली पाहिजे. आपण निरनिराळ्या देशांत राहत असलों,

† Outline of History, P. 325.
* Historian's History of the World, Vol. 8, P. 144.

आपली भाषा, संस्कृति वेगवेगळी असली, आपला धर्म वेगवेगळा असला तरी आपण सर्व एककुटुंबीय आहोंत, आपणांमध्यें कोणताही भेदभाव नाहीं ही विशाल भावना आपण मनामध्यें सतत बाळगली पाहिजे अशी इस्लामची शिकवण आहे.

" सर्व प्राणिमात्र हें परमेश्वराचें कुटुंब आहे. त्यानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रांचें कल्याण करण्याची जो शिकस्त करतो तो परमेश्वराचा अत्यंत आवडता माणूस होय."

—हजरत मुहम्मद पैगंबर

आपल्या कुटुंबियांच्या स्वास्थ्याकरितां विलक्षण परिश्रम करणाऱ्या सुपुत्राविषयीं बापाला केवढा अभिमान वाटतो, केवढी आपुलकी वाटते, केवढें प्रेम वाटतें ! सारें विश्व हें माझें कुटुंब आहे या भावनेनें मानव जातीकरितां चंदनासारखा आपला देह झिजविणाऱ्या सद्गृहस्थाबद्दल परमेश्वरास तशीच आपुलकी, तसेंच प्रेम वाटतें. आपला स्वार्थ, आपलें सुख, आपला मोठेपणा बाजूला ठेवून निरलसपणें मानवतेची सेवा करणारा गृहस्थ परमेश्वराचा अत्यंत आवडता मनुष्य समजला जातो.

" मानवांची सेवा ही परमेश्वराची सर्वश्रेष्ठ भक्ति होय."

—हजरत मुहम्मद पैगंबर

परमेश्वराची भक्ति करण्याचे अनेकविध प्रकार आज जगतांत रूढ आहेत. प्रत्येक मनुष्य आपल्या बुद्धीप्रमाणें त्याची पूजाअर्चा करतो, त्याला आळवितो. शेजाऱ्यांपाजाऱ्यांना छळावयाचें, जनतेची पिळवणूक करावयाची, राजरोस अन्यायानें वागावयाचें, स्वतःच्या फायद्याकरितां दुसऱ्यावर जुल्मजबरदस्ती करावयाची आणि नंतर

या पापांतून मुक्त होण्याकरितां परमेश्वराचें भजनपूजन करावयाचें ! अशनें कां परमेश्वर कधीं संतुष्ट होईल ? मानवांवरील अन्याय मग तो कोणत्याही स्वरूपांत असला तरी अक्षम्य आहे आणि असा अन्याय करणाऱ्या माणसाबद्दल परमेश्वराला प्रेम व आपुलकी वाटणें शक्य नाहीं. परमेश्वर दिव्यचक्षु आहे; भक्तीचा अवास्तव पसारा व डामडौल तो बरोबर ओळखतो. दिखाऊ भक्ति आणि खरी भक्ति यांमधील भेद त्याला स्पष्ट दिसतो. मानव्याला हरताळ फांसणाऱ्या व्यक्तीनें कितीही परमेश्वराचीं प्रार्थना केली तरी परमेश्वर त्याकडे ढुंकून देखील पाहत नाहीं. परमेश्वर मानवसेवेचा भुकेला आहे. मानवांची सेवा करणारास तो आपला भक्त समजतो. ज्याच्यावर संकटें कोसळत आहेत, जे अन्यायानें पिचून निघत आहेत, जे प्रत्यहीं अत्याचाराला बळी पडत आहेत, जे उपासमारीनें तडफडत आहेत अशांच्या साहाय्याला धांवून जाणारा आणि त्यांच्या दुःखाचा परिहार करण्याकरितां अटोकाट प्रयत्न करणारा हाच खरा परमेश्वराचा भक्त; मानवसेवा हीच परमेश्वराची सर्वश्रेष्ठ भक्ति.

"जो मानव जातीचें कल्याण करतो तो सर्वश्रेष्ठ होय."

—हजरत मुहम्मद पैगंबर

मानवांचें कल्याण हेंच आपलें ईप्सित मानणाऱ्या सद्गृहस्थास इस्लामनें श्रेष्ठ स्थान दिलें आहे. मनुष्याचें श्रेष्ठत्व त्याच्या कुलशीलावर किंवा गर्भश्रीमंतीवर अवलंबून आहे असें इस्लाम मुळींच मानीत नाहीं. मानवांची सेवा, मानवांचें कल्याण हीच श्रेष्ठत्वाची कसोटी आहे असें तो मानतो.

"मानवजातीच्या कल्याणाकरितां तुम्हीं (मुस्लिम) निर्माण

झालेले आहांत. तुम्ही सत्याचा पुरस्कार व अन्यायाचा धिक्कार करणारे असून परमेश्वरावर अढळ विश्वास ठेवणारे आहांत."

—पवित्र कुराण ३:१०९

इस्लामचें ध्येयवाक्य वरील ऋचेमध्यें घोषित केलें आहे. इस्लामच्या अनुयायांवर, मुस्लिमांवर मानव कल्याणाची केवढी मोठी जबाबदारी आहे याचा त्यांनीं अवश्य विचार केला पाहिजे. मुस्लिम म्हणजे जात्यंध, हटवादी, संस्कृतिहीन असा दोषारोप केला जातो तो किती असत्य आहे हें त्यांनीं स्वतःच्या वागणुकीनें सिद्ध केलें पाहिजे.

मानवी संस्कृतीचा वारसा आपणांस मिळाला आहे; त्या संस्कृतीमध्यें आणखी मोलाची भर घालण्याचें पवित्र कार्य आपणास करावयाचें आहे याचें स्मरण मुस्लिमांनीं सतत ठेविलें पाहिजे. मानवता हा संस्कृतीचा गाभा मानला जातो; आत्मा समजला जातो. तिला संपन्न करण्याचें पुण्यकार्य प्रत्येक मुस्लिमानें केलें पाहिजे. सत्य व न्याय हीं मानवतेचीं मूलभूत अंगें त्यानें आत्मसात केलीं पाहिजेत. कोणत्याही आमिषास किंवा स्वार्थास बळी न पडतां, कोणत्याही धाकदपटशास भीक न घालतां त्यानें आपलें आचरण शुद्ध ठेविलें पाहिजे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुस्लिमाचा परमेश्वरावर अढळ विश्वास पाहिजे. परमेश्वरावर विश्वास याचा अर्थ, परमेश्वराचे जे महान गुणधर्म आहेत त्यांचा स्वतःमध्यें आविष्कार असें मागील एका प्रकरणांत केलेला आहेच. या विश्वासामुळें मनुष्य विवेकी, सदाचारी व त्यागी बनतो, त्याच्यां अंतःकरणांत प्रेम व दया पालवते, उदात्त भावना ओसंडून निघतात, केवळ आपल्या जातीकडे न पाहतां सर्व जगाकडे, मानवजातीकडे आत्मीयतेनें

पाहण्याचें सामर्थ्य त्याच्यामध्यें येतें. 'सारें विश्व माझें घर' या विश्व-बंधुत्वाच्या कल्पनेंत तो रंगून जातो.

माणसांमधील देव जागृत करणाऱ्या उदात्त मूल्यांचा जीवनांत आविष्कार हेंच संस्कृतीचे सारसर्वस्व होय. या मानवी संस्कृतीमध्यें इस्लामप्रमाणें प्रत्येक धर्मानें मोलाची भर टाकून ती संपन्न केली आहे. या मानवी संस्कृतीचे आपण सर्वजण वारसदार आहोंत. संस्कृतीचें उदात्त स्वरूप हिंदु मुस्लिमादि सर्व धर्मियांनीं समजावून घेतलें पाहिजे. वेडया धर्मभावना व कोत्या कल्पना यांच्या आहारीं न जातां आपण सर्व एकाच कुटुंबांतील आहोंत या भावनेनें वागलें पाहिजे. मानवता हें आपंल्या सर्वांचें परमोच्च ध्येय आहे हें ध्यानीं धरून एकमेकांचें जीवन सुखी व उन्नत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज पुनरुज्जीवनाच्या वेदना सुरूं आहेत. आपल्या प्रिय व महान् देशाचें भवितव्य घडविलें जात आहे. अशा वेळीं संस्कृतीचे सच्चे उपासक बनणें हें प्रत्येक नागरिकाचें पवित्र कर्तव्यच ठरतें.

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | १३ | अबस्था | अवस्था |
| ६ | २२ | विस्व्यात | विख्यात |
| १६ | ७ | पूणपर्णे | पूर्णपणें |
| २६ | २४ | लाथाडणाऱ्वा | लाथाडणाऱ्या |
| ३२ | १७ | बिकास | विकास |
| ४७ | १५ | गाळा यात्रा | मक्केची यात्रा |
| ५४ | २० | पारखी | पारखा |
| ५९ | ४ | जाणि | आणि |
| ७३ | १९ | हत्या | हत्त्या |
| ११० | २३ | विद्वच्छ्रेष्ठ | विद्वत्श्रेष्ठ |
| ११९ | १२ | पैगंबरांचा सत्कार | पैगंबरांच्या आदेशाचा सत्कार |
| १२६ | ५ | ग्रेमाने | प्रेमानें |
| १२७ | १ | त्या सपंत्तीत | त्यांच्या संपत्तींत |
| १६२ | २१ | गीरगरिबांस | गोरगरिबांस |
| १९९ | २१ | राष्ट्रांचे उत्कर्ष | राष्ट्रांचा उत्कर्ष |
| १९९ | २१ | अवलंबून असते | अवलंबून असतो |

प्रसिद्ध होत आहे आवृत्ति ३ री

दक्षिणा प्राईझ फंडांतून बक्षिस मिळालेलें

# हजरत मुहम्मद पैगंबर चरित्र

लेखकः—सय्यद अमीन

## निवडक अभिप्राय

"अतिशय उत्कृष्ट रीतीनें लिहिलेलें व उपयुक्त माहितीनें भरलेलें हें पुस्तक आहे."

—नेक नामदार न्यायमूर्ति एम्. आर. जयकर, मुंबई

"चरित्र सुबोध व मनोवेधक असून त्यांचा थोरपणा मनावर ठसेल अशा भाषेंत लिहिलें आहे."

—न्यायमूर्ति सर भवानीशंकर नियोगी, नागपूर

"मराठी वाङ्मयांत उत्कृष्ट भर टाकल्यावद्दल मि. सय्यद अमीन यांचें अभिनंदन करतों."

—प्रोफेसर डॉ. पी. एल. वैद्य, एम्. ए., डी. लिट् (पॅरिस)

"ओघवती भाषा, विषय प्रतिपादनाची हातोटी व रसाळ वर्णन यांचा मनावर खोल परिणाम झाला. आदर्श चरित्रांपैकीं तें एक आहे."

—सरदार माधवराव किबे, एम्. ए., इंदूर

"आपण इतकी उत्कृष्ट मराठी भाषा लिहूं शकतां हें पाहून आनंद वाटला. पैगंबर साहेबांचें यथार्थ चरित्र व उपदेश वाचून मुसलमान व हिंदू बांधवांत पसरलेले गैरसमज नाहींसे होण्यास पुष्कळच मदत होईल."

—प्रोफेसर डॉ. शं. दा. पेंडसे, एम्. ए., पीएच्. डी., नागपूर

" यापुढें जगाचा जो एकच एक मानवधर्म होणार आहे, त्याचीं तत्त्वें पंधराशें वर्षांपूर्वी प्रतिपादन करणाऱ्या विभूतीचें चरित्र आबालवृद्ध मराठी वाचकांपुढें ठेवून तुम्हीं त्यांची चांगली सेवा केली आहे यांत शंका नाहीं."

—वि. स. खांडेकर

" ग्रंथकारानें अत्यंत परिश्रम घेऊन विषयाची मांडणी इतकी स्पष्ट व आकर्षक केली आहे कीं चरित्र वाचतांना मनास अत्यंत आल्हाद वाटतो."

—शेख अबदुल अजीझ, एम्. एस्सी. (लंडन)

" सुरुवातीपासून अखेरपर्यंत सुंदर व सुबक मराठी भाषेंत चरित्र लिहिलें आहे. लेखनशैली अतिशय उत्कृष्ट आहे."

—डॉ. अबदुल हमीद काझी, एम्. ए., पीएच्. डी. (बर्लीन)

" मोठ्या आवडीनें व काळजीपूर्वक पुस्तक वाचलें; अतिशय आनंद झाला. इस्लामधर्म म्हणजे काय आहे याची यथायोग्य कल्पना येण्यास अशा पुस्तकांची अत्यंत जरूरी आहे."

—खानबहादूर बदिउझ्झमान काझी, एम्. ए.

" चरित्रामधील अत्यंत महत्त्वाचीं प्रकरणें इतक्या बुद्धिमत्तेनें व कुशलतेनें रेखाटलीं आहेत कीं ग्रंथकाराविषयीं धन्योद्गार बाहेर पडतात."

—मौलाना इनायतउल्ला, लखनौ युनिव्हर्सिटी

" विद्वान् व सहृदय ग्रंथकार गि. अमीन यांनीं आशिया खंडांतील एका थोर तत्त्वज्ञानी सत्पुरुषाचें लिहिलेलें हें चरित्र छोटेसें पण आल्हादकारक आहे."

—मॉडर्न रिव्ह्यू, कलकत्ता

" सय्यद अमीन यांनीं पैगंबरांचें चरित्र व शिकवण उज्ज्वल स्वरुपांत आणि सुंदर मराठींत मांडलें आहे.

—नवाकाळ, मुंबई

" पैगंबरांनीं या जगांत समता व बंधुता याची शिकवण कशी दिली व अमलांत कशी आणली हें समजण्याकरितां या पुस्तकाचा अभ्यास केला पाहिजे."

—**समाचार**, मुंबई

" पैगंबर यांचें हें छोटें पण मनोरंजक चरित्र मराठींत लिहून मि. अमीन यांनीं मराठी वाचकांना ऋणी करून ठेविलें आहे. लेखक इस्लाम-धर्मीय असूनही त्यांनीं लिहिलेली मराठी भाषा अत्यंत सोपी, सोज्वल व रसाळ आहे."

**चित्रा**, मुंबई

" पुस्तकांतील कथाभाग अत्यंत स्फूर्तिजनक आहे."

—**ज्ञानमंदिर**, मुंबई

" इतक्या उदार वृत्तीनें व पूर्वग्रहरहित दृष्टीनें पैगंबर चरित्र लिहून मि. सय्यद अमीन यांनीं धार्मिक वाङ्मयांत उत्कृष्ट पुस्तकाची भर घालून महाराष्ट्रीय वाचकांस उपकृत करून ठेविलें आहे."

—**महाराष्ट्र शारदा**, मुंबई

" या चरित्रांतील ओघवती भाषा, सरळ विवेचन व भाषाप्रभुत्व पाहून मनास फार आल्हाद होतो व त्यामुळें चरित्र-नायकाच्या चारित्र्याचा पुस्तक वाचीत असतां मनावर अत्यंत इष्ट असा परिणाम होत जातो."

—**सुबोध पत्रिका**, मुंबई

" अभ्यासपूर्वक लिहिलेल्या या सविस्तर चरित्रानें मराठी वाङ्मयांत एक चांगलीच भर पडली आहे."

—**केसरी**, पुणें

" पुस्तक सुरुवातीपासून अखेरपर्यंत वाचण्यासारखें आहे."

—**क्रॉनिकल**, मुंबई

" भाषेच्या व वाङ्मयाच्या दृष्टीनीं हें पुस्तक मराठी भाषेंत बऱ्याच श्रेष्ठ दर्जाचें ठरतें."

—**प्रमोद**, मुंबई

" लेखकाची मराठी भाषा नसतांनाही पुस्तकाची भाषा इतकी सुंदर उतरली आहे कीं मराठी मातृभाषा असणाऱ्यांपैकींसुद्धां अनेक लेखकांनीं तिचा कित्ता गिरवावा."

—**प्रतिभा**, मुंबई

" हल्लींच्या अस्थिर परिस्थितींत असें पुस्तक प्रसिद्ध करून सय्यद अमीन यांनीं खरोखरीच एक महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे."

—**ज्ञानप्रकाश**, पुणें

" सदर पुस्तक लेखकानें सर्वोत्कृष्ट व सुबोध मराठी भाषेंत लिहून मराठी वाङ्मयांत एक अपूर्व भर टाकली आहे."

—**सकाळ**, पुणें

" सय्यद अमीन यांची मातृभाषा उर्दू असून शुद्ध व सुंदर मराठींत त्यांनीं हें चरित्र लिहिलें आहे हें अत्यंत भूषणावह आहे."

—**महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, पुणें

" पुस्तक अतिशय उपयुक्त झालें आहे."

—**महाराष्ट्र**, नागपूर

" मि. अमीन यांनीं हें पुस्तक लिहून मराठी वाङ्मयाच्या चरित्र विभागांत एका उत्तम पुस्तकाची भर घातली आहे."

—**निजाम विजय**, हैद्राबाद

सय्यद अमीन
यांचीं
प्रकाशनें

---

हजरत मुहम्मद पैगंबर चरित्र

इस्लाम आणि नीतिशास्त्र

अतातुर्क कमालपाशा

प्रसिद्ध हिंदी मुसलमान
( ऐतिहासिक )

प्रसिद्ध हिंदी मुसलमान
( अर्वाचीन )
भाग २